

विचार तर कराल?

नरेंद्र दाभोलकर

विचार तर कराल?

डॉ. नरेंद्र दाभोलकर

राजहंस प्रकाशन / पुणे

विचार तर कराल
डॉ. नरेंद्र दाभोलकर

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Vichar Tar Karal
Dr. Narendra Dabholkar

© डॉ. नरेंद्र दाभोलकर
द्वारा 'परिवर्तन' सहयोग हॉस्पिटल ॲनेक्स
सदर बझार, सातारा ४१५ ००१

अक्षरजुळणी
मृगार्टस्
२०१५/२ सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

मुखपृष्ठ : मिलिंद जोशी

आवृत्ती पहिली : नोव्हेंबर १९९४
आवृत्ती चौथी पुनर्मुद्रण : फेब्रुवारी २००४

ISBN 81-7434-024-6

प्रिय मुक्ता व हमीद,
विवेकशील आचाराचा वसा चालवण्यासाठी.

तुमचा
बाबा

मनोगत

अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावरील माझे हे चौथे पुस्तक.

'भ्रम आणि निरास' या पहिल्या पुस्तकात अंधश्रद्धेशी संबंधित विविध विषयांबाबतचे विवेचन होते. 'अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' या दुसऱ्या पुस्तकात लोकांच्या मनात या विषयाबाबत सतत डोकावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे होती. 'अंधश्रद्धा विनाशाय' या तिसऱ्या पुस्तकात प्रत्यक्ष चळवळीचे अनुभव कथन होते.

'विचार तर कराल' या चौथ्या पुस्तकातील प्रयत्न आणखी थोडा वेगळा आहे.

अंधश्रद्धेशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष संबंधित अनेक घटना आपल्या आजूबाजूला सतत घडत असतात. आपण त्याकडे विस्मयचकित होऊन पाहतो. काही वेळा गूढ असा शिक्का मारून मोकळे होतो तर काही वेळा असेल काही विज्ञानाच्या पलीकडचे म्हणून नतमस्तक होतो. विचार करण्याची, सत्यशोधनाची सवय आपल्याला नसते. विचार करण्याबद्दल आळस असतो, अज्ञान असते, भीती असते, 'गरज काय पडली' अशी वृत्ती असते. या चुकीच्या संस्कारामुळे आजूबाजूला अनिष्ट घडत असूनही ते आपल्याला जाणवत नाही. मग त्याचा प्रतिवाद व प्रतिकार तर दूरच राहिला. अशा घटनांच्या बद्दल 'विचार तर कराल' हे सदर मी दैनिक पुढारी व दैनिक लोकमत (मराठवाडा, नागपूर, जळगाव) या दैनिकात एकाच वेळी काही काळ चालवले. आपला दृष्टिकोन लोकांच्यापर्यंत पोचत आहे याचा प्रत्यय आला. चळवळीच्या धावपळीत पुढे हे लिखाण थांबले. त्या सदरातील काही लेखांचे सुधारणा करून पुनर्लेखन केले. चळवळीतील प्रत्यक्ष अनुभवांवरून इतर अनेक लेख वेगळेच लिहिले. प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा डोळस मागोवा हे त्यातील सूत्र कायम ठेवले. चळवळीतील कार्यकर्त्यांची याबाबतची मदत मोलाची होती.

परंतु वाचकांसाठी हे अपुरे आहे असे जाणवू लागले. विचार करण्याची जी पद्धत अवलंबावी असा माझा व आमच्या चळवळीचा आग्रह आहे ती वैज्ञानिक दृष्टी ही गेल्या चार शतकांत विकसित झालेली वैश्विक विचारपद्धती आहे. पृथ्वीतलावर मानवाची निर्मिती झाल्यानंतरच्या काही लाख वर्षांच्या इतिहासात तरी ती अभूतपूर्व आहे. विचार करण्याच्या या पायाभूत पद्धतीचे विवेचन म्हणूनच केले आहे.

विचार करू लागले, विशेषत: श्रद्धा अंधश्रद्धांच्या संदर्भात की धर्म समोर उभा ठाकतोच, आपल्या वैशिष्ट्यांसह, मर्यादांसह. धर्मबद्दल अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भूमिका काहीशी वेगळी आहे. चळवळीत असल्याने त्याबद्दल टीका-टिपणी, समज-गैरसमज बरेच होतात. आम्ही धर्म बुडवायला निघाले आहोत असा एक जोरदार आक्षेप असतो. तर आम्ही तो पुरेसा बुडवत नाही,अंगचोरपणा करतो असे दुसऱ्या काही जणांना वाटते. याबाबत भूमिका मांडणे म्हणूनच आवश्यक होते. त्यासाठी धर्मचिकित्सा

व विवेकवाद हा भाग आला.

ही मांडणी करताना अर्थातच अनेकांचे लेखन, चर्चा यांची मदत झाली. लेखनात स्वतंत्रपणे ते संदर्भ दिलेले नाहीत. परंतु बट्राँड रसेल, दि. के. बेडेकर, पु. ग. सहस्त्रबुद्धे, जयंत नारळीकर, प्रा. मे. पु. रेगे, गो. मा. पवार, प. रा. आर्डे, प्रकाश बुरूटे, प्रा. ना. वा. कोगेकर, शांताराम गरुड, अरुण टिकेकर, डॉ. विद्याधर बोरकर, डॉ. श्रीकांत जोशी, डॉ. ना. य. डोळे, श्री. वि. गो. कुलकर्णी, शरद अभ्यंकर, सुनीती सु. र. यांचा ऋणनिर्देश या दृष्टीने करणे मी कर्तव्य समजतो.

राजहंस प्रकाशनाने नेहमीच्याच आपुलकीने हे प्रकाशन केले त्याबद्दल धन्यवाद.

नरेंद्र दाभोलकर.

विचार करण्यासाठी :

वैज्ञानिक दृष्टिकोन / ८
धर्मचिकित्सा व विवेकवाद / ३४

वैज्ञानिक दृष्टिकोन

विलक्षण वेगाने विज्ञानाची दौड चालू आहे. निसर्गाचे नियम माणसाला समजू शकतात व त्या ज्ञानाचा उपयोग तो स्वत:साठी करू शकतो ही कल्पना ऐतिहासिकदृष्ट्या तशी नवीनच आहे. या कल्पनेचे डोळे दिपवून टाकणारे आणि मन विस्मित करणारे आविष्कार आपण बघत असतो. एका बाजूला अणूच्या गर्भातील कणांची संरचना व कार्य, तर दुसऱ्या बाजूला अवकाशातील प्रचंड तारकापुंज आणि सुपरनोव्हा याबद्दलची माहिती विज्ञान आपल्याला देते. अत्यंत वेगवान व महाकाय विमाने, भूस्थिर उपग्रह, इलेक्ट्रॉनिक्सच्या तंत्रामुळे आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे घराच्या खोलीत छोट्या पडद्यावर आलेले सगळे विश्व, जगभर सहजसुलभपणे पोचणारे दूरसंदेशवहन, या साऱ्यामुळे सारे जग एक छोटे गाव वाटू लागले यात शंकाच नाही. पेशीय जीवविज्ञान, प्रतिजैविके यामुळे वैद्यकीय विज्ञानात झपाट्याने प्रगती झाली. अन्नधान्याचे अधिकाधिक उत्पादन देणारी बियाणे, खते, कीटकनाशके, अत्याधुनिक शेतीपद्धती यामुळे मानवी इतिहासात प्रथमच भुकेवर विजय मिळविणे माणसाच्या शक्यकोटीत आले. संगणकशास्त्र व माहिती विज्ञानाच्या क्षेत्रात ज्या झपाट्याने रोजची दरमजल चालू आहे त्यामुळे तर आश्चर्याने तोंडात बोट घालणेही विसरून जाते.

आपल्या समाजातील विद्यार्थ्यांना अधिक चांगले विज्ञानशिक्षण मिळण्याची फार आवश्यकता आहे. ह्यातून उद्याच्या पिढीतले शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, आणि कुशल कामगार अधिक चांगले बनतील. त्याचप्रमाणे सर्वच जनतेच्या मनात विज्ञानाबद्दल विश्वास उत्पन्न होण्यास मदत होईल. आपल्या समाजात अधिक कुशल शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, इत्यादी तयार झाल्याने आपल्या औद्योगिक, शेतकी, आरोग्य, आणि एकंदरच आर्थिक प्रगतीला मदत होईल. ह्या प्रगतीच्या प्रभावाने आणि त्यातील सामान्य माणसाच्या सहभागामुळे अनेक परंपरागत कमीजास्त हानिकारक रूढी हळूहळू गळून पडू लागतील. त्यासाठी वेगळ्या अंधश्रद्धाविरोधी प्रचाराची गरज नाही, अशी आपली कल्पना होती. वस्तुस्थितीत विज्ञानाची सृष्टी चारीबाजूने हरघडीसाठी अंगणात येऊन दाखल होत असताना विज्ञानाच्या दृष्टीपासून शतयोजने दूर राहणारे आणि त्यात अभिमान मिरवणारे जनमानस हे खरे आश्चर्य आहे. अजूनही लंगोटी लावणाऱ्या आदिवासींपासून ते महानगरी मुंबईच्या गगनचुंबी इमारतीतून आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या उद्योगपतीपर्यंत आणि नुकतीच समज येऊ लागलेल्या सात वर्षाच्या बालकापासून ७० च्या परिपक्व, प्रौढ, वयस्क व्यक्तीपर्यंत धर्म, जात, लिंग, भाषप्रदेश असा कोणताही अपवाद न करता आपापल्या पातळीवर, आपापल्या सोयीनुसार अंधश्रद्धा सांभाळणारे आणि त्याचे समर्थन करणारे लोक बघितले की या अफाट प्रगतीचा मानदंड कोणता अशी बळकट शंका मनात उत्पन्न होते.

नवस करावा, तो फेडण्यासाठी कर्जबाजारी होऊन सार्वजनिक ठिकाणी पशुहत्या करावी. मेलेल्या व्यक्तीच्या पिंडाला कावळा शिवेल का याची वाट पाहत श्मशानात महत्त्वाचे तासन्‌तास वाया घालवत ताटकळत बसावे. वर्तणुकीत फरक पडल्यावर भूतबाधेची शंका घेऊन मांत्रिक वा भगताच्या आधीन व्हावे. अचानक पेटणारे कपडे, पडणारे दगड, अंगावरच्या बिब्याच्या फुल्या याला भानामतीची करामत समजून भयग्रस्त बनावे. मृतात्म्याला प्लँचेटच्या वाटीवर बोलावून प्रश्नांची उत्तरे मागावीत. आयुष्यातील सारे महत्त्वाचे निर्णय, थोतांड असलेल्या जन्मपत्रिकेच्या दावणीला बांधून, नियतीवादी बनावे. मुलगा होण्यापासून ते अखिल विश्वाचे कल्याण होण्यापर्यंतच्या विविध हेतूंसाठी अन्नधान्याची नासाडी करत दोन हजार वर्षापूर्वीचे यज्ञयागाचे स्तोम माजवावे. जातीच्या खानदानपणाच्या नावाखाली विधवाविवाहाला विरोध करावा. शरीरधर्म असणाऱ्या, मासिक पाळीत स्त्रीरोगतज्ज्ञानेही स्वत:ला अपवित्र समजावे. पावसाने ओढ घेतली तर राज्यपालाने परमेश्वराची प्रार्थना करण्याचा फतवा काढावा आणि हातातून वस्तू काढण्याचे चिल्लर चमत्कार करणाऱ्या आणि स्वत:च्या सहाय्यकालाही खुनापासून वाचवू न शकणाऱ्या कोण्या बाबाच्या पायावर राष्ट्र वाचवण्यासाठी पंतप्रधान आणि राष्ट्रपतींनी लोटांगण घालावे. ही सारी कोणत्या शतकाची चाहूल? कशाची लक्षणे ? विज्ञानयुगाचा हा ढळढळीत पराभव नेमके काय दाखवतो? तो का झाला? कां होत आहे?

माणसे अंधश्रद्धेला बळी पडतात कारण त्यांनी हरघडी आधार शोधावा असेच सामाजिक वास्तव आहे. स्वत:च्या अगतिकतेतून, शोषणातून, अस्थिरतेतून मनाला प्रासंगिक दिलासा देण्यासाठी अंधश्रद्धेचा भ्रामक पण हवाहवासा वाटणारा आधार माणसे घेणारच. परिस्थिती बदलली, आधार शोधण्याची गरज संपली वा कमी झाली की आपोआप अंधश्रद्धा कमी होतील हा नेहमी केला जाणारा युक्तिवाद तर्कशुद्ध वाटला तरी प्रत्यक्षात चित्र वेगळेच असते. आपल्या अडीअडचणीच्या काळात अंधश्रद्धेला मानवी मन कवटाळते हे खरेच, पण त्याबरोबरच आपल्या अमर्याद हव्यासाची भूक भागवण्यासाठीही अंधश्रद्धांची पाठराखण होत असते. त्यामुळे हा कधी न संपणारा खेळ बनतो. आपणाला जे हवे आहे ते मिळण्याची शक्यता, अशक्यता वा इष्टानिष्टता याचा डोळस विचार तर केला जात नाहीच, परंतु त्यासाठी बाबांचे आशीर्वाद, महाराजांची अंगठी, मांत्रिकाचे मंत्रतंत्र, शुभमुहूर्त, जप, अनुष्ठाने, यज्ञयाग, या कार्यकारणभावाला संपूर्ण सुट्टी देऊन करावयाच्या उपाययोजनांचा फोलपणाही त्यांना जाणवत नाही. याचे खरे कारण हेच की या सगळ्यांमध्ये काडीचाही तथ्यांश नाही, अशी परखड सत्य वैज्ञानिक जाणीव कधी निर्माण झालेलीच नसते. या उलट 'असेल बाबा काहीतरी आपल्याला न समजणारे' अशीच मानसिकता तयार केलेली असते. जोपासली जाते. वैज्ञानिक जाणिवांचा सगळा इतिहास हा हे न समजलेले समजून घेण्याचा प्रवास आहे.

आदिम अवस्थेतील माणूस निसर्गलीला विस्मयचकित होऊन पाहत होता. मेघांचा कानठळ्या बसवणारा गडगडाट, विद्युल्लतेचा थरकाप उडवणारा चमचमाट आणि

कडकडाट, धुवांधार कोसळणारा पाऊस, जंगलेच्या जंगले बेचिराख करत जाणारे वणवे, होत्याचे नव्हते करून सोडणारा वादळवारा हे सारे त्या मानवाच्या आकलनाच्या बाहेरचे होते. या साऱ्या फार महान शक्ती आहेत आणि त्यांच्या कृपाप्रसादावरच आपले आयुष्य अवलंबून आहे, या जाणिवेतून या व्यक्तींना पंचमहाभूतांचे वा पंचमहादेवतांचे स्थान मिळाले. या साऱ्या निसर्गलीलांशी टक्कर देऊ इच्छिणारा माणूस हा एका अर्थाने पृथ्वीवरचा सर्वात दुबळा प्राणी होता. तो गुहेमध्येच रहात होता आणि कच्चे मांसच खात होता. त्याला चिमणीप्रमाणे उडता येत नव्हते, की माशाप्रमाणे पाण्यात राहता येत नव्हते. त्याला वेगाने पळून जाण्यासाठी हरणासारखे बळकट पाय नव्हते. प्रतिकार करण्यासाठी काळवीटासारखी शिंगे नव्हती, गेंड्यासारखी प्रचंड ताकद वा हत्तीसारखे सुळे निसर्गाने बहाल केलेले नव्हते. वाघ - सिंहासारखी तीक्ष्ण नखे व दात या देणगीचा त्याच्याजवळ अभाव होता. चावऱ्या थंडीत स्वत:चा बचाव करू शकणाऱ्या अस्वलासारखी केसाळ कोटाची सोय किंवा या झाडावरून त्या झाडावर अलगद उडी मारण्याची माकडाची क्षमता यापैकी काहीही त्याच्याकडे नव्हते. तरीही हा दुबळा वाटणारा माणूस एका अर्थाने जगाचा स्वामी बनला ही किमया कशाची होती?

ज्ञान हा माणसाचा खास विशेष आहे. इतर प्राण्यांनी पर्यावरणाशी जुळवून घेतले; मानवाने स्वामित्व मिळवले. ही सारी प्रगती हजारो पिढ्यांची आहे. पकड घेता येईल, अशी रचना असलेल्या स्वत:च्या हाताने आणि निर्माण केलेल्या विविध हत्यारांनी आजूबाजूच्या निसर्गावर प्रक्रिया करता करता माणसाचा मेंदू विकसित झाला. माणसाने भाषा निर्माण केली, जोपासली, वाढवली. उत्क्रांत स्वरयंत्र व मुखपोकळी हे मानवाचे खास वेगळेपण. माणसाने ज्ञानार्जनच केवळ केले नाही, तर भाषेच्या आधारे केलेले ज्ञान संक्रमण हे माणसाचे अभूतपूर्व वैशिष्ट्य मानावे लागेल. हाताचा व हत्यारांचा वापर, भाषेची निर्मिती आणि तर्कबुद्धीचा विकास या आधारे गरुडझेपेसाठी माणसाची पूर्वतयारी झाली.

विज्ञान म्हणजे मूलत: ज्ञानसाधना होय, ज्ञानाचा अखंड शोध होय. इंग्रजीमधील सायन्स या शब्दाला मराठी प्रतिशब्द विज्ञान असा आहे. सायन्स हा शब्द लॅटिन भाषेतील 'सायेन्सिया' या शब्दापासून तयार झाला आहे. सायेन्सिया या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञानाबद्दल अगदी शुद्ध स्वरूपात प्रेम हीच विज्ञानाची प्रेरक शक्ती होय. सृष्टीबद्दल कधीही न संपणाऱ्या कुतूहलातून विज्ञानाचा जन्म झाला. विश्वातील नाना क्रिया, अनेक घटना, प्रगट होणारे आविष्कार, अस्तित्वात असणाऱ्या विविध वस्तू या साऱ्याबाबत माणसाच्या मनात अपार कुतूहल असते, होते. आकाशाचा आणि सागराचा रंग निळाच का असतो? फुलपाखरांच्या अंगावर इतके रंग कुठून येतात? समुद्रावर लाटा का तयार होतात? आणि भरती-ओहोटी कशामुळे होते? नुसत्या डोळ्यांनी आकाशातील किती तारे मोजता येतील? सूर्योदयापूर्वी तांबडे का फुटते? सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी सूर्यबिंब इतरवेळेपेक्षा मोठे का दिसते? काजवे रात्री का चमकतात? डास का गुणगुणतात? स्टेनलेस स्टील आणि प्लॅस्टिक म्हणजे काय?

एक ना दोन अक्षरश: अगणित प्रश्न कुतूहलाच्या शमनासाठी नव्या ज्ञानाच्या शोधात माणसाच्या मनात सतत उभे राहत असतात. ही जिज्ञासा तृप्त होताच त्याला मनस्वी आनंद होतो, समाधान लाभते. आनंदप्राप्तीसाठीची धडपड ही माणसाची एक सहजप्रवृत्ती मानावयास हवी.

विज्ञानाचे मूळ ऐतिहासिकदृष्ट्या माणसाला लाभलेली बौद्धिक देणगी व मनुष्याच्या अंगातील पारंपरिक कारागिरी किंवा कौशल्य यामध्ये स्पष्ट होते. व्यावहारिक अनुभव व व्यक्तीच्या अंगातील निसर्गदत्त कसब, कौशल्य याची साठवण एका पिढीतून दुसऱ्या पिढीत होत असते आणि त्याचा पिढ्यान्‌पिढ्या विकासही होत आला आहे. माणसाचे अस्तित्व पृथ्वीवर सुरू झाल्यापासूनची काही लाख वर्षे माणसाची अवस्था पूर्णत: रानटीच होती. ढोलीत वा गुहेत लपणे, फळे वा शिकार रोजच्या रोज मिळविणे व खाणे, मृत जनावराची कातडी वा झाडाच्या सालीने स्वत:चे शरीर झाकणे असे त्या काळातील त्याचे जीवन होते.

सुमारे आठ हजार वर्षांपूर्वी मनुष्याने शेतीला प्रारंभ करून स्वत:चे अन्नधान्य निर्माण करायला व स्थिर जीवन जगायला सुरुवात केली. कापूस, लोकर यांपासून वस्त्र विणून तो स्वत:चे शरीर झाकू लागला. दगडाचा वापर करून ओबडधोबड घरे बनवू लागला. लोखंड, लाकूड, चिकणमाती याचा वापर करू लागला. अग्नीच्या वापराने अन्न शिजविणे, लाकडी ओंडक्यांची पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहतूक करणे, शिडीच्या बोटीने वाऱ्याच्या साहाय्याने प्रवास करणे याची हळूहळू सुरुवात झाली. विश्वविषयक काही प्राथमिक कल्पना व विश्वात कार्य करणाऱ्या अज्ञात शक्ती या संबंधीच्या कल्पनाही याच काळात अस्तित्वात आल्या. तर्कनिष्ठ विचारांचा अवलंब करून नैसर्गिक घटनांच्या आविष्काराचे कारण शोधण्याचे काम या काळात मुख्यत्वेकरून तत्त्वज्ञांकडून होई व व्यवहारात आढळणाऱ्या व अनुभवास येणाऱ्या गोष्टींचाच आधार घेण्याची प्रवृत्ती कारागिरात आढळून येई. मात्र या दोन्हीचा मिलाफ घडवून आणण्याचे तुरळक प्रयत्नही होत असत.

माणसाने तर्क केले ते अनेकदा चुकले देखील. ग्रहणकाळात रानात राहणारा हा माणूस जोरजोराने ढोल बडवत असे. जंगली श्वापदे जशी ढोलाच्या आवाजाने पळतात तसेच सूर्याला गिळावयाला आलेल्या दुष्ट शक्ती याही ढोलाच्या आवाजाने पळून जातील असे त्याला वाटत असे. जात्यावर दळण दळताना येणाऱ्या घरघरीपेक्षा प्रचंड आवाज आकाशातील ढगाकडून होतो म्हणजे आकाशात कोणी मोठे जाते फिरवित दळण दळत बसला असणार असे त्याचे तर्कशास्त्र होते. सारथ्याने उगारलेला चाबूक जसा क्षणभर चमकतो तसे क्षणभरच तळपणारी आकाशातील विद्युल्लता ही इंद्रदेवाच्या रथाच्या सारथ्याच्या हातातील चाबकाचा फटकारा असणार हे त्याला सहज स्वाभाविक वाटे. कालपर्यंत शहाणा असणारा माणूस आज अचानक बेभान झाला वा विक्षिप्त वागू लागला तर त्याला कोणी अदृश्य पिशाच्च शक्तीने झपाटले असणार हा तर्क त्याला पुरेसा व पटणारा वाटला. कोणतीही ज्ञानसाधना करताना प्राथमिक पायरीवर ज्या ढोबळ

चुका होतात तसेच हे होते. उद्याच्या अचूकतेसाठी काहीसे अटळही होते. अत्यंत सीमित ज्ञानाच्या कक्षेत यापेक्षा वेगळे स्फुरणे वा दिसणे अवघड होते.

कुतूहल व गरज यापोटी ज्ञाननिर्मिती वाढत राहिली. शेतीला उपयोगी पडणारे पंचांग तयार करण्यासाठी आकाशातील ग्रहगोलांचा अभ्यास चालू झाला. इजिप्त देशात नाईल नदीला पूर येऊन गाळ सर्वत्र पसरत असे आणि पेरणीला उत्तम अनुकूलता निर्माण होत असे. आकाशात विवक्षित तारा विवक्षित जागी तळपण्याचा काळ व नाईल नदीला येणारा पूर यामध्ये निश्चित संबंध असल्याचे खगोल निरीक्षण करणाऱ्यांना आढळून आले आणि शेतीसाठी सर्व प्रकारची सिद्धता ठेवण्याची पूर्वसूचना इजिप्शियन शेतकऱ्याला त्याआधारे देण्यास त्यांनी सुरुवात केली. वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासामागे औषध निर्मितीचा उद्देश होता. रसायनशास्त्राचा अभ्यास करून माणसाला अमरत्व मिळवून देणारे अमृत आणि हीन धातूचे सोन्यात रूपांतर करण्याची किमया हस्तगत करणे याची ओढ होती.

भारतापुरता विचार केला तरी ख्रिस्ती सनाच्या तिसऱ्या व चौथ्या शतकात नागार्जुन या विख्यात रसायनतज्ज्ञाचे 'रसरत्नाकर' व 'काल्कपुटतन्त्रम्' हे ग्रंथ प्रसिद्ध होते. गंधक, पारा, तांबे, चांदी, सोने, यांपासून तयार करण्यात येणाऱ्या रासायनिक संयुगांची माहिती व उपयोग त्यात वर्णिले आहेत. अर्थात त्याबरोबर या ग्रंथात गुह्यमंत्र, जादूक्रिया, किमया याबद्दलचेही उल्लेख आहेत. विख्यात भारतीय ज्योतिर्विद वराहमिहीर हा देखील याच काळात होऊन गेला. त्याच्या 'बृहत् संहिता' या ग्रंथात सूर्य व इतर ग्रहांची माहिती सापडते. याच दरम्यान होऊन गेलेल्या अमरसिंग या कोशकाराने वनस्पती व प्राणी या सजीवांच्या सवयी, वैशिष्ट्ये, जननप्रकार याची काळजीपूर्वक निरीक्षणे नोंदवून त्यांची वर्गवारी करण्याचा प्रयत्न केला आहे. शून्याचा शोध भारतात लागला. आर्यभट्ट व भास्कराचार्य यांच्या ग्रंथात गणिते व खगोलशास्त्र यावरील महत्त्वाचे सिद्धांत आढळतात. मात्र इसवीसनाच्या ८व्या शतकाच्या अखेरीपासून भारतात गुरोर्वाक्य प्रमाणम् ही प्रवृत्ती वाढली आणि ज्ञान मिळवण्याची प्रवृत्ती कमी झाली.

ही सारी आधुनिक विज्ञानाचा उदय होण्यापूर्वीची माणसाची कमाई आहे. निरीक्षण, तर्कशुद्ध विचार व प्रयोग या आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर होण्यात दोन अडथळे प्रामुख्याने होते. पहिली अडचण ही की, कुशल कारागीर असलेल्या व्यवहारी व कृतिशील व्यक्तीमध्ये तर्कशुद्ध विचार व त्यासाठीची सम्यक दृष्टी यांचा अभाव असे. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे नैसर्गिक घटनांबद्दलच्या माणसाच्या कल्पना त्या काळात बहुदा अस्पष्ट व डळमळीत तरी असावयाच्या, नाहीतर पूर्वग्रहदूषित तरी. विज्ञानाची रचना बुद्धागम्य असते. त्याचा गाभा इंद्रियाद्वारे येणारी वस्तुनिष्ठ प्रचिती हा असतो. इसवीसनाच्या पंधराव्या शतकात व त्या पूर्वीच्या काळात युरोपात राजा व धर्ममत यांना संमत असणाऱ्या मतावर विज्ञान अवलंबून होते. त्यामुळे वैज्ञानिक प्रगती तर खुंटलीच पण निसर्गाबद्दल कित्येक चुकीच्या कल्पना समाजात रूढ झाल्या. उदा. पृथ्वी ही विश्वाच्या मध्यभागी आहे. देवाकडून मानवाची निर्मिती झाली. दिवसा माणसाला

प्रकाश मिळावा व रात्री शीतल चांदणे मिळावे यासाठी सूर्यचंद्राची झुंबरे आकाशात लटकविली आहेत, वगैरे त्या काळातले विज्ञान हे श्रद्धाधिष्ठित होते. विज्ञानाचा समन्वय हा एका बाजूला चर्चतर्फे सांगण्यात येणाऱ्या धर्मग्रंथांच्या ज्ञानाबरोबर तर दुसरीकडे चर्चची मान्यता असलेल्या आणि सर्वश्रेष्ठ ज्ञानी म्हणून गौरविलेल्या ॲरिस्टॉटलच्या मताबरोबर घालण्याचा आग्रह धरला जाई. त्यामुळे विज्ञानाला काहीशा बौद्धिक स्वरूपाच्या कसरतीचे स्वरूप प्राप्त होई. उदा. ॲरिस्टॉटलच्या मताप्रमाणे एखाद्या नैसर्गिक आविष्कारामागे चार कारणे असत. त्यामध्ये तो अखेरचे कारण (फायनल कॉज) व कार्यक्षम कारण (एफिशियंट कॉज) या दोघांचा अंतर्भाव करी. कार्यक्षम कारण म्हणजे ज्याला आपण कारण म्हणतो ते आणि अखेरचे कारण म्हणजे त्यामागचा 'हेतू'. बहुतेक वेळा हा हेतू धर्मग्रंथाच्या मांडणीशी सुसंगत असावा याची दक्षता घेतलेली असे.

हा काळ मागे पडून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रारंभ युरोपमध्ये सोळाव्या शतकाच्या दरम्यान झाला असे मानण्यात येते. परंतु तपासणीची विकसित यथायोग्य अचूक पद्धत हे त्याचे केवळ एक रूप आहे; त्याचा गाभा आहे. प्रस्थापित मताला स्वत:च्या प्रज्ञेने निर्भयपणे आव्हान देण्यात आणि त्यासाठी मृत्युदंडापर्यंतच्या सोसाव्या लागणाऱ्या सर्व हालअपेष्टा हसतमुखाने स्वीकारण्यात. त्याची सुरुवात होते इ.स. पूर्व ३९९ साली अथेन्स नगरीच्या लोकसभेत सॉक्रेटिसवर चालवलेल्या अभियोगापासून. 'अखिल राष्ट्राला मान्य असलेल्या देवता हा मानत नाही. रूढ नीतीपासून तरुणांना च्युत करतो' असे आरोप सॉक्रेटिसवर ठेवण्यात आले होते. वास्तविक सॉक्रेटिस देव मानत नव्हता असे नाही पण प्रत्येकाने आपल्या विवेकबुद्धीच्या निकषावर कोणतेही तत्त्व, देवाचे अस्तित्त्वसुद्धा, पारखून पाहावे असे तो सांगत असे. ज्ञान हा मोठा सद्‌गुण व अज्ञान हा अत्यंत घातक दुर्गुण हा विचार तो आपल्या शिष्यांना सांगे. गूढ दैवी शक्तीचा म्हणजे देवांच्या वचनाचा आधार नीतिकल्पनांना आवश्यक नाही. ऐतिहासिक, सामाजिक अनुभवांवरून नीतिनियम ठरवावे असा त्याचा आग्रह होता. बुद्धीचा निकष लावल्याबरोबर प्रस्थापित ज्ञान व नीतितत्त्वे यावरची श्रद्धा ढळणे अपरिहार्यच होते. सनातनी लोकांच्या मते आणि समाजधुरिणांच्या मतेही याचा अर्थ पाखंड माजवणे असाच होता. सॉक्रेटिसला न्यायालयासमोर खेचण्यात आले आणि विषाचा प्याला रिचवण्याची शिक्षा फर्मावण्यात आली. आपल्या विवेकबुद्धीचा आवाज व आग्रह कायम ठेवण्यासाठी सारे स्वजन आणि समाज यांच्याविरुद्ध उभे राहण्याचे हे धैर्य ज्या समाजात ज्या प्रमाणात प्रगटले त्या त्या प्रमाणात अंधश्रद्धेची जोखडे झुगारणे आणि विज्ञानाची कवाडे उघडणे त्या त्या जनजीवनात शक्य झाले. आपल्या मतासाठी मृत्यू पत्करावयाची ही संस्कृती सॉक्रेटिसने प्रथम जगात आणली. सॉक्रेटिसची ही परंपरा मध्यंतरी काही शतके लुप्त झाली होती आणि त्याबरोबरच युरोपची प्रगतीही कुंठित होऊन बसली होती. जगातील देशांचा इतिहास हेच दाखवितो की स्वतंत्र चिंतन, अवलोकन, अनुभूती व त्याआधारे ज्ञान यांना ज्या प्रमाणात ज्या क्षेत्रात अवसर मिळतो त्या प्रमाणात त्या क्षेत्रात समाजाचा उत्कर्ष

होतो; हे स्वतंत्र चिंतन, संशोधन थबकलेला काळ हा त्या देशाच्या संस्कृतीच्या तमोयुगाचा असतो. चौथ्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत युरोपची हीच स्थिती होती.

वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या बौद्धिक साधनसामग्रीबरोबरच यासाठी स्वत:च्या जिवाची बाजी लावून समाजाची अशी मानसिक तयारी करण्याचे काम सातशे वर्षांपूर्वी युरोपमध्ये सुरू झाले. त्यामधूनच प्रबोधनाची (रेनेसाँ) पहाट त्यांना पाहता आली. पण तोही संघर्ष जीवघेणा आणि दीर्घकाळ होता. रॉजर बेकन (१२१४-१२९४) विद्यार्थी असतानाच 'ॲरिस्टॉटलचे वचन, त्याचे सिद्धांत, प्रयोग करून पाहिल्याशिवाय मी मानणार नाही,' असा पीळ तो दाखवू लागला. 'सत्यज्ञान हे धर्मग्रंथावरून मिळत नाही, ते अंधश्रद्धेने प्राप्त होत नाही, ते फक्त बुद्धी व स्वानुभव, चिंतन, प्रयोग यांनीच प्राप्त होते.' असे तो सांगू लागला. तो स्वत: फ्रान्सिस्कन पंथाचा धर्मगुरू असल्यामुळेच केवळ त्याच्या पंथाच्या धर्माचार्यांनी त्याला देहदंडाऐवजी आजन्म अंधारकोठडीची कनवाळू सजा दिली. जगाला ज्ञानकिरणांनी उजळून टाकण्याची इच्छा धरणाऱ्या या ज्ञानी पुरुषाला मृत्यूपर्यंत चोवीस वर्षे अंधारकोठडीत काढावी लागली. आपल्याकडे मात्र चार्वाक, बुद्धानंतर पाश्चात्यविद्येचा प्रभाव निर्माण होईपर्यंत मधल्या दोन हजार वर्षांत 'विचार तर कराल' असा पुकारा करत स्वत:च्या हौतात्म्याने जनमानसाला जाग आणण्याचे प्रयत्न झालेच नाहीत. कारागिरी, परंपरेने चालत आलेले ज्ञानाचे झरे आटत गेले व त्याची खंत खेदही उरला नाही. 'कोणाच्या पंक्तीला बसावे, कोणाच्या पंक्तीला बसू नये, चातुर्मासात कांदा खावा की खाऊ नये, गंध उभे लावावे की आडवे, जानवे किती पदरी घालावे, गायीचा शेपटा तोंडावरून फिरवले की पुण्य मिळते का गोमूत्र प्राशन केल्याने आत्मा उद्धरून जातो हेच वादविवादाचे मुख्य विषय बनले. या घटापटादी चर्चेत, निरर्थक कर्मकांडात, विवेकशून्य रूढीत, शोषणप्रधान धर्मात, जनमानस निपचित पडून राहिले. काही अलौकिक कर्तृत्वाचे राजे वा तत्त्वज्ञानाचे ग्रंथ एवढीच या काळात आमची कमाई राहिली. त्याच काळात गॅलिलिओच्या शोधामुळे, संशोधनामुळे आणि त्याला रोकडा आधार देणाऱ्या, त्याने शोधून काढलेल्या दुर्बिणीमुळे युरोपचे विचारविश्व आवर्तात सापडले होते.

गॅलिलिओ कोपर्निकसच्या मतांना सज्जड पुष्टी देत होता. धर्मग्रंथाचे प्रामाण्य प्रश्नचिन्हांकित करत होता. ॲरिस्टॉटलचे सांगणे प्रयोगाच्या कसोटीवर पारखून घेत होता. दुर्बिणीचा शोध लावून त्याने जणू उत्पातच घडविला होता. शुक्राला चंद्रासारख्या कला असतात ही गोष्ट आपल्या सिद्धांताच्या सत्यतेसाठी आवश्यक आहे हे कोपर्निकसला माहीत होते. ते सिद्ध न करता आल्याने युक्तिवाद त्याच्या विरोधी जात होता. गॅलिलिओने दुर्बिणीनेच हे दाखवून दिले; चंद्रावर पर्वत आणि सूर्यावर डाग असल्याचे दाखवले. लोकांना हे धक्कादायक वाटू लागले आणि धर्ममार्तंडांच्या छातीत धडकी भरली. हे मान्य करणे म्हणजे जगन्नियंत्याच्या कार्यात दोष आहे असा होऊ लागला. कॅथॉलिक विद्यापीठातील शिक्षकांना सूर्यावरील डागांचा उल्लेख करण्यास बंदी घालण्यात

आली. ही बंदी काही विद्यापीठात कित्येक शतके चालू होती. भूमिती हे सैतानाचे शास्त्र आहे आणि गणितशास्त्रज्ञ हे सर्व प्रकारच्या पाखंडी मताचे प्रणेते असल्याने त्यांना हद्दपार केले पाहिजे असे उद्‌गार काढणाऱ्या धर्मोपदेशकाला बढती देण्यात आली होती. शेवटी निर्णय करण्यासाठी ख्रिस्ती धर्माच्या न्यायसभेने खगोलशास्त्रज्ञ हा विषय चर्चेला घेतला आणि बायबलमधील काही वचनांच्या आधारे, अनुमानपद्धतीने स्वत: दोन महत्त्वाचे निष्कर्ष काढले.

"सूर्य हा अगदी मध्यावर असून तो पृथ्वीभोवती फिरत नाही हा शास्त्रज्ञांचा पहिला सिद्धांत मूर्खपणाचा, अविचाराचा, धर्मशास्त्राच्या दृष्टीने खोटा आणि पाखंडी मताचा आहे, कारण तो पवित्र धर्मशास्त्राच्या उघड उघड विरुद्ध आहे. पृथ्वी मध्यावर नसून ती सूर्याभोवती फिरते हा दुसरा सिद्धांत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने खोटा आणि खऱ्या धर्मश्रद्धेच्या विरुद्ध आहे."

त्यानंतर पोपने गॅलिलिओला धार्मिक न्यायसभेसमोर हजर राहण्याची आज्ञा केली. न्यायसभेने त्याला त्याने केलेल्या प्रमादाचा त्याग करण्याचा आदेश दिला. फेब्रुवारी २६ इ. स. १६१६ रोजी गॅलिलिओने या आदेशाप्रमाणे कोपर्निकसची मते स्वीकारणार नाही, त्याचा लेखी वा तोंडी प्रचार करणार नाही असे शपथपूर्वक सांगून आपली सुटका करून घेतली. ब्रुनोला जिवंत जाळल्यानंतर अवघ्या सोळा वर्षांत ही घटना घडली.

यानंतर पोपच्या आदेशाने 'पृथ्वी फिरते' सांगणारी सर्व पुस्तके 'निषिद्ध ग्रंथांच्या यादीत' टाकण्यात आली.

तरीही गॅलिलिओ आशावादी होता. १६२३ साली त्याचा मित्र कार्डिनल बेबेरिनी हा 'आठवा अर्बन' ही बिरुदावली धारण करून पोपपदावर आरूढ झाला. त्यामुळे थोडी सुरक्षितता वाटून 'जगातील दोन महान सिद्धांतांवर चर्चा' हे पुस्तक गॅलिलिओने लिहावयास घेतले. या पुस्तकात त्याने 'टॉलेमी' व 'कोपर्निकस' या शास्त्रज्ञांच्या दोन सिद्धांतांच्या मध्ये ग्रहगोलांच्या भ्रमणाचा प्रश्न वरकरणी अनिर्णित ठेवला असला तरी वस्तुत: सबंध पुस्तकात कोपर्निकसच्या सिद्धांताचा जोरदार पुरस्कार केला होता. तो उत्कृष्ट ग्रंथ युरोपमध्ये मोठ्या औत्सुक्याने वाचला गेला.

धर्ममार्तंड पुन्हा खवळले. गॅलिलिओवर सक्तीचे मौन लादले गेले. "पृथ्वी फिरत असल्याचे मत हे सर्वप्रकारच्या पाखंडी मतांत अत्यंत तिरस्करणीय, अत्यंत दुष्प्रवृत्त आणि गर्हणीय आहे. पृथ्वीच्या अचलत्वाची कल्पना तिप्पट पवित्र आहे. एकवेळ आत्म्याच्या अमरत्वाविरुद्ध, परमेश्वराच्या अस्तित्वाविरुद्ध व त्याच्या मानवी अवताराविरुद्ध केलेले युक्तिवाद क्षम्य ठरतील, पण पृथ्वी फिरते हे सिद्ध करणारा युक्तिवाद क्षम्य ठरणार नाही." अशी जोरदार मोहीम गॅलिलिओच्या प्रतिपादनविरोधात उघडली गेली.

गॅलिलिओला रोमच्या धार्मिक न्यायसभेसमोर हजर राहण्याचा पुन्हा एकवार हुकूम सुटला. आजारपणामुळे फ्लारेन्झापासून रोमपर्यंतचा प्रवास झेपणार नाही ही गॅलिलिओची नम्र विनंती नाकारण्यात आली. मित्र असलेल्या पोपने आरोपीची प्रकृती तपासण्याकरता स्वत:चा वैद्य पाठवण्याची व त्याचा आजार बळावला असल्याचे सिद्ध न झाल्यास

त्याला साखळदंडाने जेरबंद करून आणण्याची धमकी दिली. गॅलिलिओ स्वत:च रोमला पोचला. तेथे न्यायसभेच्या बंदीशाळेत त्याची रवानगी करण्यात आली. खरेतर देहान्त प्रायश्चित्तच मिळावयाचे पण दयाळूपणे सुनावण्यात आले, ' तू चुका कबूल केल्यास आणि पश्चात्ताप पावल्यास तुला आमच्या मर्जीस येईल तिथपर्यंत पवित्र न्यायसभेच्या तुरुंगात दिवस काढण्याची सौम्य शिक्षा फर्मावण्यात येईल. आणि एक हितकारक देहदंड म्हणून पुढील तीन वर्षे धर्मग्रंथातील सात पश्चात्ताप निदर्शक प्रार्थना दर आठवड्यास पठण करण्याची आज्ञा देण्यात येईल.'

चुका कबूल केल्या तरच ही सौम्य शिक्षा अमलात येणार असल्याने गॅलिलिओने जमिनीवर गुडघे टेकून न्यायसभेने तयार केलेली लांबलचक जंत्री जाहीररीत्या म्हणून दाखविली आणि म्हणाला, "मी या चुकांचा व पाखंडी मतांचा त्याग करतो. ती तिरस्करणीय मानतो आणि अशी शपथ घेतो की मी याउलट माझ्याविषयी शंका निर्माण होईल असे काहीही लेखी वा तोंडी बोलणार नाही, अथवा ठामपणे मांडणार नाही. पृथ्वी फिरते आहे या मताचा पुरस्कार करणारा कोणी पाखंडी भेटल्यास आपण त्याचा न्यायसभेसमोर निषेध करू." स्वत:च्या विचाराचा त्याग केल्याची शपथ बायबलवर हात ठेवून त्याने घेतली. नंतर उदार न्यायसभेने त्याला उरलेले आयुष्य तुरुंगात न काढता एकांतवासात व मौनव्रतात काढण्याची परवानगी दिली. गॅलिलिओच्या सर्व हालचालींवर निर्बंध घालण्यात आले. त्याची त्याच्या कुटुंबीयांशी वा मित्रांशी भेट होऊ दिली नाही. तो १६१७ साली अंधळा झाला आणि १६४२ साली मरण पावला.

परंतु शेवटी विज्ञानाची पहाट झालीच. एक समर्थ आणि यथार्थ ज्ञानप्राप्तीचा एकमेव मार्ग म्हणून जगभर वैज्ञानिक दृष्टिकोन पुढे आलाच. त्यामुळे सर्व प्रश्नांची उत्तरे ताबडतोब मिळतात असा दावा कोणीच करत नाही. पण वैज्ञानिक मार्गाने योग्य कार्यकारणभाव समजतो, प्रश्नांचे आकलन होते, उपाय शोधण्याची दिशा अचूक राहते आणि आज न गवसलेले उद्या याच मार्गाने पुढे जाऊन मिळेल ही सर्वाधिक शक्यता राहते.

विज्ञान विषयाचे शिक्षण देणे, विज्ञान तंत्रज्ञान वापरणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेणे व रुजविणे या अगदी भिन्न आणि परस्पर संबंध नसणाऱ्या घटना झाल्याचे आजचे दृश्य आहे. विज्ञान शाखेतील पदवीधर स्त्री- पुरुषांच्या वर्तनावरूनही हे दिसून येते. आणि काही जण आपल्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग अवैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी करतात.

नैसर्गिक घटनेचा तर्कशुद्ध विचार करावयाचा, त्याला अनुभव व प्रयोगाची जोड द्यावयाची याची सुरुवात १६ व्या शतकापासून झाली. यासाठी शक्य तेवढ्या प्रमाणात घटनेवर नियंत्रण ठेवण्याचा वैज्ञानिकाचा प्रयत्न असतो. अनुभव व तर्क यांच्या आधारे केलेल्या प्रयोगाधिष्ठित काटेकोर वाटचालीतून विज्ञान निर्माण होते. काही जण विज्ञानाची व्याख्या विशेष ज्ञान अशी करतात परंतु ज्ञान या कल्पनेत केवळ तर्कशुद्ध विचाराच्या आधारे मिळवलेली माहिती व काढलेले निष्कर्ष यांचा अंतर्भाव होतो. उलट विज्ञानात

तर्कशुद्ध वस्तुनिष्ठ विचाराबरोबरच त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात किंवा प्रयोगातून पडताळा पाहून मगच जरूर ते निष्कर्ष काढणे, नियम मांडणे या दोघांचा अंतर्भाव होतो.

यामधून विश्व, विश्वाची रचना, उत्पत्ती, विकासप्रक्रिया त्यातील मानवाचे स्थान याकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन प्रचलित होतात. ते मुख्यत: ज्ञेयवादी व अज्ञेयवादी या गटांत विभागले जातात. वैज्ञानिक दृष्टिकोन हा ज्ञेयवादी गटातील दृष्टिकोन आहे. भौतिकवाद, इहवाद ही त्या आधारावर प्रतिपादन करण्यात आलेली तत्त्वज्ञाने आहेत. याउलट अध्यात्मवाद, देववाद, दैववाद ही अज्ञेय गटातील तत्त्वज्ञाने आहेत. समाजमानस व शिक्षणपद्धतीही आज याच तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखाली आहे.

अनुभवाचा अर्थ लावण्याची कुवत निर्माण करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे व अंधश्रद्धा निर्मूलन करणे. अनुभवाचा अर्थ लावणे म्हणजे त्याची गोळाबेरीज वा सरासरी नव्हे तर नैसर्गिकरीत्या अनुभवात खूप गुंतागुंत असते ती सोडवून शुद्ध स्वरूपात अनुभव घेणे, याला प्रतिभा लागते. उदा. दगड व पीस एकाच उंचीवरून सोडल्यास दगड लगेच व पीस हळूहळू तरंगत खाली येते. हवेचा रोध काढल्यास ते दोन्ही एकाच वेळी जमिनीवर पोचतील. हे समजण्याची अपवादात्मक प्रतिभा एखाद्याकडेच असणार. परंतु आज केवळ प्रतिभासंपन्न व्यक्तीपुरतेच मर्यादित असलेले ज्ञान उद्या सामान्य विज्ञान होते. हीच वैज्ञानिक दृष्टिकोनाची महती आहे.

अनुभवाच्या ढिगाऱ्यातून शक्यतो गणिती सूत्रमय भाषेत सार काढणे, त्या सूत्रावर संस्कार करून नवीन ज्ञान हस्तगत करणे ही फक्त माणसाचीच खुबी आहे. त्या आधारे ज्ञान सर्वत्र जाते. ज्ञानार्जन व त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ज्ञानसंक्रमण हे माणसाचे अभूतपूर्व वैशिष्ट्य आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन या ज्ञानप्राप्ती व ज्ञान संक्रमणासाठी पायाभूत महत्त्वाचा आहे.

भारत सरकारने ४ मार्च १९५८ ला शास्त्रीय धोरणविषयक ठराव तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने मंजूर केला. त्यातील महत्त्वाचा भाग असा; 'वैज्ञानिक दृष्टिकोन व शास्त्रीय ज्ञान यांचा उपयोग करूनच समाजातील प्रत्येकाला भौतिक सुविधा देता येतील. संस्कृतीची वाढ व प्रसार याबाबत विज्ञानाने अभूतपूर्व योगदान केले आहे. पूर्वी जे अशक्य वाटत होते ते आज शक्य झाले आहे ते विज्ञानाच्या नेतृत्वामुळेच.... विज्ञानाने विचार करण्याची नवी साधने दिली व मानवी बुद्धिची क्षितिजे मोठ्या प्रमाणात विस्तीर्ण केली. विज्ञानाने जीवनाच्या मूलभूत मूल्यांवर प्रभाव टाकला आहे व संस्कृतीला एक नवा जोम, नवी गतिशीलता प्राप्त करून दिली आहे. १९७५ साली इंदिरा गांधींनी घटनादुरुस्ती करून नागरिकांची मूलभूत कर्तव्ये हा भाग त्यात समाविष्ट केला. (विभाग ४ अ कलम ५१ अ) या कर्तव्यांच्या यादीत शास्त्रीय दृष्टिकोनाचा, मानवतावादी विचारांचा विकास करणे, चौकस बुद्धी वाढविणे यासाठी मनोवृत्ती सजग ठेवणे हे भारतीय नागरिकांचे प्रमुख कर्तव्य मानले आहे. १९८७ साली राजीव गांधींच्या नव्या शैक्षणिक धोरणात वैज्ञानिक दृष्टिकोन हा शब्द आग्रहाने आला.

मात्र याबरोबरच एक भान कटाक्षाने बाळगावयास हवे विज्ञान म्हणजे जादू नव्हे. सर्व प्रश्न विज्ञानाने सुटतील असे म्हणणे म्हणजे परमेश्वराच्या जागी विज्ञान शब्द घालणे होय. प्रश्न समाजातील व्यक्तीनेच सोडवायचे असतात. वैज्ञानिक दृष्टिकोन त्याचा योग्य मार्ग दाखवितो. याबरोबर विज्ञान लोकप्रिय करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे याही वेगळ्या बाबी आहेत याची समज हवी. उदा:- सौरशक्तीचा वापर दैनंदिन जीवनात वाढविणे हितकारक आहे आणि त्या प्रकल्पाचे वा त्यातील यंत्राचे नारळ फोडून वा काळी बाहुली आणि लिंबू टांगून उद्घाटन करणे हे वैज्ञानिक दृष्टिकोन विरोधी आहे. मात्र विज्ञान लोकप्रिय करणे हा वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यातील एक भाग होऊ शकतो. संशोधनाचा परिणाम परिसरावर झाला तर त्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यास मदत होते.

ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची पद्धत म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन. ज्ञान आत्मसात करण्याची एक विशिष्ट पद्धत विज्ञानाच्या प्रगतीसोबतच इतिहासातून तयार झाली आहे. धार्मिक श्रद्धा ही माणसातील एक मूलगामी व बळकट प्रेरणा आहे यात शंका नाही पण त्याचप्रमाणे चिकित्सक विचार करण्याची शक्तीही माणसाला आहे. व्यवहारातले निर्णय घेताना माणूस हिचाच सतत उपयोग करतो. साधक बाधक दृष्टीने शक्य तेवढ्या समग्रतेने विचार करून व्यवहार केला नाही तर तो फसतो. वैज्ञानिक विचारपद्धती म्हणजे हीच साधकबाधक विचारपद्धती पण व्यावहारिक निर्णय घेण्यास हिचा वापर होत नाही. सत्य काय आहे, निसर्गातील पदार्थाचे स्वरूप काय आहे, घटना कोणत्या नियमांना अनुसरून पडतात त्याचा शोध घेण्यासाठी तिचा वापर होतो. अर्थात घटना ज्यांना अनुसरून घडतात ते नियम पदार्थांच्या आणि घटनांच्या दृश्य स्वरूपावरुन सहज हुडकून काढता येतील असे नसतात. ते खोल असतात. त्याचा शोध घेण्यासाठी श्रेष्ठ दर्जाची कल्पकता, अनुमानशक्ती आवश्यक असते. जेव्हा प्रतिभावान शास्त्रज्ञ असा शोध लावतो तेव्हा त्याची मांडणी ज्या पुराव्यावर आधारित असते तो पुरावा, आणि त्यापासून तार्किक अनुभवाने काढलेले निष्कर्ष, या स्वरूपात तो करतो. तो शोध अमान्य करावयाचा तर या पुराव्याला आव्हान द्यावे लागते किंवा अनुमानात दोष आहे हे दाखवावे लागते. नाहीतर तो शोध प्रमाण म्हणून स्वीकारावा लागतो. यामुळे वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब करून प्रस्थापित झालेल्या वैज्ञानिक सिद्धांताशी धार्मिक श्रद्धेला जुळवून घ्यावे लागते. वैज्ञानिक विचारपद्धतीवर आधारलेले ज्ञान जेव्हा युरोपिअन समाजात स्थिर झाले तेव्हा धार्मिक श्रद्धा अस्थिर झाली किंवा ओसरायला लागली असे नाही, पण धार्मिक श्रद्धेचे क्षेत्र आणि वैज्ञानिक विचारपद्धतीचे क्षेत्र यांची परस्पर सुसंगत आखणी झाली. माणसाला ज्यांचे निरीक्षण करता येते असे पदार्थ व घटना यांचा मिळून निसर्ग बनतो. या नैसर्गिक पदार्थांचे स्वरूप आणि नैसर्गिक घटनांचे नियम यांचा वैज्ञानिक पद्धतीला अनुसरून शोध घेणे हे विज्ञानाचे कार्यक्षेत्र आहे. तेथे धर्मश्रद्धेला वाव नाही.

विज्ञान दृष्टीची काही वैशिष्ट्ये आहेत.

१. कोणत्याही अधिकारी व्यक्तीने सांगितले म्हणून वा ग्रंथात लिहिले म्हणून खरे मानणे चूक आहे. सत्याचा अंतिम निकष म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण वा निरीक्षण. कितीही थोर व्यक्तीने कोणत्याही ग्रंथसंभाराचा दाखला देऊन अग्नी शीतल आहे असे सांगितले तर ते मानता येत नाही असे आदिशंकराचार्यांनी केलेले प्रतिपादन आहे. युरोपमध्ये पाहिले तर मध्ययुगीन विचारसरणी व आधुनिक विज्ञानाची विचारसरणी यामध्ये हा महत्त्वाचा प्रामाण्याचा फरक जाणवतो. मध्ययुगीन तत्त्ववेत्त्यांना बायबल, कॅथॉलिक पंथांची तत्त्वे जवळजवळ तितक्यातच प्रमाणात ॲरिस्टॉटलची वचने ही सर्व वादातीत वाटत होती. या लोकांनी, ग्रंथांनी आपल्या भरमसाट तर्कवितर्काच्या आधारे अनुल्लंघनीय अशा वैचारिक सीमारेषा उभारल्या होत्या. सत्याचा शोध घेण्यासाठीही त्यांचे उल्लंघन करण्यास मनाई होती. धर्म व विज्ञान यातील खरा झगडा शब्द व ग्रंथ प्रामाण्य व प्रत्यक्ष निरीक्षण यातील होता. मान्यवर वचने प्रमाण न मानता त्यांना आपल्या इंद्रियाचा कौल लावावा असे विज्ञान सांगत होते. आवश्यक ते निरीक्षण करावयास तयार असलेल्या कोणाही व्यक्तीला स्पष्ट बोध होऊ शकेल अशा वस्तुस्थितीवर आधारलेली ही तत्त्वे होती. या नवीन पद्धतीला एवढे अमाप व व्यावहारिक यश लाभले की धर्मशास्त्राला विज्ञानाशी तडजोड करावी लागली.

२. विश्व विशिष्ट नियमांनी बद्ध आहे. ह्या नियमांचे ज्ञान प्रयोग, तर्क व पडताळा ह्या पद्धतीने मिळते. विज्ञानाचा विषय असणारे भौतिक जग माणसाच्या जाणिवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे, ते निश्चित अशा नियमबद्ध प्रक्रियेमधून बदलत असते. या जगाला हे जे स्वयंभू अस्तित्व आहे, नियमबद्धता, गतिमानता आहे ती बाहेरच्या कोणत्याही ईश्वरी शक्तीमुळे लाभलेली नाही तर तिचे स्पष्टीकरण या जगातील वस्तू, घटना यांच्या व्यापारातूनच शोधायला हवे. माणूस या जगाचा भाग आहे. त्याच्या जाणिवेला जगाचे ज्ञान होण्याची क्षमता आहे. ही क्षमता कोण्या ईश्वराच्या कृपेमुळे त्याला येत नाही तर त्याच्या व्यवहाराचे स्वरूपच असे आहे की त्याला ती येते. माणसाच्या ज्ञानाच्या सत्यतेचा निकष व्यवहारात पडताळणी हाच असू शकतो; दुसरा कोणताही निकष त्याला लागू शकत नाही. प्रायोगिक पद्धत, गणिताचा वापर, घटनांचा कार्यकारणभाव शोधणे ही आधुनिक विज्ञानाची वैशिष्ट्ये गॅलिलिओने प्रस्थापित केली. त्यानेच शोधलेल्या दूरदर्शक व सूक्ष्मदर्शक यंत्रांमुळे त्याचे प्रतिपादन प्रत्ययकारी बनले. या बदलामुळे ज्ञानातच केवळ वाढ झाली नाही, तर विश्वरचनेच्या कल्पनेतच बदल झाला. त्याबरोबर मनोवृत्तीतच स्थित्यंतर झाले. गॅलिलिओपासून विश्व हे यंत्र मानले जाऊ लागले. त्या रचनेचे छोटे छोटे भाग करून त्याचे जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्याची विशेषकरणाची प्रक्रिया सुरू झाली. अंतिम प्रश्न सोडवण्याचा दावा न करता मर्यादित प्रश्नांचे अधिकाधिक अचूक ज्ञान ही प्रक्रिया विज्ञानाची असते. या सृष्टीचे काही नियम

असावेत असे माणसाला बराच काळ वाटत होते परंतु ते नियम धार्मिक वा नैतिक नसून भौतिक आहेत हे कळण्यास गॅलिलिओचे संशोधन व वैज्ञानिक दृष्टिकोन उपयोगी पडला. कार्यकारणभाव वाढत्या गतीने स्पष्ट होऊ लागले.

३. पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू नाही. मानवासाठी हे विश्व निर्माण झालेले नाही. कोणत्याही सुष्ट वा दुष्ट शक्तीच्या प्रार्थनेतून विश्वातील कार्यकारणभावाच्या नियमात काहीही फरक पडत नाही. विश्वनिर्मितीचा हेतू ही कल्पना विज्ञानाला मान्य नाही. "या विश्वातील चराचर वस्तुमात्र आणि प्राणिमात्र याची निर्मिती केली आहे, केली जात आहे. त्याचा कोणी ना कोणी कर्ता आहे; तो या निर्मिती प्रक्रियेच्या बाहेरून ती घडवत आहे. तिचे नियंत्रण करत आहे, ती चालविणे वा थांबविणे हे केवळ त्याच्या हाती आहे. त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्या मागे त्या शक्तीचा काही हेतू आहे." या कल्पनांचा त्याग वैज्ञानिक दृष्टिकोनातून अपेक्षित आहे. ही सारी प्रक्रिया अंतर्गत घटकांच्या संयोगातून व संघर्षातून उत्क्रांत होत असते. हे सूत्र वैज्ञानिक दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे.

४. वैज्ञानिक दृष्टिकोन हा, अंतिम व श्रेष्ठ ज्ञान बुद्धीच्या सातत्याने प्राप्त होत नसून साक्षात्कार वा अतींद्रिय अनुभवांच्या द्वारा प्राप्त होतं, ही तत्त्वज्ञान व धर्मविचारातील श्रद्धा साफ नाकारतो. साक्षात्कारी ज्ञान श्रेष्ठ मानण्याचा एक दुष्परिणाम असा होतो की वस्तू व घटना यांच्याबद्दल शास्त्रीय व वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करून घेण्याचा आग्रह समाजातील बुद्धिमान लोकांत राहत नाही. दुसराही एक लोकशाही विघातक परिणाम होतो. साक्षात्कारी ज्ञान हे सर्वांनाच प्राप्त होऊ शकत नाही. ती एक विशेष प्रकारची सिद्धी आहे असे मानले जात असल्याने समाजात ज्ञानी, अधिकारी पुरुष व सर्वसामान्य भक्तगण असे दोन वर्ग तयार होतात. सर्वसामान्यांना वैयक्तिक साक्षात्काराच्या अभावी, परंपरेने चालत आलेल्या अधिकारी पुरुषाने निरूपण केलेल्या ज्ञानाचा स्वीकार करणे हाच एकमेव मार्ग उरतो. बुद्धिगम्य ज्ञान गौण ठरल्याने भौतिक घटनांचे अनुभवसिद्ध निरीक्षण व कार्यकारणभाव निश्चिती याकडे दुर्लक्ष होऊ लागते. विज्ञानाच्या उत्कर्षाला आवश्यक अशी मनोभूमिकाच तयार होत नाही.

५. वैज्ञानिक दृष्टिकोनाची सिद्धता करण्यासाठी करावयाच्या प्रयोगात प्रयोगाच्या परिस्थितीवर पूर्ण ताबा असतो. अज्ञेय शक्ती आपोआप काही घडवून आणतील यावर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विश्वास नसतो. वैज्ञानिक सत्याच्या बाबतीत काटेकोर तपासणी नंतर एक जरी अपवाद केला तरी पत्त्याचा बंगला कोसळावा तसा विज्ञानाचा डोलारा कोसळून पडतो. एखाद्या सत्यसाईबाबाच्या मोकळ्या हातात जर आपोआप अंगारा वा अंगठी निर्माण होऊ लागली तर ती घटना संपूर्णपणे अवैज्ञानिक ठरेल. अन्यथा विज्ञानाचे ज्ञात नियम ओलांडणारी अद्‌भुत शक्ती आपणाकडे आहे हे सत्यसाईबाबा वा त्याप्रकारे चमत्कार करणाऱ्या अन्य कोणाही बाबास सिद्ध करावे लागेलं.

६. विज्ञान हे सार्वजनिक असते. वैज्ञानिक सत्य सर्वांसाठी खुले असते. ज्या कोणाला त्याविषयी कुतूहल असते त्याला ते तपासून घेता येते. वैज्ञानिक दृष्टिकोनाला मताभिनिवेश (डॉगमॅटिझम्) मंजूर नसतो. कारण मताभिनिवेशाचे स्वरूप व्यक्तिनिष्ठ असते आणि त्याचा पाया पूर्वग्रह हा असतो. श्रद्धाधिष्ठित मत वैयक्तिक स्वरूपाचे असते असे वैज्ञानिक दृष्टिकोन मानतो. वैज्ञानिक दृष्टिकोन एखाद्या आविष्काराचा खुलासा वा आकलन करू शकतो, परंतु तो वस्तुनिष्ठ असतो; व्यक्तिनिष्ठ नसतो. ज्वाला हे तेजाचे रूप आहे म्हणून ज्वाला सूर्याच्या म्हणजे तेजाच्या दिशेने झेपावतात असे वैज्ञानिक दृष्टिकोन कधी म्हणत नाही. उलट विज्ञान सांगते की अग्नी म्हणजे प्रकाश व उष्णता या स्वरूपात बाहेर पडणारी ऊर्जा असून तिची निर्मिती हवेतील ऑक्सिजन व ज्वालाग्राही पदार्थ यांच्या संयोगातून घडते.

७. विज्ञान हे नेहमीच नम्र असते. मी सांगितलेला शब्द शेवटचा, माझा निष्कर्ष अंतिम असा दावा विज्ञान कधीही करत नाही. मला सर्व काही समजले आहे, विश्वाचे कोडे उलगडले आहे, सर्व ज्ञान प्राप्त झाले आहे, आता फक्त माझ्या आदेशाचे पालन करा असे धर्म सांगतो. विज्ञानाचे मत, वस्तू, घटना तपासावयाच्या, न समजलेल्याचा शोध चालू ठेवायचा. व्यवहार मात्र सिद्ध झालेल्या सत्याच्या आधारेच करावयाचा असे असते. शास्त्राचे प्रत्येक गृहीतक हे स्वत:ला तपासून घेण्याच्या आणि त्यामध्ये कसाला उतरले नाही तर नष्ट होण्याच्या निर्भयतेने उभे असते. शास्त्रज्ञांचे कौतुक ते बरोबर आहेत यासाठी करावयाचे नसते; तसे ते कोणालाच शक्य नसते. त्यांनी काही मूलभूत मांडण्याचा सर्जनशील प्रतिभाशाली प्रयत्न केला यासाठी करायचे असते. अनेक व्यक्तींच्या अतिशय मौलिक योगदानानंतरही शास्त्र मात्र वस्तुनिष्ठच असते. न्यूटनचे अपुरेपण आईनस्टाईन मांडू शकतो. त्यामध्ये न्यूटनचा अधिक्षेप नसतो. आणि त्या दोघांच्याही मर्यादा उद्या आणखी कोणी सिद्ध केल्यास त्यामुळे त्या दोघांचाही अपमान होत नाही. त्यांचे सिद्धांत सत्यशोधनार्थ तपासण्याची कोणालाही परवानगी असते. विज्ञानाचे सर्व सिद्धांत हे सदैव कसोटी घेण्यासाठी खुले असतात.

कितीही प्रगती झाली तरी सर्व काही समजले असा दावा विज्ञान कधीही करत नाही. नवे प्रश्न सदैव तयार असतात. नवी क्षितिजे खुणावत असतात.

न्यूटनच्या गती व गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा इतिहास या दृष्टीने पाहण्यासारखा आहे.

न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचा जम बसून कित्येक दशके उलटल्यानंतर खगोलशास्त्रज्ञांच्यासमोर एक पेचप्रसंग उभा राहिला. युरेनस ग्रहाची भ्रमंतीची कक्षा न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताप्रमाणे आखली जात नव्हती. त्यात थोडे बदल होत होते. सिद्धांताचे भाकीत आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांच्या या तफावतीमधून तीन पर्याय उभे राहिले. १) सिद्धांत चुकीचा आहे २) निरीक्षणात गफलत आहे ३) सिद्धांत आणि निरीक्षण दोन्ही बरोबर असून त्यांच्यात मेळ साधायला आणखी काही नव्या गोष्टी

विचारात घ्यायला पाहिजेत. न्यूटनचा सिद्धांत चूक असे म्हणणे अवघड होते. अनेक वर्षांची अनेक ठिकाणची निरीक्षणे असल्यामुळे दुसरा पर्यायही लागू पडत नव्हता, तर मग तिसऱ्या पर्यायाला आवश्यक अशी नवीन माहिती कुठली? यावर इंग्लंडमधील जॉन ॲडम्स आणि फ्रान्समधील लेव्हेरिये या दोघांनी भाष्य केले की युरेनस जवळ एक नवीन ग्रह असून त्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे युरेनसची कक्षा बदलते. वेगवेगळ्या मार्गांनी गणिते मांडून दोघांनी सांगितलेला हा निष्कर्ष नंतर खरा ठरला. तो नवीन ग्रह नंतर सापडला त्याला नेपच्यून हे नाव देण्यात आले.

नेपच्यूनच्या शोधामुळे न्यूटनच्या सिद्धांताला निश्चित बळकटी आली पण पुढे पुन्हा पेचप्रसंग निर्माण झाला. अनेक दशकांच्या वेधानंतर बुधाच्या भ्रमणकक्षेत अशीच तफावत दिसू लागली. लेव्हेरियेने पुन्हा पूर्वीचा उपाय सुचविला. बुधाहूनही सूर्याच्या निकट व्हत्कन नावाचा नवा ग्रह असून तो बुधाची कक्षा बदलतोय असा दावा त्याने केला. पण व्हत्कनचे अस्तित्व दिसून आले नाही. बुधाच्या भ्रमणाबाबतची निरीक्षणे अनेक शास्त्रज्ञांनी अनेक देशांत घेतलेली होती व ती एकमेकांशी जुळती होती. म्हणजे पर्याय राहिला न्यूटनचा सिद्धांत चूक ठरवण्याचा. पण जर न्यूटनचा सिद्धांत चुकीचा म्हटला तर बरोबर सिद्धांत कुठला?

हा प्रश्न १९१६ पर्यंत अनुत्तरित राहिला. त्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या आइनस्टाईनच्या व्यापक सापेक्षतेच्या सिद्धांताला या तफावतीची योग्य कारणमीमांसा करता आली. न्यूटनच्या सर्व यशस्वी प्रयत्नांना हे एक अपयश भारी ठरले. पण त्यामुळे न्यूटनचा अपमान झाला असे कोणी मानले नाही. त्यानंतर अनेक वेगवेगळ्या निरीक्षणांनी न्यूटनपेक्षा आइनस्टाईनच्या सिद्धांताला मान्यता दिली. अर्थात विज्ञानाच्या कार्यपद्धतीप्रमाणे जोपर्यंत त्या सिद्धांताला कुठल्या नवीन रहस्याचा उलगडा करताना अपयश येत नाही तोपर्यंतच ही मान्यता टिकून राहील.

आपल्या इंद्रियांना जाणवणारे, निरीक्षण करता येणारे जे विश्व आहे त्या पलीकडचे 'आध्यात्मिक' असे काही अस्तित्वात नाही हा जडवादाचा विचार मानवी संस्कृतीत प्राचीन काळापासून होता. इंद्रिय अनुभवाच्या पलीकडचे अस्तित्व मानणारी अध्यात्मवादी विचारधाराही प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेच. वैज्ञानिक विचारपद्धतीचा अवलंब करून प्राप्त झालेले व तार्किकदृष्ट्या चोख असलेले वैज्ञानिक ज्ञान जेव्हा स्थिर झाले तेव्हा जडवादाला बळकटी आली. निसर्गातील पदार्थांची घडण, निसर्गात घडणाऱ्या घटना या काही सामान्य नियमांना अनुसरून निश्चित होतात. त्या नियमांना अपवाद नसतात. अनुभव व कल्पक तर्क यांच्या साहाय्याने आपल्याला ते शोधून काढता येतात. अशी निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी वैज्ञानिक ज्ञान प्रस्थापित झाल्यावर स्थिर झाली. निसर्गापलीकडे असे काही अस्तित्व वा शक्ती आहे हे मानायला पुरावा नसल्याने जडवादी मताला पुष्टी मिळाली. विज्ञान स्थिर झाल्यावर धार्मिक श्रद्धेचे क्षेत्र मर्यादित झाले व धार्मिक श्रद्धा अमान्य करणारे जडवादी तत्त्वज्ञान मान्यता पावले. निसर्गातील पदार्थांचे स्वरूप, निसर्गापलीकडच्या पदार्थांचे स्वरूप आणि निसर्गापलीकडच्या

आध्यात्मिक अस्तित्वाचे स्वरूप या दोन्ही विषयीची सत्ये प्रगट करणाऱ्या एकसंध धार्मिक श्रद्धेचे प्रामाण्य नष्ट झाले. ही एक सांस्कृतिक, वैचारिक क्रांती होती.

याचे माणसाच्या व्यवहारावरही परिणाम झाले. पंधराव्या, सोळाव्या शतकापर्यंत युरोपातील खेड्यांतून चेटकिणींना सर्रास जाळत. कोंबड्या मरू लागल्या, गाय दूध देईनाशी झाली, मुले अचानक दगावली तर गावातील एखादी वृद्ध, मान हलणारी म्हातारी, तिचे मानेचे लटलट हलणे, तोंडातल्या तोंडात बोलणे हे चेटकिणीचे मंत्र पुटपुटणे समजून चेटूक करण्याचा आरोप तिच्यावर ठेवत. न्यायाधीशासमोर पुराव्यासह शाबीत करून तिला जाळत. सतराव्या शतकापासून युरोपमध्ये हे थांबले याचे कारण कोंबड्या का मरतात हे लोकांना समजू लागले आणि म्हणून त्यांनी चेटकिणीला जाळावयाचे सोडून दिले असे नाही. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस लुई पाश्चर यांच्या संशोधनानंतर या कारणाचा उलगडा झाला. पण निसर्गात जे इष्ट, अनिष्ट घडते ते सामान्य नियमांना अनुसरून घडते; तेथे चमत्कार, जादूटोण्याला स्थान नाही; एखाद्या गोष्टीचे कारण आपल्याला माहीत नसले तरी तिचे काही नैसर्गिक कारण असते ही दृष्टी सुशिक्षित युरोपियन न्यायाधीश व इतर लोकांत दृढ झाली.

वैज्ञानिक दृष्टिकोन कसा विकसित होतो?

मनात प्रश्न तयार होणे वा अंकुरणे यापासून सुरुवात होते. आजूबाजूला निसर्ग, समाज, मानवी कृती हे सारे नजरेस येताना माणसाच्या मनात असंख्य प्रश्न येतात. माणूस नावाच्या प्राण्याचे लक्षण म्हणून सांगता येईल एवढा हा विशेष महत्त्वाचा आहे. काय? कसे? का? हे प्रश्न या घटनांच्याबाबत माणूस स्वत:लाच सतत विचारत गेला आणि त्याची उत्तरेही शोधत गेला. एका उत्तरानंतर आणखी अनेक प्रश्न निर्माण होत गेले आणि त्यातूनच विज्ञानाची आजची अफाट प्रगती निर्माण झाली.

निरीक्षणातून प्रश्न पडणे आणि त्याच्या उत्तरासाठी आणखी निरीक्षणे करणे हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पाया. उकळत्या किटलीवर ठेवलेले झाकण पुन्हा-पुन्हा उडून खाली पडते हे निरीक्षण आणि त्याला आतून कोण ढकलते हा प्रश्न; जहाजाच्या डेकवर उभे राहिल्यावर समोर अथांग निळा सागर आहे आणि वर निळे आकाश. दोन्हीचा रंग निळाच हे निरीक्षण आणि असे का हा रामन यांना पडलेला प्रश्न; चर्चमध्ये हेलकावे खाणारा लोंबता दिवा हे गॅलिलिओचे त्यांच्या मनात उठलेले प्रश्नतरंग यापासून सुरुवात होते. निरीक्षणाने माहिती गोळा केल्यावर जमा झालेल्या गोष्टींची वर्गवारी व संगतवार मांडणी करावी लागते. प्रश्न उपस्थित केले जातात. झाडावरून सुटलेले फळ खाली पडते तसेच वेगवेगळ्या उंचीवरून खाली सोडलेल्या वेगवेगळ्या आकाराच्या, वजनाच्या वस्तू खाली कशा पोचतात याचे निरीक्षण नोंदवावे लागते. 'पुरावा' तयार होऊ लागतो. तो जास्तीत जास्त निर्दोष होण्याची गरज असते. पुरावा गृहीत धरून कधीही चालत नाही. ॲरिस्टॉटलच्या शब्दावर विसंबून एकाच वेळी खाली टाकलेल्या जड पदार्थांपैकी जड पदार्थ लवकर खाली येतो व हलका उशिरा खाली येतो असे शिकवले जात होते. याला पुरावा काय? यासाठी प्रत्यक्षात तुलनेने जड व हलकी

वस्तू एकाच वेळी खाली ते केव्हा पोचतात याचे निरीक्षण करण्याची गरज ना ॲरिस्टॉटलला वाटली ना त्याच्या शिष्यांना. ॲरिस्टॉटलने असेही ठाम विधान केले होते (म्हणजे पुरावा गृहीत धरला होता) की बायकांना पुरुषांपेक्षा कमी दात असतात. हे विधान ना स्वत:च्या दोन बायकांचे दात प्रत्यक्ष मोजून त्याने कधी तपासले, ना ते शिकवणाऱ्यांनी पुराव्यासाठी स्वतंत्र निरीक्षणे करून त्याची सत्यता पडताळली. याबरोबरच अनेक पुरावे धर्मग्रंथ, धर्माचार्य यांच्या आधारावर गृहीत धरले जातात. उदा : स्वर्ग नरक, पाताळ, पुनर्जन्म वगैरे. या गोष्टी पडताळून घेण्याची सोय नाही आणि म्हणून पुरावा म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवणे श्रेयस्कर नाही. असा कल्पित पुरावा जसा मानता येत नाही तसेच आत्मनिष्ठ पुरावाही ग्राह्य धरता येत नाही. स्वत:चा विकार, भावना, पूर्वग्रह इत्यादी बाबतचा आत्मनिष्ठ अनुभव वा निरीक्षण याला पुरावा समजता येत नाही.

एखाद्या व्यक्तीला पडलेला प्रश्न तिच्या आजूबाजूच्या कोणाला वा तिच्या आधीच्या कालातील व्यक्तींनाही पडला असणे शक्य आहे. त्या प्रश्नाशी संबंधित इतरांच्या व स्वत:च्याही निरीक्षणाचा विचार म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. इतरांचे पुरावे लक्षात घ्यावे लागतात. त्यांचे सामर्थ्य व मर्यादा तपासावी लागते. सद्यप्रश्नांच्या वर्तमानाची या सर्व प्रयत्नांशी सांधेजोड करून वस्तुनिष्ठ दृष्टिकोन तयार होण्यास प्रारंभ होतो. या टप्प्यावर काहि प्रश्नांची उत्तरे हाती लागतात तर काही जास्त आव्हानात्मक आहेत हे समजते.

प्रश्न आव्हानात्मक असला की माणूस त्यात गुंतून राहतो. विचारचक्रे स्वत:चा वेग घेतात. शक्य कोटीतील उत्तरांच्या काही दिशा त्यातून हाती येतात. 'न्यूटनच्या डोक्यावर फळ पडले आणि त्याला गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला' हे विधान म्हणूनच फार अपुरे आहे. गतीविषयक अनेक घटना निसर्गात अनुभवास येत असतात. ग्रह विवक्षित कक्षेतून फिरत असतात. वर टांगलेला दगड आपोआप खाली येत असतो.

अशा अनेक घटनांतून निर्माण झालेले प्रश्न मनात फेर धरून नाचत असतात. उत्तराची दिशा दिसायला पडलेले फळ निमित्तमात्र ठरते. हे आव्हानात्मक प्रश्न न पडणाऱ्यांच्या डोक्यात फळच काय धोंडे जरी पडले तरी गुरुत्वाकर्षणाचे नियम, गतीविषयक नियम त्यांना स्फुरणार नाहीत. ही पायरी वैज्ञानिकाला कलावंताप्रमाणे सर्जनशील बनवते. शक्य कोटीतील उत्तराच्या ज्या दिशा हाती येतात त्यांची अंतर्गतरित्या सुसंगत मांडणी केली की गृहीतक उपपत्ती तयार होते. प्रतिभावंत वैज्ञानिक असे सामान्य विधान कल्पितो की ज्यातून विविध सत्रे निष्पन्न व्हावीत; त्याच सामान्य विधानाला उपपत्ती म्हणतात.

संचित ज्ञानाच्या विरोधात जेव्हा एखादी उपपत्ती जात असेल तेव्हा त्या विसंगतीचे नेमके स्वरूप असे उपपत्ती मानणाऱ्यांना जोखावे लागते. तसेच उपपत्ती नेहमी खरे ठरेल असे नाही म्हणून त्याचा पडताळा पाहणे आवश्यक असते. एखाद्या घटनेचा उलगडा एकापेक्षा अधिक उपपत्त्या मांडून होत असेल तर कोणते गृहीतक जास्त विश्वसनीय? यासाठी नवी माहिती मिळवावी लागते, नवे प्रयोग केले जातात. यातून

विज्ञानाचा विकास होतो. प्रकाश हा कणांचा बनलेला आहे अशी न्यूटनची उपपत्ती होती. त्याच्या आधारे प्रकाशरेषेचे सरळ रेषेत जाणे व परावर्तनाचे नियम सिद्ध करता येत होते. हायगेन या वैज्ञानिकाने प्रकाश लहरीस्वरूप असा सिद्धांत मांडला. यातला खरा कोणता? यंग नावाच्या वैज्ञानिकाने प्रयोग केला. त्या प्रयोगातून जी निरीक्षणे मिळाली ती न्यूटनच्या कण सिद्धांताने सिद्ध होत नव्हती. हायगेनची उपपत्ती स्वीकारली गेली.

ज्ञान आत्मसात करण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा शेवटचा टप्पा म्हणजे उपपत्ती ते सिद्धांत (थिअरी) हा प्रवास. अनेक उपपत्त्यांपैकी एखादी उपपत्ती सिद्धांताच्या पायरीवर पोचत असते. प्रयोगाच्या भट्टीतून उपपत्ती तावून सुलाखून निघते. गतीचे नियम माहीत असले की पृथ्वीवरून उड्डाण केलेले यान चंद्रावर केव्हा, कोठे पोचेल याचे निदान करता येते. वैद्यकशास्त्रातील नियमांच्या आधारे रोगनिदान करता येते मात्र प्रयोगाच्या मर्यादा या सिद्धांताच्याही मर्यादा ठरतात. त्या मर्यादांमध्ये ते सिद्धांत न सत्य असते. उदा. : न्यूटनच्या गतिविषयक नियमाने ग्रह, तारे, गाड्या, खेळणी अशा गोष्टीसंबंधी स्पष्टीकरण देता येते. अवकाशात सोडावयाच्या उपग्रहांच्या गतीची गणितेही मांडता येतात पण इलेक्ट्रॉनिक्ससारख्या मूलकणांच्या गतीची भाकिते करण्यास ते नियम असमर्थ असतात.

धार्मिक तत्त्व व वैज्ञानिक सिद्धांत यात फरक असा की धार्मिक तत्त्वात एक चिरंतन आणि निर्विवादपणे निश्चित अशा सत्याचा समावेश असल्याचा दावा करण्यात येतो. याउलट विज्ञान हे नेहमीच तात्पुरत्या अशा स्वरूपाचे असते. परंतु प्रगत शास्त्रात सामान्यत: हे बदल थोडी अधिक अचूकता संपादन करण्यापुरतेच आवश्यक असतात. सामान्यपणे सुस्थिर झालेली उपपत्ती पूर्णपणे त्याज्य ठरत नाही. अधिक योग्य उपपत्तीमध्ये ती अंतर्भूत केली जाते. ती अधिक समावेशक उपपत्ती पारखण्यात येते. म्हणूनच वैज्ञानिक ज्ञानात प्रगती होते.

हा प्रवास झाला की पडलेला प्रश्न व केलेले निरीक्षण येथपासून प्रारंभ झालेला प्रवास त्या संदर्भात संपलेला असतो. एक सत्य हाती गवसलेले असते. ज्ञान अमर्याद असल्याने सद्यकालीन ज्ञानाच्या मर्यादेतच खरे असणारे हे सत्य असते.ते त्रिकालाबाधित वा अंतिम सत्य नसते. तरीही संपूर्ण मानवाच्या ज्ञानाची क्षितिजे त्यामुळे काकणभर विस्तारली जातात. त्यातून पुन्हा नवे प्रश्न खुणावू लागतात आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे पुन्हा प्रवास पहिल्या पायरीपासून सुरू होतो.

आपल्या समाजात आज घडीला वैज्ञानिक दृष्टिकोन नाही. समाजातील कमालीची निरक्षरता हे त्याचे एक (एकमेव नव्हे) महत्त्वाचे कारण आहे. शिक्षणामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याला मदत होते. आज ही अपेक्षा पूर्ण होत नसली तरी ही अपेक्षा ठेवण्यात गैर नाही; नव्हे, शिक्षणाचे ते एक महत्त्वाचे उद्दिष्टय आहे. भारतातील ४९% जनता निरक्षर आहे आणि त्याबरोबरच विज्ञानविन्मुखता व अंधश्रद्धा याची स्वाभाविक बळी आहे. एकूण लोकसंख्येच्या १० तें १२ टक्के संख्या १७ ते २३

वयोगटात म्हणजे उच्चशिक्षण घेण्याच्या वयात आहे. या वयोगटातील ८ ते १० कोटी व्यक्तींपैकी ३० ते ४० लाख म्हणजे फक्त चार टक्के विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळतो. बाकीच्या अफाट संख्येला शैक्षणिक गळती वा निरक्षरता याची शिकार व्हावे लागते. निरक्षरतेसाठी दारिद्रय, सोयी-सुविधा न पोचलेल्या भागात वास्तव्य, जातिव्यवस्था व स्त्री असणे ही चार महत्त्वाची कारणे आहेत. त्यावर मात करण्याच्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजावा आणि विज्ञानाभिमुखता वाढावी याला समाजात यश का येत नाही याची ही महत्त्वाची कारणे दूर करण्यासाठी व्यापक समाजपरिवर्तनाची गरज या वस्तुस्थितीतून स्पष्ट होऊ शकेल. परंतु ज्यांना शिक्षणाचा लाभ मिळतो त्यांच्यामधूनही वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होत नाही ही दुसरी बाजूही विचार करावयास लावणारी आहे. युवक वा कुमार गटातील मुलांच्यावरचे आजचे संस्कार कोणते आहेत? शिक्षणात विज्ञान असले तरी त्यामध्ये चिकित्सक व संशोधनात्मक अंग कमी व कमजोर आहे. धर्मात मानले गेलेले सर्वश्रेष्ठ आहे. आपली जात श्रेष्ठ वा कनिष्ठ आहे. यशापयश परमेश्वराच्या हाती, मुहूर्त, पूजन, आशीर्वाद, देव-दैव, अवतार, वर-शाप, पाप-पुण्य, इहलोक-परलोक, स्वर्ग-नरक, तीर्थ-प्रसाद, पूजा-अर्चा, प्रार्थना-उपासना, गतजन्म-पुनर्जन्म, कर्मविपाक अशा अनेक अवैज्ञानिक कल्पना आजच्या शिक्षकांच्या मनात व संस्कारात बळकट आहेत व त्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये त्या संक्रमित होत असतात. अगदी सहजपणे या कल्पना शिकवल्या जातात. त्याकरिता खर्ची पडणारी प्रतिभा ही कुशलतेच्या श्रेणीतील समजण्यात येते. सोमवार शंकराचा, मंगळवार देवीचा, बुधवार विठोबाचा, गुरुवार दत्ताचा, शुक्रवार पुन्हा देवीचा, शनिवार मारुतीचा, रविवार ज्योतिबाचा असे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येते. विष्णूला पांढरी व गणपतीला लाल फुले आवडतात हे कळल्यावर विज्ञानाच्या जिज्ञासेचे फूल उमलण्याची शक्यताच उरत नाही.

अगदी लहानपणापासून मुलांच्यात चौकस वृत्ती जोपासण्याचा प्रयत्न हवा. आपल्याकडे नेमके त्याच्या उलट आहे. पाठ्यपुस्तकात भरपूर अभ्यासक्रम असतो आणि तो कसा उरकावयाचा इकडे शिक्षकांचे लक्ष असते. सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो, म्हणजे नक्की काय होते हे सांगितले जातच नाही. मुलांच्या डोक्यात शेकडो कुतूहलाचे भुंगे असतात. न संपणाऱ्या प्रश्नांची अखंड मालिका असते. सदा सतेज अशी अथक जिज्ञासा असते. त्यांच्या या वृत्तीतून शिक्षक वा पालकांवर प्रश्नांचा जो भडिमार होतो त्याला शिक्षकांचे उत्तर काय असते? बहात्तर रोगांवर एकच रामबाण उपाय करणाऱ्या वैदूप्रमाणे सर्व प्रश्नांना पुरून उरणारा शिक्षक सतत दटावत सांगत असतो, "काट्या! गप्प बैस देवासारखा! हे परीक्षेत पडणार आहे का? उगाच डोक्याला नसती भुणभुण लावलीये!" जेथे विज्ञानाच्या शिक्षकाला विज्ञानाची जिज्ञासा ही 'नसती भुणभुण' वाटते, परीक्षेत काय पडणार याच्यावरच शिकवणे बेतले जाते आणि गप्प बसणे हे भूषण आणि देवाचे लक्षण बनते तेथील उद्याची तरुण पिढी स्वत:च्या समस्यांना डोळसपणे सामोरे जाण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासेल हे मृगजळ ठरले

तर नवल नाही. विख्यात शास्त्रज्ञ श्री. जयंत नारळीकरांनी स्वत:चा सांगितलेला अनुभव बोलका आहे. स्वत: एक वर्ष परदेशी असताना स्वत:च्या मुलीला त्यांनी भारतामधून नेऊन इंग्लंडमधील चौथीच्या शाळेत घातले. काही दिवसांनी त्या शाळेच्या शिक्षकांनी त्यांना सांगितले, ''तुमच्या मुलीची अभ्यासातील तयारी आमच्या मुलींच्यापेक्षा नक्कीच वरच्या दर्जाची आहे. पण तिच्यात एक उणीव आहे. ती म्हणजे ती प्रश्नच विचारत नाही.'' त्यांनी पुढे असेही आश्वासन दिले की 'तुम्ही वर्षभराने ज्या वेळी भारतात परताल त्या वेळी ही उणीव दूर झालेली तुम्हाला दिसेल.' आणि वस्तुस्थितीत तसे झालेही.

आपल्या शिक्षणपद्धतीत आणि म्हणून समाजातही ही मोठी उणीव आहे. मोठ्या प्रगत राष्ट्रांनाही हे प्रश्न न विचारणे परवडत नाही. १३ सप्टेंबर १९९१ च्या लंडनच्या 'डेली टेलिग्राफ' या अंकात आलेली ही बातमी व माहिती बरेच काही सांगून जाते.

'केवळ ज्ञानसंपादन किंवा माहिती संपादन हा शिक्षणाचा उद्देश नसून मुख्य उद्देश शिक्षणाने स्वतंत्रपणे विचार करण्याचा, टीका करण्याचा आणि दिले जाणारे ज्ञान नि:शंकपणाने न स्वीकारता शंका विचारण्याची क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण करण्याचा आहे. निरनिराळ्या प्रकारच्या यंत्रनिर्मितीत जपान आज अग्रेसर आहे. संगणकाकडे सोपवलेले काम ते अत्यंत थोड्या वेळात, कार्यक्षमतेने, बिनचूकपणे करतात पण संगणकांना कोणते काम द्यावयाचे, त्याची न संपणारी भूक कशी भागवावयाची हे प्रश्न पुढच्या शतकात उपस्थित होणार आहेत. त्यासाठी स्वतंत्रपणे विचार करावयाची शक्ती जोपासायला हवी. शिक्षणपद्धतीत याकडे दुर्लक्ष झाले आहे. पुढच्या शतकात ही उणीव विशेषत्वाने जाणवेल.' असे मत टोकियो विद्यापीठात पाहुणे प्राध्यापक म्हणून काम करणारे स्टीफन प्लॅटझर यांना वाटते. लहानपणापासून परीक्षेच्या यशाचे ओझे विद्यार्थ्यांच्या डोक्यावर असते. त्यातून परीक्षेतील यशाच्या तंत्रकौशल्याची चाचणी होते पण इतर क्षेत्रात त्याच्या अंगी असलेल्या गुणाची किंवा कौशल्याची चाचणी होत नाही. शाळांचा उपयोग विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवण्यासाठी नव्हे तर विचारनियंत्रणासाठी केला जातो. ओसाका येथील किंकी विद्यापीठात प्लॅटझर शिकवायला गेले त्या वेळी अभ्यासाबद्दल विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन पाहून त्यांना आश्चर्य वाटले. प्राध्यापकाकडून येणारा ज्ञानाचा ओघ कोणताही प्रश्न वा शंका न विचारता विद्यार्थी ग्रहण करत होते. प्रश्न विचारण्याच्या बाबतीत वा प्राध्यापकाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याबाबत त्यांची नाखुषी वा टाळाटाळ दिसून आली. स्वत: विचार करायला उत्तेजन दिले जात नसल्याने मुले प्रचलित घडामोडीत रस घेत नाहीत. प्रा. प्लॅटझर जपानमध्ये होते तेव्हा अमेरिकेने पनामावर आक्रमण केले होते. या घटनेवर एका आठवड्याने प्रा. प्लॅटझर यांनी विद्यार्थ्यांना या घटनेबद्दल प्रतिक्रिया विचारली. त्यांच्या चेहऱ्यावरून असे दिसले की ती घटनाच त्यांना माहीत नव्हती तर ते प्रतिक्रिया काय देणार? आणि हे अपवादात्मक नव्हे असे प्रा. प्लॅटझर यांनी म्हटले आहे. मुलाखतीसाठी आलेल्या

पदवीधर उमेदवारांमध्ये मनाची पाटी कोरी असलेला विद्यार्थी आदर्श असे तेथील कंपन्यांना वाटते याचे त्यांना आश्चर्य वाटले.

जपानप्रमाणेच आपल्याकडच्या शिक्षणातही परीक्षांवर अवास्तव भर दिला जात आहे. आणि तेथल्याप्रमाणेच येथेही स्वतंत्र विचारशक्तीच्या जोपासनेकडे दुर्लक्ष होत आहे. जपानमध्ये उद्योगधंद्याच्या गरजांशी तरी शिक्षणाची सांगड घातली जाते. आपल्याकडे तेही व्यवस्थित होत नाही. स्वाभाविकच शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे खूपच दूर जाते.

व्यक्तीवर संस्कार होण्याची शिक्षणाप्रमाणचे दुसरी महत्त्वाची व्यवस्था म्हणजेच कुटुंबसंस्था. आपल्याकडे कुटुंबात बहुदा एकाधिकारशाही असते. कुटुंबकर्ता हा सर्वेसर्वा असतो. त्याची इच्छा, त्याचे मार्गदर्शन प्रमाण असते. त्याचा शब्द झेलायचा व अखेरचा मानायचा अशी शिकवणूक असते. मत मांडणे, चर्चा करणे, मत बदलणे, मनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे (समाजसंकेत व कुटुंबहित पाहून) वर्तन करणे हे घडत नाही. कुटुंबांतर्गत खुल्या चिकित्सेला स्वाभाविकच वाव नसतो. यामुळे निकोप, डोळस दृष्टिकोन कुटुंबात निर्माण होणे अवघड जाते. आपल्या पारंपरिक समाजमानसात विभूतिपूजा फार आहे. लोक आपापल्या श्रद्धेनुसार असे दैवतीकरण करतात की त्या विरोधात ब्र उच्चारलेला चालत नाही. मग त्या व्यक्तीच्या मतांची, कार्याची (आदर राखून केलेली) चोखंदळ उलटतपासणी तर दूरच राहिली. असा प्रयत्न होणार ही शंकाही वादळ उठवून जाते. अशा मानसिकतेच्या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजणे दुरापास्त ठरते यात नवल नाही.

याबरोबरच आपल्या लोकमानसाची एक ठेवण मारक ठरते. एका क्षेत्रात महनीय असलेल्या व्यक्तीचे अन्य क्षेत्रातील मत व आचरण हे आपला समाज उगाचच आदर्श मानतो. उत्तम खेळाडू, कलावंत, साहित्यिक, राजकारणी हे अनेकदा वैज्ञानिक दृष्टिकोनाशी पूर्ण विसंगत वर्तन करतात परंतु त्यांचे त्या त्या क्षेत्रातील धुरीणत्व बघून त्यांच्या या वर्तनाबद्दल जनमानस मान्यता देऊन टाकते आणि त्याचे विपरीत परिणाम होतात.

समाजाला डोळस बनवणे, प्रश्न विचारण्याची शोधकता व निर्भयता लोकांच्यात जोपासणे, दैववादी वृत्तीपासून त्यांना दूर ठेवणे हे काम पुरोगामी चळवळीचे असते. आपल्या समाजात एका बाजूला परंपरांचे प्रचंड ओझे आणि परिवर्तनवादी शक्तीची त्या मानाने दुर्बलता असे चित्र आहे. परिवर्तनापेक्षा परंपरा प्रभावी आहे. चिकित्सेला प्रतिष्ठा नाही, लोकमानसाचा आधार नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन अशा समाजात रुजणे अवघड असतेच.

वैज्ञानिक दृष्टिकोन केवळ मनात ठेवून फायदा होत नाही. कोणत्याही विषयासंबंधी कितीही ज्ञान वाढले तरी लोकांच्यात जुन्या पद्धती सोडून नव्याने वागण्याचे धैर्य यावे लागते. यासाठी या विचारांचे नेतृत्व करणाऱ्यांनी व तसा वसा घेतलेल्यांनी त्यांची उक्ती व कृती यात सुसंगती ठेवावी लागते. हे आचरण जेवढे स्पष्ट, ठाम आणि लखलखीत तेवढे तो विचार जनमानसाची पकड घेण्याची शक्यता अधिक. वैज्ञानिक

दृष्टिकोनाच्या पाठीराख्यांची फळी या कसाला त्या प्रमाणात आपल्या समाजात उतरू शकली नाही.

याबरोबरच माणसाला पदोपदी अगतिक बनवणाऱ्या सामाजिक वास्तवाचे कारणही महत्त्वाचे म्हणून लक्षात घ्यावे लागेल. बहुसंख्य माणसांचे आजचे जीवन हे एका अस्थिरतेने वेढलेले आहे. व्यवसाय, नोकरी यांची शाश्वती, मुलांचे भवितव्य, मुलींचे विवाह, हक्काचा निवारा, अडचणीला आधार, आवश्यक सुरक्षितता, आत्मप्रतिष्ठेचा सन्मान यापैकी काहीही मिळेल आणि मिळालेच तर टिकेल याची त्यांना शाश्वती नाही. स्वत:च्या हाताबाहेर अनेक गोष्टी गेल्याची हतबलता ते अनुभवत असतात. एक अंधळी स्वार्थी घुसळण समाजाच्या सर्व अंगात चालू आहे. याचे आकलन करणे, विश्लेषण करणे हे त्यांना अशक्यप्राय वाटते. चिकित्सक विचार जोपासण्यापेक्षा सोयीस्करपणे (पळ) वाटा शोधणे त्यांना जवळचे वाटते. अशा वेळी जिज्ञासूपणे शोध घेणे व तसा आचार करणे हे खूप अवघड बनते.

या सर्व अडचणी खऱ्या आहेतच पण तरीही त्यावर मात करण्याची जिद्द ठेवावीच लागते. विचार करण्याचे 'माणूसपण' जोपासावे लागते.

वैज्ञानिक विचार पद्धतीवर अनेक आक्षेप घेतले जातात. सत्यशोधनाच्या या पद्धतीकडे आध्यात्मिक प्रवृत्तीचे साक्षात्कारवादी साशंकतेने पाहतात. त्यांचा आक्षेप असा की शास्त्रीय सिद्धांत डळमळीत असतात. त्यातील सत्य बदलते. असे जर असेल तर या अस्थिर शास्त्राने दिलेले ज्ञान प्रमाण कसे? या ज्ञानाला अनुसरून केलेली समाजरचना हितकारक कशी होणार? आज जे सत्य ते उद्या असत्य ठरल्यावर काय उपयोग?

ज्ञान म्हणून विज्ञानाला अप्रमाण मानण्याची ही आध्यात्मिक फॅशन खरी नाही. जेथे विज्ञान संपते तेथे अध्यात्म सुरू होते हा आवडता युक्तिवाद योग्य नाही. आज जे वैज्ञानिक ज्ञान उपलब्ध आहे ते तार्किकदृष्टया भक्कम आहे. त्यांचे जे विभाग आहेत म्हणजे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र वगैरे यांच्यामधील तार्किक संबंधही असेच भक्कम आहेत. स्वत:ला अवलिया म्हणवणारा कोणी वैज्ञानिक ज्ञानाकडे पाठ फिरवून आपले जीवन जगू शकेलही पण ज्ञान म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे निर्माण झालेल्या विज्ञानाचा तो प्रतिवाद करू शकणार नाही.

आक्षेपक सुचवितात त्याप्रमाणे सगळे शास्त्रज्ञानही अस्थिर नाही. भौतिकशास्त्राचा विचार केला तरी गती, विद्युत, रसायन, वैद्यक इत्यादी शास्त्रातील काही सिद्धांत पूर्णपणे प्रस्थापित केले गेलेले आहेत. याचा साधा पुरावा म्हणजे त्या ज्ञानाचा उपयोग करून निर्माण झालेले रेडिओ, विमान, दूरदर्शन, चलत्चित्रपट अशा अनेक गोष्टींकडे बोट दाखविता येईल. एकूण वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे निर्माण झालेल्या विज्ञानाचा जन्म होऊन धर्माच्या मानाने फारच कमी काळ लोटलेला आहे. तरीही शास्त्राने जे मिळवले ते धर्मग्रंथाच्या तुलनेत प्रचंड आहे.

विज्ञानाबद्दल अनेकांच्या मनात आक्षेप, अपसमज व आकस असतो. जगन्नियंत्या

परमेश्वरावर श्रद्धा न ठेवता जीवनातील सर्व समस्यांना सामोरे जाण्याची भाषा काहींना उर्मटपणाची तर काहींना अडाणीपणाची वाटते. आधार ज्यांना हवा वाटतो व देव या कल्पनेतून तो ज्यांना मिळतो त्यांना तो घेण्याचा अधिकार त्या त्या व्यक्तीला आपल्या देशातील संविधानानेही दिला आहे. परंतु कल्पित शक्तीला शरण जाऊन आपण प्रयत्न केले असोत वा नसोत ती आपणास अडचणीच्या वेळी वाचवेल असे मानणे आणि याउलट आलेल्या संकटाचे विश्लेषण करून, आपल्या चुका कबूल करून, दुरुस्त करून संकटाला सामोरे जाण्याचा प्रयत्न करणे यात प्रगल्भता कशात आहे? माणसाचा आत्मगौरव कशामुळे उन्नत होईल?

माणसाने कितीही शोध लावले तरी त्याला निसर्गावर विजय मिळवणे शक्य आहे काय? असाही एक भाबडा तिरकस प्रश्न अनेकांच्या डोक्यात असतो. निसर्ग म्हणजे कोणीतरी बलाढ्य महाशक्तिशाली दैवत आणि आपल्या विविध ज्ञानशाखांच्या चिमण्या तलवारी घेऊन त्याच्याशी लढणारे केविलवाणे विज्ञान असे काहीसे चित्र या प्रश्नकर्त्यांच्या मनात असते काय कोणास ठाऊक? माणूस वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या साहाय्याने निसर्गामागचे नियम समजावून घेतो. त्याआधारे आपले जीवन सुखकर बनवण्याचा प्रयत्न करतो. पावसाळ्यात बेभान वाहून आसपासचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या आणि उन्हाळ्यात कोरडी पडून सर्वांच्या तोंडचे शब्दश: पाणी पळवणाऱ्या नदीवर, धरण बांधून पूर नियंत्रण, वर्षभर पाण्याची हुकमी उपलब्धी व वीजनिर्मिती हे सारे माणूस करू शकतो कारण त्या त्यासाठीचे नियम तो शोधून काढतो. विज्ञानाचा हेतू म्हणजे निसर्गाविरुद्ध युद्ध जिंकणे नसतो तर निसर्गनियमांचा उपयोग मानवी हिताच्या दृष्टीने करण्यासाठी निसर्गाबरोबर अर्थपूर्ण सहजीवन हा असतो.

विज्ञानाधिष्ठित जीवनपद्धती म्हणजे रोकडेपणा, शुष्कता, भावनाशून्यता असाही एक समज हेतुपुरस्सर वा अज्ञानाने पसरवला जातो. माणासाच्या व्यक्तिमत्त्वाची भावना ही एक समृद्ध व आवश्यक बाजू आहे. विरोध आहे तो सारासार बुद्धी गहाण टाकून भावनेच्या आहारी जाण्याला. मूल आजारी पडल्यावर विज्ञाननिष्ठ आई त्याला योग्य उपचार करेल. अंधश्रद्धाळू आई त्याशिवाय त्याला अंगारा लावेल, नवस करेल, उपास धरेल व बाबाचा मंतरलेला ताईत बांधेल. याचा अर्थ निव्वळ औषधोपचार करणारी आई भावनाविरहित असते असे थोडेच आहे? मुलाची सारी सेवा ती अंतरीच्या उमाळ्याने करतेच परंतु अंधश्रद्धेच्याकडे भावना गहाण टाकणे नाकारते हे अधिक श्रेयस्कर नव्हे काय?

विज्ञानामुळे माणूस सुखी कोठे झाला? भोपाळच्या वायू गळतीमध्ये हजारो लोक मेले आणि हिरोशिमावरच्या अणुबॉम्बने तर लाखो लोकांचा बळी घेतला हा विरोधकांचा एक नेहमीचा युक्तिवाद आहे. एक गोष्ट या वेळी सोयीस्करपणे विसरली जाते की माणसाचे जीवन सुखकारक आणि सुरक्षित करण्यासाठी विज्ञानाने फार मोठे योगदान केले आहे. सर्व मानवांना पुरून उरेल एवढे धान्य उत्पादन करण्याची किमया विज्ञानामुळे घडली. मानवजातीला हैराण करून सोडणारे अनेक रोग विज्ञानाने हद्दपार केले.

एकमेकांशी संपर्क साधण्याच्या शक्यतेत क्रांती घडवून आणली. मनोरंजनाचे अद्‌भुत खजिने खुले केले. माणसाच्या काही लाख वर्षांच्या इतिहासात ज्याची कल्पनाही अशक्य होती त्या शक्यता गेल्या दोन शतकांत मानवी जीवनात वास्तवात आल्या त्या केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या पायाभूत आधारावर केलेल्या घोडदौडीमुळे. खरे आहे की अग्नी शोधून काढणारे विज्ञान हे सांगत नाही की तो अग्नी अन्न शिजवण्यासाठी वापरावा की दुसऱ्याचे घर जाळण्यासाठी. हा निर्णय विवेकशक्तीने घ्यावा लागतो. पण तरीही विज्ञानाने माणसाच्या जीवनात झालेल्या क्रांतीची मातबरी राहतेच कारण तिला भरभक्कम व्यावहारिक पाया आहे.

हे सगळे स्वीकारणे तसे सर्वसामान्य माणसाला अवघड जाते कारण त्याच्या मनावर परंपरा, धार्मिक संस्कार, संतांची शिकवण यांचा प्रचंड पगडा असतो. त्या शिकवणुकीमध्ये विवेक करणे त्याला उमजत नाही, उमजले तरी जमत नाही. आपण परंपरा डावलतो, मोडतो वा बदलतो म्हणजे परंपरा निर्माण करणाऱ्या आपल्या पूर्वजांवर अन्याय करतो असे नव्हे. पूर्वजांच्या काळात अत्यंत मर्यादित ज्ञानावर त्यांनी आखलेले पडताळे चुकीचे ठरले तर ते विकसित होणाऱ्या प्रवाही ज्ञानाशी सुसंगत मानावयास हवे आणि कालबाह्य गोष्टी टाकून देऊन कालोचित स्वीकारावयास हवे. संतांनी सांगितलेल्या गोष्टींचाही असा शोध घेता येतो. विधिलिखित, प्रारब्ध या बाबी संतांनी सांगितल्या तरी त्याज्य मानल्या पाहिजेत. साक्षात्कारासारखे अनुभव कसे आभासात्मक असतात ते आधुनिक मानसशास्त्र सांगू शकते ते समजावून घेतले पाहिजे आणि सर्वांभूति समभाव, दया, क्षमा, शांती या गोष्टी समाजोपयोगी असल्याने त्यांचा आदर करावयास पाहिजे. संतच काय धर्मसंस्थापकांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींनाही हाच निकष लावला पाहिजे.

शास्त्रामध्ये उच्च पदव्या मिळवलेली माणसे अवैज्ञानिक परंपरा निष्ठेने पाळतात आणि स्वत:ला विज्ञानवादी म्हणवून घेणारे अभिमानीही प्रत्यक्ष आचरणात कच खातात. या दोन्हींच्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दलच प्रश्नचिन्ह उभे करणे योग्य नव्हे.

शास्त्राचे ज्ञान मिळविणे आणि शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारणे या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. शास्त्रांचे अध्ययन केलेली व्यक्ती वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करण्याची शक्यता अधिक आहे पण ती निश्चितपणे तसे करेलच असे मात्र नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनाला आवश्यक असणारी स्वतंत्र विचारसरणी हा संस्काराचा भाग आहे. केवळ बुद्धिमत्ता त्यासाठी पुरेशी नाही. एखादी व्यक्ती हुशार असूनही स्वतंत्र विचार प्रवृत्ती तिच्यात नसेल तर दुसरी व्यक्ती सामान्यबुद्धीची असूनही चिकित्सक असू शकेल. शास्त्रीय ज्ञान यशस्वीपणे संपादित करणे हा केवळ व्यक्तीच्या बुद्धिमत्तेचा प्रश्न आहे पण शास्त्रीय दृष्टिकोन संपादन करणे हे मूल्य आहे आणि तो व्यक्तीच्या प्रवृत्तीचा भाग आहे. सामान्य माणसाला हे पेलवणारे नाही, त्याला धर्माचाच आधार पाहिजे हेही खरे नाही. धर्माची खरी शिकवण सामान्य माणसाला पेलणे हे त्याहूनही अवघड आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा माणूस प्रत्यक्षात काही वेळा अंधश्रद्धा, कर्मकांड

यांचे पालन करताना आढळतो. त्या व्यक्ती एक तर अप्रामाणिक असल्या पाहिजेत किंवा प्रत्यक्ष व्यवहारात त्यांना मोठ्या प्रमाणात तडजोड करणे भाग पडत असले पाहिजे. विचार पटतात पण हितसंबंधविरोधात जाण्याचे धैर्य नाही अशी स्थिती शक्य आहे. या दोन्ही प्रकारच्या माणसांच्या उदाहरणावरून वैज्ञानिक दृष्टिकोन अपुरा आहे असे मांडणे हे तर्कट होईल. धर्माचा कायदा अनेक जण स्वत:च्या फायद्यासाठी करून घेतात म्हणून धर्मावर प्रामाणिक श्रद्धा ठेवणारा माणूस धर्म त्याज्य आहे असे कोठे म्हणतो? शेवटी माणसांना अनेक कारणांसाठी व्यवहारात आपल्या विचारांशी तडजोड करणे भाग पडते. खरा विज्ञाननिष्ठ माणूस ही तडजोड अपवादात्मकरित्याच करतो आणि ही तडजोड आहे, मूल्य नव्हे याची जाणीव बाळगतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन वापरल्यामुळे वेळ, श्रम, पैसा, शक्ती यांचा अपव्यय टळतो. आपल्या देशासमोरचे प्रश्न सोडविताना दोन मार्ग उपलब्ध असतात. एक परंपेरची गुलामगिरी स्वीकारून प्रश्न सोडविणे वा दुसरा मार्ग वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करणे. आपल्या देशाला असलेल्या प्रदीर्घ परंपरांमुळे याबाबत परिस्थिती गुंतागुंतीची बनते; तोटा असा होतो की परंपरेची बंधने जाचक आहेत. जुन्या कल्पना, विचारपद्धती, संस्था यांना परिस्थितीनुरूप बदल करणे अवघड जाते. हा बदल किती व कसा करावयाचा यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन उपयोगी पडतो. आपली परंपरा कितीही गौरवशाली असली तरीही संपूर्ण बदललेल्या वर्तमान व भविष्यकाळातील प्रश्न सोडवण्यास ती उपयोगी नाही हा समज वैज्ञानिक दृष्टिकोन आपणास देतो. परंपरेची गुलामगिरी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची सोयीस्कर सरमिसळ तर अधिकच धोक्याची असते. जसे आपल्याकडे शैक्षणिक धोरणापासून ते संविधानातील कर्तव्यांपर्यंत वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता व महती गायलेली असते. पण नॅशनल सायन्य काँग्रेसमधले मानाचे संशोधनाचे पारितोषिक जाते गूढविद्येच्या संस्थेचा अध्यक्ष असलेल्या व फलज्योतिषावर निबंध लिहिलेल्या चार्टर्ड अकौंटंटला. नामवंत शास्त्रज्ञ संशोधन संस्थांनी विरोध करूनही ही चूक सुधारावी असे शासनाला वाटत नाही. राज्यपालांना पाऊस पडण्यासाठी लोकांनी देवाची प्रार्थना भाकावी हे आवाहन करताना कोणतीच चूक दिसत नाही आणि एकविसाव्या शतकाकडे देशाला घेऊन निघालेल्या पंतप्रधानांपासून राष्ट्रपतीपर्यंत सर्वांना हातचलाखीचे चिल्लर चमत्कार करणाऱ्या सत्यसाईबाबाची चरणधूळ कपाळी लावण्यात काहीच आक्षेपार्ह वाटत नाही.

विविध अनुभव एकत्र करून त्यांचा कार्यकारणभाव निश्चित करणे, त्यांचे सार काढणे ही कौशल्ये शिक्षणातील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहेत. संशोधन आणि तंत्रविकासात काम करणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या लक्षात घेतली तर जगात आपला क्रमांक दहावा लागतो. देशातील प्रचंड दारिद्रय आणि निरक्षरता पाहता ही बाब खास कौतुकाचीच म्हणावी लागेल. संशोधन तंत्रविकासावर आपला खर्च हजार ते पंधराशे कोटी आहे. या कौतुकास्पद बाबींच्या विरोधात जाणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अनुभवाचे ज्ञानात रूपांतर करण्याची सवय

सुटणे आणि त्याची सामाजिकता दुर्लक्षित होणे. व्यापक सामाजिक पातळीवर याचा वाईट परिणाम होतो. जगाच्या तोडीचे तंत्रज्ञान विकसित करू शकणाऱ्या देशात हवा, पाणी, अन्न, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत हे वाक्य फक्त परीक्षेत वा तुळईवर लिहिले जाते. लाखो लीटर दूध ओतून टाकले जात असताना चाळीस टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जगते म्हणजे त्यांना शारीरिक कष्टासाठी आवश्यक असलेले उष्मांक अन्नातून मिळत नाहीत. हजारो कोटी रुपयांची महाकाय धरणे उभी राहत असतात, पण तीन लाख खेड्यांत पाणी मिळण्याची मारामार असते. मग स्वच्छ पाणी ही फार पुढची गोष्ट झाली. बहुजन समाजाला आरोग्यासाठी आवश्यक त्या फळांची निर्यात करून महागडी, श्रीमंतांनाच परवडतील अशी औषधे आयात केली जातात. हवा प्रचंड दूषित होते. जे बांधण्यासाठी कसल्याही परकीय वस्तूची वा तंत्रज्ञानाची गरज नाही ते डोक्यावरचे छप्पर अनेकांना दुरापास्त राहते. उपलब्ध पाण्याचा नेमका वापर करून दारिद्र्य हटवता येते हे फार नेमकेपणाने महाराष्ट्रात चार-पाच ठिकाणी तरी सिद्ध होऊनही त्या उत्तराचा पाठपुरावा होत नाही.

हे असे होते, कारण या प्रश्नांच्या सोडवणुकीची जबाबदारी असलेली माणसे मूर्ख, स्वार्थी वा देशद्रोही आहेत असे नाही. आपले निर्णय व कृती यांचा सामाजिक अन्वयार्थ लावण्याची क्षमता व दृष्टी आमच्याकडे अपवाद वगळता नव्हती आणि ती निर्माण होण्याची धडपडही आपण करत नाही.

छत्रपतींनी अल्पावधीत शून्यातून आरमार उभारले ते इतके समर्थ की इंग्रजी आरमाराला दहशत बसावी. या घडामोटीचा अर्थ न कळल्याने पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊन ते बुडविले. डभईच्या लढाईसाठी घेतलेले रुपये परत द्या आणि मगच नादिरशहाच्या पारिपत्यासाठी निघा असे साहुकारांनी थोरल्या बाजीरावाला घेराव घालून बजावले. उलट स्पॅनिश आरमाराच्या पाडावासाठी आलेला खर्च देशरक्षणासाठी केला होता, राणीच्या डामडौलासाठी नव्हे हे लक्षात घेऊन इंग्लंडने बँकेचे राष्ट्रीयकरण करून बँक ऑफ इंग्लंडची स्थापना केली.

आपले निर्णय व कृती यांचा सामाजिक अन्वयार्थ लावण्याची क्षमता गमावणे हे झाले वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे पाठ फिरवणे. त्यातून प्रश्नांची रास्त सोडवणूक लांब जाते. या चुकीच्या उपायातून घडणारे परिणाम सोसणे आले की नशिबाला दोष देत बसावे ही झाली प्रश्नांची दैववादी बाजू. दोन्ही चूकच आहेत व हातात हात घालून घात करणाऱ्या आहेत. त्यांच्या विरोधी संघर्ष हेच खरे अंधश्रद्धा निर्मूलन आहे.

♦♦♦

धर्मचिकित्सा व विवेकवाद

मानवी जीवनात धर्माला एक वैशिष्टपूर्ण स्थान आहे. जगाच्या सर्व भूभागातील सर्व प्रकारच्या जनसमूहात मानवाच्या आदिम अवस्थेपासून या ना त्या स्वरूपात धर्माने माणसाची सोबत केली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उदय आणि विकास ही गेल्या चारशे वर्षांतील गोष्ट. संघटित धर्माचा उदयही त्याआधी कित्येक शतके झाला होता. विज्ञानाचा उदय होण्याआधीच त्यांना विशाल स्वरूप आणि विलक्षण सामर्थ्य प्राप्त झाले होते. जीवनाचे सर्व आयाम धर्मकल्पनेच्या प्रभुत्वाने व्यापले होते आणि सर्व बाजूंनी त्याची जीवनावर अप्रतिहत सत्ता फार दीर्घकाळ चालली होती.

विचार करण्याचा वसा एकदा घेतला की हे सगळे डोळसपणे तपासले जाण्याची सुरुवात होते.अनेकांना अनेक कारणांनी हा सत्यशोध रुचत नाही. अंधश्रद्धांचे समर्थन करणे शक्यच नसते पण त्यांचे निर्मूलन करू पाहणारी मंडळी धर्मच बुडवायला निघाली आहेत का अशी साशंकता असते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची भूमिका धर्माबाबत तटस्थतेची आहे. तिचे अनेकांना आकलन होत नाही.काहींना ती अशास्त्रीय वाटते तर काहींना मतलबी. वैज्ञानिक दृष्टिकोनाने वस्तुमानाचे ज्ञान होईल पण इष्ट काय? अनिष्ट काय? योग्य काय? अयोग्य काय? भले कोणते? बुरे कोणते? हे कळायला धर्मच हवा असे बहुतेकांना वाटत असते. धर्माशिवाय माणसे अनीतीने वागू लागतील, धर्म नाहीसा केला तर त्याच्या जागी काय आणणार असा त्यांचा सवाल असतो.

आपण लहानपणी भाषा शिकतो. धर्म तर आपणास जन्मत:च मिळतो. मायबोलीप्रमाणेच हा मायधर्म असतो. लहानपणीच धर्म संस्कार म्हणूनच आपण स्वीकारतो. धर्मविचार करण्याचा प्रयत्न तेथे उपस्थित होत नाही. व्यक्ती प्रौढ होते. विचार करण्याची, विवेकाची तिची क्षमता तयार होते. इतर धर्मांबरोबर स्वत:च्या मायधर्माची तुलना ती करू लागते.तेव्हा धर्मविचाराला प्रारंभ होतो. बहुतेकांच्या जीवनात हे घडत नाही. बदलत्या वयापरत्वे काही कर्मकांडे, धार्मिक वाचन, तीर्थयात्रा एवढेच घडते. धर्मसंस्कार गडद होत जातो. मनाला समाधान देत जातो. व्यक्तिश: यामध्ये आक्षेप घेण्यासारखे काही नाही. त्या त्या व्यक्तींना ही बाब उचित व उपयुक्तच वाटत असते.

महाराष्ट्रात अर्वाचीन काळात धर्म या विषयावर मनन, चिंतन व कृती करणारी काही माणसे मागच्या शतकात होऊन गेली. लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, पंडिता रमाबाई, डॉ. केतकर, वा. म. जोशी, राजर्षि शाहू महाराज, गाडगेबाबा, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या लोकांचे आपापल्या क्षेत्रात मोठे कार्य आहेच, परंतु त्या बरोबरच त्यांनी 'धर्माचा विचार' केला असे दिसून येईल. त्यांचे विचार, निष्कर्ष व कृती वेगवेगळ्या होत्या, त्या कोणाला पटतील वा

न पटतील पण त्यांनी धर्माचा विचार आस्थेने व शोध घेण्याच्या बुद्धीने केला हे मानावे लागेल.

धर्माचा अभिमान, अस्मिता व अहंकार अधिकाधिक बलवान करण्याचा प्रयत्न सध्या सर्वच धर्मात चालू आहे. देवळात जाणे, यात्रा करणे, धर्माची व्याख्याने, प्रवचने, कीर्तने, देवतांचे व धर्माचे उत्सव या गोष्टींकडे त्या त्या धर्मातील सर्वसामान्य समाजच नव्हे तर तरुण पिढीही आकर्षित झालेली दिसते. धर्माभिमान व धर्मविचार या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. धर्माभिमानी माणूस धर्मविचार करू शकेल पण करेलच असे नाही. धर्माभिमानाला जास्तीत जास्त तीव्रता व धर्म विचाराला ओहोटी असे महाराष्ट्रातले आजचे स्वरूप आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ प्रत्यक्ष कृतीच्या क्षेत्रात असल्याने आणि या विचारांचा संबंध हरघडी धर्माशी येत असल्यानेही धर्मचिकित्सा अपरिहार्यच बनल्याचे आम्हाला जाणवते.

विविध ठिकाणच्या आदिमानवाच्या सामजिक जीवनात प्राथमिक धर्मभावना 'यातू' प्रधान होती. विश्वातील सर्वांत-माणसात, प्राणिमात्रांत, निर्जीवांच्यात एक 'यातू' तत्त्व आहे. याची उपासना विविध-कर्मकांडांनी करावयाची. त्या क्रिया म्हणजे 'यातू क्रिया'. पाऊस पडण्याकरता करावयाचा यज्ञ, शत्रूचा युद्धात पराभव व्हावा म्हणून करावयाचा विधी, ग्रहदाह होऊ नये यासाठीची वास्तुशांती, बाळंतीण सुखरूप प्रसूत व्हावी यासाठीचे गंडेदोरे, धर्मशाळा, तलाव, ग्रामदैवत यांच्या उद्घाटनाच्या वेळी वा दरवर्षी करावयाचे उत्सव या साऱ्या यातू क्रिया होत्या. त्याद्वारे सिद्ध होणारा तो यातू धर्म अशी धर्माची आदिम अवस्थेतील कल्पना होती. यातू दोन प्रकारचे होते. व्यक्ती, कुटुंबे, समाज यांच्या हितासाठी करावयाची साधना म्हणजे शुक्ल यातू. धनधान्य वाढावे, पुत्रपौत्र समृद्धी मिळावी, व्यक्ती, समाज निरोगी राहावा यासाठी शुक्ल यातूची आराधना केली जाई. तर शेजाऱ्याच्या शेतातले धान्य जळावे, सवत वांझ व्हावी, शत्रू रक्ताच्या उलट्या होऊन मरावा यासाठीचे उपाय म्हणजे कृष्ण यातू. चेटूक करणे, मूठ मारणे, भानामती, काळी जादू हे त्याचे प्रकार. मेणाची वा मातीची शत्रूची मूर्ती करून खऱ्या शत्रू नाशासाठी तिच्यात तलवार खुपसणे वा चेटूक करणे किंवा जिचे अनिष्ट साधावयाचे त्या व्यक्तीचे वस्त्र, केस, शेतातील माती यावर जादू करावयाची अशी ही क्रिया चालत असे. नरमेधापर्यंतचे विधी त्यात आढळत. यातू शक्तीचे पावित्र्य व निर्माणशक्ती या क्षीण होऊ लागल्या तर त्यांचे संभरण या नरमेध विधीतून होते अशी कल्पना होती. जगातील सर्व धार्मिक कल्पनांचा पाया या विचारापासून बनलेला होता. यातूनिर्भरतेवर आधारलेले हे धर्म जीवन संदेहवादी तत्त्वचिंतन आणि नंतर विज्ञानाचे आघात याने दुर्बल होऊन अस्त पावू लागणे स्वाभाविक होते. परंतु ते ज्या प्रमाणात घडून येईल असे वाटले होते तसे ते घडून आल्याचे दिसत नाही.

मानवी मन श्रद्धेत रमणारे, रस घेणारे आहे. वेळोवेळी या श्रद्धांची छाननी करणे, जुन्या त्याज्य श्रद्धांचे उल्लंघन करून चैतन्यपूर्ण नव्या श्रद्धा स्वीकारणे व्यक्तीच्या व समाजाच्या सामर्थ्यासाठीही आवश्यक असते. या दृष्टीने मानवी मन यातूविषयक

धारणेतून बाहेर पडणे हितावह होते. आजच्या आव्हानाला सामोरे जावयाचे तर यातूनिर्भरता व रूढ धर्मश्रद्धा यातून माणसाने मुक्त होणे ही गरज होती. तसा प्रयत्न सजगपणे व्हावयास हवा होता.

यातूनिर्भर अशा समजुती व आचार यांना धार्मिक म्हणणे काही संशोधकांना योग्य वाटते तर काही जण त्यांना यातूप्रधान कल्पना (मॅजिकल बिलीफ) किंवा फार तर यातूधर्मीय कल्पना (मॅजिको-रिलीजस बिलीफ) म्हणतात. 'धर्म' ही संज्ञा साक्षर, प्रगल्भ संस्कृतीमधील समजुतींना लावावी असा त्यांचा आग्रह असतो. काही जण तर एकेश्वरी धर्मकल्पनेलाच धर्म ही संज्ञा लावावी; इतर सर्व पूर्वकल्पनांना 'यातू' म्हणावे असे मानताना दिसतात. प्रत्यक्षात यातू व धर्म या संज्ञांनी निर्देशित केल्या जाणाऱ्या समजुती व आचार यांच्यामध्ये एकरूपता आढळते. साधे घरबांधणीचे उदाहरण घेतले तर आजही सुशिक्षित बहुसंख्य व्यक्तीही घर बांधावयाच्या जागेचे त्या जागेतील दुष्ट शक्ती नाहीशा होतात या कल्पनेने आधी भूमिपूजन करतात. चौकटीपर्यंत घराचे बांधकाम झाले की त्या चौकटीला काळी बाहुली उलटी टांगतात; लिंबू मिरची बांधतात. घर बांधून पूर्ण झाले की वास्तुशांती केली जातेच; कुलपरंपरा असेल तर पशुहत्याही केली जाते. भारतीयच नव्हे तर महाराष्ट्रीयन सुशिक्षित समाजही (समाजसुधारकांचा वारसा सांगत असताना) धर्म या संज्ञेचा तात्त्विक आश्रय पाहण्यास उत्सुक नाही व जिज्ञासेने पाहतही नाही. धर्मश्रद्धा म्हणजे पारंपरिक धर्मश्रद्धा असेच बहुतांशी समीकरण लोकमानसात आजही रूढ आहे.

नागर श्रद्धा संप्रदाय, संतांचे प्रयत्न असे काही अपवाद वगळता ग्रामीण लोकसमूहाचे जीवन यातूप्रधान श्रद्धेच्या परंपरेतच अखंडपणे चालू होते. जन्मसिद्ध जातिसंस्थाही यातूनिर्भर पावित्र्यभावनेवरच उभी आहे. कुलधर्म, कुलाचार, कुलदैवते याबद्दल अखंडता आहे. ब्राह्मणापासून ते अतिक्षुद्र समजल्या जाणाऱ्या सर्वच जातीजमातींमध्ये या परंपरेचे काटेकोरपणे पालन करण्याची वृत्ती आढळते. 'ऐसे कैसे रे सोवळे शिवता होतसे ओवळे' असे रामदास म्हणाले. अनेकविध बाह्य खुणांनी सहजपणे ओळखल्या जाणाऱ्या आणि व्यवहारात जपल्या जाणाऱ्या जातीजमातींच्या खुणा, बुक्क्याचा टिळा आणि तुळशीच्या माळा, सार्वत्रिक करून मिटवून टाकण्याचा प्रयत्न वारकरी संप्रदायाने केला. प्रत्यक्षात मात्र पंढरपूरची वारी करणारेही सोवळे ओवळे मानत गेले. गावात वेगळ्या वस्त्याच नव्हे तर वेगळे पाणवठे, मसणवटे जपत गेले. काही शतकांचा इतिहास असलेल्या वारकरी संप्रदायातील लोकांमध्ये मागील शतकापर्यंत रोटीबेटी व्यवहार अशक्य होता आणि आजही बेटी व्यवहार फारच दूरची गोष्ट झाली.

श्रद्धांच्या दृष्टीने आजही असे वर्णन करता येईल की सामान्य लोकसमुदाय आजही यातूनिर्भर धर्मश्रद्धेला धरूनच आहेत. जातपात, दैवतोपासना, बळी देण्याची पद्धत, लग्नानंतरचा गोंधळाचा कार्यक्रम, मुरळ्या-वाघे यांची प्रथा, मंत्रतंत्र, शकुन, फलज्योतिष, तोडगे, ताईत या साऱ्या गोष्टींचा पगडा ब्राह्मण समजले जाणाऱ्यांपासून ते अतिक्षुद्र मानले जाणाऱ्यांपर्यंत आणि रावापासून रंकापर्यंत सर्वांवरच आहे. या प्रभावाव्यतिरिक्त

यातूनिर्भर श्रद्धेला विरोधी अशा श्रद्धाही नागर समाजातील काही व्यक्तींच्या मनात नांदत आहेत परंतु या दोन्हीमध्ये काही मोठा संघर्ष झाल्याचे दिसून येत नाही. बहुसंख्यांच्यामध्ये इष्ट दैवतभक्तीलाच मुख्य स्थान आहे आणि या श्रद्धेचे मुख्य स्वरूप यातूशक्तीला आवाहन असेच आहे. त्यासाठी अमुक बळी देणे, तमुक मंत्र म्हणून अभिषेक करणे, विशिष्ट क्षेत्री जाऊन जागृत दैवताला नमस्कार करणे या प्रकारच्या विधीमध्येच भक्ताला मोठी श्रद्धा वाटते. या विधीमुळे पुण्य मिळेल, नवसाला देव पावेल अशी यातूनिर्भर अपेक्षा भक्ताच्या अंत:करणात असते.

संतांची भक्ती व शिकवण वेगळ्या प्रकारची आहे. माणसाने आपले कर्तव्यकर्म करावे पण ते ईश्वराची आज्ञा म्हणून ईश्वरार्पण बुद्धीने करावे, अंत:करणाच्या शुद्धीला व ईश्वरविषयक तळमळीला प्राधान्य द्यावे. क्षुद्र देवतांची उपासना सोडावी. माणुसकीने व करुणेने वागावे हे संतांनी सांगितले आणि आचरलेही. पण नव्या श्रद्धेचा हा भक्तिमार्ग संतांच्या शिकवणीनंतरही पारंपरिक दैवत श्रद्धेची जागा घेऊन भारतीय/मराठी मनाला व्यापून टाकू शकला नाही. पाप-पुण्याचे आणि त्यासाठी करावयाच्या कर्मकांडाचे, यातूक्रियांचे साम्राज्य अबाधित राहिले. त्यातच एका छोट्या क्षेत्रात संतांची भक्ती व श्रद्धा बंदिस्त केली गेली.

विकसित धर्मश्रद्धा, धार्मिक अनुभव, आणि आचरण यांचा गाभा कशात सामावलेला आहे? थोडक्यात त्याचे विश्लेषण असे करण्यात येते. विश्वात एक अतीत (ट्रॅन्सडन्ट) असे तत्त्व आहे. इंद्रियांच्या आधारे ज्ञान ग्रहण करून व्यक्ती आपले नेहमीचे व्यवहार करते. त्याच्या पलीकडे असणारे असे हे विश्वातील सर्वोच्च, सार्वभौम व नियामक असे तत्त्व आहे. हे तत्त्व इंद्रियात असले तरी त्याच्या अस्तित्वाची व स्वरूपाची जाणीव माणसाला असते, वेगळ्या प्रकारे त्याचा अनुभव येतो, साक्षात दर्शन होऊ शकते, किंवा त्याचे यथार्थ ज्ञानही फार थोड्या पण साधनेची अत्युच्च पातळी गाठलेल्या विभूतींना होऊ शकते. विश्वातील या अतीत तत्त्वाशी यथायोग्य संबंध जोडण्याची खोल प्रेरणा माणसात असते आणि असा संबंध जोडण्यात मानवी जीवनाचे सर्वोच्च साफल्य असते. असे जीवनव्यापी, विश्वनियंत्रक श्रद्धेय दिव्यतत्त्व म्हणजे धर्म. ज्या प्रकारे आचरण केले असता या तत्त्वाशी संबंध जोडून स्वत:चे परमश्रेय साधता येते असे आचरण म्हणजे धार्मिक आचरण. अतीत तत्त्वाची प्रतिती करून देणारा अनुभव अलौकिक असतो, असे धार्मिकांना वाटते, हा धार्मिक अनुभव येतो ही मूलभूत धार्मिक श्रद्धा.

धार्मिक व्यवहाराला आधारभूत असलेल्या विश्वाविषयीचे आणि माणसाविषयीचे जे दर्शन आहे त्याचे निरूपण करणाऱ्या या संकल्पनांत बहुविधता आहे. विश्वातील आणि मानवी प्रकृतीतील अतीत तत्त्वाविषयी भिन्नभिन्न संकल्पना, धार्मिक व्यवहाराचे भिन्न प्रकार, धार्मिक रूपे माणसाच्या धार्मिक संस्कृतीत विकसित झालेली आढळतात. विश्वातील अतीत तत्त्व म्हणजे देव किंवा ईश्वर. त्याचे प्रतिबिंब असलेले मानवी प्रकृतीतील घटकतत्त्व म्हणजे आत्मा. आणि अनन्यभावाने ईश्वराची भक्ती करून

मिळणारे परमश्रेय म्हणजे मोक्ष ही कल्पना हे एक परिचित रूप आहे. सांख्य तत्त्वज्ञानात हे तत्त्व पुरुष आहे. अद्वैती वेदांत्यांच्या मते ब्रह्म आहे. हे तत्त्व म्हणजे ईश्वरच असे नव्हे पण मुख्य मुद्दा म्हणजे ती अतीत तत्त्वे आहेत. या भिन्नभिन्न, अनेकदा परस्परांशी विसंगत असलेल्या संकल्पनांच्या माध्यमातून धार्मिक जीवनदृष्टीच्या आशयाचा 'अर्थ' लावण्यात येतो आणि त्या संकल्पनाव्यूहावर भिन्न धार्मिक जीवनसरणी आधारलेल्या असतात.

धार्मिक दर्शनाचा विषय असलेले जे अतीत तत्त्व आहे तेच मुळात आहे का? त्याचा अनुभव प्रमाण मानावा का? त्याला खरेखुरे अस्तित्व आहे का? अशा अनुभवाचे'दर्शन' या शब्दाने वर्णन करणे कितपत योग्य आहे हे प्रश्न वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे उपस्थित केले जातात. ते रास्तही आहेत. परंतु मानवी संस्कृतीत मानवी अनुभवाची व त्याच्याशी संलग्न असणाऱ्या व्यवहाराची जी अनेक रूपे प्रगट झाली आहेत त्यापैकी धार्मिक अनुभव व व्यवहार हे एक आहे. मानवी बुद्धी ज्या वेळी पुरेशी तार्किक बनली नव्हती तेव्हा धर्मासारखी गंभीर संस्था निर्माण झाली. ती हजारो वर्षे मानवी मनाचा ताबा घेऊन वावरली. आजही बालमनात वा इतरत्रही धर्म हा बुद्धिवादाच्या अनुरोधाने वाढत नाही. धार्मिक विचार हे तर्कशुद्ध विचारावर आधारलेले नसतात म्हणून समुदायाच्या लेखी त्याची मातब्बरी कमी होत नाही, असे मानसशास्त्र मानते. मानवी जीवनाचे एक अंग तर्काच्या कक्षेच्या बाहेर असते. यामुळे माणसाला विश्वात प्रतीत होणारा जो अनुभव आहे तो स्वभावत:च दुहेरी असतो. सभोवतालच्या वस्तूची प्रचिती देणारा इंद्रियजन्य अनुभव आणि अतीत तत्त्वाची प्रचिती देणारा धार्मिक, आध्यात्मिक अनुभव असे धर्मश्रद्धा मानणाऱ्यांचे प्रतिपादन असते.

व्यवहारात लोकजीवनाचे नियमन ज्या धार्मिकतेच्या आधारे होते त्याचे स्वरूप काय असते? परंपरेने चालत आलेल्या ज्या प्रथा, रूढी, चालीरीती असतात, उदा. विवाह, वारसा, दत्तक वगैरे त्यांना धार्मिक मान्यता असते. वैयक्तिक व सामूहिक उपासना, व्रतवैकल्ये हाही धर्माच्या आविष्काराचाच भाग असतो. त्याचा संबंध प्रामुख्याने परलोकाशी येतो. या रूढ लौकिक धार्मिक नीतीपलीकडे जाणारी नैतिक मूल्ये, आदर्श हेही धर्माच्या आधारे सांगितले जातात. जसे अहिंसा, सत्य, अपरिग्रह, समबुद्धी वगैरे. ही आध्यात्मिक नीती असते. विश्वाचे आणि मानवी व्यक्तीचे स्वरूप ह्या विषयाच्या काही विशिष्ट कल्पना, आणि त्यांच्यावर आधारलेल्या उच्चतम मानवी श्रेयाविषयीची कल्पना ह्यांचा आविष्कार ह्या नीतीद्वारे होतो. याबरोबरच तत्कालीन समाजव्यवस्था शास्त्र हाही अर्थ धर्म या संकल्पनेतून व्यक्त होतो.

रूढी, सामाजिक प्रथा, उपासनापद्धती, दार्शनिक आध्यात्मिक नीती आणि समाजव्यवस्था शास्त्र हे घटक धर्मात अलगपणे नसतात. त्यांच्या मिलाफातूनच धर्म साकार होत असतो. आणि हे 'धर्मपण' व्यक्ती मानसात, समाजमानसात एकवट मुरलेले असते.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करताना विचार कसा करावा लागतो?

धर्माच्या आधारे अनेकविध परंपरा, रूढी, संकेत आणि विवाह वगैरे सारख्या

महत्त्वाच्या गोष्टींचे आचारनियम व संस्कारपद्धती नक्की झाल्या आहेत. सांस्कृतिक आनंद, अर्थहीन कर्मकांडे, शोषण करणाऱ्या पद्धती, अपायकारक यातू कल्पना अशी सरमिसळ त्यामध्ये असते; याची विधायक पण कठोर चिकित्सा करावी लागते.

ठरावीक वयाच्या आत मुलीचा विवाह केला नाही तर तिचे आईवडील नरकात जातात आणि पोटी मुलगा आला नाही, मरणोत्तर क्रियाकर्मे त्याच्याकडून घडली नाहीत तर स्वर्गाचे दार खुले होत नाही या कल्पनांचा पगडा अगदी अलीकडे पर्यंत सर्व समाजावर होता आणि बहुसंख्यांच्या मनावर आजही आढळतो. विवाह करताना वधुवरांच्या मस्तकावर अक्षता म्हणून तांदूळ उधळले जातात. एकट्या महाराष्ट्रातील दर वर्षीच्या तीन लाख लग्नांत अक्षतांपायी होणारी ही उधळण १५ ते २० लाख किलो तांदळाची होते पण त्याबाबत प्रश्न विचारणेच लोकांना आक्षेपार्ह वाटते. मुलगी ही दानपात्र वस्तू समजून मोठ्या हौसेने कन्यादान केले जाते. त्यात मुलीचे अवमूल्यन आहे असे न मानता अभिमान वाटतो. काही अपघाताने स्त्री विधवा बनते; तिचा दोष कोणताच नसतो पण मुलाचा गर्भ पोटात वाढवणारी आणि त्याला जन्म देणारी ती माता मग विवाहसमारंभात कटाक्षाने दूर ठेवली जाते. सार्वजनिक समारंभ म्हणून साजरा होणाऱ्या हळदीकुंकवात तिला अघोषित मज्जाव असतो आणि शुभकार्यात तिचे पांढरे पाऊल न पडेल याची दक्षता घेतली जाते. अनेक जातींत मृत्यूनंतर दहा-बारा दिवसांचे सुतक पाळण्यासाठी सारे उद्योग - व्यवहार सोडून स्वत:ला घरात बंद केले जाते. पिंडाला कावळा शिवतो की नाही यासाठी स्वत:ची वेळ, अक्कल गहाण टाकून माणसे ताटकळत थांबतात आणि मयत व्यक्तीच्या आजारपणातले कर्ज फिटलेले नसतानाही कर्ज काढून १३ व्या दिवशी गाव-जेवण घालतात. हे सारे आविष्कार धर्माच्याच नावाने निर्माण आणि बळकट झालेल्या रूढी, कर्मकांड, परंपरांचे असतात. मुसलमान समाजात तोंडी तीन वेळा तलाक शब्दाचा उच्चार केला की केवढेही दीर्घ विवाहबंधन संपुष्टात येते. लग्न हा करार असल्याने नंतर तलाकपीडित पत्नीला पोटगी देण्याची गरज उरत नाही. मूल होण्याची अजिबात शक्यता नसली तरी जोडप्याला मूल दत्तक घेता येत नाही. अर्धांगिनी असलेल्या धर्मपत्नीला इस्टेटीच्या वारशात मात्र अर्धा वाटा कोणताच धर्म देत नाही. या मार्गाने जीवनातल्या पावलापावलावर भेटणारा धर्म प्रश्नचिन्हांकित करावा लागतो.

कोणकोणती धार्मिक कृत्ये करावीत? आपापल्या दैवतांची उपासना कशी करावी? अणि आपले पारलौकिक कल्याण कसे साधावे हा खरे तर त्या- त्या व्यक्तीचा प्रश्न आणि त्याचा-त्याचा अधिकारही. पण त्यासाठी जे केले जाते त्यामध्ये फक्त अंधळेपणाच असेल तर? धार्मिक उपासना म्हणून त्याचा आदर करावयाचा की सारासार माणूसपणा गहाण पडतो म्हणून त्याचा अव्हेर करायचा? महाराष्ट्रातल्या जत्रा यात्रांच्यात पावलोपावली हा प्रश्न आम्हांला पडतो. देवाला केलेला नवस फेडण्यासाठी पळत येऊन मंदिराच्या दगडी भिंतीवर टक्कर देऊन डोके फोडून घेणे, पाठीच्या कातडीतून धारदार गळ आरपार घालून घेणे, बैलगाडीवर ठेवलेल्या काठीवरच्या बगाडाला टांगून सकाळपासून

संध्याकाळापर्यंत ती बैलगाडी पळवत नेणे, गंजलेल्या एकाच वस्त्र्याने शंभरजणांनी स्वत:च्या कपाळावर चीर मारून रक्त ओघळत असताना देवाला प्रदक्षिणा घालणे, नवसाचे बकरे भगताने दाताने तोडून मारणे, रेडा मारून त्याच्या रक्तात हाताचा पंजा भिजवून तो गुरवांच्या अंगावर आणि देवळाच्या भिंतीवर उठवणे. नवस फेडण्यासाठी हजारोंच्या संख्येने देवापुढे बोकडे मारून रक्तमांसाचा चिखल करणे, आगीवरून चालणे, धुळीत लोटांगणे घालत (म्हणजे गडबडा लोळत) देवळाला प्रदक्षिणा घालणे वा अनेक मैल जाणे. त्या-त्या भक्तसमुदायाच्या लेखी ती उपासना पद्धत असते. आरती किती वेळा करावी? अथवा नमाज किती वेळा पढावा? गायत्री मंत्राचे पठण कसे करावे? रुद्राक्षाची माळ कितीदा ओढावी? रोजे किती कडक पाळावेत? मांसाहार पूर्णपणे सोडावा आणि सूर्यास्तापूर्वीच भोजन उरकून घ्यावे. अग्निहोत्राने स्वत:ची आध्यात्मिक उन्नती साधावी, अशा उपासनेच्या प्रत्येकाला इष्ट वाटणाऱ्या आणि फलदायी ठरणाऱ्या या पद्धती, त्या इतर कोणाला अर्थहीन आणि अनावश्यक वाटल्या तरी त्याचे आचरण करण्याचा आणि आपले लौकिक व पारलौकिक कल्याण साधण्याचा व्यक्तीचा अधिकार मान्यच आहे. परंतु डोळसपणे त्याची कालसापेक्ष चिकित्सा करण्याचा अधिकारही मान्य व्हावयास हवा की नको?

दगडूशेठ हलवाई गणपतीपुढे अग्रीत लक्ष मोदकांची आहुती दिली, ते उपासना स्वातंत्र्य म्हणून मान्य करावे काय? विश्वशांतीच्या नावाने लक्षावधी लोकांना जमा करून यज्ञ संस्कृतीचे पुनरुज्जीवन करावे काय? वैराग्याची मूर्ती असणाऱ्या बाहुबलीच्या मस्तकावर शेकडो लीटर दही, दूध, तूप, मध यांचा वर्षाव धर्मउपासनेशी सुसंगत की विसंगत? अर्थहीन, कालबाह्य व्रते ही धार्मिक उपासनेचा भाग आहेत काय? वटवृक्ष जोपर्यंत उभा आहे तोपर्यंत पांथस्थाला सावली देणार आणि जीर्ण शीर्ण झाल्यावर सावलीसाठी थांबलेल्या वाटसरूचा बळीही घेणार. त्याला दोरे गुंडाळून पूजा करून प्रदक्षिणा घालून पतीचे आयुष्य कसे वाढेल? हरतालिकेचे व्रत करण्याचा आणि चांगला नवरा मिळण्याचा, जन्मोजन्मी तोच लाभण्याचा संबंध काय?

सत्यनारायणाच्या पूजेच्या कथेबद्दल बोललेले आजही आपल्या समाजाला आवडत नाही. त्याला तो स्वत:च्या धर्मावर हल्ला वाटतो. सत्यनारायणाची कथा स्कंद पुराणाच्या २ खंडात येते. पुराणांचा काळ सामान्यत: मानला जातो इ. स. पूर्व १०० ते इ. स. ३०० ते ४००. अल्पश्रमात, अल्पखर्चात अधिकाधिक पुण्य मिळवून देणारे व्रत दस्तुरेखुद्द विष्णूने नारदास, नारदाने सूतमुनीस, सूतजींनी शौनकादी ब्राह्मणांस सांगितले असा उल्लेख पोथीत येतो. सत्यनारायणाच्या या कथेत संपूर्ण हिंदू समाजाचा व्यवस्थित समावेश केला आहे. एकूण सात अध्यायात शतानंद ब्राह्मण, राजा तुंगध्वज, साधूराम वाणी, गरीब लाकूडतोड्या यांच्या कथा येतात. हे उघडच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व श्रमजीवी क्षुद्र यांचे प्रतिनिधी आहेत. साधुवाणी सोडून इतर सर्वांची कथा एकेका अध्यायात आटोपली आहे. साधुवाणी हा मध्यमवर्गीय व्यापारी, नोकरदाराचा प्रतिनिधी आहे. पूजापाठ, व्रतवैकल्यातून अल्पश्रमात उत्पन्न मिळवण्याचा मार्ग हाच

वर्ग सर्वाधिक शोधत असतो. त्यामुळे त्याच्याबाबत तीन अध्याय खर्चणे आलेच. शिवाय व्रत करण्याची त्याची आर्थिक क्षमताही बरी असते. ही गरज व क्षमता लक्षात घेऊनच इतरांना वर्षांतून एकदाच करावयास सांगितलेले हे व्रत साधुवाण्यास मात्र दरमहा करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

कथेत सरळसरळ प्रलोभन व भीती यांचा वापर करण्यात आला आहे. कष्टकरी शोषित वर्गाचा प्रतिनिधी लाकूडतोड्या ज्या दिवशी पूजा करतो त्या दिवशी त्याला दुप्पट मिळकत होते. राजाला प्रलोभन काय कामाचे? त्यांनी पूजा करायची तर भीतीचा बडगा हवा. त्यामुळे पूजा न करणाऱ्या वा प्रसाद न खाणाऱ्या राजा तुंगध्वजाचे सारे साम्राज्य नष्ट होते. एकेक करून मुले मरतात आणि सत्यानारायणाची पूजा करताच पूर्ववत् ऐश्वर्य प्राप्त होते. साधुवाण्याला मात्र प्रलोभन व भीती या दोन्हीचे चाप लावले आहेत. एकीकडे चोरीचा आळ येऊन तुरुंगाची हवा खावी लागली, जावयाला जलसमाधी मिळाली तर दुसरीकडे धनधान्याने भरलेली नौकाही सागरतळाला गेली. सत्यनायणाची पूजा करताच हे सारे परत आले हे सांगणे नकोच. पुढची फसवणूक अशी की ही सत्यनारायण व्रत कथा प्रत्यक्षात सत्यनारायण व्रत केले तर फायदा काय होतो याचीच कथा आहे. भगवान विष्णूंनी म्हटल्याप्रमाणे सर्वांचे दु:ख दूर करणारे, धनधान्यसौभाग्य संतती देणारे व्रत त्यात आहेच कोठे? संत गाडगेमहाराज हजारोंच्या समुदायासमोर या कथेचा पंचनामा करत; वाभाडे काढत; रूढार्थाने अशिक्षित माणसाची ही तर्कबुद्धी, प्रगल्भ बुद्धिमत्ता कोठे? आणि पदोपदी कमी वेळ, श्रम, पैसा यामध्ये हुकमी लाभ मिळवण्यासाठी गतानुगतिकपणे सत्यनारायण घालणारे तथाकथित सुशिक्षित आणि धार्मिक कोठे? याही पलीकडे भटजी सांगत असलेल्या कृती 'मम' म्हणून करत असताना बुद्धी गहाणच टाकली जाते. पूजेच्या पोथीमध्ये ब्रह्मदेवाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूपासून क्षत्रिय, स्कंधापासून वैश्य व पायापासून दलित निर्माण झाले असा स्पष्ट उल्लेख आहे. हे कसे मान्य करायचे? एकतर भारताचे संविधान मान्य करावे लागेल नाहीतर सत्यनारायण? परंतु पूजेला बसणारा यजमान याला मान डोलावतो आणि हे मान्य आहे म्हणून निरांजनातील तुपाची वातही लावतो. ही अज्ञता की धार्मिक विधीने केलेला चलाख बुद्धिभेद?

स्वत:च्या आचारविचारातील अशुद्धता नाहीशी व्हावी, अखिल प्राणिजातीला उपयोगी पडण्याची पात्रता अंगी बाणावी या आर्त उत्कटतेने अतीताशी, परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे उपासना. स्वाभाविकच त्याचा संबंध नीतीशी येतो. ज्या कर्मकांडात नैतिक नियमांना प्राधान्य असते त्यांना व्रते म्हणतात. उदा:- एकपत्नीत्व, सत्यभाषण वगैरे. धर्माची ही उपासना, धर्माचे हे आचरण हे अनेक घटकांचे मिळून बनलेले असते. त्यामध्ये नीती असते, कर्मकांड असते, मिथ्याकथन आणि शोषणही असू शकते. यातील शोषणाला विरोध करावा लागतो. मिथ्याकथनातील फोलपणा स्पष्ट करावा लागतो. कर्मकांडे ही कोणत्याही मानवी संस्कृतीत राहणारच. ती माणसाच्या उपजत कृतज्ञता बुद्धीचा अविष्कार असतात. मात्र ती शोषणाला पूरक आणि मिथ्याकथनाचा

आधार घेणारी नसावीत असा प्रयत्न करावा लागतो. नीती कल्पनांचा आदर करावा लागतो. या साऱ्यासाठी धर्मचिकित्सा करावी लागते.

केली कर्मकांडे तर बिघडले काय? असा प्रश्न सतत विचारला जातो. ज्या परमेश्वराच्या उपासनेसाठी ती केली जातात ती मानणाऱ्या संतसज्जनांनाही त्यांची गरज लागत नाही. परमेश्वराचे नुसते नामस्मरणही त्याला पोचते असा त्यांचा विश्वास असतो. खरा प्रश्न असतो भावना परोपकाराची हवी. नीतीची हवी. ती भावना नसून कर्मकांडे असतील, तर त्याचा उपयोग शून्य आणि ती असतील तर कर्मकांडांची गरजच नाही. कर्मकांडाचे तोटे फार. एक तर कर्मकांडप्रधान पंथ आणि व्यक्ती, बौद्धिकदृष्ट्या योग्य अशा ऐहिक व्यवहारास दुय्यम स्थान देतात, त्यामुळे सामाजिक अवनती होते. उदा. संशोधन मागे पडते. दुसरे असेही की ज्या समाजात अशा कर्मकांडाचे स्तोम माजते त्या समाजाची आर्थिक पीछेहाट होते. आर्थिक व्यवहारात लागणारा उत्साह भजन-पूजनात जातो.श्रीमंतांनाच हे परवडते आणि मोक्षाचे धनीही तेच होतात. खरे तर ही कर्मकांडे हा एक प्रकारचा बहिर्मुख निवृत्तीमार्ग आहे. माणूस त्यामुळे आत्मकेंद्रित होतो; परलोकाच्या कल्पनेत अडकतो. याशिवाय पुरोहित वर्गाचा स्वार्थ साधला जातो हे तर आहेच.

तथाकथित उपासना, धार्मिक आचरण यामध्ये नीतीचा रसदार गाभा बहुदा दुर्लक्षित राहतो. डावलला जातो आणि कालबाह्य कर्मकांडाच्या कौतुकांचे नारे जोरात पिटले जातात. एकच उदाहरण पुरे होईल. महापवित्र कुंभमेळे उज्जैन, हृषिकेश, नाशिक, अलाहाबाद तीर्थक्षेत्रावर नियमित १२ वर्षांच्या अंतराने भरत असतात. (मिथ्याकथन असे की) अमृतमंथनानंतर देव दानवांचे बारा वर्षे युद्ध झाले; देवांनी अखेर असुरांच्याकडून अमृतकुंभ हस्तगत केला. या झटापटीत वरील चार ठिकाणी अमृताचा एकेक थेंब खाली पडला. त्या स्थानाला अलौकिक महत्त्व प्राप्त झाले. त्या प्रत्येक ठिकाणी त्या विशिष्ट मुहूर्तावर स्नान करणे ही महान पुण्याची गोष्ट आहे.

काही लाखात या यात्रा भरतात. अलीकडे ही संख्या कोटीचा आकडाही ओलांडू लागली आहे. मुहूर्तावर स्नान करून बारा वर्षांचे पाप विमोचन करण्याची अशी नामी युक्ती जगात कोठेही नसल्याने देशविदेशाचे वार्ताहर गर्दी करतात. लाखभर साधू महिनाभर मुक्काम ठोकून राहतात; शाही स्नानाला जातात. पहिल्यांदा मान कुणाचा यावर लहान मुलांसारखे भांडतात. भजन, कीर्तन, प्रवचन, आध्यामिक चर्चा यातले काहीच जवळपास करत नाहीत. अन्नदान, ज्ञानदान, रक्तदान यातले त्यांना काहीच सुचत नाही. एकही झाड लावत नाहीत. फक्त हजारो किलो दूध, तूप, श्रीखंडावर ताव मारतात. सजवलेले हत्ती, घोडे, उंट मिरवतात. भपकेबाज विदेशी गाड्या वापरतात. आरामात चिलीम ओढतात. गांज्याशिवाय जगणे त्यांना अशक्य असते. आणि या अशांच्या साऱ्या सुविधांसाठी, त्यांच्या धार्मिक आचरणासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. ही कसली उपासना? त्याचा फायदा कोणाला? असा प्रश्न विचारणे धर्माचा अधिक्षेप ठरते. अलीकडेच महाराष्ट्रात झालेल्या नाशिक येथील सिंहस्थकुंभमेळ्यासाठी

शासनाने तीस कोटी रुपये खर्च केले, ज्या वेळी महाराष्ट्रातील निम्या प्राथमिक शाळांना शिक्षकांची, इमारतींची, खडू-फळ्याची, पिण्याच्या पाण्याची टंचाई होती.

रूढी, परंपरा, उपासना यांना मानवी जीवनात मोठे स्थान आहेच. यासाठी या धर्मआविष्काराचा, त्यामागील जाणिवांच्या इष्टता, अनिष्टतेचा म्हणूनच शोध घ्यावा लागतो. तो धर्मविरोध नसतो पण साक्षेप करणारा विचार असतो. परंतु याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा आहे. लोकमान्यांच्या गीतारहस्यातील पुढील उतारा त्यासाठी पाहण्यासारखा आहे.

'धर्म हा शब्द नित्य व्यवहारात कित्येकदा निव्वळ पारलौकिक अर्थी वापरतात. आपण एखाद्यास 'तुझा धर्म कोणता?' असा प्रश्न करतो तेव्हा पारलौकिक कल्याणार्थ तू कोणत्या मार्गाने जातोस, वैदिक, बौद्ध, जैन, ख्रिस्ती की महम्मदी असे विचारण्याचा आपला हेतु असतो आणि तोही त्याप्रमाणे उत्तर देतो. 'अथ तो धर्मजिज्ञासा' या सूत्रालाही धर्माचा हाच अर्थ अभिप्रेत आहे. पण येवढाच अर्थ धर्म या शब्दाचा नाही. उदा. :- चतुर्विध पुरुषार्थाची गणना करताना 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष' असे म्हणतात. यातील धर्म या शब्दातच मोक्ष (पारलौकिक धर्म) येत असेल तर शेवटी निराळा पुरुषार्थ सांगण्याची गरज नव्हती. धर्म या शब्दात तत्कालीन समाजव्यवस्था शास्त्र हाच अर्थ विवक्षित असतो.'

तेव्हा धर्म म्हणजे रूढी, परंपरा, उपासनापद्धती, सज्जनपणा, सद्गुण एवढाच अर्थ नाही. आम्हाला धर्माचे राज्य स्थापन करायचे आहे असा पुकारा या देशात अनेक जण करतात. त्या वेळी त्यांचे दाखवायचे दात आणि खाण्याचे दात वेगळे असतात. धर्म याचा अर्थ लोकांना सांगण्यासाठी नैतिक व सांस्कृतिक मूल्यांना असलेली एकूण निष्ठा हा असला तरी व्यवहारातील अभिलाषा, धर्माच्या आधारे समाज नियंत्रणाची असते. समाजव्यवस्था शास्त्र हा गुलामगिरीच्या व सरंजामशाहीच्या काळात धर्माचा विषय होता. आधुनिक काळात समाजव्यवस्था शास्त्र हा राजकारणाचा विषय आहे; धर्माचा नव्हे.

अंधश्रद्धा निर्मूलन कार्यातील भूमिका धर्माबाबत तटस्थपणाची आहे याचा अर्थ भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेले देश उभारणीचे स्वरूप व आत्मतत्त्व मोडीत काढून ते विशिष्ट धर्माचे राष्ट्र म्हणून उद्घोषित करण्याचा काही मंडळींच्या उपद्व्यापाचा प्रतिवाद वा प्रतिकार करायचा नाही असे मुळीच नव्हे. उलट या कारस्थानातील व्यापक धोके लोकांना समजावून सांगणे हे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या व्यापक आशयाशी अत्यंत सुसंगत आहे. देशातील समाजकारण, राजकारण, अर्थकारण याचा आधार तथाकथित संतमहंताची धर्मसंसद नक्की करेल अशा वल्गना केल्या जात असताना तर, आणि तशी कारवाईही सुरू असताना हे कधी नव्हे एवढे आवश्यक झाले आहे.

धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व मोडीत काढणे हे पूर्णत: संविधानविरोधी आहे अशी ग्वाही सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाने दिली आहे. धर्माच्या आधारे मते मागितली आणि निवडून आले तरी निवडणूक रद्द होते. कारण एक माणूस, एक मत, एक मूल्य या

पायाभूत कल्पनेलाच त्यामुळे सुरुंग लागतो. धर्माचा प्रभाव राजकारण, समाजकारण एवढेच नव्हे तर जीवनाची सर्व अंगे यावर घट्ट पाडण्याचा ब्राह्मणी धर्माचा शेकडो वर्षांचा अनुभव असताना तर ही गरज अधिकच जाणवते. मनुस्मृतीमधले 'राजकारण' राजाने दंडसत्तेचा वापर कसा करावा याबद्दल आहे. त्यात भयानक वर्णविषमता आहे. एक चोरी सोडून बाकीच्या सर्व गुन्ह्यांबद्दल ब्राह्मणांना सौम्य शिक्षा आहेत. इतर वर्णीयांना चढत्या क्रमाने शिक्षा आहेत. शूद्रांकरिता क्रूर, अमानुष, सूडाने अंधळ्या झालेल्या वेडसर माणसाने घ्याव्यात अशा शिक्षा सांगितल्या आहेत. राजाने दंडसत्तेचा वापर अप्रतिहत करावा नाहीतर अराजक माजेल असा इशारा मनुस्मृती देते, पण मनूची अराजकाची व्याख्या काय आहे?

तर कावळे कुत्रे यज्ञातील पायसादी हवन लांबवतील, शूद्र सामर्थ्यवान होतील. वर्णसंकर होईल. मनुस्मृतीच्या ९ व्या प्रकरणात मनूने स्त्रियांच्या स्वाभाविक प्रवृत्तीविषयी जे शेरे मारले आहेत ते वाचताना आज कुठल्याही सुसंस्कृत माणसाची मान शरमेने खाली जाईल. अर्थात सर्वच धर्मशास्त्रांमध्ये स्त्रिया, शूद्रातिशूद्र यांना धर्माच्या नावाने अमानुष वागणूक दिली आहे. बोहरा धर्मगुरू धर्माच्या आधारे त्यांच्या धर्मातील लोकांवर जी दंडेली आज राजरोसपणे करतात, किंवा परदेशगमनासाठी वाहनाचा वापर केला म्हणून जैन साध्वींना धर्माचार्य धर्मबहिष्कृत करतात त्यामध्ये धर्मदंडाच्या आधारे व्यक्ती, समाजव्यवस्था नियंत्रित करण्याचा दुराग्रह स्पष्ट दिसतो. या सर्वांचा प्रतिसाद आवश्यकच आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य ही सारासार बुद्धी वापरण्यास व्यक्तीला प्रवृत्त करणारी चळवळ आहे. हे राष्ट्र हिंदूंचे व्हावे म्हणून प्रचार करणारे हे सध्या सारासार बुद्धीने समजणाऱ्या सत्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत आहेत काय, अशी शंका येते. राष्ट्र हिंदूंचे झाले तर मुसलमानांचे करायचे काय? एकतर सर्व बारा कोटी मुसलमानांना देशाबाहेर काढावयास हवे, जे अशक्य आहे. त्यांना ठार मारून नष्ट करणे हे त्याहूनही अमानुष आणि अशक्य आहे. युद्ध करणे आणि त्यांना गुलाम करणे हे कदाचित ७० कोटी हिंदूंना वरपांगी शक्य होईलही परंतु शस्त्रास्त्रे कोठूनही मिळणाऱ्या आजच्या जमान्यात हा उपाय म्हणजे स्वत:च्या हाताने स्वत:ची उद्ध्वस्ततेकडे आणि अराजकाकडे वाटचाल ठरेल. हे सारे स्वच्छपणे समजत असताना एकच गोष्ट उरते ती म्हणजे न्यायाचे, बंधुतेचे, प्रतिष्ठेचे सहजीवन जगण्याची.

धर्मभावनेचा विचार करताना म्हणूनच तीन महत्त्वाच्या बाबी पुढे येतात. एक धर्माच्या नैतिक आशयाच्या आचरणाची, दुसरी संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेच्या चोख अंमलबजावणीची आणि तिसरी विवेकवादी जीवनदृष्टीने धर्माला एक समग्र पर्याय देण्याची.

धर्माचा नैतिक आशय अतिशय प्रभावीपणे संत गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून लोकांच्यापर्यंत पोचवीत असत. त्यांच्या मते 'भुकेलेल्याला अन्न द्या, तहानलेल्याला पाणी, अडाण्याला शिक्षण, बेघराला घा, आजाऱ्याची शुश्रूषा, प्राण्यांना अभय, रंजल्यागांजलेल्यांची सेवा' हाच धर्म होता. हा महाराष्ट्रातल्या संतांचाच वारसा होता.

गाडगेबाबांनी तो कृतीशीलपणे जगून दाखवला हे त्यांचे महामानवत्व. रूढ कल्पनांना छेद देणाऱ्या धार्मिकतेच्या या मानवधर्मी रूपाने महाराष्ट्रातील समाजसुधारकही प्रभावित झाले होते यात शंका नाही. धर्मभावनेच्या भ्रष्ट स्वरूपामुळे व तिला साधन करून लोकांची वंचना करणाऱ्या वृत्तीमुळे धर्म ही अफूची गोळी आहे हे मार्क्सचे वचन अनेकदा सांगितले जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या वस्तुनिष्ठ कसोटीवर धर्म कोठे टिकतो असा प्रश्नही बुद्धिजीवी विचारतात. या मर्यादा मान्य कराव्या लागतातच. धर्माचे भ्रष्टीकरण व साधनीकरण होण्याचे भय प्रत्यही जाणवत असलेल्या आजच्या जमान्यात याचा प्रतिवाद कसा करावयाचा? विवेकवादाची निर्मिती जनसमूहाच्या मनात करून? की मानवाच्या मूलभूत व शाश्वत अशा धर्मभावनेकडे अधिक आस्थेने पाहून? दोन्ही पर्यायांबाबत ममत्व व आदर बाळगण्याची अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची भूमिका आहे. अर्थात याबरोबर व्यापक सामाजिक कारणांचे भानही बाळगणे आवश्यक आहेच.

मानव हा आपल्या अस्तित्वाचा विचार करतो. त्याबरोबर आपल्या भोवतालच्या विश्वाचाही. एक बाजूला विश्वातील कार्यकारणभाव व नियमबद्धता तो अनुभवतो तर दुसरीकडे विश्वरचनेचे रहस्य त्याला गूढ व अद्‌भुत वाटते. आपल्या ज्ञानाची सान्तता त्याला प्रतीत होते. मानवी अस्तित्वाचा व श्रेयाचा विचार करताना मानवाच्या मर्यादित सामर्थ्याची जाणीव मानवी प्रज्ञेला गाढपणे होते व या नम्र जाणिवेच्या पायावर एका धर्माच्या श्रद्धेचा उदय होतो. ही श्रद्धा मूलत: मानवप्रधान या स्वरूपातील विकसित धर्मश्रद्धा असते. विश्वाचा निर्माता असा जो ईश्वर तो न्यायी व दयाघन आहे, मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा तो आधार आहे. मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानावी. ईश्वराचे पितृत्व मानून सर्व मानवांचे भ्रातृत्व मानावे. या श्रद्धेच्या आचरणासाठी कोणाही प्रेषिताची, धर्मग्रंथाची, मूर्तिपूजेची गरज नाही असे या निखळ नैतिक धर्मश्रद्धेचे रूप दिसते. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकातील पुढील मांडणी त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे.

महात्मा फुले यांनी संवादरूपाने मांडणी केली आहे.

बळवंतराव - प्रश्न : तर मग निर्मिकाचे नावसुद्धा आपण मानवांनी घेऊ नये काय?

ज्योतिराव - उत्तर : आपण मानवांनी कृतज्ञतापर्वूक व मन:पूर्वक निर्मिकाचे नाव सुद्धा घेऊ नये म्हणून सिद्ध करणारास अधम व कृतघ्न म्हटले पाहिजे.

बळवंतराव - प्रश्न : तर मग मानवाने कृतज्ञतापूर्वक निर्मिकाचे नाव कसे व कोणत्या वेळी घ्यावे?

ज्योतीराव - उत्तर : निर्मिकाच्या नावाचा सतत व्यर्थ नामघोष करून त्याचे मस्तक फिरवल्याने त्यास नि:संशय संतोष होणार नाही. आपल्याकरिता निर्मिकाने निर्माण केलेल्या वस्तूंचा धर्म संबंधीत कल्पित छक्केपंजे उत्पन्न केल्याशिवाय सर्वांच्या श्रमाप्रमाणे उपभोग घेण्याची सुरुवात केल्याबरोबर सर्व जगातील मानव प्राण्यात कोणत्याही तऱ्हेचे निरर्थक कलह उत्पन्न होणार नाहीत व एकंदर सर्व मानव प्राणी

सुखी होऊन साक्षात निर्मिकाचा अंमल बसून त्याचे राज्य होणार आहे.

बळवंतराव - प्रश्न : आपल्या निर्माण कर्त्यावर पुष्पे चढवून त्याची पूजा करावी काय?

ज्योतिराव - उत्तर : एकंदर सर्व पदार्थ निर्मिकाने जर उत्पन्न केले आहेत तर आपल्याजवळ आपले स्वत:चे काय आहे, ते निर्मिकावर वाहून त्याची पूजा करावी?

बळवंतराव - प्रश्न : तर मग या पुष्पाचा काय उपयोग करावा?

ज्योतिराव - उत्तर : स्वपरिश्रमाने आपल्या कुटुंबाचे पोषण करून रात्रंदिवस जगाच्या कल्याणासाठी झटणारे - म्हणजे मानव बांधवास आपमतलबी व स्वकार्यसाधू लोकांच्या जाळ्यातून मुक्त करणाऱ्या संतपुरुषास फुलांच्या माळा करून ईश्वराच्या नावाने अर्पण कराव्यात म्हणजे पुष्पांचे सार्थक झाले.

यशवंत फुले-प्रश्न : आपण निर्मिकास नैवेद्य दाखवून त्यास कसे तृप्त करावे?

ज्योतिराव - उत्तर : एकंदर सर्व पोकळीतील अनंत सूर्यमंडळांसह त्याच्या ग्रहोपग्रहांसहित पृथ्वीवरील सर्व प्रकारचे पदार्थ मानवाच्या निर्वाहाकरिता जर निर्माणकर्त्याने आपल्या स्वेच्छेने केले आहेत, तर त्यापैकी आम्ही कोणत्या पदार्थाचा उलटा नैवेद्य अर्पण करावा?

बळवंतराव -प्रश्न : अनुष्ठानापासून अथवा जप करण्यापासून निर्मिकास काही संतोष होईल काय?

ज्योतिराव - उत्तर : नाही. कारण हे सर्व अज्ञानरूप अंधःकारात बुडालेल्या बांधवास बहुरूपी धूर्त ठकांचे लुटून खाण्याचे कृत्रिम सोंग आहे.

बळवंतराव - प्रश्न : तर मग अनुष्ठान घालून जपतप कसे करावे?

ज्योतिराव - उत्तर : निर्मिकाने एकंदर सर्व पदार्थ उत्पन्न केले आहेत. त्यापैकी प्रत्येक पदार्थाचा कोणकोणत्या ठिकाणी कसा उपयोग करावा याविषयी रात्रंदिवस खटपट करून ध्यानस्थ होऊन विचार करावा.

मनाजी - प्रश्न : स्वर्ग नाही म्हणून तुम्हांस वाटते काय?

ज्योतिराव - उत्तर : यात काय संशय? एखादा मनुष्य स्वर्ग पाहण्यास गेला व तो परत आला अशी कधीतरी गोष्ट घडून आली आहे काय? अशा प्रकारचा मनुष्य तरी एखाद्या भूभागावर सापडेल काय?

मानवाला उन्नत करू पाहणाऱ्या या धर्मश्रद्धेचा आदर अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करताना आम्ही करतो. विवेकाच्या आधारे विचार करून जे साधण्याचा आमचा प्रयत्न आहे तेच एका वेगळ्या मार्गाने मिळवण्याचा हा प्रयत्न आहे असे मानतो.

परंतु धर्माचे व्यवहारातील वर्तन असे साधे सोपे बहुदा नसते. त्यामध्ये नैतिकतेची जाणीव असली तरीही मजबूत हितसंबंधी गृहिते असतात. बऱ्याच वेळा तर तेवढीच

असतात. धर्मपालनाचे स्वातंत्र्य आणि समाजजीवनाचे नियमन यांच्यात असा अंतर्विरोध येतो त्या वेळी काय करावयाचे याचे दिग्दर्शनही संविधानानेच केलेले आहे.

व्यक्तीला उपासना पद्धतीचे, धर्मपालनाचे पूर्ण स्वातंत्र्य, धर्माधर्मावरून व्यक्तिव्यक्तीमध्ये भेदभाव न करणे, आणि शासनाने धर्मपालनाला मदत, विरोध वा हस्तक्षेप न करणे या सूत्रावर आपल्या घटनेतील धर्मनिरपेक्षता उभी आहे. मात्र धर्मआचरणाचे हे स्वातंत्र्य निरपवाद नाही. त्याला काही मर्यादा आहेत. राष्ट्रीय एकात्मता, कायदा आणि सुव्यवस्था, सार्वजनिक नीतीमत्ता, सार्वजनिक आरोग्य यांच्या रक्षणासाठी धर्मस्वातंत्र्याचा संकोच करण्याची वेळ आल्यास त्याची अनुमती घटनेनेच देऊन ठेवलेली आहे. अमृतसरचे सुवर्ण मंदिर शिखांना कितीही पवित्र असले तरी त्यामध्ये राष्ट्रापासून फुटून निघून खलिस्तान उभारणीची कारस्थाने चालविली जातील तर देशाचे सैन्य राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्या मंदिरात घुसणे घटनेला मंजूर आहे. मंदिर वा मशिद वा चर्च बांधण्याचा व्यक्तीला, समाजाला अधिकार आहेच. पण बांधकामाचे नियम धाब्यावर बसवून, कायदा सुव्यवस्था डावलून भरचौकात प्रार्थना स्थळ उभारण्याचा हक्क मात्र कोणालाच नाही. देवाची पूजा कशी करावी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण नदीत अंघोळ करून नग्न अवस्थेत रेणुकामातेचे दर्शन घेण्याची कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यातील चंद्रगुप्पीची नग्नयात्रा व नग्नपूजा मात्र शासनानेच हस्तक्षेप करून बंद पाडली कारण धर्माचरण सार्वजनिक नीतिमत्तेशी विसंगत होते. पंढरीच्या पांडुरंगाची आषाढी वारी हा वारकऱ्यांचा धार्मिक अधिकारच आहे पण कॉलऱ्याची लस टोचून घेणे नाकारून पांडुरंगाच्या कृपाप्रसादावर भरवसा टाकणे मात्र मान्य होण्यासारखे नाही. कारण तशी परवानगी दिली तर चंद्रभागेच्या किनाऱ्यावरून कॉलरा पसरून सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होते. खरे तर धर्मनिरपेक्षतेच्या अभिप्रेत आशयाचे काटेकोर पालन करणे हे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या भूमिकेतील धर्मविषयक तटस्थतेशी खूपच सुसंगत व तिला उपकारक ठरणारे आहे.

धर्माबद्दल खरा पायाभूत प्रश्न येतो नैतिक जाणिवांचा. कांट या जगप्रसिद्ध तत्त्ववेत्त्याने याबाबत केलेले भाष्य मोलाचे आहे. तो म्हणतो, "ज्या दोन गोष्टींचे जितके स्मरण करावे, चिंतन करावे तितके मन आश्चर्य व गंभीरता यांनी भरून जाते, त्या गोष्टी म्हणजे अवकाशातील तारांगण व अंत:करणातील नैतिक विवेक. जीवन क्षणभंगुर आहे. सामाजिक व्यवहार चंचल आहे तर नीतीचे शाश्वत मूल्य कोठून येते? सारे जग विरोधात गेले तरी नीतीयुक्तच जगेन हे धैर्य कोठून येते? नीतीचा भंग केला तर जे भय वाटते ते कुणाचे वाटते?

हा युक्तिवाद बिनतोड नाही. पण धार्मिक श्रद्धा, धार्मिक अनुभव व संस्कार या पार्श्वभूमीवर तो एका श्रेयाकडे निर्देश करतो. मानवी जीवनातील विवेकबुद्धी वेगळ्या वाटेने हेच उत्तर समर्थपणे शोधते.

माणसाचा सारासार विचार करण्याची शक्ती म्हणजे विवेकबुद्धी असे स्थूल मानाने समजता येईल. विवेकबुद्धी दोन क्षेत्रांत काम करते. ज्ञानाच्या क्षेत्रात व आचरणाच्या

क्षेत्रात. ज्ञानाच्या क्षेत्रात सत्य काय व असत्य काय याचा निर्णय वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे विवेकबुद्धी करते. यामध्ये चोख पुरावा व तर्क यांच्या बळावर सिद्ध झालेल्या वैज्ञानिक उपपत्तीपुढे धर्मश्रद्धेला अटळपणे माघार घ्यावी लागते व लागली. परंतु महत्त्वाची गोष्ट ही की मूलत: संघर्ष हा धर्मश्रद्धा व वैज्ञानिक ज्ञान यांच्यामध्ये नव्हता तर तो धर्मश्रद्धा व विवेकवाद (रॅशनॅलिझम) ह्यांच्यामध्ये होता. आधुनिक विज्ञान हे विवेकवादाला आलेले एक फळ आहे. आचरणाच्या क्षेत्रात इष्ट काय, अनिष्ट काय, वाईट काय, याचा निर्णय विवेकबुद्धी करते. विवेकी आचरणाचा एक महत्त्वाचा निकष म्हणजे ते आत्मकेंद्रित नसते. आपल्या विचाराबरोबर दुसऱ्याचा विचारही त्यात असतो. दुसऱ्याच्या भावना दुखवू नयेत, त्याच्यावर अन्याय होऊ नये याबद्दल विवेकशील मनुष्य स्वत:इतकाच दक्ष असतो. दुसऱ्याने माझ्याशी जसे वागणे मला आवडते तसे मी इतरांशी वर्तन करेन आणि इतरांनी माझ्याशी जसे वर्तन केलेले मला आवडणार नाही तसे वर्तन मी इतरांशी करणार नाही. हा विवेकी मानवी व्यवहाराचा निकष असतो. सात-आठ वर्षांपर्यंत मुले खूप आत्मकेंद्रित असतात. मनोविकास होणे म्हणजेच ही आत्मकेंद्रितता नष्ट होऊन सामाजिकतेची जाणीव येणे, विवेकशील बनणे.

माणसाच्या मनाची घडण विलक्षण गुंतागुंतीची असते. मनुष्याच्या आचरणामागे उपभोग, लालसा, कीर्ती, अंधश्रद्धा अशा अनेक प्रेरणा असतात. विवेकी बुद्धीची प्रेरणाही असते. परंतु ती कित्येक वेळा प्रभावी ठरतेच असे नाही. ती प्रभावी ठरणे म्हणजेच विचाराला व कृतीला विवेकाची बैठक प्राप्त करून देणे. ही बैठक हा जीवनाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन असतो. त्यामुळे विचाराला मूल्यांचे स्वरूप प्राप्त होते. विवेकवाद हा मानवी जीवनाबद्दलचा मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन तर्कशुद्ध, शास्त्रीय असतो. त्याला विवेकशील (रॅशनल) हे विशेषण लावले जात नाही. विवेकशीलता ही मानवी जीवनाच्या संदर्भातच असते कारण मानवाच्या प्रत्यक्ष जीवनातच आचरण्याचा प्रश्न येतो. चातुर्य म्हणजे विवेक नाही, याचे भान ठेवावयास हवे. चातुर्ययुक्त वागण्याचा ते वागणे चांगले का वाईट याच्याशी संबंध नसतो. विवेकबुद्धी मात्र याचा विचार करूनच चांगल्याचा स्वीकार करते. बुद्धीने दिलेला निर्णय योग्य आहे का याचाही निर्णय विवेकशक्ती करते. मानवी जीवनातील बुद्धिसह मूल्य, भावना, श्रद्धा या सर्वांचा विवेकही विवेकशक्तीनेच होतो.

आचरणाचे धर्मावर अवलंबून असलेले क्षेत्रच यामुळे बदलते. धर्मग्रंथ, रूढी यांना प्रमाण न मानता विवेकाला प्रमाण मानावे असा निष्कर्ष निघतो. विवेकवाद हा धार्मिक श्रद्धेच्या विरोधातील ऐहिक तत्त्वज्ञान म्हणून पुढे येतो. त्याचे आधारभूत निकष म्हणजे माणसाचे हित व प्रतिष्ठा ही आचरणाच्या केंद्रस्थानी असते. सृष्टीच्या घडामोडींचे ज्ञान ऐहिक पद्धतीनेच होते आणि व्यक्तीच्या व मानवी विकासाच्या दृष्टीने मानवी व्यवहाराची, सामाजिक संबंधांची, संस्थांची फेरमांडणी करावी हे त्यात अभिप्रेत असते.

आचरणाच्या क्षेत्रात विवेकबुद्धीचा व नीतीशास्त्राचा विषय एकच असतो. नैतिकतेच्या काही कल्पना स्थलकाल, परिस्थिती सापेक्ष असतात. कालांतराने त्यात बदल होतो.

मुसलमानी धर्मात एका पुरुषाला अनेक बायका असणे ही गोष्ट नीतिसंमत आहे. ख्रिश्चन धर्मात हीच गोष्ट नीतिविरुद्ध मानली जाते. काही रानटी टोळ्यांत स्त्रीला अनेक पती असणे हे नैतिक गणले जात असे. सुधारलेल्या देशात तीच गोष्ट अनैतिक ठरल्यावाचून राहणार नाही. सतीप्रथा ही मागील शतकात धर्मसुसंगत नीती होती; या शतकात ती धर्म आणि कायदा दोन्हीशी विसंगत अशी बाब आहे.

चांगल्या आचरणाचे आदेश सर्व धर्म प्रवर्तकांनी दिले आहेत. सत्य बोलावे, हिंसा करू नये, दयाभाव बाळगावा, प्रेम करावे हे नीतीनियम सामाजिक गुणांची वाढ करणारे आहेत. या नियमांची आवश्यकता व उपयोग नाकारता येत नाहीत पण परिस्थिती अनेकदा अनपेक्षित असते, वेगळी असते. नीतीनियमांना बाधा आणण्यावाचून गत्यंतरच उरत नाही. सत्य बोलावे हे ठीक पण रोगी ज्या वेळी स्वत:च्या प्रकृतीबद्दल विचारतो तेव्हा सर्व सत्य सांगणे अपायकारक ठरण्याची शक्यता असते. घरात विषारी नाग निघाला तर अहिंसेचे पालन योग्य ठरत नाही. त्यामुळे नीतीनियम व प्रत्यक्ष आचरण यांच्यामध्ये कधी-कधी मेळ घालणे अवघड बनते. त्यासाठी या विसंगतीचा निरास करून सगळ्या इष्ट नीतीकल्पनांना सामावून घेणारे एखादे व्यापक तत्त्व असणे आवश्यक आहे. वरील नीतीनियमांचे पालन करावे असे म्हणण्यात हेतू असतो की हे नियम चांगले आहेत. विशिष्ट परिस्थितीत सत्य बोलावे की बोलू नये, हिंसा करावी की करू नये याबद्दल मतभेद असतील परंतु कोणत्याही परिस्थितीत माणसाने चांगले वागावे याबद्दल मतभेद असत नाहीत. कोणकोणते वागणे चांगले याची मोजदाद शक्य नाही, त्यापेक्षा 'चांगले' या शब्दाने कोणता अर्थ सांगितला जातो हे पाहणे उपयुक्त ठरेल. 'चांगले' या संज्ञेचा हा अर्थ म्हणजेच विवेकवादाचे सर्वसमावेशक व्यापक तत्त्व होय.

मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे व तो स्वभावत:च समाजशील आहे. या दोन वैशिष्ट्यांतच माणसाच्या विवेकशीलतेचा उगम आहे. मानवी चांगलेपण हे फक्त समाजजीवनाच्या संदर्भातच शक्य आहे; अस्तित्वात आहे. निर्जन बेटावर पूर्णपणे एकाकी राहणाऱ्या माणसाने विवेकी वागणे याला अर्थ नाही. तेव्हा विवेकशीलतेच्या उगमाचा सामाजिक संदर्भ लक्षात घेऊनच विवेकदृष्ट्या 'चांगले' या संज्ञेचा अर्थ निश्चित करावयास हवा.

सामाजिक असणे ही माणसाच्या अस्तित्वाची मूलभूत शर्त मानली तर माणसाची आत्मकेंद्रितता नष्ट होऊन इतरांबद्दलची जाणीव त्याला निर्माण होणे, इतरांचा आत्मौपम्यबुद्धीने त्याने विचार करणे म्हणजेच चांगले वा विवेकी वागणे. इतरांच्याकडे तो आपल्या गरजा पुरविणारी माणसे या दृष्टीने पाहत नाही तर आपल्याबरोबर माणुसकीचा अनुभव घेणारी, जीवनाची गुंतागुंत अनुभवणारी, माणुसकीच्या एकाच भावनेने बद्ध असणारी माणसे या दृष्टीने बघतो. चांगलेपण व विवेकशीलता ही माणसांच्या या मानसिक वैशिष्ट्यावर व सामाजिक जीवनावर आधारलेली असते आणि तिचा रोख अखिल मानवजातीच्या सर्वांगीण समृद्धीकडे असतो. आत्मकेंद्रिततेचे सामाजिक जाणिवेत

रूपांतर होणे, तात्कालिक स्वसुखाच्या मर्यादा ओलांडून व्यापक, विश्वात्मक पातळीवर जाणे म्हणजे विवेकशील होणे.

ही नैतिकता उघडच धर्मनिरपेक्ष असते. माणसाची नैतिक भावना निसर्गाची देणगी आहे. तिचा उगम धर्मात वा दैवी शक्तीत नाही. उत्क्रांतीत अपरिहार्यपणे वाढलेली ही स्वाभाविकच प्रेरणा आहे. मनुष्य हा समाजातच राहतो. त्याचे भवितव्य सामाजिक सहकार्यावर अवलंबून असते. सहृदयता, प्रेम, अहिंसा या स्वरूपाच्या सहभावना निसर्गदत्त आहेत वा असतात. या नैतिक भावना मानवी जीवनाला परिपोषक असल्यामुळे उत्क्रांतीकाळात व सामाजिक जडणघडणीत त्या एक स्वाभाविक प्रवृत्ती बनण्याची शक्यता असते. तशा त्या बनतातही. धर्माशिवाय नीतीला आधार नाही असे लोक मानतात. मनुष्यप्राणी हा स्वाभाविकच स्वार्थी असल्यामुळे धर्माच्या दडपणाशिवाय तो नैतिकतेला धरून वागणे शक्य नाही असा युक्तिवाद केला जातो. पण नैतिक भावना ही मनुष्य स्वभावाची एक नैसर्गिक प्रवृत्ती असेल तर हे प्रतिपादन चूक ठरते. (मात्र या नैसर्गिक प्रवृत्तीच्या आविष्काराला आवश्यक ती समाजस्थिती अस्तित्वात आणणे ही पायाभूत बाब आहे हे दुर्लक्षून चालणार नाही.) कोणत्याही नैसर्गिक प्रवृत्तीला वाव मिळाला तर मनुष्याला समाधान होते म्हणूनच नीतिमत्तेने वागणारे लोक सुखी असतात. परपीडनाने त्यांना दु:ख होते, परोपकाराने समाधान वाटते. या नैतिकतेचा पाया असणारी विवेकबुद्धी (Conscience) ही दैवी देणगी नाही. व्यक्तीचे जीवन यशस्वी करण्यासाठी नैसर्गिक उत्क्रांतीत निर्माण पावलेली ती एक मन:प्रवृत्ती आहे. हे लक्षात घेऊन कोणीही माणूस आपली विवेकबुद्धी व त्याद्वारे आपली नैतिकता प्रखर करू शकतो. व्यक्तीच्या सुखासाठी समाज नीतिमान असावा म्हणून व्यक्ती नीतिमान असावी हा कार्यकारणभाव कोणालाही पटण्यासारखा आहे. विवेकी माणसाची नीतिमत्ता ही स्वयंस्फूर्त असल्याने तो स्वतंत्र असूनही नीतिमान असू शकतो. याची नीती ही धर्माच्या भीतीपोटी निर्माण होण्याची गरजच राहत नाही. बाह्य परिस्थिती सगळ्याच प्राण्यांना घडवते पण मनुष्य हा एकमेव प्राणी असा आहे की त्याच्या ठिकाणी विवेकबुद्धी आहे. त्यामुळे तो परिस्थितीचा दास राहत नाही तर आपल्या आंतरिक शक्ती व बाह्य परिस्थिती यांना मूल्यात्मक वळण लावू शकतो. हे संकल्प स्वातंत्र्य हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. राजकीय दडपण आणणारी हुकुमशाही, आर्थिक पिळवणूक करणारी भांडवलशाही, मानसिक गुलामगिरी लादणाऱ्या धार्मिक रूढी, अंधश्रद्धा माणसाचे हे स्वातंत्र्य हिरावू पाहतात, माणसाच्या नैतिकतेचा, माणूसपणाचा पायाच उद्ध्वस्त करू इच्छितात. याविरोधी लढा लढण्याची इच्छा असणाऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे म्हणूनच विवेकवाद हे हत्यार असते.

हा विवेकवाद पारंपरिक ख्रिस्ती धर्मश्रद्धेच्या आणि सामान्यपणे धर्मश्रद्धेच्या विरोधात उभा ठाकतो. धर्मश्रद्धा हे जसे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतील व्यवहाराचे नियामक तत्त्व आहे त्याऐवजी विवेकशक्ती ही सर्वच जीवनव्यवहारातील नियामक शक्ती असली पाहिजे, असा दावा करतो. नीती ही मानवी व्यवहारातील पायाभूत गोष्ट, ती विवेकनिष्ठ

असली पाहिजे, धर्मधिष्ठित नव्हे असा आग्रह धरतो. सृष्टीतील वस्तू, माणसे, मानवी कृत्ये, त्यांचे परिणाम सत्यावर आधारित असावेत आणि नीतीने चालावेत आणि या गोष्टी फक्त विवेकशक्तीच्या वापरानेच शक्य होतात असे आग्रहाने मांडतो. परंपरेने चालत असलेले समाजातील सर्व व्यवहार व्यक्ती, कुटुंब, राज्य या सामाजिक संस्थांच्या संबंधातील वा नैतिक कृत्याबाबतचे त्यांचे भ्रामक (धार्मिक) स्वरूप दुरुस्त करून त्याच्या सम्यक स्वरूपाची व्याख्या करणे, त्यांचे सम्यक स्वरूप स्पष्ट करणे हे विवेकाचे कार्य आहे आणि ते व्यवहार समाजात रूढ करणे हीच खरी विवेकाधिष्ठित नीती आहे अशी उमेद बाळगतो.

या आधुनिक विवेकवादाने धार्मिक श्रद्धेपुढे उभ्या केलेल्या आव्हानाला तत्त्वज्ञानाच्या पातळीवर एक उत्तर देण्याचा प्रयत्न झाला आहे. धर्मश्रद्धेच्या बाजूने त्याबाबत तटस्थतेची भूमिका घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाला अडथळा येतो असे वाटत नाही. ही भूमिका थोडक्यात अशी की, माणूस हा विश्वात एक ज्ञाता असतो आणि या स्वरूपाचे त्याला विश्वाचे जे ज्ञान होते त्यासाठी वैज्ञानिक विचारपद्धतीचा वापर अपरिहार्य आणि तिचे सामर्थ्य वादातीत असते परंतु हाच माणूस एक नैतिक कर्ता म्हणून वापरतो. त्या वेळी त्याचे एक वेगळे स्वरूप त्याच्या प्रत्ययाला येते नीतीला अनुसरून वागणारे हे माणसाचे रूप स्वायत्त असते; आपल्या इच्छा, वासना, आपल्या मानसिक प्रवृत्तीचा कल किंवा दडपण काहीही असो त्या पलीकडे जाऊन एखादे कृत्य करणे, ज्या वेळी कर्तव्यच आहे असे व्यक्तीला वाटते. त्याचा अर्थ असा होतो की ते कृत्य कोणत्याही शारीरिक वा मानसशास्त्रीय वा बाह्य दबावाला अनुसरून निर्धारित झालेले नसते, ते व्यक्तीच्या आत्मनिर्णयानुसार झालेले असते. हा निर्णय व्यक्तीची मानसिक घडण, तिची परिस्थिती या आगंतुक घटकावर अवलंबून नसतो तर नैतिक कर्ता हे त्याचे स्वरूप आहे त्याद्वारे व्यक्त झालेला असतो. थोडक्यात नीतीचे मूल्य, नीतिमत्तेचा निकष माणसाला निसर्गात निरीक्षणाने सापडत नाही. एक नैतिक कर्ता या माणसाच्या स्वायत्त भूमिकेचा तो नैतिक निर्णय हा आत्माविष्कार असतो.

अशा स्वायत्त नैतिक कर्त्याचे जे नैतिक जग बनलेले आहे ते या ज्ञेय जगाचा भाग आहे, कारण हे नैतिक कर्ते माणसेच आहेत. पण दुसऱ्या अर्थाने हे नैतिक जग नाही, कारण ज्या तत्त्वांनी नैतिक जगाचे नियमन होते त्याचा ज्ञेय जगातील वस्तु-घटनांचे नियंत्रण करणाऱ्या निसर्गनियमांशी काही संबंध नाही; ते स्वायत्त असे जग आहे. म्हणजे माणूस एकाच वेळी दोन भिन्न जगात वावरतो. तो या जगात असतो आणि ईश्वराच्या राज्यात असतो. (किंवा ब्रह्मस्वरूप असतो वा त्याच्या त्याच्या धर्मकल्पनेतील अतीताचा भाग असतो.) खरे तर हे अतीत तत्त्व इंद्रियांच्या कक्षेत येणारे नसतेच असे मानले जाते परंतु आत्मभान असलेल्या नैतिक कर्त्याला स्वत:च्याच रूपात ते गवसत असल्याने हा अंतर्विरोध राहत नाही. आता माणसात जर अतीत तत्त्व असेल तर विश्वातील वस्तुजातातही असे तत्त्व असणार. माणसाने स्वत:चा घेतलेला शोध हा या अतीत तत्त्वाच्या शोधाचा प्रारंभ आहे. ईश्वराने मानवी आत्म्याला स्वत:ची प्रतिमा म्हणून

निर्माण केले ही पारंपरिक श्रद्धा आणि विश्वातील अतीत तत्त्व ही माणसाच्या प्रकृतीतील अतीत तत्त्वाची प्रतिमा आहे ही आधुनिक श्रद्धा. तेव्हा माणसाचे रूप दुहेरी असते. प्राणी हे त्याचे स्वरूप घेतले तर ते निसर्गात पूर्णपणे सामावलेले असते पण नैतिक कर्ता हे त्याचे स्वरूप निसर्गाच्या चौकटीत सामावू शकत नाही. माणसाच्या या भिन्न अतीत रूपाचा आविष्कार भिन्न स्वरूपाच्या व्यवहाराच्या जगात होतो. एकाच वेळी या भिन्न जगाचा तो धारक असतो. आपण नैतिक कर्ते आहोत, आपले आत्मभान प्रमाण आहे हे ज्ञान श्रद्धेने समजून घ्यावे लागते; त्याचे प्रमाण देता येत नाही.

प्रामाण्य न देता येणारी गोष्ट का मानावी असा मुद्दा स्वाभाविकच उपस्थित होतो. अतीतच्या श्रद्धेवर आश्वासित होऊन मूल्याधिष्ठित आचरण करावे, नीतीने वागावे असे कोणी प्रतिपादत असेल आणि त्याचे वर्तन त्या कसोटीला उतरत असेल तर वादाचे कारण नाही, असे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला वाटते. असे नीतिमान आचरण हीच अधिक महत्त्वाची व वास्तवातील गोष्ट आहे. विवेकशील व्यक्तीची निर्णायक कसोटीही त्याच्या धारदार वैज्ञानिक दृष्टिकोनावर नाही तर विवेकी आत्मौपम्य वर्तनावरूनच ठरत असते.

इतिहासात असे घडले आहे की धार्मिक पद्धतीने विचार करण्याची रीत सर्वप्रभावी बनली. इतिहासात सामान्य माणसे कष्ट करून पोट भरत होती. कवी काव्य निर्माण करत होते. कलावंत कलानिर्मिती करत होते, सत्ताधारी राज्यकारभार चालवीत होते. मात्र हे सर्व होत असतानाच या सर्वांच्यावर एक सर्वोच्च मूल्य होते, ते म्हणजे धर्म. इतर सर्व मूल्ये त्याच्यापुढे गौण होती; त्याच्याकडे जाण्याची फक्त साधने होती. याची आता गरज आहे काय? धार्मिक माणसेदेखील जी मानवी मूल्ये मनोमन मानतात त्या मूल्यांकडे केवळ मानवी मूल्ये म्हणून का बघता येऊ नये? निकोप सामाजिकता, सौंदर्य विषयक मूल्ये, न्याय, कर्तव्य, समता, बंधुभाव या कल्पना धर्मकल्पनेवर आधारण्याची आवश्यकता नाही. तुम्ही धार्मिक असा वा नसा, प्रत्यक्ष अनुभवातून तुम्हाला असे वाटते की मानवी जीवन सतत जास्तीत जास्त सुधारता येणे शक्य आहे. जगताना अगदी रोजच्या व्यवहारातही आपल्याला असे वाटते की स्वत:च्या मर्यादा ओलांडून मी गेले पाहिजे. ह्यापेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेने जगले पाहिजे. अतीत जाण्याच्या, परतत्त्व स्पर्शाच्या या कल्पनेत गूढ असे काहीही नाही. स्वत:च्या मर्यादा समजणे आणि त्या ओलांडण्यासाठी धडपडणे हा प्रयत्न सजग माणूस सतत करत असतो. मानवाच्या मूळ स्वरूपाशी सुसंगत अशीच ही बाब आहे.

एक सर्वांगीण अरिष्ट समाजाला ग्रासते आहे. हिंसा, द्वेष, धर्मांधता, अतिरेकी उपभोग याचे वादळ घोंघावत आहे. अंधश्रद्धांची व्यापक वाढती श्रेणी, त्याबाबतचे अभिमान, अहंकार हे त्याचे एक रूप आहे. अंतिम सत्य, खराखुरा सत्यधर्म याच्या घटपटादि चर्चेत उत्तर शोधण्याची ही वेळ नाही. आपल्या कुवतीनुसार प्रत्येकाने उभे राहिले पाहिजे आणि विचारले पाहिजे, मानवी मूल्यांच्या संघर्षात मी काय करू शकतो. मानवी मूल्ये ही काहीतरी गूढ गोष्ट बनवण्याची अजिबात गरज नाही. ज्यांना हा झगडा

करावयाचा नसतो त्यांनाच बहुदा ती मूल्ये गहन, गूढ वाटतात. धार्मिक संस्था, धार्मिक लोक या निकडीच्या लढ्याकडे पाठ फिरवून असतील तर त्यांची धार्मिकता नकलीच असणार. आळशीपणामुळे वा स्वत:च्या मर्यादित कक्षेत समाधानाने पडून राहण्याच्या सुखसीनतेमुळे विवेकवाद्यांनी हा संघर्ष टाळला तर विवेकशीलता पुस्तकी व बेगडीच ठरणार. या मानवी मूल्यांना दुसरीकडे कोठेही आधार शोधण्याची गरज नाही. निसर्ग, विज्ञान, परमतत्त्व वा अतीत यांच्यात त्यांना अधिष्ठान नाही. मानवी मूल्यांना फक्त एकच परिमाण आहे ते म्हणजे मानव.

मूल्यांना फासलेली अंधश्रद्धांची काळोखी, त्याला चढवलेल्या पावित्र्याचा, हितसंबंधाचा गडदपणा यांनी मूल्य स्थापनेचा हा लढा अधिकच अवघड बनवला आहे. असाध्य असलेल्या पण श्रेयस्कर वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीच्या मागे लागताना, संघर्षाला उभे राहताना, शक्तीपलीकडच्या मूल्यांसाठी धडपडताना असंख्य अज्ञात हात सहकार्याला पुढे येतील, काळोखी खरडून काढतील; त्याद्वारे मूल्यांच्या समीप जाता येईल. परिस्थिती बदलता येईल. हाच आशावाद आमच्या चळवळीला आश्वासित करत असतो. सच्च्या धार्मिक माणसांनाही हे आवाहन भिडू शकेल अशी उमेद आम्ही बाळगत असतो.

कृपया स्वत:चे हृदय धुंडाळून पाहा. बुद्धीला कौल लावा. तिथं तुम्हाला मानवी मूल्यांविषयी कणव आढळली तर या लोकयात्रेत सामील व्हा. कारण माणसाला मदत फक्त माणसाकडून मिळू शकते आणि माणसेच समाज बदलत असतात.

विचार तर कराल?

♦♦♦

विचार करताना :

१. प्लँचेटचा पांचटपणा / ५६
२. शोधा म्हणजे सापडेल / ५८
३. परीक्षा सर्पाची आणि स्वत:ची / ६२
४. फ्रिजमधला गणपती / ६४
५. गोलमाल है भाई / ६७
६. कुंडलीतील मृत्यूयोग / ६९
७. दीडशे वर्षे मागे नेणारा पुरस्कार / ७२
८. आता तरी माझ्याकडे लक्ष द्या / ७६
९. बुडबुडे भ्रमाचे / ७९
१०. यज्ञसंस्कृती की अज्ञ संस्कृती / ८२
११. चाबूकही हवा / ८८
१२. प्राणशक्तीचे छायाचित्रण / ९०
१३. येशूचे कफन / ९३
१४. एक तांदूळ पुढे एक गहू मागे / ९९
१५. भुकेला कावळा पिंडाला शिवणारच / १०१
१६. आंधळी कोशिंबीर की डोळसपणा / १०४
१७. राज्यपालांचा अंधविश्वास / १०६
१८. देवाचे दैव / ११२
१९. देवाचे अवमूल्यन / ११४
२०. सत्यशोधकी विवाह / ११६
२१. व्रतवैकल्याचा वेगळा विचार / १२२
२२. होकार देणारा नकार / १२५
२३. धर्मश्रद्धा की अंधश्रद्धा / १२७
२४. अंधश्रद्धेची आणीबाणी / १३३
२५. विवेकाचा आवाज / १३६
२६. समाज क्रांतीचे पाऊल पुढेच पडावं / १४९
२७. असेल हिंमत तर! / १५३
२८. क्रोधापेक्षा करुणा/ उपहासापेक्षा आपुलकी / १५६

प्लँचेटचा पांचटपणा

इंजिनिअरिंग कॉलेजातील भाषण संपले. प्राचार्यांबरोबर गप्पांमध्ये बराच वेळ गेला. बाहेर आलो तर कॉलेज विद्यार्थिनींचा एक घोळका उभाच होता. त्या जणू एका सुरात म्हणाल्या-

'प्लँचेट तरी खरे असते की नाही?'

'अजिबात नाही,' मी हसत उत्तरलो.

'नाही पटत आम्हाला. परवाच आम्ही हॉस्टेलवर प्लँचेट केले. गुळगुळीत पाटावर इंग्लिश अक्षरे काढली. अंक लिहिले. मध्ये वाटी उपडी ठेवली. तिघींनी त्यावर बोट ठेवले. मग आत्मा बोलवला. काय आश्चर्य! वाटी घसरत घसरत अक्षरांवरून फिरू लागली. आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली. अगदी बरोबर.'

'काय विचारलंत?' मी.

मुली जरा लाजल्या. एकमेकींकडे पाहू लागल्या. त्यातल्या एकीने धिटाईने सांगितले.

'परीक्षा पास की नापास?'

नवऱ्याचे नाव, हुंडा द्यावा लागणार की नाही?'

मी विचारले,'मग उत्तरे बरोबरच मिळाली याला पुरावा काय?'

त्यांनी एकमेकींकडे बघितले. थोडा विचार केला, सावरल्या.

पण वाटी आपोआप फिरेलच कशी? ज्याअर्थी आत्म्याच्या शक्तीने वाटी फिरवली त्याअर्थी मिळालेली उत्तरेही बरोबरच असणार.

मला या संवादानं धक्का वगैरे काही बसला नाही. महाराष्ट्रातून सर्वत्र हाच अनुभव येतो. उद्याच्या इंजिनिअर्सनी हे विचारावे याची खंत मात्र वाटली.

किती गोष्टी गृहीत धरल्या होत्या? मरणानंतर आत्मा राहतो. तो प्लँचेटद्वारा घरगड्यासारखा बोलवता येतो.

तो अशरीरी असला तरी भौतिक परिणाम घडवतो.

मात्र हे परिणाम घडवायला त्याला माणसाच्या बोटामधूनच करंट देता येतो, त्याशिवाय नाही. बोट ठेवणाऱ्या तिघांपैकी एक जण तरी देवगणाचा हवा. शिवाय त्या सर्वांची त्याबाबत श्रद्धा हवी. पाखंडीपणा नको. प्लँचेटमधून उत्तर अचूक मिळते. भूत, भविष्य कळते. पाटवाटी उचलली की बापडा आत्मा निमूटपणे जेथून आला तेथे राहावयास जातो. बरे आत्मेही साध्यासुध्या माणसांचे नाहीत. अगदी ओशोरजनीशांपासून हिटलरपर्यंत (आणि आत्मा न मानणाऱ्या आगरकर, सावरकरांचे आत्मेही कुणीतरी वेठीला धरत असणारच.)

मुद्दलात विज्ञानांचा मूळ नियमच हा की, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात बल लावल्याशिवाय कोणतीही गोष्ट एक तसूभरही हलत नाही. (मग पाटावर बागडणे

सोडूनच द्या.) हे आहे भौतिक सत्य, कठोर परीक्षेला उतरणारे. प्लँचेट आत्म्याने हलते हा भाबडेपणा असेल वा बनवाबनवी, पण शास्त्रीय वास्तव नक्कीच नाही. याचा अर्थच असा की, जाणता अजाणता बोटाने बळ लावले तरच प्लँचेट हलू शकते.

पण अंधपणे प्लँचेटचे सामर्थ्य स्वीकारले की, हे साधे प्रश्न सुचत नाहीत. इतरांनी सुचवलेले चालत नाहीत.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तिन्ही कार्यकर्त्यांनी बोट लावले तरी हलणारे एकही प्लँचेट भारतात नाही. मग आमचे कार्यकर्ते राक्षसगणाचे असल्याचा शोध लावला जातो. (पुन्हा म्हणायलाही बरे, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात सारी राक्षसगणाचीच मंडळी असणार!)

बोट सरळ न लावता उलटे करून टेकले तर प्लँचेटची हालचाल मंदावते आणि अनेकदा थांबतेदेखील. (त्या अवस्थेत पेल्यावर बल लावणे अवघड असते.) पण त्याचे कारणही समजून घेतले जात नाही.

बरे हे आत्मे असतात कुठे? स्वर्गात की नरकात?

ते हुकुमाबरहुकूम येतात कसे?

अज्ञात अवकाशातून घरापर्यंत येणारे सिमेंट काँक्रीटच्या भरभक्कम घरातून आत येणारे आत्मे, त्यांना माध्यम कशाला हवे?

आत्म्याच्या स्वसामर्थ्याने मानवी स्पर्शाशिवाय प्लँचेटची वाटी एक मिलीमीटर हलवली गेली तरी आम्ही पाच लाख रुपये देऊन चळवळ बंद करू.

या प्रकारावर अजिबात विश्वास नसणाऱ्या तीन व्यक्ती प्लँचेटसाठी बसल्या तर ते अजिबात हलत का नाही? आत्मे पळ काढतात का? देवगण, राक्षसगण ही काय भानगड आहे? शास्त्राचा काडीचा आधार नसलेली ही शुद्ध बकवास नाही का? प्रश्नांची अचूक (!) उत्तरे तरी कशी?

मृत भावाला प्लँचेटवर पाचारण केले जाते. प्रश्नोत्तर छेडतात.

'भाऊ तू सुखी आहेस का?'

'नाही.'

'तू कुठे आहेस?'

'पृथ्वीवर.'

'मुक्ती मिळाली का?'

'नाही.'

ही उत्तरे बरोबर कशी? तपासणार कशी? मानसिकतेचा अंदाज घेऊन दिलेल्या या उत्तरात तथ्य कसले? आणि खरेच येत असेल आत्मा, देत असेल उत्तर तर आमचे आव्हान फारच सोपे! दहा बंद लिफाफ्यातील एकेक शब्द जरी प्लँचेटने ओळखला तरी आम्ही पाच लाखाची आव्हान रक्कम द्यायला तयार आहोतच....लोकवर्गणीतून जमवलेले हे पाच लाख रुपये आमच्याकडे आहेत. पण आम्ही लाखावर उदार झालेलो धनिक

नाही. चळवळीतले साधे कार्यकर्ते आहोत. पण आमची पक्की खात्री आहे एवढे मात्र नक्की.

आणि तुम्हीही विचार करायला हरकत आहे?

प्लँचेटद्वारे अचूक माहिती मिळत असतीच तर नागरी वस्त्यांवर बॉंबफेक करून जगभरचे शिव्याशाप खाणाऱ्या अमेरिकन लष्कराने या प्लँचेटवाल्यांना इराकचे लपवलेले लष्करी तळ शोधायला स्पेशल विमानाने नसते का बोलावून घेतले? आणि हे नाहीच जमले तरी निदान पोलिसांना तरी प्लँचेटवाले चांगलेच उपयोगी ठरू शकतील अतिरेक्यांचा ठावठिकाण सांगायला!

यासाठी पुढे येणाऱ्या प्लँचेटवाल्यांना भेटायला आम्ही उत्सुक आहोत.

♦♦♦

शोधा म्हणजे सापडेल

अंगावर अचानक बिब्याच्या फुल्या उमटतात, कपडे फाटू लागतात, वस्त्रे जळू लागतात, घरात दगड येतात, अन्नात राख कालवली जाऊ लागते, वस्तूंची उलथापालथ होते.

सारेच गूढ कसे घडते? का घडते? कोण घडवते? काहीच कळत नाही. भानामतीची भीती टळत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ यासाठी तर उभी आहे. ही भानामती कोण आणि कशी घडवते ते आम्ही आव्हानपूर्वक शोधून काढतो. भानामती बंद पाडतो. आमच्या शिबिरात यावर उदाहरणासह प्रशिक्षण करतो. पुन्हा लेखनही उपलब्ध आहेच. स्वाभाविकच हे सारे समजल्यावर माणसे हिंमत बांधतात आणि भानामती प्रकारच्या विरोधात मोर्चे बांधणी करतात. पण कधी कधी काय होते?

एकदा एक अशीच दक्ष व्यक्ती मला भेटली. त्यांनी शिबिरात हजेरी लावली होती. भानामतीवरची भाषा मन:पूर्वक ऐकली होती. भानामती शोधण्यावरचे सारे लिखाणही पचवले होते. पण त्यांची प्रामाणिक तक्रार होती की आमचे हे सारे अनुभवसिद्ध एक्सपोजर टेक्निक वापरूनही त्यांना स्वत:ला मात्र यश येत नाही.

ते म्हणाले, 'अगदी तुमच्या सूचनेबरहुकूम घटना कोणीतरी मानवी हातच घडवत आहे हा तर्काचा पाया मानला.

घटना प्रत्यक्ष डोळ्याने पाहण्याचा आग्रह धरला. हकीकतीमध्ये पराचा कावळा असणार हा विवेक बाळगला, घराची तपासणी केली, व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या,

मानसिक तणावाखाली विकृतीमुळे घरातीलच कोणी व्यक्ती भानामती करत असणार याची जाण बाळगली.

... आणि असेच सर्व काही केले. पण नाही जमले बुवा आपल्याला! असे लोक सर्वत्र भेटतात.

म्हशीचे दूध अचानक कडू कसे होऊ लागले याचे गूढ प्रयत्न करून उलगडत नाही म्हणून कोणी येतो.

नवा कोरा टॉवेल वापरायला लागला तर चार दिवसांत त्याला भोके कशी पडतात म्हणून सारी शोधबुद्धी वापरून हताश झालेला कोणी चिपळूणचा डॉक्टर येतो.

कडेगावला मुलीच्या डोळ्यातून डझनावारी खडे येऊ लागल्यावर पालक, गावकरी सारेच अचंबित होतात. डोळ्यातून खडे येऊनही मुलींना काहीच होत नाही. ही भानामती त्यांना गूढ वाटते व भीतीचीही. प्रकरण घेऊन येणारी सारी मंडळी शास्त्रीय दृष्टिकोन बाळगणारी असतात. भानामतीला भाकडकथा म्हणायला त्यांची तयारी असते. पुस्तके, लेख वाचून त्या प्रकरणाशी त्यांनी झटापटही केलेली असते, मग त्यांचे चुकते काय?अडते कोठे?

अडते हेच की, सारे नियम, आराखडे, तर्कविचार याला अपवाद असतात. मानवाचे वर्तन, निसर्गातील अघटित हे सारे काही जसेच्या तसे साच्यात बसवता येत नाही. अंधश्रद्धांच्या प्रकाराबाबत तर नाहीच नाही. नित्य नव्या डोळसपणे त्याचा शोध घ्यावा लागतो.

एक अफलातून सत्यकथा आहे. अशाच प्रकारची. वीस वर्षांची तरुणी. चेहऱ्यावरून, वागण्यातून शहाणी वाटणारी, हातामध्ये तर बघत रहावे अशी कला, मातीच्या सुरेख बाहुल्या करण्याची. आणि अचानक भानामतीचा प्रकार सुरू झाला. ती करत असलेल्या बाहुल्यांच्या अंगावर, चेहऱ्यावर तिळासारखे काळपट ठिपके उठू लागले. तिने तयार केलेल्या, रंगवलेल्या बाहुल्यांच्या तोंडावर, शरीरावर जेथे-जेथे तिचे बोट लागे त्या भागावर काळ्या ठिपक्यांची रांगोळी उठायला सुरुवात झाली. मुलीला काहीच होत नव्हते पण हे घडण्याचे थांबत नव्हते. नोकरी जाण्याची पाळी आली. मालक अस्वस्थ, कामगार अचंबित तर कुटुंबातील लोक हवालदिल.

गोऱ्या कातडीच्या माणसाच्या अंगावर विशेषत: वयात येणाऱ्या मुलीच्या चेहऱ्यावर असे ठिपके उमटले तर ते स्वाभाविकच वयात येताना शरीरात होणाऱ्या रासायनिक बदलाचा तो दृश्य परिणाम असतो. त्यामुळे असे डाग त्या मुलीच्या चेहऱ्यावर जरी जास्त उमटले तर तक्रारीचे कारण नव्हते. उपाय करता आला असता. पण येथे प्रकार औरच होता. काळ्या डागांचा त्रास मुलीला होत नव्हताच, तो होत होता तिच्या हातून घडलेल्या बाहुल्यांना.

उपचाराची एक शक्यता म्हणजे बाहेरचे काय आहे का म्हणून शोधायचे. दुसरी शक्यता भानामती शोधायचा फार्म्युला वापरायचा. हे दोन्ही प्रकार अयशस्वी ठरले.

मग काय पॉवरफुल भानामतीला मान्यता द्यायची?

चौकशी करणाऱ्यांनी अधिक खोल विचार केला. मुलीचा घाम बाहुल्यांना लागतो त्या घामामुळे तर ते नसेल होत?

घामाचे नमुने गोळा केले. त्याचे रासायनिक विश्लेषण केले. त्यामध्ये अपेक्षेपेक्षा बरीच जास्त सेंद्रिय सल्फाईडची संयुगे आढळली. मुलीने केलेल्या बाहुल्यांवरच्या काळपट डागांचे नमुने घेतले. त्यांचे पृथ:क्करण केले. त्यामध्ये सल्फर व लोखंड मोठ्या प्रमाणात आढळले. डाग नसलेल्या भागामध्ये मात्र ही द्रव्ये साधारणच आढळली. तिच्या घामात ही संयुगे आली कोठून याचा शोध घेतला. लसणामध्ये हे पदार्थ फार मोठ्या प्रमाणात असतात हे डॉक्टरांना कळले. साहजिकच अन्नातील लसणातून तिच्या रक्तात शिरलेले हे पदार्थ तिच्या घामात उतरले. बाहुली ज्या मातीची त्या मातीमधील लोहाची प्रक्रिया होऊन काळसर ठिपक्यांची रांगोळी तयार झाली.

तरीही विचारणारे लोक होतेच. " काहीतरी सांगता झाले? लक्षावधी लोक लसूण खातात त्यांनी आपल्या घामेजलेल्या हातात मातीचा गोळा धरला तर का नाही उठत त्याच्यावर डाग? फक्त हिच्याच बाबतीत हे आक्रीत कसे घडते?

नक्कीच काहीतरी बाहेरचे असणार! बहुदा भानामतीच!" पण हेही टिकले नाही. लक्षात आले की, लसणातील सल्फाईडस् जेव्हा पोटात व रक्तात जातात तेव्हा सर्वांच्या बाबतीत त्यांचा मूत्राद्वारे निचरा होतो. एखादाच या मुलीसारखा असा अपवाद की ज्यांच्या घामात ती संपूर्णत: उतरतात. त्यात मुलगी होती लसणाची भोक्ती. शेवटी बाहुल्यांची प्रकृती ठणठणीत रहावी, काळ्या ठिपक्यांची भानामती थांबावी (आणि हो, नोकरी पण वाचावी) यासाठी लसूण खाणे तिला साफ थांबवावे लागले. मग तिच्या बाहुल्यांच्या गौर कांतीला लागलेली काळपट ठिपक्यांची दृष्ट नाहीशी होऊन त्या पूर्वीसारख्या चमकू लागल्या.

पण प्रत्येक वेळेला असे घडेलच आणि त्या प्रकारामागचे गूढ लगेच कळेलच अशी खात्री नाही. सत्य लवकर समजो की उशिरा, आपला ठाम विश्वास हवा की अचूक उत्तर जेव्हा केव्हा मिळेल तेव्हा ते मिळेल शास्त्रीय दृष्टिकोनातूनच. उत्तर जोपर्यंत सापडत नाही तोपर्यंत शोधत राहायचे. मग तो कालावधी कितीही असो. 'परंतु असेल बुवा काहीतरी भानामती' अशा गलथान मानसिकतेला मात्र अजिबात थारा द्यायचा नाही.

भुताटकीच्या घंटानादाचे उदाहरण याबाबत बोलके ठरावे.

मेजर एडवर्ड मूर. हिंदू पुराणे ह्या विषयावर लेखन करणारे हे गृहस्थ. ईस्ट इंडिया कंपनीमधून निवृत्त झाल्यावर सफोकमधील ग्रेट बीलिंग्ज येथे राहत होते. त्यांच्या घरात प्रत्येक खोलीमध्ये एक घंटा टांगलेली होती. दिनांक २ फेब्रुवारी १८३४. श्री. मूर रविवारी चर्चमध्ये जाऊन घरी आले. दुपारी २ ते ५ या तीन तासांच्या काळात त्यांच्या भोजन कक्षातील घंटा तीन वेळा वाजली. पुढे तर रोजच त्यांच्या घरातील घंटा वाजू लागल्या. नक्कीच भानामती. घरात कोणी नसताना घंटा आपोआप वाजतील कशा? पण मूर अशा गोष्टींच्यावर विश्वास ठेवणारे नव्हते. त्यांनी बारकाईने पाहणी केली.

घंटेच्या दोरीवर कोणी पक्षी बसून घंटा वाजते काय? दोरीवरून उंदीर फिरल्यामुळे तिचा आवाज होतो काय? घंटेची दोरी घराबाहेर काढलेली होती. बाहेरून आलेली व्यक्ती ती ओढून घंटानाद करे. त्यामुळे घराबाहेर खेळणारी मुले वात्रटपणा करत नाहीत ना? कोणी नोकर, चाकर आगाऊपणा करत नाहीत ना? या सर्वांवर श्री. मूर यांनी लक्ष ठेवले. परंतु रहस्य उलगडले नाही.

२ फेब्रुवारी १८३४ ते २७ मार्च १८३४ इतके दिवस हा घंटानाद सुरू होता. त्याचे वैशिष्ट्य असे की, तीन ते पाच वेळा घंटा वाजे. लंबक व हंडी गदागदा जोराने हलत. श्री. मूर यांनी दोरी ओढून या चमत्काराची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न केला. घंटानाद होई पण लंबक व हंडी हलत नसत.

या भानामतीचे रहस्य उलगडण्यासाठी श्री. मूर यांनी वृत्तपत्रात एक पत्र छापले. त्यांना इंग्लंडमधील सर्व विभागातून पत्रे आली आणि त्यांना धक्काच बसला.कारण असा रहस्यमय घंटानाद संपूर्ण इंग्लंडमध्ये घडून येत होता. काही लोकांनी या घटनेचे वर्णन 'इंग्लंडमधील भानामती, असे केले होते.

श्री. मूर यांच्याकडे सतत माहिती जमा होत होती. १८३४ ते १९४१ म्हणजे जवळपास सात वर्षे .. त्या सर्वांची छाननी करून त्यांनी एक पुस्तक लिहिले. पत्राने कळविण्यात आलेल्या घटनांचे विविध प्रकार होते. काही काल्पनिक आहेत असे जाणवत होते. काही व्यक्तींच्या कथनात घंटानादाचे वर्णन न करता स्वत:चे घरच भुताटकीने कसे झपाटले आहे, याचीच माहिती होती. बऱ्याच घटना संशयास्पदही होत्या. मात्र तीस घटना ह्या नि:संदिग्धपणे विश्वासार्ह होत्या.

या सर्व घटनांचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण अनेक वर्षे कोणीही देऊ शकले नाही. इंग्लंडमधील भानामती अनुत्तरितच राहिली.

पहिले महायुद्ध सुरू झाले. स्कॉटलंडमध्ये ग्रीनक नावाचे बंदर आहे. तेथे अनेक जुनी घरे होती. घराच्या छताला घंटा टांगलेल्या होत्या. या जुन्या घरातल्या घंटा मध्यरात्री आपोआप वाजू लागल्या आणि आपोआप थांबू लागल्या. असे चालूच राहिले. नागरिक घाबरले. दिवस युद्धकाळाचे. त्यामुळे हे परवडणारे नव्हते. 'मध्यरात्रीच्या घंटानादाची भानामती' शोधून काढण्याचे आदेश सुटले.

काय सापडले?

ग्रीनक बंदरात पाणबुड्या बांधण्याचे कारखाने नव्यानेच सुरू करण्यात आले होते. पाणबुड्यांसाठी तयार केलेल्या डिझेल इंजिनांच्या तपासणीचे काम रात्री चाले. रात्रपाळीचे कामगार मध्यरात्री ही पाणबुड्यांची डिझेल इंजिने सुरू करीत. एकाच वेळी सुरू झालेल्या त्या धडधडाटाची कंपने ग्रीनकमधील जुन्या घरात टांगलेल्या घंटांवर आदळत. घंटा गदागदा हलू लागत. स्वाभाविकच लंबक हलत. आपोआप वाजणाऱ्या घंटांची भानामती चालू होई.

भानामती समजली, संपुष्टात आली. पण १८३४ ते १९१४ म्हणजे तब्बल ८० वर्षे गेली. एवढ्या मोठ्या कालखंडात कारण अज्ञातच होते हे खरेच. प्रश्न आहे तो

असा की, अशा वेळी आपण काय करायचे? भानामतीवर शिक्कामोर्तब करून गप्प बसायचे की गूढ शोधायला झगडायचे? 'शोधा म्हणजे सापडेल' म्हणत पुढे पाऊल टाकायला धडपडायचे?

♦♦♦

परीक्षा सर्पाची आणि स्वत:ची

अगदी छोटा मेंदू असलेल्या सर्पाबद्दल प्राणी सृष्टीतील सर्वात मोठा व विकसित मेंदू असलेल्या माणसाच्या मनात जेवढ्या अंधश्रद्धा असतील तेवढ्या अन्य कोणाही बाबत नसतील.

साप डूख धरतो.

सर्प दूध पितो.

नागराजाच्या मस्तकावर मणी असतो.

भुजंगाचे अंग केसाळ असते आणि तो धनाचे रक्षण करतो.

घरावर आस्तिक लिहिल्यावर नागोबा घरात येत नाहीत.

सर्पदंश झाला की शंभरी भरलीच.

मंत्राने सापाचे विष उतरते.

भारतात दरवर्षी साधारपणे तीस हजार माणसे सर्पदंशाने मरतात असा अंदाज आहे. यापैकी बहुतेकांनी वैद्यकीय उपचार करून घेण्यापूर्वीच बहुदा मांत्रिकाकडून 'बाहेरचा' उपचार केलेला असतो. त्यात गुण न आल्याने आधुनिक उपचाराला जाईपर्यंत उशीर झालेला असतो. आणि मग मृत्यूला कवटाळण्याला पर्यायच उरत नाही.

पण हे पटावे कसे?

विचार करण्याची सवय तर लावायला हवीच पण शक्यतर डोळे उघडवणारी कृतीही करायला हवी.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी याबाबत जे केले त्याचा किस्सा असा.

पायाप्पाची वाडी हे मिरज तालुक्यातील गाव. या गावातील लोकांना सहसा सर्पदंश होत नाही. कारण अगदी साधं सोपं. गावातील मंदिराच्या परिसरातील वाळू आणि पुजाऱ्यांनी दिलेला अंगारा मंतरून दारापुढे रेघ मारायची. सर्प ती ओलांडून घरात प्रवेश करूच शकत नाही. यदाकदाचित सर्पाकडून तसा प्रयत्न झालाच तर त्याच्या अंगाची असह्य होरपळ होते. तो निमूट माघारी वळतो.

गावात पंचलिंगाचे (तायाप्पाचे) मंदिर आहे. गावातील वा पंचक्रोशीतील कोणालाही

सर्पदंश झालाच तर त्याला या देवळात आणले जाते. देवळात लिंबाचा रस पाजला व देवळाला फेरे काढले की विष उतरते अशी त्या भागातील लोकांची श्रद्धा आहे.

एकदा अघटित घडलं. एक महिन्यात सर्पदंशाने गावात दोन मृत्यू घडले. डोंगरवाडी येथील श्रीमती चव्हाण यांना शेतात काम करताना सर्पदंश झाला. दोन किलोमीटरवरून पळत धापा टाकत त्या देवळात आल्या. पुजाऱ्याने रूढीप्रमाणे मंत्रतंत्र केला. लिंबाचा रस पाजला. देवळास फेऱ्या मारून झाल्या. दोन फेऱ्या पूर्ण होण्याच्या आतच तिने शेवटचा आचका दिला. याच गावातील श्री. साळुंखे यांना दुपारी झोपलेल्या ठिकाणी सर्पदंश झाला. त्यांनाही देवळात नेले आणि काहीच उपाय न झाल्याने पुढे श्मशानात पोचविले.

जवळच असलेल्या खंडेराजुरी येथील वैद्यकीय अधिकारी आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते डॉ. डी. एस. यक्कलदेवी हे स्वत: सर्पमित्र आहेत. त्यामुळे सर्पाबद्दल आणि सर्पदंशाबद्दल लोकांना समजावून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण लोकांची आपल्या देवावर गाढ (अंध) श्रद्धा होती. सर्पदंशानंतर तो तारतोच अशी खात्री होती. बहुतेक साप बिनविषारी असतात म्हणून लोक वाचतात हा युक्तिवाद त्यांना देवाचा अवमान वाटत होता. दोन जणांचा मृत्यू हा त्यांच्या लेखी विचार करण्याचा मुद्दा नव्हता. नशिबाची दोरीच कुजली तर त्याला देवळाचा पुजारी काय करणार असाच त्यांचा सवाल होता.

आमच्या सलगरे गावच्या शाखेने सापाविषयक एक उत्तम जाहीर कार्यक्रम पायाप्पाच्या वाडीत घेण्याचे ठरवले. गुरुवार होता. अचानक मुसळधार पाऊस आला. बसस्टॉपपासून दोन किलोमीटर भिजत, चालत कार्यकर्त्यांनी गाव गाठले. पावसातही त्या छोट्या गावात उत्सुकतेने ५०० हून अधिक लोक जमले होते. स्पीकर नव्हताच. वादसंवाद चालू झाले. गावकरी आपल्या मुद्द्यांवर पक्के होते. देवळाभोवतालची वाळू आणि अंगारा यांच्या सामर्थ्यावरचा त्यांचा विश्वासही पक्का होता. वाळू साप ओलांडू शकत नाही ही कल्पना ठाम होती. वाळू ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या सापाच्या अंगाची लाही-लाही होईल याची खात्री होती. आणि स्वाभाविकच याच्या अनुषंगाने मंत्राने सापाचे विष उतरू शकणाऱ्या त्यांच्या जागृत देवस्थानाचा आणि ते करणाऱ्या पुजाऱ्याचा त्यांना श्रद्धायुक्त अभिमान होता.

चर्चा पुढे जाणार कशी?

एका कार्यकर्त्याच्या सुपीक डोक्यातून कल्पना निघाली. " जर वाळू आणि पुजाऱ्यांनी दिलेला अंगारा यांचे रिंगण केले व त्यात साप सोडले तर काय होईल. ते बाहेर येतील का रिंगणातच घुटमळतील? " गावकरी सापाला रिंगण ओलांडता येणार नाही याबद्दल नि:शंक होते.

सलगर शाखेकडे स्वत:चे सर्पालय आहे. कार्यक्रमाला जाताना त्यांनी दहा-बारा विषारी-बिनविषारी साप बरोबर नेलेच होते. त्यामुळे चर्चा प्रत्यक्ष चाचणीवर आली. पुजाऱ्याने दोन बादल्या वाळू स्वत: आणली. त्यात भस्म भरपूर मिसळले. रिंगण

त्यानेच काढले. कार्यकर्ते म्हणाले, "तुमची वाळू, तुमचे भक्त, तुमचे देऊळ, तुमचा पुजारी, फक्त सर्प आमचे. ते रिंगणात सोडतो. तुमच्या डोक्यानीच आता निवाडा करा."

गावकऱ्यांची उत्सुकता प्रचंड ताणलेली. कार्यकर्त्यांनी पिशव्यांतून दहा साप अलगद बाहेर काढले आणि रिंगणात नेऊन सोडले. सळसळणाऱ्या आणि सरपटणाऱ्या त्या जाती, त्या रिंगणात क्षणभरही थबकल्या नाहीत. वाळूचे रिंगण आहे ही जाणीवही त्यांना झाली नाही. त्यांनी न भाजता न पोळता रिंगण ओलांडले आणि दहादिशांनी धूम ठोकली. कार्यकर्त्यांनी कौशल्याने त्यांना उचलून पुन्हा पिशवीत बंद केले.

लोक काही काळ अवाक् झाले पण भानावर येऊन त्यांनी कडाडून टाळ्या वाजवल्या. त्यानंतर विषारी, बिनविषारी सर्पांची माहिती देण्यात आली. सर्पदंश झाला तर करावयाचे उपाय सांगण्यात आले. शंकासमाधान झाले.

पडत्या मुसळधार पावसाबरोबर जणू काही लोकांच्या अंधश्रद्धाही वाहून गेल्या. आता सर्पदंश झालेली व्यक्ती स्वत: पुजारी देखील दवाखान्यातच पाठवतो.

♦♦♦

फ्रिजमधला गणपती

परमेश्वर अवतार घेतो. अज्ञ पामरांना दर्शन देतो.

त्याचा महिमा असा की तो खांबातून, दगडातून, फळातून कोठेही कसाही, केव्हाही प्रगटतो. स्वयंभू म्हणून मानाने मिरवतो.

या धामधुमीत 'तीर्थे, धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी' या संतवचनाचा विसर आपणाला केव्हाच पडतो सोयीस्करपणे.

उगाच विरोध कशाला करायचा ? बिघडले कोठे मानले तर, हात जोडून पूजा बांधली तर? होय, बिघडतेच.

ते हात जोडणे देवाला नसते. तो गौरव असतो आपल्या अंधळेपणाचा.

ती पूजा असते आपल्या मानसिक गुलामगिरीची.

परभणी जिल्ह्यातील हिंगोली तालुक्यातील अंभोरी हे गाव. गावापासून थोड्या अंतरावर ग्यानबाराव सातव यांच्या शेतातले एक झाड. झाडाचे नाव कुणालाच माहीत नाही. गावकऱ्यांनी त्याचे नामकरण केले ऋषीचे झाड. लोकांचा गाढा विश्वास असा की झाड बोलते. पुसद येथील ह. भ. गंगामहाराज यांच्याशी झाड बोलले याची तर लोकांना खात्रीच. झाड तसं अनेक वर्षांचे, पण १९९३ च्या श्रावण महिन्यात गावातील

काही जणांच्या पुढाकाराने ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या वाचनाचा सप्ताह झाडाखाली झाला. त्याच्या सप्ताहाला मोठा भंडारा झाला. आठ-दहा हजार प्रसादाचे (फुकटात) जेवून गेले. बघता-बघता ऋषीच्या झाडाच्या अफवा पंचक्रोशीत पोचल्या आणि नंतर मराठवाडा विदर्भात सर्व दूरपर्यंत. तेथून थेट आंध्रप्रदेशात.

मूल न होणाऱ्या जोडप्याला सोळा वर्षांनी झाडाची वारी केली म्हणून मूल झाले.

मोडलेले लग्न जुळले..... झाडाला फेऱ्या काढून पांगळा चालू लागला, अंधळ्याला दृष्टी आली, मुका बोलू लागला...

कुणाकुणाला हे गुण आले कोणास ठाऊक पण आजारी बायाबापड्यांची, पोराबाळांची आपापल्या आजारासाठी गर्दी उसळू लागली. कुणी पोटदुखीने आजारी तर कुणी हृदयविकाराने. कुणाला सांधेदुखी तर कोणाला कोड.

ऋषीच्या झाडाभोवती दर सोमवारी यात्रा भरू लागली. तीन-चार लोक येऊ लागले. झाडाभोवती कठडा उभारण्यात आला. झाडाच्या बुडाशी पूजेचा ओटा झाला. बाजूला दानपेटी आली.

इं. काँ. चे आमदार मारुती शिंदे यांनी यात्रेकरूंना पिण्याच्या पाण्याच्या सोयीकरता दोन रोटेक्स टाक्या पाठविल्या.

मग भा. ज. प. चे हिंगोलीचे आमदार बळीराम पाटील तरी कसे मागे राहणार? त्यांनी अंभेरीस जाऊन झाडाची यथासांग पूजा केली. कल्पवृक्षाच्या वाऱ्या करण्यासाठी परिवहन महामंडळाने पुसद, नांदेड, वाशीम, परभणी येथून थेट बस सेवा सुरू केल्या. याशिवाय ट्रक, जिप्स, यातून अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचा सुळसुळाट झाला तो वेगळाच. दंतकथा, अफवा, हितसंबंध यामुळे या अंधश्रद्धेची भलतीच चलती झाली. अनेक महिला झाडाभोवती अंगात येऊन घुमू लागल्या. थोड्याच दिवसांत बाहेरची बाधा, भानामती, भूत उतरविणारे स्थळ म्हणून ऋषीचे झाड प्रख्यात होईल अशी शक्यता निर्माण झाली.

खरा मामला काय होता? वनस्पती तज्ज्ञांचे मत काय होते? सायन्स कॉलेज नांदेड येथील वनस्पती विभागातील तज्ज्ञांच्या मते ते झाड रुद्राक्ष कुळातील होते. पण रुद्राक्ष नव्हते. वैज्ञानिक भाषेत झाडाचे कूळ ऋषीचे नाही तर STERLULIANEAE या प्रकारचे आहे. झाडाचे फूल नाजूक असते. त्याला देशाच्या काही भागात निष्फळ वृक्ष असेही म्हणतात. जगात दैवी शक्ती आणि चमत्कार मुळात नसतातच आणि एखाद्या झाडात तर ते असण्याची अजिबात शक्यता नाही. मराठवाड्यात अशा प्रकारचे झाड क्वचितच आढळते, त्यामुळे तर अंधश्रद्धेला फुलोरा यायला आणखीनच सोपे गेले.

खरे तर अठरा विश्वे दारिद्र्य, अडाणीपणा, कुपोषण व विविध शारीरिक आजार, कौटुंबिक अप्रतिष्ठा अशा अनेक कारणांनी बाईची मानसिकता बिघडते. प्रचंड ताणाखाली मनाचे प्रासंगिक विघटन होते. यावर उपचार असतात व समितीचे मानसोपचारतज्ज्ञ ते विनामूल्य करतात देखील. खरे तर ऋषीच्या झाडाजवळ मोठ्या भक्तिभावाने आणण्यात येणाऱ्या सर्व व्याधीग्रस्तांच्या आजाराला काही कारणे असतात. ती शोधता येतात व

दूर करता येतात. परंतु एका बाजूला अंधश्रद्धा व दुसऱ्या बाजूला अडाणीपणा, अगतिकता व गरिबी यामुळे उपचार समजणे व परवडणे अवघड असते. यापेक्षा आजाराची काहीतरी वेगळी कारणमीमांसा करणे व ऋषीच्या झाडाला फेऱ्या घालणे पारंपरिक असते, सोपे असते.

बुवा, बाबा, थडगी, झाड यांच्या यात्रा किंवा वाऱ्या अफवेवर आधारित असतात. काही प्रासंगिक आराम मिळतो हे खरे परंतु बहुदा त्याचे कारण संबंधित व्यक्तीला असणारा आजार मनोशारीरिक स्वरूपाचा असतो. अशा वेळी त्या व्यक्तीच्या अंतर्मनाला देण्यात आलेली सकारात्मक सूचना मन थेट स्वीकारते. त्या प्रकारे वर्तन करते. माणसाला तात्पुरते बरे वाटते. अशा व्यक्तीनिष्ठ अनुभवाला सार्वत्रिक बनवून दैवी चमत्काराच्या भाकड कथा पसरवल्या जातात. मग स्वाभाविकच काही जणांचे काही धंदे बरकतीला येतात आणि अंधश्रद्धा चालू ठेवण्यातले हितसंबंध सुखेनैव चालू राहतात. हे प्रकरण फार पुढे गेले नाही याचे श्रेय जाते परभणीचे जिल्हाधिकारी एस. एस. संधू यांना. अंधश्रद्धेच्या या वाढत्या गोतावळ्याची कल्पना येताच त्यांनी अंभेरीचे पंच, सरपंच, पोलिस पाटील, कल्पवृक्षाचे शेतमालक यांना बोलावून घेतले. समज दिली. सोनाराने कान टोचल्यावर सरपंच किशन नागरे, पोलिस पाटील घुगे यांनी सदरहू वृक्षामध्ये कोणतीही दैवी शक्ती नाही, त्याच्याभोवती निर्माण केले गेलेले अद्‌भुततेचे वलय खोटे आहे, त्या झाडाचे दैवतीकरण करू नये, त्याबाबत फैलावणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन केले. स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी या घटनेवर टीका केली. नांदेड जिल्ह्यातील लोकपत्र या प्रमुख दैनिकाने शास्त्रीय पंचनामा केला आणि मग कल्पवृक्षाचे पुन्हा वृक्षात रूपांतर झाले.

परंतु प्रत्येक वेळी असेच घडते असे नाही. अघटिताची क्रेझ आपल्या लोकमानसाला इतकी अनावर आहे की प्रत्यक्ष बुद्धिदाता गजाननही यातून स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही. म्हणजे असं की, आपल्या भक्तांना तो यातून बाहेर पडायची बुद्धी देतोच असे नाही . ९३ सालचीच गोष्ट. गणेशोत्सव नुकताच संपलेला. कोल्हापूर जिल्ह्यातल्या गडहिंग्लज गावात गुणेगल्लीतल्या कुराडे यांच्या मुलीने बाजारातून पपई आणली आणि ती कापताच 'अहो आश्चर्यम्' त्यामधून गणेशमूर्ती अवतरली. पपईच्या गरात श्रीगणेशाचे मुगुट, मस्तक, सोंड, लंबोदर हे सारे काही स्पष्ट दिसत होते. शेजारच्या चारचौघांना कुराडेबाईंनी ते दाखविले. ज्याने-त्याने मनोभावे वंदन केले. एका उत्साही भक्ताने डोळ्याच्या ठिकाणी दोन टिंबे देऊन आणि निमुळत्या सोंडेवर त्रिशूल काढून मूर्तीचे देवत्व पूर्णत्वाला नेले. बघता बघता कुराडेंच्या घरासमोर लांबलचक रांगा लागल्या. त्यात सगळेच होते. स्त्री आणि पुरुष, लहान आणि मोठे, सुशिक्षित आणि अशिक्षित. जो तो दुसऱ्याला सांगत होता. एरवी पपईत शेकडो बिया असतात, परंतु या पपईतून एकही बी न निघता गणेशाची मूर्ती प्रगटावी याला चमत्कार नाही तर काय म्हणायचा?

अनावर गर्दी लक्षात घेऊन शेवटी गावच्या चौकात मंडप घालून आणि आरास

करून श्री विनायकाची स्थापना करण्यात आली. मूर्तीला महाभिषेक करण्यात आला. सत्यनारायणाची पूजा करून तीर्थप्रसाद वाटण्यात आला. लोकांचे पैसे पायापाशी खचाखच पडू लागले.

या सर्व प्रकारावर स्थानिक अंधश्रद्धानिर्मूलन समितीने वैज्ञानिक आक्षेप घेतले. त्याबरोबर समितीच्या निषेधाचे फलक गावात झळकले. पण सत्य त्याच्यामुळे थोडेच झाकले जाणार? ते काय होते?

बिनबियाची फळे ही आता सर्वपरिचित बाब आहे. अनेक फळांच्यामधील बिनबियांच्या जाती विकसित होत आहेत. गणपती प्रकट झालेली पपई ही अशाच फळांपैकी एक होती. ते फळ तयार होताना त्या वेळी एक बी नाहीशी होण्याऐवजी तिच्यामधील तीन ॲन्टीपोडल पेशींची अवास्तव वाढ झाली होती व या सर्व पेशी विभक्त न होता, एकत्र राहिल्या होत्या. त्यामुळे त्यांना गणपतीचा आकार आला होता. काहीवेळा हे आकार नागाच्या फणीसारखे असतात असेही नमूद करण्यात आले होते. गंमत अशी की, याबाबतच्या वनस्पतीशास्त्राच्या पुस्तकात जी आकृती उदाहरणादाखल दिली होती ती थेट मंडपात मांडलेल्या गजाननासारखी होती.

मात्र शास्त्रसंगत असे सारे सविस्तर मांडूनही मंडळींची समजूत पटली असे झाले नाही. गजाननाची पूजा चालूच राहिली.

आणि हो, रात्रीच्या वेळी मंडपातून हलवून घरातल्या फ्रिजमध्ये नेण्याचा आणि तेथे करावयाचा त्याचा मुक्कामही चालूच राहिला.

♦♦♦

गोलमाल है भाई

प्रामाणिक पोटतिडिकीने मला आलेले एक पत्र. मजकूर असा,

'आपण फलज्योतिषाच्या अगदी कट्टर विरोधात आहात म्हणून हे पत्र आपणास लिहीत आहे. फलज्योतिष हा खगोलशास्त्राहून अतिशय कठीण विषय आहे. सगळेच ज्योतिषी तुम्ही कुडमुडे ज्योतिषी म्हणायला हरकत नाही. तरी पण या सर्व ज्योतिषांनी निरनिराळ्या ग्रहांचा पृथ्वीवर होणारा परिणाम त्याच्याप्रमाणे पाहून १९९१ च्या सुरुवातीलाच या पृथ्वीचे एक फलज्योतिष वर्तवले आहे. ते म्हणजे १९९१ च्या सुरुवातीपासून दोन हजारच्या अखेरपर्यंत एकूण दहा वर्षे सबंध पृथ्वीला चांगली नाहीत. म्हणजे नैसर्गिक आपत्ती पूर्वीच्या कोणत्याही दहा वर्षांपेक्षा पुष्कळच जास्त प्रमाणात आहेत. उदा. १) ज्वालामुखी भडकणे, २) धरणीकंप, ३) काही देशांत महापूर, ४) निरनिराळ्या लहान-

मोठ्या देशांत छोट्या-मोठ्या लढाया होणे, ५) पदोपदी विमान अपघात होणे, रेल्वे अपघात होणे.

'गेल्या ६/७ महिन्यांची वर्तमानपत्रे जर आपण चाळली तर ही वस्तुस्थिती आहे असे जाणवते. अर्थात् अजून ९-९।। वर्षे जायची आहेत. ती गेल्यावरच आकडेवारी काढल्यावर आपल्याला काहीतरी म्हणता येईल. तरी या १९९१ ते २००० च्या फलज्योतिषाबाबत काही चर्चात्मक लेख आपण आत्ताच लिहिल्यास त्याचा पडताळा ९ वर्षांनी पाहता येईल. आपण आपला लेख कधी? केव्हा? कोठे? प्रसिद्ध करणार आहात ते मला कळवावे.'

प्रामाणिक अज्ञानाचे हे प्रतिनिधिक लेखन समजायला हरकत नाही. पृथ्वीचे भविष्य मांडणाऱ्या ज्योतिषविशारदांनी तिची जन्मवेळ कोणती मानली हा अवघड प्रश्न आपण बाजूलाच ठेवू. तरीही पत्रलेखकाला वाटणाऱ्या भविष्यवाणीच्या सत्यतेत ग्यानबाची मेख कोणती आहे?

निरनिराळ्या लहान-मोठ्या देशात छोट्या-मोठ्या लढाया होतील असे ऐसपैस भविष्य सांगायला ज्योतिषतज्ज्ञ कशाला हवा?

-येत्या दशकात,

-भारतात राजकीय अस्थिरता नांदेल.

जर्मनी -जपान सगळ्या जगावर वर्चस्व गाजवतील. प्रदूषण वाढेल, हिंसा भडकेल ही भविष्यवाणी (!) नियमाने वृत्तपत्र वाचणारा कोणीही सामान्य वाचकही उच्चारू शकेल की नाही? ती अचूक ठरेल की नाही? शास्त्र म्हणून दावा असेल तर सांगायला हवे ते हे की, भूकंप कोठे होतील? किती तीव्रतेचे? कोणत्या तारखेला? ग्रहताऱ्यांच्या कोणत्या गणिताच्या आधारे हे समजले? ते गणित वापरून याच दशकातील नव्हे तर पुढच्या शतकातील भूकंपाच्या वेळाही बरोबर येतील की नाही?

खरे तर एखादी बाब शास्त्रीय निकषांवर टिकते की नाही याचे आता जगमान्य निकष आहेत. माहिती जमवावी कशी? तिची मांडणी कशी करावी? निष्कर्ष कसे काढावेत? याचे शास्त्र किती तरी प्रगत झालेले आहे पण दोन हजार वर्षांचा इतिहास आहे म्हणणाऱ्या ज्योतिष शास्त्राने याबाबत शास्त्र कोठे आणि कसे वापरले आहे?

किती पुढे नेले?

खरेतर हे किती सोपे!

शंभर नवजात अर्भकांच्या कुंडल्या मांडायच्या. त्यांचे भविष्य लिहून ठेवायचे. निवडक महत्त्वाच्या गोष्टी-शिक्षण किती? नोकरी कसली? विवाह कधी? संतती कशी? पैसा-अडका? अपघात? काही अन्य विशेष. त्या मुलांचा पाठपुरावा करायचा. सांगितलेल्या घटना यांची नोंद करायची. शंभर जणांची अशी माहिती जमवायला यंत्रणा लागेल. पण शेकड्यात फी आकारणाऱ्या ज्योतिषांना ती उभी करणे अवघड नाही. आणि नसेलच काही व्यवस्था तर आमची अंधश्रद्धा निर्मूलन समिती हे काम करील. दोन हजार वर्षांची शास्त्रीय परंपरा सिद्ध करायला पाच पन्नास वर्षांचा शास्त्रीय अभ्यास

करायला हरकत आहे?

भविष्य कसे असेल?

मला खात्री आहे, ज्योतिषमंडळी पुढे येणार नाहीत आणि आलीच तर भविष्य कसे वर्तवतील?

शिक्षण - गरजेपुरते मिळेल.

नोकरी - समाधानकारक मिळणे अवघड.

विवाह - योग्य वेळी होईल.

संतती - कुंडलीतील अपवित्र ग्रहांची युती टळल्यास योग संभवतो.

अपघात - छोटा, मोठा अपघात होण्याची शक्यता.

आता मला सांगा, येत्या दहा वर्षांत जगात काही ठिकाणी ज्वालामुखी, काही ठिकाणी धरणीकंप, काही देशांत महापुरामुळे मनुष्य व संपत्तीची हानी, निरनिराळ्या देशांत छोट्या - मोठ्या लढाया, विमाने व रेल्वे अपघात ही भविष्यवाणी आणि वरचे भविष्यकथन यात डावे उजवे करण्यासारखे काय आहे? आठवतं?-

एक गाजलेले गीत - 'गोलमाल है भाई गोलमाल है'

♦♦♦

कुंडलीतील मृत्युयोग

पुण्याला अखिल भारतीय ज्योतिष महामंडळाचे अधिवेशन भरले होते. भारतातून पाचशेहून अधिकजण त्यात सहभागी झाले होते. ज्योतिष हे कसे अचूक आणि आशयगर्भ आहे यावर तावातावाने मुद्दे मांडले जात होते. आरोग्य व फलज्योतिष या विषयावरच्या चर्चासत्राचे अध्यक्षस्थान तर सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. पुरंदरे यांनी भूषविले होते. ज्योतिष हे शास्त्र आहेच या कल्पनेचा फुगा भरपूर फुगवला गेला होता.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रसिद्ध केलेल्या एका छोट्या आव्हानपत्राने त्या फुग्याला टाचणी लावली.

आमचे आव्हान अगदी साधे, सोपे, सरळ होते.

फलज्योतिषाच्या वैज्ञानिकतेचा प्रकार करणाऱ्यांनी एक छोटी चाचणी द्यावी. सेकंदापर्यंत अचूक अशा दहा-दहा जन्मवेळा आम्ही देऊ. त्यावरून कुंडली मांडायची. पहिल्या दहा कुंडल्यांमधील स्त्रियांच्या कुंडल्या कोणत्या व पुरुषांच्या कोणत्या आणि दुसऱ्या दहा कुंडल्यांमधील कोणत्या व्यक्ती मृत आहेत व कोणत्या जिवंत, बस्स, फक्त एकेकाच प्रश्नाचे उत्तर द्यायचे! ती बरोबर निघाली तर आम्ही आव्हान जिंकल्याबद्दल त्या

ज्योतिषाला एक लाख रुपये देऊ. आमची ज्योतिषाच्या विरुद्धची चळवळ बंद करू.

खरे तर हे आव्हानही तसे जुनेच आहे. डॉ. अब्राहम कोवूरांनी हे जाहीर करून आता दोन दशके उलटून गेली. महाराष्ट्रात ते घेऊन आम्ही क्रियाशीलपणे उभे आहोत. एवढेच!

फलज्योतिष हे शास्त्र आहे हे सिद्ध करण्याची चांगली जाहीर संधी साधण्यास एकही ज्यातिषी पुढे आला नाहीच उलट त्यांनी प्रामाणिकपणे (?) पळवाट काढली. ती वृत्तपत्रात जाहीर केली. त्याचा आशय असा- फलज्योतिष हे शास्त्र आहे पण पूर्ण नाही. त्याला मर्यादा आहेत. त्यातील एक मर्यादा ही की, पत्रिकेवरून व्यक्तीचे लिंग सांगता येत नाही. तसेच ती जिवंत आहे का मृत याचाही निवाडा करता येत नाही.

या प्रामाणिकपणाबरोबर त्यांचा पोकळपणाही आपोआपच सिद्ध होतो हे तुमच्या लक्षात आले ना? खरे तर मुलगा की मुलगी या लिंगावर जीवनातले अनेक निर्णय आपोआप निश्चित होतात. भारतासारख्या देशात तर मुलगा म्हणून जन्माला येणे यामुळेच अनेक छळांतून जन्मत:च सुटका मिळते. मुलीच्या जन्माला आले की वागणूक, शिक्षण, संधी, भवितव्य यांचे संदर्भच आपोआप उलटेपालटे होतात. जीवनातल्या इतक्या महत्त्वाच्या निवाड्याबाबत भविष्याचे इतर सारे अंदाज कथन करणाऱ्यांनी मौन पाळावे यातच त्यांचा पाया किती भुसभुसीत आहे हे सिद्ध होत नाही का? आस्तित्वच पुसून काढणारे मरण हा तर जीवनातला फारच मूलभूत भाग. त्यानंतर भविष्य म्हणून काही शिल्लकच राहत नाही. या पायाभूत सीमारेषेचे दर्शनही ज्यामधून दोन हजार वर्षांच्या अभ्यासानंतर पडत नाही ज्या ज्योतिषाला शास्त्र कशाला म्हणायचे?

कोणताही चमत्कार सिद्ध करण्यासाठी असलेली आव्हान रक्कम आम्ही लाखावरून दोन लाखांपर्यंत वाढविली. त्या निमित्ताने भविष्याच्या या आव्हानाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला. इंग्लिश वृत्तपत्रातून आव्हान छापून आले. 'सायन्स टुडे' या मान्यताप्राप्त मासिकातील माझ्या मुलाखतीमधेही ते ठळकपणे पुढे आले.

त्यानंतर मुंबई येथील सांताक्रुझच्या नरेंद्र शहांचे मला पत्र आले. शास्त्र म्हणून ज्योतिष किती पुढे आहे याची माहिती मला नसावी याचा त्यांनी खेद व्यक्त केला होता आणि पत्रिकेवरून व्यक्तीचे लिंग व जिवंत आहे का मृत आहे हे छातीठोकपणे सांगण्याची तयारी दर्शविली होती. मी त्यांना आव्हानप्रक्रियेचा तपशील कळविला. अनामत रक्कम दोन हजार रुपये भरण्याची विनंती केली. त्यावर त्यांचे पत्र आले. मी हे शास्त्र सिद्ध करण्यास तयार आहे, आव्हान-प्रतिआव्हानात मला रस नाही. त्यामुळे मी अनामत रक्कम भरणार नाही.

नेहमीच्या पद्धतीला मुरड घालून मी तेही मान्य केले. त्यांना जन्मवेळांचे एकूण दहा दहांचे दोन संच पाठविले. त्यांना कळविले यापैकी पहिल्या संचातील जन्मवेळेवरून आपण व्यक्तीचे लिंग सांगावे, दुसऱ्या संचातील जन्मवेळेवरून ती मृत आहे का

जिवंत याचा निवाडा द्यावा. तुम्हाला पाहिजे तेवढे दिवस घ्यावेत. मी येथे सीलबंद लखोट्यात उत्तरे ठेवली आहेत. तुम्ही तुमची उत्तरे घेऊन आला की तुमच्या समक्ष लखोटा उघडू. आमने -सामने सोक्षमोक्ष होईल.

मोठ्या उत्साहाने नरेंद्र शहांनी महिन्यात निर्णय द्यायचे कबूल केले. दोन अडीच महिन्यांनी त्यांचे पत्र आले. त्यात काही कौटुंबिक अडचणींमुळे वेळ पाळणे शक्य झाले नाही म्हणून मुदत वाढवून मागितली होती. मी आंनदाने दिली. ती मुदतही टळून गेली. पुन्हा दुसरे पत्र, दुसऱ्या अडचणी आणि मुदतवाढ. त्यालाही होकार दिला. त्यालाही आता सहा महिने उलटले. अजूनही माझ्याकडील लखोटा सीलबंद आहे.

काहींना प्रश्न पडतो - कशाला ही आव्हाने, प्रतिआव्हाने? हा तुमचा रिकामपणाचा खेळ आहे. लोक दोन घटका करमणूक म्हणून ज्योतिष बघतात. मला मात्र ते तेवढे निरुपद्रवी वाटत नाही; गंभीर वाटते. कुंडलीवरून दोन्ही भविष्ये सांगतो असा दावा करणारे नरेंद्र शहा खरे तर काय सांगत असतात?

कुंडली म्हणजे तुमच्या जन्मवेळेचा नवग्रहांचा नकाशा. त्याकडे नजर टाकून व्यक्ती मृत का जिवंत आहे हे सांगणे याचा अर्थ तुम्ही जन्माला आला त्याच वेळी तुमच्या मृत्यूची वेळ नक्की झाली. विधात्याने हे जे ठरविले, त्या नियतीचे संकेत ग्रहांच्याद्वारे कुंडलीतून उमटतात. ते वाचून तुमच्यापर्यंत आणण्याचे काम ज्योतिषी आणि त्याचे शास्त्र करते एवढेच. याचा अर्थ असा की, जन्माला येतानाच प्राक्तन ठरते. कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे या खेळात वागणे हेच व्यक्तीला क्रमप्राप्त असते. हा सूत्रधार दिसत नाही पण कुंडलीतील त्याने स्पष्टपणे व्यक्त केलेली इच्छा टाळता येत नाही.

एका झटक्यात माणसाच्या कर्तृत्वाला खुडून नशिबाच्या हवाली करणारी कुंडली माणसाचा पुरुषार्थच नाकारते आणि असत्याला प्रतिष्ठा देते. गेल्या काही दशकांत आरोग्य व्यवस्था सुधारली. भारतीयांची आयुर्मर्यादा दुप्पट झाली. चाळीस वर्षांपूर्वी ज्यांच्या नशिबी म्हणून कुंडलीत (सरासरी) तिशीतले मरण होते त्या सगळ्यांना पन्नाशी ओलांडणे सहज साध्य झाले. हे घडले नियतीला अजिबात न जुमानता, कुंडलीतले मृत्युयोग जणू भराभर बदललेच... कारण तद्दन सत्य हेच की, खुदको कर बुलंद इतना। की हर तकदीर से पहले । खुदा बंदेको खुद पूछे। बता तेरी रजा क्या है।

♦♦♦

दीडशे वर्षे मागे नेणारा पुरस्कार

इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन, भारतातील सर्व शास्त्रज्ञांची शिखर संस्था. गेले ६५-६६ वर्षे ती अस्तित्वात आहे. प्रतिवर्षी तिचे अधिवेशन भरते. भारतातील सर्व शाखांचे शास्त्रज्ञ काही हजारांच्या संख्येत त्याला हजर असतात. न चुकता दरवर्षी पंतप्रधानच त्याचे उद्घाटन करतात, अशी भव्य परंपरा.

१९९३ साली हे अधिवेशन झाले. जानेवारी ३ ते ८. पणजी, गोवा येथे. या परिषदेत Science & Miracles या विषयावर बोलण्यासाठी मला निमंत्रण आले होते. मला नेमके नियोजन, प्रयोजन समजले नाही. नामवंत शास्त्रज्ञांना महाराज मंत्राने अग्नी कसा पेटवतो? हळदीचा बुक्का बाबा कसा करतो? अंगात आलेली बाई आग खाते व खेळवते कशी? नाण्यातून विभूती आपोआप बाहेर येण्याचा चमत्कार घडतो कसा? हे समजावणे मला बालिश वाटले. परंतु एका वेगळ्या अर्थाने मला या संधीत रस होता. मी त्यांना लिहिले.

'आपल्या पत्रातून मी भाषण कोणासमोर द्यावयाचे याचा नीट बोध होत नाही. रासायनिक क्रिया, यांत्रिक करामत वा हातचलाखी या आधारे बाबा, बुवा, महाराज करत असलेले कथित चमत्कार नामवंत शास्त्रज्ञांच्या समोर करणे हे मला फारसे आवश्यक वा उचित वाटत नाही. अधिवेशनाच्या निमित्ताने स्थानिक लोकांच्यासमोर हे प्रयोग करावयाचे असल्यास मी येण्याची गरज नाही. आमच्या चळवळीने आत्तापर्यंत या स्वरूपाची प्रात्यक्षिके हजारो ठिकाणी दाखवली आहेत. त्यासाठीचे चांगले व प्रशिक्षित कार्यकर्ते आहेत, त्यापैकी कोणी येऊ शकेल. मला आपले लक्ष एका वेगळ्याच मुद्द्याकडे वेधायचे आहे.

विज्ञानाच्या कार्यकारणभावाशी उघड विसंगत अशा अनेक बाबी आज जनमानसात मान्यताप्राप्त आहेत, मानाने मिरवीत आहेत. फलज्योतिष हे शास्त्र आहे असे समजून व्यवहार चालू आहेत. तथाकथित चमत्कारामागचे विज्ञान समजावून भोळीभाबडी फसणारी माणसे काही प्रमाणात डोळस होतील पण उच्चविद्याविभूषित असे समाजातील अनेक घटक चमत्कारावर विश्वास ठेवतात. त्या वेळी ते असेच मानतात की हे विज्ञानाने होतही असेल परंतु बाबा मात्र करतो ते मात्र त्याच्या दैवी सामर्थ्यानेच; आणि त्यामुळे त्या बाबा, गुरुमहाराजांपुढे नतमस्तक होणेच योग्य. आपल्या देशाच्या घटनेत 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास व आग्रह' हे मार्गदर्शक तत्त्व आहे. हा आग्रह इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशन सारखी भारतव्यापी संस्था धरेल काय? त्यासाठी फलज्योतिषाचा शास्त्र म्हणून फोलपणा, चमत्कारामागची बुवाबाजी, याचा स्पष्ट शब्दात उच्चार करेल का? लोकांना त्यापासून दूर राहण्याचे आव्हान करेल काय? अर्थातच मला उत्तर आले नाही.

पण प्रत्यक्ष उत्तर गोवा काँग्रेसमध्येच दिले गेले ते नेमके उलट अर्थाने.

इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये प्रतिवर्षी प्रतिष्ठेचे राजदत्त क्रिसो पारितोषिक दिले जाते. विज्ञान क्षेत्रातील हे मानाचे पारितोषिक त्या वर्षी श्री. भंडारी यांना दिले गेले.

त्यांचा परिचय? त्यांची कामगिरी?

श्री. भंडारी - कलकत्ता

व्यवसाय - चार्टर्ड अकौटंट

सामाजिक कार्य- गूढविद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष

पारितोषिकाचे स्वरूप - रुपये दहा हजारांचे बक्षीस. पारितोषिक विजेत्याने शास्त्र जगतात त्या वर्षात केंद्रीभूत ठरलेल्या त्याच्या विषयावर काँग्रेसमध्ये भाषण द्यावे हा बहुमान.

श्री. भंडारी यांच्या व्याख्यानाचा विषय - फलज्योतिषाचा शास्त्रीय पाया आणि ग्रहांचे मानवी जीवनावर परिणाम यावरील विशेष संशोधन. कोणी दिले? नॅशनल सायन्स काँग्रसचे त्या वर्षीचे अध्यक्ष, नियोजन मंडळाचे सदस्य, अंटार्टिकामधील भारताच्या पहिल्या मोहिमेचे प्रमुख एस. झेड. कासिम यांनी. या जबाबदारीतून त्यांची सुटकाच नाही. कारण या पारितोषिकासाठी समिती नेमली जात नाही; अध्यक्ष स्वत:च्या जबाबदारीवर जाहीर करतात.

विशेष काय? - इंडियन सायन्स काँग्रेस कोणकोणत्या विषयांशी संबंधित आहे, याची कल्पना देणाऱ्या १९९२-९३ च्या पुस्तिकेत फलज्योतिष विषयाचा उल्लेख नाही.

आपला समाज तसा सोशीक आणि उदार, सहजपणे दुर्लक्ष करतो. पण समाधानाची बाब ही की, विज्ञान क्षेत्रातीलच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च व आयुका (इंटर युनिव्हर्स सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रॉफिजिक्स) या दिग्गज प्रतिष्ठेच्या दोन भारतीय संस्था या विरोधात उभ्या राहिल्या.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च यांनी हे पारितोषिक देण्याचा निषेध करणारे पत्रक काढले. १७० हून अधिक मान्यवर शास्त्रज्ञांनी त्यावर सह्या केल्या. पारितोषिकाद्वारे अशास्त्रीय विषयाला मान्यता देण्याच्या गंभीर घटनेकडे त्यात लक्ष वेधण्यात आले आहे.

इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनचे अध्यक्ष व सभासद यांना उद्देशून केलेला त्यांच्या ठरावाचा मथितार्थ थोडक्यात असा. -'इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन' सारख्या देशातल्या महत्त्वपूर्ण आणि केंद्र शासनाचा आधार लाभलेल्या शास्त्रीय संस्थेने शास्त्रीय विकासासाठीचे या वर्षीचे पारितोषिक फलज्योतिषाला दिले. यामुळे आम्हाला मोठाच धक्का बसला. फलज्योतिषाला कोणताही शास्त्रीय पाया नाही आणि त्यातील अन्वेषण पद्धतीही शास्त्रासारखी नाही. जगातील कोणत्याही मान्यताप्राप्त शास्त्रीय संशोधन संस्थेने फलज्योतिषाला शास्त्र म्हणून मान्यता दिलेली नाही किंवा अलीकडच्या काळात शास्त्रीय जगतात अशी कोणतीही वैशिष्ट्यपूर्ण प्रगती झालेली नाही की

ज्यामुळे सायन्स काँग्रेसने आपले शास्त्र पारितोषिकाचे नेहमीचे निष्कर्ष बदलावेत.

एक प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस. मुखी यांनी आणखी एका गंभीर व वेगळ्या बाबीकडे लक्ष वेधले आहे.

त्यांचे म्हणणे असे की, 'काही अतिशय महत्त्वाच्या शास्त्रीय विषयाच्या चर्चा परिसंवादाला शासन अत्यंत कमी पैसे देते. उदा. :- अणू उर्जेच्या 'हाय एनर्जी फिजिक्स' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर दोनशे शास्त्रज्ञ सहभागी झालेल्या भारतीय पातळीवरील चर्चासत्राला फक्त एक लाख रुपये शासनाने मंजूर केले. आणि इंडियन सायन्स काँग्रेससारखी अधिवेशने पर्यटन सहलीसारख्या उधळपट्टीने साजरी होतात. आपल्याकडे अत्यंत मर्यादित असलेले पैसे त्यामुळे समारंभप्रियता वा मामुली संशोधन यावर खर्च होतात व उच्च दर्जा वाढवण्याचा पाठपुरावा डावलला जातो. या रोगाचे एक अत्यंत वाईट लक्षण म्हणून, फलज्योतिषाला दिलेल्या पारितोषिकाकडे बघता येईल.

फलज्योतिष हे शास्त्र का नाही या चर्चेत शिरण्याचे कारण नाही. पण दीडशे वर्षांपूर्वी म. फुलेंनी विचारलेला साधा कार्यकारणभावाचा प्रश्न आपल्या डोक्यात का येत नाही? फुलेंनी विचारले, "प्रत्येक लढाई मुहूर्तावर करणारी पेशवाई बुडली आणि गोरासाहेब जिंकला हे कशामुळे घडले? पत्रिकेचे छत्तीस गुण जमणाऱ्या आमच्या भगिनीच्या कपाळी वैधव्य येते आणि गोऱ्या मडमांचे संसार सुखाने कसे तरतात?" म. फुलेंचा कार्यकारणभाव अगदी स्पष्ट होता. लढाईचे निर्णय होतात त्यातील सामर्थ्यबळावर, ग्रहताऱ्यांच्या गणितावर नव्हे. अत्यंत लहान वयात लग्ने केली आणि बालमृत्यूचे प्रमाण मोठे असेल. (या दोन्ही बाबी महात्मा फुले यांच्या काळी होत्या.) तर येणारे वैधव्य कुंडलीत जमलेले गुण कसे टाळणार? दीडशे वर्षांनंतर आपण कोणत्या दिशेला निघालो आहोत?

चेटूक, करणी, पिशाच्च, भूत, भानामती, यंत्र, मंत्र, तंत्र आणि अशा तथाकथित ढीगभर विद्या म्हणजे गूढशास्त्र. एक चार्टर्ड अकौटंट त्यांची संस्था स्थापतो आणि फलज्योतिषावर पेपर लिहितो त्याला आपण सन्मानाने मोठे शास्त्रीय पारितोषिक देतो ही प्रगती की परागती?

परिस्थिती अशी विचित्र आहे की देशातील थोरामोठ्यांच्या कृती बघितल्यावर फक्त गोंधळ वाढावा. इंडियन एक्सप्रेस २४ जाने. ९३ ची बातमी. पंतप्रधान नरसिंहरावांनी आपल्या मंत्रिमंडळात अनेक दिवस खोळंबलेला विस्तार केला. राष्ट्रपती भवनावर शपथविधीचा कार्यक्रम. प्रथा अशी की, राष्ट्रपती भवनातील सर्व महत्त्वाचे शासकीय कार्यक्रम, सूर्यास्ताच्या वेळी सन्मानपूर्वक जनगणमनची धून वाजवत, तिरंगा राष्ट्रध्वज उतरवला जातो, त्यापूर्वी करावयाचे. परंतु हा शपथविधी झाला सायं ७ वाजता राष्ट्रध्वज उतरवल्यानंतर. तसा तो यापूर्वी कधीच झालेला नाही. कारण?

शपथविधीला दोन तास वेळ हवा होता. श्रीलंकेचे अध्यक्ष आर. प्रेमदास दुपारी सव्वा तीन वाजताच राष्ट्रपती भवन सोडणार होते. ४ ते ६ कार्यक्रम सहज होऊ शकला

असता. पण अडचण अशी झाली की त्या दिवशी ४।। ते ६ ही राहूच्या प्रभावातील अशुभ वेळ होती. त्या वेळात शपथविधी कसा होणार?

राहू हा ग्रह मुळातच अस्तित्वात नाही. भ्रमण कक्षाच्या काल्पनिक छेदन बिंदूंना राहू आणि केतू ही नावे दिलेली. पण त्यांचे अस्तित्व गृहीत धरून पूर्वीच्या सर्व प्रथा मोडून राष्ट्रध्वज उतरवल्यानंतर सायं. ७ वाजता शपथविधी करण्याचा निर्णय झाला. पंतप्रधान व राष्ट्रपती या देशातील दोन सर्वोच्च नेत्यांचे वर्तन कोणती दिशा सूचित करते? महात्मा फुलेंचा विचार दीडशे वर्षे पुढे नेणारी की मागे लोटणारी? याचा तर्कसंगत विस्तार आणि परिणाम असाच होणार की कुंडली आणि मुहूर्त केवळ लग्नाच्या वेळीच का बघायचा? हॉस्पिटलला ज्योतिषी जोडलेला बरा. ऑपरेशन करण्यापासून ते सलाईन लावण्यापर्यंत शुभवेळ समजेल. दहावीच्या, बारावीच्या निकालाची भीती शाळांनाही असते आणि पाल्य, पालकांनाही. तेव्हा परीक्षेचे फॉर्म शुभमुहूर्तावर मुलांना भरावयाला सांगितले तर तेवढाच दिलासा. (नाही तरी निवडणुकीचा फॉर्म मुहूर्तावर भरतातच की नाही?) विमानाचा प्रवास धोक्याचा, कधी कोसळते, कधी अपहरण होते, तेव्हा विमान उड्डाणासाठी विशेष वेळा द्यायला विमान वाहतूक विमानातही, ज्योतिषांची भरती करायला हरकत नाही. तेवढे ज्योतिषी आणायचे कुठून याचाही प्रश्न नाही. शालेय पातळीवर ज्योतिष विषय शिकवण्याची आग्रही मागणी अ. भा. ज्योतिषशास्त्र महामंडळ करते आहेच. या देशातल्या ४०% प्राथमिक शाळांचे पहिली ते चौथीचे वर्ग एक शिक्षकी आहेत. त्यांना प्रत्येक वर्गाला तरी एक-एक शिक्षक कधी मिळायचा तो मिळो पण फलज्योतिष शिकवणाऱ्या शिक्षकाचा पगार करण्यासाठी काही कोटी रुपयांची तरतूद मात्र शिक्षण खात्याने करावयास हवी. आणि समजा उद्या पाकिस्तानबरोबर लढाई करण्याची वेळ आली तर युद्ध सुरू करण्याचा अचूक निर्णय युद्ध शास्त्राच्या तज्ज्ञांचा? की कुंडलीतील आकडेमोड करणाऱ्या जोतिर्भास्करांचा? ज्योतिषाने सांगितलेली वेळ युद्धशास्त्राला गैरसोयीची असली तर काय करायचे? युद्धशास्त्राच्या सोयीने युद्ध सुरू करायचे आणि 'ग्रहांचे साह्य शूराला यशश्री पायीची दासी' म्हणत ग्रहकुंडली मोडीत काढायची? का मुहूर्त काही चांगला नाही याची धाकधुकी बाळगत युद्ध करायचे? का ग्रहांना शरण जात, युद्धशास्त्राला वाऱ्यावर सोडून, लढाईची वेळ फलज्योतिषाच्या आधारे ठरवायची?

आणि मुख्य मुद्दा म्हणजे देशाची कुंडली मांडायची कशी? भारत हे राष्ट्र कधी जन्माला आले? १५ ऑगस्ट १९४७ ला भारताची फाळणी झाली. पण त्याआधी हजारो वर्षे येथे राष्ट्र होतेच. पण कुंडलीसाठी त्याची जन्मवेळ कुठली घ्यायची?

केवळ गोंधळापलीकडे काहीही निष्पन्न न होणारे हे प्रश्न.

पण देशाचे शास्त्रज्ञ, सर्वोच्च राष्ट्रपती, पंतप्रधान याच मार्गाने जाणार असतील तर हा गोंधळ लक्ष पटीने वाढू शकतो. शास्त्र संशोधनाचे बजेट गूढ शाखांच्या अभ्यासाला मिळू शकते. फलज्योतिषाच्या अभ्यासासाठी जनतेच्या कष्टाचे कोट्यवधी रुपये शिक्षण क्षेत्रातून खर्च होऊ शकतात. देशाच्या, व्यक्तीच्या, समाजाच्या जीवनातील महत्त्वाचे

निर्णय भलत्याच प्रभावाखाली घेतले जाऊ शकतात.

भारतीय संविधानात नागरिकांच्या मार्गदर्शक तत्त्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आवर्जून घातला आहे. त्याचा अर्थ काय? साधा, सोपा, सरळ अर्थ असा की विशिष्ट पद्धतीने तपास करायचा, निष्कर्ष काढायचे. खरे आहे, सगळ्याच प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. त्यांचा शोध चालू ठेवायचा; पण व्यवहार मात्र सिद्ध झालेल्या गोष्टीच्या आधारेच करायचा. या सगळ्यात ज्योतिष कुठे बसूच शकत नाही. घटनेशीच ती गद्दारी ठरेल. खरे तर कासीम यांनी भंडारी यांना दिलेले पारितोषिक परत घ्यायला हवे वा स्वत:च राजीनामा द्यायला हवा. नाहीतर त्यांना तो वरिष्ठांनी मागायला हवा. पण हे सांगावे कुणाला? पंतप्रधानांना? ते बहुधा मुहूर्तावर सत्यसाईबाबांची भेट घेऊन त्यांना सल्ला विचारतील आणि राष्ट्रपती त्यांना मान डोलावतील.

विज्ञान युगात झेपावणाऱ्या आपल्या लाडक्या भारत देशाची वाट कोणत्या दिशेने निघाली आहे?

♦♦♦

आता तरी माझ्याकडे लक्ष द्या

"डॉक्टर आता डोळ्यांनी बघितले म्हणूनच विश्वास ठेवायचा. रात्री झोपताना लेक धडधाकट होती. सकाळी उठली तवा लकवा मारलेला. एक बाजू लुळी पडलेली. गावातला डॉक्टर बघितला. दवा, इंजक्शनं झाली. फोटू काढला. मालिश केलं. पण गुण नाही. तरणीताठी पोर, चार महिन्यांपूर्वीच लगीन झालेलं. समदे उपाय हरले. तसं पीरवाडीचा देवऋषी बघितला. भारी माणूस. पॉवरबाज. तीन दिवस त्याच्याकडे नेले. अंगारे धुपारे झाले. तिसऱ्या दिवशी अंगावरून हात फिरवत म्हणाला, 'ऊठ पोरी, समदं ठीक होईल' आणि काय हो चमत्कार. लकवा मारलेली पोर आपल्या पायावर उभी राहिली. म्हणजे चमत्कारच म्हणायचा ह्यो."

तो चमत्कार नव्हता हे मला समजलं कारण मिरजेला एम. बी. बी. एस. करीत असताना अगदी अशीच केस पाहिली होती. नुकतीच लग्न झालेली मुलगी. अचानक अर्धांगवायू झाला. हातापायातील ताकद गेली. गावाकडचे उपाय करून मिशन हॉस्पिटलला आणली. नामांकित मानसोपचार तज्ज्ञ डॉ. देबसिकदार आम्हाला शिकवत. त्यांनी तपासणी केली. शरीराच्या तथाकथित आजारामागे दडलेल्या मनाच्या आजाराचा शोध घेतला. काय घडले होते? मुलीचे प्रेम एकावर. घरच्यांनी विवाह दुसऱ्याशीच केला. प्रचंड नाराजी. पण ती व्यक्त करणे शक्य नव्हते. पतिपत्नीचा शरीरसंबंध हा पतीचा

हक्काचा भाग. तो टाळणे अशक्य होते. मग मनाने बंड केले. शरीराची सकृतदर्शनी साथ मिळाली. शरीर अर्धांगवायूचा झटका आल्यासारखे झाले. शरीरसंबंध आपोआप टाळला गेला. काही काळाकरता मनाने दिलेल्या ठाम नकाराचा तो पक्षघात, हा शारीरिक (तात्पुरता) आविष्कार होता. कारण समजले. तिची समजूत घालण्यात आली. पटविण्यात आले. मन सावरले. विचार बदलला. हातापायातली ताकद परत आली. ती सासरी गेली. संसार सुरळीत झाला.

रुग्णाचा, त्याच्या आई-वडिलांचा मनापासून ज्याच्यावर विश्वास आहे असा एखादा बाबा, महाराज, भगत, देवऋषीदेखील हाच आधार मुलीला देऊ शकला असता. कधी अंगाऱ्याने तर कधी शब्दानेही. पण हिंडू फिरू लागलेल्या मुलीच्या मागे बाबाचा केवढा बोलबाला झाला असता, चमत्कारात त्याची गणना झाली असती.

जगामध्ये सगळेच काही आपल्या मनासारखे घडत नाही. काही जणांना आपुलकी कमी मिळते. घरी अथवा कामाच्या ठिकाणी सतत कोणीतरी हिडीस फिडीस करते गोष्टी मनाविरुद्ध घडत जातात. हेटाळणी सतत चालू राहते. याचा परिणाम हळूहळू मनावर होतो. मन खंतावते. आपल्यात काही दोष आहे का अशी टोचणी मनाला लागते.

अशा माणसांची स्थिती केविलवाणी होते. कुणीतरी आपल्याकडे लक्ष द्यावे असे त्यांना वाटू लागते. घरातल्या माणसांची सहानुभूती आपोआप कशी मिळेल याचा ते विचार करतात. पण घरातील इतर माणसे तिकडे कशाला लक्ष देतील? एखादा शारीरिक आजार दिसला तरच घरच्यांचे लक्ष सहजपणे वेधून घेणे शक्य होते. मग अशा माणसांचे मन शरीराला 'आजारी पड' असा आदेश देते. शरीर आणि मन यांचे नाते फार जवळचे असल्याने शरीर मनाचा आदेश मानते.

सुधाच्या बाबतीत असेच घडले होते. घटना समजावून घ्यायला सुधा ही प्रातिनिधिक उदाहरण समजायला हरकत नाही. परिस्थिती वेगवेगळी पण मूळ गाभा कायम राहतो.

सुधाच्या नवऱ्याने मुंबईची नोकरी सोडली. तो आपल्या गावी परत आला. मुंबईत राजाराणीचा संसार करणारी सुधा खऱ्या अर्थाने सासुरवाशीण झाली. ती स्वभावाने अगदी गरीब गाय. पण खाष्ट सासूचे आणि तिचे पटेना. नवरादेखील सासूची बाजू घेऊन येता-जाता तिच्यावर डाफरू लागला.

गौरी-गणपतीच्या वेळी घरी खूप पाहुणे आले होते. सासूने सुधाला बरीच कामे सांगितली. संध्याकाळी हळदीकुंकवालाही अनेक जणी आल्या होत्या. अचानक सुधाला अपस्माराचा झटका आला. उभ्या - उभ्या ती कोसळली! तिला कुठे लागले नाही इतकेच. पण दातखीळ बसली. दहा -बारा मिनिटे ती थाड थाड उडत होती. साऱ्यांचे लक्ष तिच्याकडे लागले होते. चारजणींनी तिला दाबून धरले. एकीने कांदा फोडून हुंगायला दिला. दुसरीने तिच्या तोंडावर पाणी मारले. हळूहळू ती भानावर आली. आलेल्या आयाबायांनी तिची मायेने चौकशी केली. 'सांभाळून रहा ग बाई.' असा सल्ला सासूदेखत दिला. नंतर सुधाही दोन दिवस झोपूनच होती.

बाकी सर्वांनाच काय पण खुद्द सुधालाही आपल्याला अपस्माराचा झटका आला असे वाटले. पण ते खरे नव्हते. सुधाला स्वत:ला जरी ठाऊक नसले तरी तिने स्वत:च्या नकळत एक नाटकच केले होते. अपस्माराच्या खऱ्याखुऱ्या झटक्याने माणसे धाडकन पडली तर त्यांना मार बसतो. ती जखमी होतात. दातखीळ बसली तर दातात जीभ चेंगरून रक्त येते. बेशुद्ध असताना कपड्यात लघवी झाली तरी कळत नाही. ही सारी लक्षणे समजून घेतली तर सुधाला अपस्मार झाला नव्हता हे कळेल. पण तिला रागे भरून चालणार नाही. तिने जाणूनबुजून नाटक केले नव्हते. तिच्या आजारी व्याकूळ मनाने हे नाटक करायला तिला नकळत भाग पाडले होते. दर दहा-पंधरा दिवसांनी असा झटका येणे हा पुढे सुधाचा एक नेहमीचा आजार होऊन बसला.

मनातील ताण व संघर्ष शारीरिक लक्षणाद्वारे व्यक्त केल्या जाणाऱ्या या आजाराला म्हणतात 'हिस्टेरिकल कन्व्हर्जन'. हे विकार स्त्रियांत थोडे अधिक असले तरी ते पुरुषांमध्येही आढळतात. हे रुग्ण लुळे आढळतात. अंधळे होतात. पांगळे होतात. पण हे शारीरिक आजार नसतात. शरीराच्या अवयवात दोष नसतो. मूळ मानसिक ताणात असते. रुग्णाच्या अंतर्मनातील संघर्षाचे रूपांतर शारीरिक लक्षणामध्ये होते.

मनातील भावना, विचार, शब्दांबरोबर शारीरिक हावभावही व्यक्त होतात. आपण भुवई उंचावून प्रश्न विचारतो. खांदे उडवून, कपाळाला आठ्या घालून नाराजी व्यक्त करतो. संतापाने थरथर कापतो. मानसिक धक्क्याच्या शारीरिक परिणामाचे वर्णन वाक्प्रचारातही केले जाते. जसे हातपाय गळणे, कंबर खचणे, अवाक् होणे, देहभान हरणे! हिस्टेरिकल कन्व्हर्जन हा मानसिक द्वंद्वाचं शारीरिक लक्षणात रूपांतर होण्याचा असाच एक मार्ग आहे. हा रुग्ण अप्रिय वा असाध्य भावना, इच्छा मनात दडपू पाहतो. पण त्याचं रूपांतर रुग्णाच्या नकळत शारीरिक लक्षणात होते. स्वरयंत्राला व जिभेला काही एक इजा न होता व्यक्ती मुकी होते. डोळ्याची रचना आतून बाहेरून शाबूत असून माणूस अंधळा होतो. एपिलेप्सिप्रमाणे त्यांना फिट येते. डोक्याला मार लागलेला रुग्ण बेशुद्ध होईल त्याप्रमाणे हिस्टेरिकल माणूस बेशुद्ध होतो. मज्जासंस्थेच्या आजाराप्रमाणे त्याचे हातपाय लुळे वा पांगळे होतात.

गेल्या शतकात पाश्चिमात्य देशात सर्रास आढळणारे हे प्रकार शिक्षण व सुधारणांच्या प्रसाराबरोबर कमी झाले. भारतातही शिक्षित, सुसंस्कृत वर्गामध्ये अशी लक्षणं क्वचितच आढळतात. दु:ख व्यक्त करण्याच्या मार्गांपैकी हा तसा ओबडधोबड मार्ग आहे. सर्वात जास्त दडपल्या जाणाऱ्या स्त्रिया व मुलांमध्ये हा विकार अधिक आढळतो. भारतातील बहुसंख्य स्त्रिया आजही अतिशय खडतर आयुष्य जगतात. शिक्षणाचा अभाव, मागासलेले विचार, अंधश्रद्धांचा पगडा, पुरुषी वर्चस्व या दडपणाखाली परावलंबी जीवन त्या जगत असतात. अशा गोष्टींचा प्रत्यक्ष निषेध स्त्रीला करता येत नाही. किंबहुना निषेध करण्याचा विचारही तिच्या मनाला क्वचितच शिवतो. ही दु:खे मग अशा वेगळेपणाने प्रकट होतात. काही वेळा ही लक्षणे तात्पुरत्या सूडाचं साधनही बनतात. पण बहुसंख्य वेळा त्या स्त्रीचे मूक होणे हे खरेतर 'माझ्याकडे आतातरी लक्ष द्या' म्हणून न बोलता

फोडलेला टाहो असतो. त्यात व्यथा आणि अगतिकता असते.

अडचणीला तोंड देण्याचा हा डाव, पळपुटा पवित्रा रुग्ण नकळत शिकतात. त्यामुळे हे आजार पुन्हा पुन्हा येत राहतात. वारंवार दातखीळ बसणारी मंडळी आपण बघतोच. डॉक्टरकडे गेल्यानंतरही परत-परत येत राहणाऱ्या या लक्षणाने हे काहीतरी बाहेरचे प्रकरण आहे, ही संबंधितांची शंका बळावते. (अपुऱ्या ज्ञानाने व्यवसाय करणारे डॉक्टर मित्रही त्याला खतपाणी घालतात हे खेदजनक पण खरे आहे.) मांत्रिक, बाबा, भगत यांची प्रसिद्धी व चलती होते ती अशा हिस्टेरिकल रुग्णांमुळेच.

हा प्रश्न केवळ अंधश्रद्धांचा नाही. समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण, स्त्रियांना समान दर्जा व आदराने वागणूक, मनमोकळेपणा यातून याचे प्रमाण निश्चित कमी होईल. मनातील संघर्ष सोडविण्यासाठी अशा भडक परंतु बहुदा निष्फळ मार्गाऐवजी योग्य त्या वैचारिक मार्गाचा रुग्ण अवलंब करू लागतील. मात्र ते घडून यावे यासाठी सर्वांचाच हातभार हवा.

♦♦♦

बुडबुडे भ्रमाचे

अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करताना परत परत ठामपणे एक प्रश्न सतत विचारला जातो. 'असंख्यांना साक्षात्कार झाले, संतांना देव भेटले, रामकृष्ण परमहंसांच्याबरोबर ते बोलले देखील, हे सर्व लोक काय खोटे बोलतात?'

ही सर्व मंडळी प्रामाणिकच आहेत यात शंकाच नाही. निखळ, निर्मळ संत खोटे बोलणारच नाहीत. परंतु नेमके घडते काय?

सुरवातीला भोंदू बदमाषांचा प्रश्न निकालात काढू. देव मला दिसतो, देवी माझ्या कानात कुजबुजते, मंजूळ आवाजात संदेश देते. याचा धंदा मांडणारे गावोगावी भेटतात. थोडे खरवडले तर त्यांचे नकली रूप सिद्ध होते. परंतु यापेक्षा वेगळेही काही असू शकते. ते म्हणजे कधी मनोविकृती तर कधी स्वसंमोहनाची प्रगाढ अवस्था.

वंदनाची दहावीची परीक्षा पंधरवड्यावर आलेली. तेव्हा तिच्या कानात तिला स्पष्ट आवाज ऐकू आला. 'वंदना कशाला बसतेस परीक्षेला, नापासच तर होणार आहेस!' आईवडिलांनी परोपरीने समजूत घालूनही वंदना परीक्षेला बसलीच नाही. परीक्षा तर हातातून गेलीच. वंदनाची मैत्रीण सुधा म्हणाली, 'घरी नुसतीच बसून काय करणार? माझ्याबरोबर शिवण शिकायला येत जा.' वंदनाच्या कानातल्या आवाजाने स्पष्ट बजावले, 'तुला शिवणकाम जमणार नाही.' पाच सहा महिन्यांनी तिच्या मामांनी तिच्यासाठी

चांगला मुलगा बघितला. पण कानातला आवाज तिथेही आडवा आला. म्हणाला, 'तुला नकार मिळणार आहे.' वंदना मामांना म्हणाली, 'मुलाला इथे बोलावूच नका.' कानातला आवाज म्हणाला, 'तू मामांचं ऐकलं नाहीस हे फार बरं केलंस.'

मग वंदनाच्या घरच्यांनी अंगारे-धुपारे, गंडे -दोरे, लिंबू-नारळ सारे केले पण गुण आला नाही. कानातला आवाज बोलतच राहिला.

हेमाच्या शाळेपासून तिचे घर दोन मैलांवर होते. हेमा रोज चालत एकटीच जायची, यायची आणि परीक्षेचे दिवस जवळ आलेले. एके दिवशी रस्त्यावर असलेल्या पिंपळाच्या झाडावर एक पांढरी शुभ्र आकृती हेमाला दिसली. केस मोकळे सोडलेली बाई. ती हाताने हेमाला खुणावत होती, ये -ये म्हणून बोलावत होती. भीतीने निथळून हेमा माघारी पळाली. तिने शाळेला जाणे सोडले. एकदा धीर धरून पुन्हा प्रयत्न केला. पुन्हा तेच. मग मात्र हेमाची वा तिच्या घरच्यांची छातीच झाली नाही तिला शाळेत पाठवावयाची.

गोखलेबाईंचा संसार सुखाने चाललेला. तीन मुले. पतींना चांगली नोकरी. पण एके दिवशी अचानक गोखलेबाईंच्या लक्षात आले, आपल्यामागे घरात एक आकृती फिरत आहे. थोडेच दिवसात त्या आकृतीचा हिरवागार शालू, तेज:पुंज चेहरा त्यांना स्पष्ट दिसू लागला. आणि पुढच्या काही दिवसांत तो चेहरा त्यांच्याशी बोलला देखील. 'बाई गं, मला ओळखले नाहीस, मी झाशी संस्थानाची कुलस्वामिनी. तुला सांगायला आलेय. तुझा पूर्वीचा जन्म, झाशीच्या लक्ष्मीबाईचा. तू अचानक धारातीर्थी पडलीस. माझे धार्मिक संस्कार राहून गेले. या जन्मी तरी ते पुरे कर!' गोखलेबाईंना मग आपला पूर्वजन्म जणूकाही लख्खपणे आठवला. एका बाजूला तिने पूर्वीच्या जन्माचे अनुभवकथन चालू केले तर दुसऱ्या बाजूला धार्मिक कृत्यांना प्रारंभ केला.

वंदनाचा आदेश देणारा आवाज, हेमाला खुणावणारी पांढरी आकृती, गोखलेबाईंना देवतेकडून मिळणारी सूचना हे सारे काय आहे? या साऱ्या गोष्टी त्या त्या व्यक्तींच्या लेखी फार खऱ्या आहेत. तरीही ती भूतबाधा वा करणी नाही, साक्षात्कार नाही. तो आहे गंभीर स्वरूपाचा मनोभ्रम आणि त्यामुळे होणारे भास.

असे भास कसे होतात?

निरोगी व्यक्तीला ऐकू येण्यामागे मेंदूची एक खुबी असते. दूरवर शीळ वाजते. त्यामुळे हवेत ध्वनिलहरी उत्पन्न होतात. या लहरी कानाच्या पडद्यापर्यंत येऊन पोचतात. कानाचा पडदा हलू लागतो. हे हलणं एका सूक्ष्म विद्युत संदेशात रूपांतरित केलं जातं. श्रवणेंद्रियाची नस (नर्व्ह) हा संदेश मेंदूपर्यंत पोहोचवते. मेंदू या संदेशाचे पुन्हा आवाजात रूपांतर करतो. आता मेंदूची खुबी ही की हा आवाज आपल्या कानाने ऐकू आला तरी तो कानामध्ये निर्माण झालेला नसून त्याच्या उगमापासून (शीळ घालणाऱ्या व्यक्तीच्या मुखापासून) येत आहे याची जाणीव आपल्याला होते. स्किझोफ्रेनिया (व इतर काही रोगातही) आवाजाचे, इतर इंद्रियांच्या संवेदनांचे भास होतात. हा बिघाड मेंदूत होतो. परिस्थितीमुळे व्यक्तीच्या मनावर पडलेल्या असह्य ताणामुळे किंवा असे

कारण नसतानाही मेंदूतील काही रासायनिक स्रावांच्या कमतरतेमुळे हे भास निर्माण होतात. मेंदूच्या खुबीमुळे मात्र हा आवाज, ते चित्र बाहेरून आले आहे असे वाटते. यामुळे खिडकीबाहेरची माणसं, लांबवर असलेली माणसं, आपणाबद्दल बोलत आहेत असेच रुग्णाला वाटते. कानात कुजबुजणे, संदेश येणे, नसलेल्या व्यक्ती दिसणे हेही सारे याचेच परिणाम आहेत. कितीही समजावलं, ओरडलं, मारलं, मनधरणी केली तरी असे भ्रमिष्ट विचार बदलत नाहीत.

परंतु हे भास म्हणजे प्रत्येक वेळा मनोविकृतीच असते असे नाही. ती प्रगाढ स्वरूपाची संमोहन अवस्थाही असू शकते. पुन्हा संमोहन म्हणजे काहीही अद्‌भुत बाब नाही. जागृती , झोप, स्वप्न, बेशुद्धी या जशा मनोवस्था तशीच संमोहनही मनाची एक स्थिती. या अवस्थेचे वैशिष्ट्य हे की, त्यामध्ये इंद्रियाचे भ्रम उत्पन्न होतात. प्रगाढ संमोहित अवस्थेमधील व्यक्ती कारले कॅडबरी म्हणून खाते. रॉकेल अत्तर म्हणून हुंगते. नसलेल्या मुंग्या तिला कडकडून चावतात. आणि नसलेल्या फुलांच्या वासाचे घमघमाट जाणवतात, देवाचे दर्शन घ्या म्हटले की, भक्तिभावाने संमोहित व्यक्ती हात जोडतात, माथा टेकवतात. साष्टांग नमस्कारही घालतात. आणि कोणत्या देवाने दर्शन दिले याचे रसभरित वर्णन करतात.

संमोहन म्हणजे असते तंद्रीची अवस्था. फक्त वेगळेपण हे की, ही तंद्री सूचनांशी जोडलेली असते. जशा सूचना स्वीकारल्या जातात तसे-तसे भास उत्पन्न होतात. पण प्रत्येक वेळा दुसऱ्याच्या सूचनांमुळे संमोहनात जाण्याची गरज नसते. स्वत:च स्वत:ला कळत नकळत सूचना देऊनही व्यक्ती स्वसंमोहनात जाऊ शकते.

आरत्यांचा अखंड लयबद्ध नाद, डोळे दिपवणारी रोषणाई, धुपाचा दाटलेला वास, आजूबाजूला भक्तीच्या बेहोषीत घुमणारे स्त्री-पुरुष यापैकी एखाद्या परिणामाने देखील संमोहन अवस्थेत भाविक व्यक्ती जाऊ शकते. मग सर्वच बाबी एकत्रित असतील तर विचारायला नको. या अवस्थेत देव-देवी अंगातही येऊ शकते. मन:पूर्वक घेतलेला ध्यास, सततचे नामस्मरण, उपासतापास याही गोष्टीतून स्वसंमोहन अवस्था प्राप्त होऊ शकते.

हे सारे माणसाला समजले अलीकडे, म्हणजे या शतकात.

तोपर्यंत असे मानले जाई की पाणी सगळीकडेच असते. विहिरीत, झऱ्यात, नदीत, सागरात पण भरती येते फक्त सागरालाच. त्याप्रमाणे मन सगळ्यांनाच असते पण साक्षात्काराने जीवन उजळून टाकण्याची मानसिक भरतीची अवस्था एखाद्याच संत महात्म्याला प्राप्त होणार. त्या थोर पुरुषाला ते जाणवायचे आणि त्या व्यक्तीच्या सच्चेपणावर अवलंबून सर्वांना ते सत्य वाटायचे. हे अगदी स्वाभाविकच.

हा विचार कोणी करावयाचा नाही की, 'अरे या सर्वांना दर्शन देणारा तो देवाधिदेव माणसाच्या देहासारखाच कसा? नाक, कान, डोळे, तोंड असलेला? खरे तर तो हवा अगदी आगळा-वेगळा माणसाहून एकदम निराळा. साक्षात्कारात जाणवणारा देव तसा नव्हता; असणे शक्य नव्हते पण 'देव दानवा नरे निर्मिले हे मत लोका कळवू द्या' असा

पुकारा होईपर्यंत माणसांना त्याची चिकित्सा करण्याची गरज भासली नाही. आणि खरे सांगू, आपण विवेकानंदांना (आणि त्या मालिकेतील सर्व महापुरुषांना) थोर मानतो ते कशाकरता? त्यांना देवाने दर्शन दिले याकरता? मला नाही वाटत. विवेकानंदांच्या भाषेत सांगायचे तर, ''येत्या पन्नास वर्षांत या देशात एकाही देवाची पूजा झाली नाही तरी चालेल पण इथल्या दरिद्रीनारायणाची पूजा मात्र व्हायलाच हवी.'' प्रत्येक शोषितात, पीडितात, वंचितात भगवंत पहा याचा हा पाठ महत्त्वाचा. बाकीचे सारे बुडबुडे भ्रमाचे.

♦♦♦

यज्ञ संस्कृती की अज्ञ संस्कृती

नवसाने पुत्रप्राप्ती होत असेल तर पतीची गरजच काय? असा परखड, न रुचणारा, धक्का देणारा प्रश्न तुकारामांनी तीनशे वर्षांपूर्वी विचारला. पण त्यापासून आपण कोठे काय शिकलो? तुकाराम महाराजांचा डोळसपणा होता तो हा की कशामुळे काय घडू शकेल आणि काय नाही हे तपासाल की नाही? असा त्यांचा रोकडा सवाल होता. कार्यकारणभावाने ते तपासावे असा त्यांचा आग्रह होता. पण विज्ञानयुग समजल्या जाणाऱ्या आमच्या समाजात आपला प्रवास कोठे चालला आहे?

निसर्गाच्या लीला भयचकित नजरेने बघणाऱ्या आदिम अवस्थेतील माणसाने या विश्वामध्ये एक 'यातू' शक्ती भरून राहिली आहे असे मानले. या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी करावयाची कर्मकांडे म्हणजे यातू क्रिया. अमुक केले की तमुक फळ असे अर्थ आदिम अवस्थेतल्या माणसाने या कर्मकांडांना जोडले. यज्ञ हे यातीलच एक. स्वर्ग, पुत्र, पशु, आरोग्य, ऐश्वर्य, पापनाश इ. इष्ट फलांच्या प्राप्तीसाठी अग्नी, इंद्र आदी देवतांना उद्देशून अग्नीमध्ये समंत्रक आहुती अर्पण करण्याचे धार्मिक कर्मकांड हे स्थूल मानाने यज्ञाचे स्वरूप. एकेकाळी यज्ञप्रसंगी होणारी पशूंची हिंसा व अन्य ओंगळ प्रकार आता कालओघात बंद झाले, मात्र अशा यज्ञ संस्कृतीमागे उभी असलेली उच्चवर्णीय मानसिकता कायमच राहिली. विषमतेची परंपरा कायम होण्यासाठी यज्ञयागादी रूढींची मदत झाली. हा इतिहास आहे. यज्ञ ही नेहमीच उच्चवर्णीयांची धर्मसंस्था राहिली.

द्रव्यमय यज्ञापेक्षा ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ ही गीतेची भूमिका, यज्ञरूपी नावा फुटक्या असल्याचा मुंडकोपनिषदाचा निर्वाळा, अश्वमेधासारख्या यज्ञापेक्षा मानसिक उपासनेचे मोल मोठे असल्याचे आरण्यकांचे व ब्राह्मण ग्रंथांचे सांगणे आणि चार्वाक; बौद्ध आणि जैन मतांचे यज्ञसंस्थेवरील आक्षेप, या सगळ्यामुळे खरेतर यज्ञ काय आहे आणि काय नाही हे वेगळे सांगण्याची गरज नाही. अवैदिक दर्शन म्हणून त्या आक्षेपांकडे दुर्लक्ष

केले तरी वैदिक परंपरेत येणाऱ्या उपनिषदांची यज्ञविरोधी भूमिका तशी डावलता येणार नाही. यज्ञाचे फळ मोक्षाएवढे शाश्वत नसल्याचे सांगून उपनिषदांनी यज्ञाला विरोध केला आहे.

आजच्या समतेच्या आणि विज्ञानाच्या युगात हे समजण्यात खरेतर कसली अडचण? पण मामला एवढा साधा, सोपा, सरळ नाही. कारण यज्ञाबद्दल शंका घेतली की मग वेदाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होतो. सगळ्यात पवित्र, प्राचीन, अपौरुषेय ग्रंथ म्हणजे वेद आणि तो सर्वश्रेष्ठही. अगदी आधुनिक विज्ञानाचे सारही त्यात अंगभूत आहे असा त्यांच्या भक्तांचा दावा. तेव्हा हे सारे प्रश्नचिन्हांकित होण्याआधीच उच्चरवाने पुकारा चालू होतो. सर्व प्रश्नांची उत्तरे वेदात सापडतात. संतानप्राप्ती आणि हमखास पुत्रप्राप्ती, अखिल मानवजातीचे कल्याण, अवघे जग प्रदूषणमुक्त करणे या आणि अशा अनेक गोष्टींची गुरुकिल्ली वेदांतील यज्ञसंस्थेत आहे. आपले काम एवढेच ती समजून घ्यावयाची, त्याचा आचार करावयाचा.

म्हणूनच मग केरळात जोरदार पुत्रकामेष्टी यज्ञ होतो. नागपुरात देव संस्कृती अश्वमेध यज्ञ मांडला जातो. आणि घरोघरी सूर्यास्त वा सूर्योदयाच्या वेळेला अग्निहोत्र प्रज्वलित करावे यासाठी मोहीम चालू होते.

केरळात अलीकडेच एक भलाथोरला पुत्रकामेष्टी यज्ञ झाला. वाल्मीकींनी रामायणाच्या बालकांडात घालून दिलेल्या तपशीलवार सूचनांचे काटेकोरपणे पालन करून तो पार पडला. यज्ञाचे सर्व सोपस्कार विधी ऐंशी वर्षांचे वासुदेवन अक्कितिरिपद यांच्याकडे होते. आणि त्यांना तीन मुख्य नम्बुद्रीपाद आणि १००आचार्य मदत करत होते. प्रचंड मंडप, हजारो गायी पाळून त्यांच्या दुधापासून तयार केलेले शेकडो टन शुद्ध तूप, उत्तम तांदूळ, शुद्ध प्रज्वलनास सुलभ असे लाकूड यज्ञासाठी वापरले गेले. जानेवारी ९४ मध्ये नागपूर येथे झालेला अश्वमेघ यज्ञ तर अभूतपूर्वच होता. हरिद्वाराच्या शांतीकुंज येथील वेदमाता गायत्री ट्रस्ट यांच्या वतीने ५ ते ९ जानेवारी असा कार्यक्रम झाला. यज्ञाचे प्रमुख संयोजक कालिदास शर्मा हे एम. टेक ही उच्च पदवी घेतलेले गृहस्थ. त्यांनी आपले आयुष्यच यासाठी वाहून घेतलेले आहे. याआधी दहा ठिकाणी हा यज्ञ पूर्णपणे यशस्वी झाला असा त्यांचा दावा होता. एका वेळी १००८ जोडप्यांनी हा यज्ञ केला. इकडे यज्ञ चालू असताना नंबर लावलेली पुढची हजारो मंडळी प्रतीक्षेत असतच. संस्कार शाळा, जात कर्म, अन्नप्राशन, विवाह, संस्कार, वानप्रस्थदीक्षा यासाठी वेगळे मंडप करण्यात आले होते. प्रत्येक मंडपात चार दिवसांत तीन लाख संस्कार झाले असा संयोजकांचा दावा. गायत्री ट्रस्टचे एक लाखापेक्षा अधिक सदस्य देशभरातून आले होते. या यज्ञ कर्मात प्रत्येक दिवशी सुमारे तीन लाख लोकांनी भाग घेतला. बाराशे तंबू त्यासाठी उभारले होते. मंगल कलशाची यात्रा निघाली त्या वेळी ५ हजार महिला स्वत:च्या डोक्यावरून ते कलश वाहून नेण्यास हव्या होत्या. प्रत्यक्षात इतक्या मोठ्या संख्येने महिला आल्या की त्यांना कलशाविनाच सहभागी करून घेणे भाग पडले. कलशयात्रेवर विमानातून पुष्पवृष्टी करण्यात आली.

अश्वमेध यज्ञाच्या संयोजकांचे आवाहन होते की, दुसऱ्यांच्या भावनांना धक्का पोहोचेल असे वागू नका. शिवाय हा यज्ञ ब्राह्मणी संस्कृतीचे पुनर्जीवन करणारा आहे हे त्यांना अजिबात मान्य नव्हते. त्यांच्या मते या मंत्राचा जनकच मुळी महर्षी वाल्मीकी. आकाशातून पडलेला मंत्र वाल्मीकीने झेलला. लोकांच्यापर्यंत तो पोहोचविणे एवढेच यज्ञ संयोजकांचे काम. यज्ञातील प्रमुख १६ पुरोहितांपैकी दहा पुरोहित अब्राह्मण आहेत याचा आवर्जून उल्लेख होत होता.

पुत्रकामेष्टीच्या यज्ञाच्या आयोजकांच्या मते तो यज्ञ म्हणजे शास्त्राचाच एक भाग होता. त्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यांवर काही शारीरिक व आहारविषयक कठोर बंधने घालण्यात आली होती. यज्ञाआधी दोन आठवडे व नंतर दोन आठवडे व नंतर दोन आठवडे असे एकूण ४ आठवडे शास्त्रज्ञ व ज्यातिषी यांनी या जोडप्यांच्यावर बारीक लक्ष ठेवले. कारण हा यज्ञ काही अंधश्रद्धा जोपासणारा नव्हता तर त्यात शास्त्रीय ज्ञान व त्याची चिकित्साही होते.

पुत्रकामेष्टीच्या यज्ञाने संबंधितांच्या पदरात अपत्य पडले नाही तरी त्यांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी, समाधान तरी नक्कीच निर्माण होणार होते. सर्व देशांतील सर्व धर्मांचे लोक त्यासाठी तर त्यात सामील झाले होते, अशी संयोजकांची ठाम धारणा होती. देवसंस्कृती, अश्वमेध यज्ञ यांचा दावा तर फार मोठा होता. आसाम, पंजाब, काश्मिरातील अतिरेकी, धर्मजाती, प्रांतवादामुळे निर्माण झालेली गृहयुद्धाची स्थिती, राजकीय नेत्यांमध्ये असलेला इच्छाशक्तीचा अभाव आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सगळ्यांच्यात असलेला 'राष्ट्रीय वृत्तीचा अभाव' हे सारे दूर करण्यासाठीच्या राष्ट्रीय उपासनेची सर्वाधिक प्रचलित प्रक्रिया यज्ञ ही होती. तिच्या निमित्ताने संयोजकांना जागृत करावयाची होती विवेकबुद्धी. कुप्रथा, कुप्रवृत्ती अशा वाईट दुर्गुणांच्या 'अश्वाचा' बळी देणारा अश्वमेध यज्ञ होता. अनेक वर्षांत न झालेल्या या यज्ञाने जगाला, देशाला मानवी रीतीने वागण्याची बुद्धी येणार होती. आपली संस्कृती, संस्कार यांचे पुनर्जीवन होणार होते.

खरेच कोणत्या संस्कारांचे दृढीकरण केले गेले?

मुलगाच हवा, त्याशिवाय जन्म व्यर्थ आहे. हा संस्कार कोणता? उत्तम तांदूळ आणि शेकडो क्विंटल साजूक तूप विधीपूर्वक जाळणे ही प्रवृत्ती कोणती? श्रुतींनी सांगितलेले श्रौत व स्मृतींनी सांगितलेले हे यज्ञाचे दोन प्रकार आहेत. श्रुती आणि स्मृती या दोहोंवरही उच्चवर्णीयांचा ऐतिहासिक अधिकार आहे. या कर्मकांडांना सामाजिक समतेचे स्वप्न चिकटवू पाहणारे राजकीय खेळी खेळत आहेत की स्वत:चीच फसवणूक करत आहेत? यज्ञसंस्थेचे प्रकृती व विकृती असे दोन प्रकार केले जातात. एखादा यज्ञ कसा करावा हे समजण्यासाठी शास्त्राने जेव्हा त्याचे सर्व अंगांनी वर्णन केले असते तेव्हा त्या यज्ञाला प्रकृती याग म्हणतात. जेव्हा एखादी यज्ञविषयक माहिती देताना प्रकृती यागाच्या वर्णनात न आलेली नवीन वा विशेष माहिती सांगितली असते व बाकीची माहिती प्रकृती यागातून मिळवावी लागते, तेव्हा त्याला 'विकृतीयाग' म्हणतात.

त्या वर्गीकरणात न बसणाऱ्या यज्ञांना सरळ 'विकृती' म्हटले जाते. अश्वमेध यज्ञामध्ये मृत शरीराशी राणीने उघड्यावर संभोग करावयाचा असतो, त्यामुळे या यज्ञाचा समावेश विकृतीमध्येच करावयास हवा. देव आणि संस्कृती या दोन्ही शब्दांच्या उदात्ततेसाठी दूरान्वयाने तरी याचा संबंध आहे काय?

स्त्रीला पुत्रप्राप्तीच व्हावी ही गोष्ट आजच्या वैज्ञानिक प्रगतीमध्येही आजतरी अशक्य आहे. पुत्रकामेष्टी यज्ञात धर्मकल्पनांचे व कर्मकांडाचे पाठबळ या पलीकडे असे काय आहे की ज्यामुळे हा अद्‌भुत चमत्कार घडून यावा?

यज्ञ होऊन आता दोन वर्षे होत आली. प्रयोगाची कोणती आकडेवारी कोणी जाहीर केली आहे? राष्ट्रीय वृत्तीचा अभाव दूर होणे आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रभाव जाणवणे ही जादूची कांडी जर एखाद्या देवसंस्कार अश्वमेध यज्ञात असली तर यापेक्षा दुसरे ते देशाला काय हवे आहे?

भंपकपणा करणारे लोक सर्व समाजात सर्व काळात असतात. पण खरी वेदना आहे ती ही की जनांचा प्रवाह खळाळून त्यांच्याच मागे कसा जातो? सारासार बुद्धी गहाण कशी टाकतो? भारतातील सर्वप्रथम साक्षर झालेल्या राज्यात, शिक्षणाचे प्रमाण भरपूर असलेल्या राज्यात पुत्रकामेष्टी यज्ञाबद्दल एवढे जबरदस्त आकर्षण लोकांना वाटते कसे? धर्मशास्त्रे, वेदपुराणे यांच्यामध्ये आपल्या आजच्या प्रश्नांची उत्तरे लोक भक्तिभावाने शोधतात, मानाने मिरवतात, त्यांना प्रश्न विचारल्यावर संतप्त होतात. ही मानसिकता धर्मांध राजकारणाला सुपीक भूमी निर्माण करते. खऱ्या प्रश्नाचे भान हरवते. संयोजकांच्या मताप्रमाणे या यज्ञातून देशाला मानवी रीतीने वागण्याची बुद्धी येण्याऐवजी बुद्धी गहाण टाकण्याचा राजरस्ता खुला होतो आणि विकासाऐवजी विनाशाकडे वाटचाल चालू राहते.

या यज्ञाची खास घरगुती पॉवरफुल आवृत्ती म्हणजे अग्निहोत्र. पुन्हा थेट वेदापासून घेतलेली, देशात, परदेशात घराघरात पोचलेली. त्याबद्दल सांगितले जाते ते असे, - परम सद्‌गुरू श्री. गजानन महाराज यांनी १९४४ मध्ये दसऱ्याच्या दिवशी अखिल जगताला वेदाचे सार असलेला सप्तश्लोकी धर्मोपदेश केला त्यात जे पंचसाधन मार्ग सांगितले त्यामध्ये यज्ञसंस्थेस अगस्थान दिले आहे. वायुमंडलाच्या शुद्धीपासून पूजेच्या उत्पत्तीपर्यंतच्या सर्व घटकांवर यज्ञाचा प्रभाव असून ऋग्वेदास मान्य असलेल्या यज्ञाचे काळाच्या ओघात रूप बदलून सर्व सामान्य जनांस अत्यंत सोप्या पद्धतीने अग्निहोत्र उपासना सांगितली.

उपासना विधी अगदी साधा, सोपा, सरळ. तांब्याचे अथवा मातीचे तीन पायांचे पिरॅमिड आकाराचे पात्र घ्यावे. त्यामध्ये गाईच्या शेणाच्याच गोवरीचा तुकडा ठेवावा. गाईच्या तुपात भिजवलेली फुलवात मध्ये ठेवून अग्नी प्रज्वलित करावा. दोन चिमटी तांदूळ तुपात माखून त्याची आहुती काही विशिष्ट मंत्र उच्चारून बरोबर सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी द्यावी. बस्स. एवढेच करावे. विधी छोटा अगदी लहान पण फल केवढे महान! अखिल मानवजातीवर उपकार करणारे.

या उपासनेचे आद्यपीठ असलेल्या शिवपुरी अक्कलकोट येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन वैदिक सायन्स या संस्थेचे मुखपत्र 'अनादी' मध्ये या उपासनेमुळे घडून येणाऱ्या चमत्काराच्या दिलेल्या तपशीलातील नोंदी बघण्यासारख्या आहेत.

अग्निहोत्र सूर्योदय व सूर्यास्ताच्या अचूक वेळीच करावे. नाहीतर फलदायी परिणाम मिळत नाही. ज्या वेळी सूर्य उगवत असतो त्या वेळी त्या-त्या भागातील वातावरण विद्युत शक्तीने भारित असते. त्याच वेळी केलेल्या अग्नीहोत्रामुळे सूर्यमालेची चैतन्यशक्ती पृथ्वीकडे अधिक प्रभाविपणे येऊ शकते. सूर्यास्तावेळी जंतूंची धोकादायक वाढ वातावरणात होत असते. अग्नीहोत्र त्यावर फारच परिणामकारक ठरते.

गायीच्या शेणात किरणोत्सर्गापासून संरक्षण देण्याची शक्ती असते असे रशियन शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. गायीच्या शेणाच्या केवळ वासामुळे मलेरियाचे जंतू आणि ताप नाहीसे होतात असे इटालियन शास्त्रज्ञांना आढळून आले आहे. तूप गाईचेच हवे. केवळ शुद्ध गायीच्या तुपामुळेच अग्नीहोत्र झालेल्या ठिकाणावरील सर्व रोगजंतू नाहीसे होतात. गायीच्या शुद्ध तुपाशिवाय हा विधी केल्यास तो माणसाला व वातावरणाला अपायकारक ठरतो.

गायीच्या तुपाने माखलेल्या तांदुळाची समंत्र आहुती दिल्यामुळे गायीचे शेण, गायीचे तूप, मंत्र व अचूक वेळ यांच्या एकत्रित प्रभावातून जे वायू तयार होतात ते वातावरणात सर्वात वर जातात व तसे जाताना विषारी, अस्वच्छ हवा स्वच्छ करतात. प्रदूषण विरोधात सर्वात प्रभावी हत्यार म्हणजे अग्नीहोत्र.

अग्नीहोत्रातील राखेचा शेतातील पीक वाढीसाठी अतिशय प्रभावी उपयोग होतो. यातले काय सिद्ध झाले? कधी झाले? कसे घडले? कोठे झाले? साध्या तर्काशी जे विसंगत आहे ते एकदम शास्त्रीयदृष्ट्या मान्यताप्राप्त कसे ठरले?

सूर्योदयाच्या वेळी वातावरण विद्युत शक्तीने भारित असते आणि सूर्यास्ताला वातावरणात विषारी जंतू वाढत्या प्रमाणात वळवळत असतात याला पुरावा काय?

गायीच्या तुपामध्ये (आणि शेणामध्येही) अद्‌भुत सामर्थ्य असते आणि म्हशीचे तूप वा शेण याने अग्नीहोत्र केले तर वातावरण व माणूस याला अपाय होतो या विधानाला कोणत्या प्रयोगशाळेत प्रमाण मिळाले?

अग्नीहोत्रातील राखेने पिके जोमदार वाढतात असे कोणत्या कृषी विद्यापीठात शिकवले जाते? साजूक तूप आणि तांदूळ जाळून पिकाच्या वाढीला खत मिळवणे यात शहाणपणा कोणता?

कुठल्याही ज्वलनक्रियेत प्राणवायू वापरला जातो व कर्बद्विप्राणिल वायू बाहेर फेकला जातो. स्वाभाविकच वातावरणाचे प्रदूषण वाढते. अग्नीहोत्रातल्या ज्वलनामध्ये असे काय आगळेवेगळे, निराळे आहे की ज्याच्यामुळे ज्वलन होते तरी प्रदूषण मात्र कमी होते?

क्षणभर अग्नीहोत्राने वातावरण शुद्ध होते असे मानू, पण दोन चिमूट तांदूळ आणि थोडे तूप यांनी केवढे क्षेत्रफळ प्रदूषण मुक्त होते? एवढा छोटासा विधी दिवसातून फक्त

दोनदा करून तो पृथ्वी व्यापणाऱ्या प्रदूषणाच्या विरोधात सर्वात प्रभावी अक्सरी इलाज कसा ठरतो? अग्नीहोत्राचे साधक व त्याचे चिकित्सक यांनी एकत्रितपणे प्रयोग करण्यास काय हरकत आहे?

हे काही मुक्त विचारतरंग नाहीत. चळवळीत हे प्रश्न आम्ही अग्नीहोत्राच्या प्रवक्त्यांकडे उपस्थित केले आहेत.

प्रतिसाद काय मिळतो?

शास्त्राच्या कसोटीच्या रिंगणात कोणी येत नाही. उत्तराचा बाह्य रोख असतो. प्रश्न श्रद्धेचा आहे, ज्ञान वेदातले आहे. आणि मनातला संताप हा असतो की हे प्रश्नचिन्हांकित करताच कसे? साक्षात् वेदाला आव्हान देता?

ज्याला सत्याला सामोरे जायचे असते तो अनेक ठिकाणी आव्हान देतो. सत्याचे त्यामुळे काहीच बिघडत नाही. ते सत्यच असते. सत्यच राहते. बिघडते ते विशेषत: तथाकथित ज्ञानाच्या नावाखाली ज्या वेळी पुत्रप्राप्तीचे, विश्वशांतीचे, पर्यावरणारक्षणाचे दावे केले जातात त्या वेळी. ते तपासावे लागतातच.

श्रद्धेच्या आचरणाचे आणि उपासनेचे स्वातंत्र्य तर प्रत्येक भारतीयाला आहेच. त्याचा आदर करावयास हवा. पण विचाराचे स्वातंत्र्य अन्य सर्वांनाही आहे. त्याचे काय? नरहर कुरुंदकरांनी एके ठिकाणी फार चांगले विवेचन केले आहे. 'समाजात जर खरोखरी स्वातंत्र्य सजावयाचे असेल तर ती दुहेरी प्रक्रिया असते. एका बाजूने आपण सहिष्णू असावे लागते आणि दुसऱ्या बाजूने जबाबदार. आज आपल्या सहिष्णुतेच्या मर्यादा आपल्यापेक्षा वेगळा विचार करणाऱ्याबाबत उदासीनता इतक्याच आहेत. सहिष्णुतेची खरी कसोटी आपल्या श्रद्धांच्यावर आघात करण्याच्या विचारांविषयी आपण किती सहिष्णुता दाखवतो या ठिकाणी लागते. कुणीच कुणाची मने दुखवावयाची नाहीत, सर्वांनी एकमेकांच्या अंधश्रद्धा जपायच्या या दिशेने आपला सहिष्णुतेचा प्रवास चालू असतो. मुळात ही दिशाच चूक आहे. सर्वांनीच सर्व बाबींची चिकित्सा करावयाची आणि या चिकित्सेबाबत श्रद्धा कितीही दुखावोत, सहिष्णुतेने वागायचे या दिशेने आपण प्रवास केला पाहिजे. स्वातंत्र्याचा प्रश्न दुसऱ्या बाजूने जबाबदारीशीही निगडित आहे. विचार मांडणाऱ्याने 'मी विडंबन करणार नाही, विपर्यास करणार नाही, असत्यालाप करणार नाही, सत्य नाकारणार नाही, खंडन विचाराचे करेन, व्यक्तीचे करणार नाही, अशा जबाबदाऱ्या मान्य कराव्या लागतात.' अशा सत्यशोधनासाठी जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे आम्ही उत्सुक आहोत; वेदांती कधी पुढे येतात याच्या प्रतीक्षेत आहोत.

♦♦♦

चाबूकही हवा

'काय हो तुम्ही एवढे रक्त आटवताय! काही होतोय का फायदा? आम्हाला तर दिसतेय बुवाबाजी, देवऋषीपणा, ताईत, तोडगे, करणी सारे सुखेनैव चालू आहे.'

'नुसते चालू नाही हो, चांगले गंडवतात हे लोक. हजारो रुपयांना फटका बसतो, पुन्हा वेळ, श्रम वाया जातात ते वेगळेच.'

'माणसंच मूर्ख, एवढं कसं कळत नाही?'

'तुमची चळवळ आहे ना अंधश्रद्धा निर्मूलनाची. मग आमच्याकडे अर्जंट या. एका बाबाने अगदी उच्छाद मांडलाय!'

कानाला सराव झालेल्या संवादाचे हे काही तुकडे. काही जणांना वाटते आम्ही फायर ब्रिगेडसारखे अंधश्रद्धेची आग विझवायला सदैव तयार असावे.

काहींना वाटते काय एवढ्या कामात फायदा? कुठे काय कमी होतंय?

बहुतेक सगळ्यांनाच सात्त्विक संताप असतो तो यासाठी की, दिवसाढवळ्या अंधश्रद्धेचे साक्षीदार दरोडे घालतात.

डोळ्यांदेखत धनदौलत नव्हे, कधी प्राणही लुटून नेतात.

ज्या विषारी, जीवघेण्या सर्पदंशावर वा श्वानदंशावर प्रतिबंधात्मक इंजेक्शनच द्यावयास हवे, त्याऐवजी भलतेच काही उपाय सुचविले जातात. राजरोस केले जातात.

मानसिक आजाराला भुताची बाधा समजून बाईचे केस आढ्याला टांगून ती बांधली जाते. चपलेचे पाणी तिला प्यावे लागते, वेताच्या काठीने बेदम मारहाण होते.

चष्म्याचा नंबर जाण्याचे कोणतेच औषध नसताना कोणी चष्मा उतारो बाबा पुण्यासारख्या शहरातील लोकांच्या डोळ्यांचा नंबर जाण्यासाठी औषध देऊन मालामाल होतो. तर कुणी सहावी नापास झालेला शेखबाबा महात्म्या फुल्यांच्या घराशेजारी असाध्य बहात्तर रोगांवर रामबाण औषध म्हणून देतो, ते असते पेशवे पार्कमधले व्याघ्रमूत.

अनमोल शास्त्रीय संशोधन अशी जाहिरात करून कोणी मधुसूदन पटवर्धन भाग्यरत्न नावाखाली पंचवीस पैशाचे ॲगटचे खडे पंचवीस रुपयांना विकतो. काही वर्षांत पाच-सहा लाख खडे विकून कोटी, दोन कोटी रुपये कनवटीला लावतो.

अनेक अघोरी अमानुष प्रकार खेडोपाडीच्या यात्रा-जत्रात मानाने मिरवले जातात. लोक उघडपणे फसतात. दारुण दिशाभूल होते, जिवावर बेतते. काही वेळा जीव जातोही.

चळवळ कुठे कुठे पोचणार? प्रबोधन किती पुरे पडणार? प्रत्येक जिल्ह्यागणिक अंधश्रद्धांचे नाना प्रकार दिसतात. मती गुंग करणारे आणि प्रक्षुब्धही

सातारा जिल्ह्यातील 'मोठी आई' हा प्रकार घ्या. माणसाला एखादे करट येते, गाठ उठते, जखम काहीशी चिघळते, डॉक्टरकडे जाण्याआधीच आजूबाजूची कुजबुज

वाढते. 'मोठी आई दिसते बरं का?'

मग मोठ्या आईची मांड भरण्याचा विधी साग्रसंगीत केला जातो. मांडव असतो, गाणी असतात, बॅन्ड असतो, जेवणे घातली जातात. त्या जखमेवर वा करटावर हळद, कुंकू वाहिले जाते. सात सवाष्णींना खण, लुगडी दिली जातात. वाजतगाजत मांड नदीला सोडली जाते. रात्रभर शेजाऱ्यापाजाऱ्यांना न झोपू देता हा गोंधळ चालतो. पाच-पन्नास रुपयांत बऱ्या होणाऱ्या दुखण्यासाठी हजार-दोन हजाराला टोला बसतो. त्यामुळे बरे तरी वाटते का?

नैसर्गिकरीत्याच बऱ्या होणाऱ्या जखमा वा करटे वगळता अनेकदा यामुळे भलतेच घडते. जखम चिघळते. जखम बरी न होण्याचे आणखी काही गंभीर कारण असेल, (मधुमेह, कॅन्सर) तर त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. योग्य वेळी करावयाच्या योग्य उपायाला व्यक्ती पारखी होते. माणूस मूर्ख नसतो. पण अगतिक असतो. मोठ्या आईसाठी डॉक्टरी दवापाणी केलं तर तिचा कोप होईल असा धाक देवऋषी सतत घालत असतो. त्यामुळे रुग्ण आणि त्याचे सगेसोयरे भयग्रस्त असतात. मांड भरण्याचा विधी करणारी मंडळी टगी पण असतात. त्यांची दहशतही असते. शिवाय अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे शेजारीपाजारी या साऱ्यातून अनेकदा व्यक्तीची सुटका होते मृत्यूने. सातारा जिल्ह्यात हे सर्वदूर पसरले आहे.

हे काय आहे? लोकांच्या आरोग्यावर वा प्रसंगी जिवावरही घातलेला हा दरोडा नाही काय? याच्याविरोधी लढताना किती दमछाक करायची? ताकद किती पुरी पडणार? जिल्हा बदलतो. अंधश्रद्धेचे प्रकार बदलतात. शोषणाचा गाभा कायम राहतो. माझ्या डोळ्यासमोर दरोडा पडताना दिसला तर मी जमेल तसा प्रतिकार करेनही. पण माझे खरे काम असते पोलिसांना कळवण्याचे. दरोडेखोरांचा समाचार घेण्याचे काम मग ते पार पाडतात. त्यांना पकडतात. शिक्षा व्हावी, असा प्रयत्न करतात कारण गुन्हा दखलपात्र असतो.

समाजात अंधश्रद्धेच्या अघोरी, अमानुष प्रकारातून अनेक जीवघेणे दखलपात्र गुन्हे घडतात किंवा ते होण्याची संभाव्यता स्पष्ट दिसत असते. असे गुन्हे करणाऱ्यांना मात्र आजचा कायदा हातच लावू शकत नाही.

कारण आज अंधश्रद्धाविरोधी कायदा नाहीच. असा कायदा व्हावा, यासाठी आम्ही सर्वतोपरी धडपडत आहोत आणि अपुरे पडत आहोत.

तुम्ही याबाबत काय मदत करू शकाल?

निदान आपल्या भागातील आमदाराला पंधरा पैशांचे कार्ड पाठवून अशा कायद्याची आग्रही मागणी तर कराल?

चळवळीच्या भल्यासाठी कासेची लंगोटी देण्याची तयारी हवीच पण तेवढीच पुरेशी नाही.

'नाठाळाचे माथी काठी हाणू' हा तुकोबांचा संदेश स्मरण्याचीही गरज आहे.

♦♦♦

प्राणशक्तीचे छायाचित्रण

'पण योगाबद्दल काय हो?'

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हा प्रश्न वारंवार आणि धारदारपणे विचारला जातो.

शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योगासनांचा उपयोग होतो हे सर्वमान्य आहे. परंतु प्रश्नकर्त्यांच्या (आणि इतर असंख्यांच्या) मनातील प्रश्नचिन्हे खरे तर पुढची असतात.

त्यांना विचारावयाचे असते, कुंडलिनी सामर्थ्याचे काय? किरलियन फोटोग्राफी सत्य किती, असत्य किती? व्यक्तीच्या माकडहाडाखाली सर्पासारखे वेटोळे घालून कुंडलिनी अस्तित्वात असते. ध्यानधारणेने ती जागृत होते. मजारज्जूपासून मेंदूपर्यंत असणारी षट्चक्रे ओलांडून ती मेंदूतून बाहेर पडते आणि मग साऱ्या विश्वाचे ज्ञान प्राप्त होते. ही योगशास्त्रातील कल्पना श्रद्धा की अंधश्रद्धा? निखालस अंधश्रद्धाच, आधुनिक विज्ञानाचा कोणताही आधार नसलेली.

किरलियन फोटोग्राफी तर याही पुढे जाते.

सर्वसामान्याला अचंबित करणारी ही शास्त्रीय माहिती कशी असते? डॉ. स्वानंद घाटपांडे, पुणे यांनी रविवार सकाळच्या १९ मार्च १९८९च्या अंकात लिहिलेला 'मशाल पेटली योग ज्ञानाची' हा लेख पहा. अशी माहिती कशी सादर केली जाते त्याचा तो एक उत्तम नमुना आहे. किरलीयन फोटोग्राफीबद्दल असे लेखन तुम्हांला अनेक ठिकाणी आढळेल.

प्रास्ताविक असे :— भारतीय विज्ञानात योग शास्त्राचा पाया घालणारे महान ऋषी पातंजली यांची परंपरा विज्ञानाच्या निकषावर उतरवणारे या काळातील महर्षी म्हणजेच 'बिहार स्कूल ऑफ योगा'चे स्वामी सत्यानंद सरस्वती. त्यांचा आश्रम बिहारमध्ये मुंगेरया या गावी गंगा किनाऱ्यावर अडीच तीन मैलाच्या परिसरात वसलेला आहे. स्वामीजींच्या जगभर पसरलेल्या आश्रमातून परदेशातील अनेक विद्वान शिष्य येथे संन्यस्त जीवन जगत असतात. दमा या रोगावरील योगिक उपचार या चर्चासत्रासाठी डॉ. घाटपांडे त्या ठिकाणी गेले आणि त्यांची किरलियन फोटोग्राफी या तंत्राशी गाठ पडली. डॉ. घाटपांडे लिहितात— 'एका स्विडिश मानसशास्त्र विदुषीने (?) मानसिक अवस्थेचा, व्यक्तीच्या शरीराच्या तेजोवलयावर कसा परिणाम होतो, या सध्या प्रयोगावस्थेत असलेल्या किरलियन फोटोग्राफी या विषयावर अत्यंत मनोरंजक व माहितीपूर्ण निवेदन केले. या तंत्राने असे सिद्ध केले आहे की, प्रत्येक सजीव वस्तूला स्वत:चे असे तेजोवलय असते. सजीवामध्ये रोग निर्माण होण्यापूर्वी बऱ्याच आधी या तेजोवलयात बदल होतो. योगाच्या दृष्टीने सजीवामध्ये दिसणारे हे वलय त्याच्या प्राणिक शक्तीचे द्योतक असते. शरीरामध्ये रोग होण्यापूर्वी त्याची

प्राणिक शक्ती आधी कमी होते व नंतर रोगाची निर्मिती होते. याचाच अर्थ किरलियन तंत्राने कोणताही रोग शरीरात प्रत्यक्ष निर्माण होण्यापूर्वी बराच आधी समजू शकेल व योगाच्या साहाय्याने प्राणिक शक्ती वाढवून तो शरीरापर्यंत पोचणारच नाही अशी व्यवस्था करता येईल. या विशेष शोधाची माहिती झाल्यावर मी सगळ्या अडचणींना तोंड देऊन इथे आल्याचे सार्थक वाटले. हे ज्ञान माझ्यापर्यंत पोचवणाऱ्या संस्थेचे मी शतश: आभार मानले.

उपनिषदांमध्ये अन्नमयकोष, प्राणमयकोष, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोषाचे वर्णन केले आहे. ते कोष आजही भारतातील संशोधनाच्या मागासलेपणाने कोषावस्थेतच आहेत. किरलियन फोटोग्राफी हे या कोषावस्थेला फोडण्यासाठी मानवाने टाकलेले पहिले पाऊल म्हटले पाहिजे. फक्त ते भारतामध्ये टाकले न जाता रशियामध्ये टाकले जावे हीच काय ती खेदाची बाब.

साप्ताहिक सकाळ (ता. १६ ते २२ मार्च १९९०) या अंकात बाळासाहेब धोपेश्वरकर *यांनी 'अदृश्य प्राणशक्तीचे छायाचित्रण?' या नावाने लिहिलेल्या लेखातील* ही वाक्ये. 'पदार्थ वैज्ञानिकांनी याचा शास्त्रीय खुलासा केला आहे. परंतु किरलियन फोटोग्राफीच्या पद्धतीविषयी सांगावयाचे म्हणजे तो एक क्लिष्ट व जडजंबाल शास्त्रीय विषय होईल... ती प्रयोगक्षम कशी आहे हे दाखवावयाचे तर बरेच तांत्रिक वर्णन करावे लागेल...' अशी किरलियन फोटोग्राफीची भलावण केली आहे.

हे सारे वाचल्यावर जनसामान्यांना काय वाटते?

योगामागे काही महान (खरे तर अद्‌भुत) शास्त्र आहे. उपनिषदात त्याबाबत उल्लेख आढळतात. परदेशी मानशास्त्रज्ञ, रशियासारखे देश त्यावर संशोधन करतात. आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेत आज ना उद्या ही सत्यस्थिती अवतरणार आहे.

थोडक्यात, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विचाराने अंधळ्या झालेल्या करंट्यांना ही महान सत्ये उमगत नाहीत? का ते हेतूपुरस्सर त्याकडे दुर्लक्ष करतात? आपल्या उज्ज्वल परंपरेचा वारसा नाकारतात?

खरे तर कोणत्याही सत्याच्या बाबतीत हा प्रश्न येतच नाही. सत्य तेच असते जे तपासाला सदैव तयार असते. तपासात जे टिकते ते मानावेच लागते व जे टिकत नाही ते टाकावे लागते. किरलियन फोटोग्राफीच्या तंत्राची अशी तपासणी शास्त्रज्ञांनी कधीच केली आहे. त्यामध्ये काय आढळले?

किरलियन फोटोग्राफीमुळे दिसणाऱ्या वलयाचा माणसाच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीशी काहीही संबंध नाही असे आर्लीन वॅटकिन्स व विल्येम बिकेल यांनी प्रयोगाद्वारे दाखवून दिले आहे. त्यांच्या प्रयोगावरून ही फोटोग्राफी ही १००% सत्य असणारी एक साधी नैसर्गिक घटना आहे हे समजून येते. उच्च दाबाचा विद्युतभार बाहेर फेकला गेल्यामुळे पदार्थाभोवतीच्या वायूमध्ये ऊर्जेचे एक मंडल तयार होते. त्याचे दृश्य स्वरूप अथवा फोटोग्राफीने मिळालेली प्रतिमा म्हणजेच किरलियन वलय होय. त्यासाठी एखाद्या विशिष्ट वायूचीच गरज आहे असे नसून

केवळ हवेमध्येही असे वलय निर्माण होते. वलयाचा रंग हा हवेतील घटक, हवेचा दाब, ज्या पदार्थाचा फोटोग्राफ घेतला जातो त्याची शुद्धता, विद्युतदाब आणि विद्युतप्रवाह यावर अवलंबून असतो. योग्य त्या प्रकारे प्रयोगाची मांडणी करून, फोटोग्राफिक कागदावर एखादा पदार्थ ठेवून त्यामधून उच्च विद्युतदाब (१५,००० ते ६०,००० व्होल्ट) आणि उच्च कंपने निर्माण केली असता पदार्थाच्या सभोवताली एक प्रकाशीय मंडल उत्सर्जित होते. आपल्या डोळ्यांना ते अस्पष्ट असे जांभळट, निळसर प्रकाशीय वलयांच्या रूपात दिसते. उच्च विद्युतदाब सोडला असता, हवेतील कण विद्युतजागृत होऊन उद्दीपित होतात व त्यामधून प्रकाश बाहेर फेकला जातो. उद्दीपित वायूमधून उत्सर्जित झालेले किरण निघतात याचा अभ्यास वर्णपट दर्शकांनी (Spectro Scopist) फार पूर्वीपासून केलेला आहे.

फोटोफिल्म किती वेळ प्रकाशित केली जाते, विद्युतदाब, फोटो फिल्मचा प्रकार, पदार्थावरील दाब, पदार्थाचा दमटपणा, फोटोफिल्मवर प्रक्रिया करण्यासाठी लागणारा वेळ आणि पदार्थाची औष्णिक वाहकता यावर वलयाचा आकार, रूप, तीव्रता, रचना इ. अवलंबून असतात. यामुळे किरलियन वलय हे प्राणी आणि वनस्पतींची 'लाइफ एनर्जी', 'बायोप्लाझ्मिक एनर्जी', 'प्राणमय कोश', 'लाइफ कोर्स' अशा शब्दांशी जोडणे बरोबर नाही. त्याचप्रमाणे या वलयाचा आकार, रूप, तीव्रता, रचना ही व्यक्तीचे आरोग्य, भावना, मानसिक स्थिती, मानसिक शक्ती यावर अवलंबून असते असे जर कोणी म्हणेल तर त्याला वैज्ञानिक आधार नाही. ही वलये माणसाची कोणतीही माहिती सांगत नाहीत. शास्त्रज्ञांनी अन्य वस्तूंचे फोटोग्राफ्स या पद्धतीने घेऊन दाखविले आहेत– नाणे, तार, पाण्याचा थेंब, दातेरी चक्र, धातूच्या लहान चकत्या, पेपर क्लिप, पितळी दातेरी चक्र वगैरे. जर वलय सजीव वस्तूची 'फोटो एनर्जी' किंवा 'बायोप्लाझम' दाखवत असेल तर ते यांत्रिक वस्तूभोवती देखील कसे आले? किरलियन वलय हे सजीवाप्रमाणेच मृत, तसेच निर्जीव वस्तूंभोवतीदेखील दिसते, त्यामुळे त्याच्याशी बायोप्लाझमचा संबंध जोडता येणार नाही.

किरलियन वलय हे वस्तुत: पदार्थाची औष्णिक वाहकता आणि उष्णतावाहक पृष्ठभागाची संरचना या दोन बाबींवर विशेष अवलंबून असते. त्यामुळे जेथे या दोन बाबींचा संबंध येतो तेथेच फक्त ही पद्धत उपयोगी पडेल; अन्यत्र नाही. एखाद्या खडकाचा पृष्ठभाग पॉलिश करून गुळगुळीत केला आणि त्याचा फोटोग्राफ काढला तर त्यातील उष्णतावाहक खनिजे व उष्णतारोधक खनिजे यांची वलये वेगवेगळी घेऊन निरनिराळ्या खनिज कणांच्या सीमा आपण निश्चित करू शकू. खडकात कोणत्या कोणत्या प्रकारची खनिजे किती प्रमाणात आहेत हे आपल्याला सांगता येईल.

किरलियन फोटोग्राफीचे तंत्र फारसे अवघड नाही. त्याचप्रमाणे हे तंत्र वापरून येणारे फोटोग्राफ्स वरवर पाहता गूढ वाटतात. त्यामुळे विज्ञानापलीकडे 'काहीतरी'

आहे अशी ज्यांची धारणा असते त्यांना त्याचे आकर्षण वाटते. विज्ञानाचा आधार घेऊन परंपरागत गैरसमजुती व अंधश्रद्धा दूर करता येतात पण विज्ञानाचा आणि वैज्ञानिक परिभाषेचा खोटा आधार घेऊन असे गैरसमज कोणाकडून पसरविले जात असतील तर?

प्राणशक्तीचे छायाचित्रण करण्याचा शोध खरेच उपलब्ध असता तर या महाभागांचे छायाचित्रण प्रथम घेऊन त्यांचा खोटेपणा वेशीवर टांगला असता.

♦♦♦

येशूचे कफन

हजरतबाल दर्ग्यात अतिरेकी घुसले. भारतीय लष्कराने आपला वेढा दर्ग्याभोवती पक्का आवळला. साऱ्या भारतभरच नव्हे तर अनेक इस्लामी राष्ट्रातही भीतीची लहर लोकमानसात दौडत गेली.

एवढे चिंताक्रांत होण्याचे काय कारण?

मशीद असो वा मंदिर, गुरूद्वारा असो वा चर्च जेथे कुठे राष्ट्रविघातक कारवायांचे अड्डे चालतात त्यांचा समूळ नायनाट करायलाच हवा.

धर्मपालनाचे घटनात्मक स्वातंत्र्य त्याच्या बिलकूल आड येत नाही. राष्ट्राची एकात्मता आणि प्रार्थनास्थळाचे स्वातंत्र्य यांचा टकराव आला तर निवड कशाची करायची याचा आदेश संविधानातही अगदी स्पष्ट आहे.

पण हजरतबालचा मामला वेगळा होता. तो काही असंख्य दर्ग्यांपैकी एक असा दर्गा नव्हता. त्याला विलक्षण पावित्र्य होते. आंतरराष्ट्रीय महत्त्व होते. कारण...? कारण अल्लाचे शेवटचे प्रेषित असलेल्या पैगंबरसाहेबांचा पवित्र केस त्या वास्तूत मौजूद होता.

हा केस पैगबरांचाच कसा? तो कोठून आला? हे खरे का मानायचे? तपासणी करून शोध घेतला तर? सत्य लोकांसमोर मांडले तर?

तोबा. तोबा.

असा विचार करणेही महापाप आहे. मग कृतीने तर जगभर आगडोंब उसळू शकेल. तेव्हा निमूटपणे मानायचे. घडेल ते सोसायचे.

खबरदार केसाला (जरी) धक्का लागला तर.

आणि ही मक्तेदारी काही एका धर्माचीच नाही.

ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीला कसलाही धोका न पोचवता त्यांच्या अंतरंगाचा

वेध घेण्याच्या शास्त्रीय कल्पनेलाही त्यांच्या निष्ठावान अनुयायांनीही अलीकडे असाच कडाडून विरोध केला होता.

ख्रिश्चन धर्माचे अनुयायी तर साऱ्या जगभर पसरलेले. येशू ख्रिस्तावर अमाप श्रद्धा ठेवून जगणारे. मात्र अगदी अलीकडेच त्यांच्या सर्वोच्च धर्मगुरूंनी त्यांना मर्माघाती बसावे असे संशोधन केले, निखळ सत्य शोधण्यासाठी. आणि ते होते आकाशातल्या बापाने मानवाच्या उद्धारासाठी आपला जो एकुलता एक पुत्र भूतलावर पाठवला अशी जगभरच्या ख्रिश्चनांची श्रद्धा आहे त्याच्या पवित्र प्रेतवस्त्राचे.

मार्क आणि लूक या नव्या कराराच्या लेखकांनी नमूद केले आहे की, प्रभू येशू ख्रिस्ताचा मृतदेह योसेफ अरिमथिकर या गृहस्थाने पिलाताच्या संमतीने क्रुसावरून उतरवला, आणि कपड्यात गुंडाळून तो कबरेमध्ये ठेवला. संध्याकाळ झाल्यावर येशूचा एक अनुयायी अरिमथाई या गावाचा योसेफ नावाचा एक श्रीमंत मनुष्य पिलाताकडे गेला आणि येशूचे शरीर आपल्या ताब्यात द्यावे अशी विनंती त्याने पिलाताला केली. पिलाताने येशूचे शरीर त्याच्या ताब्यात देण्याची आज्ञा दिली. योसेफाने येशूचे शरीर घेतले. एका स्वच्छ 'तागाच्या वस्त्राने' गुंडाळले आणि खडकात खोदलेल्या आपल्या मालकीच्या एका नव्या कबरीमध्ये ते ठेवले. कबरीच्या दाराशी त्याने एक मोठी शिळा लोटून ठेवली. नंतर तो तेथून निघून गेला.

इटलीतील तुरीन शहरी सेंट जॉन बॅप्टिस्ट चर्चमध्ये पवित्रवेदीच्या वरती एक पोलादी शोकेस ठेवली आहे. तिची काच बुलेटप्रुफ असून त्यामध्ये निष्क्रीय अशा नायट्रोजन वायूच्या वातावरणात एक प्रेतवस्त्र ठेवण्यात आले आहे. हेच ते येशूच्या मृत शरीराभोवती योसेफाने गुंडाळलेले तागाचे वस्त्र. १४ फूट ६ इंच लांबीचे, चार फूट रुंदीचे. इंग्रजीत त्याला श्राऊड म्हणतात. अळशीच्या तंतूपासून बनवलेले धागे व कापसाचे धागे यापासून बनवलेले हे मिश्रवस्त्र आहे. त्यातील कापसाचे तंतू हे मध्यपूर्व आशियात पिकणाऱ्या एका कापसाच्या जातीचे आहेत. बदलत्या राजसत्ता आणि सतत होणारी युद्धे यामुळे या पवित्र वस्त्राचा अनेक शहरात मुक्काम झाला. शेवटी ते तुरीनच्या भव्य चर्चमधील कडीकुलपात बंदिस्त झाले. सुमारे चारशे वर्षांपासून ते प्रेतवस्त्र तुरीन येथे सांभाळून ठेवण्यात आले आहे. ते येशू ख्रिस्ताचेच आहे अशी ख्रिश्चनभाविकांची नितांत श्रद्धा आहे. १९७८ साली ते दर्शनासाठी ठेवले होते. तेव्हा जगातील ३० लाख भाविकांनी तुरीनला गर्दी केली होती.

१८९८ साली पिआ नावाच्या नवशिक्या फोटोग्राफरने या वस्त्राचे फोटो घेतले तेव्हा त्याला म्हणे एखाद्या फोटोग्राफिक फिल्मसारखे गुणधर्म या वस्त्रात आढळले. त्याच्या फोटोच्या निगेटिव्हमध्ये एक अतिसूक्ष्म बारकावे दाखवणारी पॉझिटिव्ह प्रतिमा स्पष्ट दिसत होती. छायाचित्र डेव्हलप केल्यावर ती प्रतिमा ख्रिस्ताचीच उमटली आहे हे पाहिल्यावर तो चकित झाला, आणि बाकीची ख्रिस्ती जनता स्तंभित झाली.

या फोटोनुसार या प्रेतावस्त्रावर साधारण ५ फूट ११ इंच उंचीची एक पुरुषी

प्रतिमा आहे. त्या प्रतिमेची दाढी व लांब केस हे बायबलकालीन ज्यू पुरुषाप्रमाणे आहेत. त्या प्रतिमेचे खांदे जड ओझ्यामुळे खोल गेलेले वाटतात. (क्रूसावर खिळण्याअगोदर येशू ख्रिस्ताने क्रूसाचे जड ओझे खांद्यावर वाहिले होते.) प्रतिमेतील हातापायांच्या तळव्यांना भोके आढळतात. (ख्रिस्ताच्या हातापायांना क्रूसावर खिळे ठोकण्यात आले होते.) प्रतिमेतील मानवाकृतीच्या छातीतील पाचव्या सहाव्या बरगडीत तिरपा खळगा आढळतो. (क्रूसावर अडकविल्यानंतर ख्रिस्ताच्या छातीत एका ज्यू सैनिकाने भाला खुपसला होता.)

आधीचे येशूचे कफन त्यात हा चमत्कार. मग तर्काला आणखी उधाण आले. गुन्हेविषयक तज्ज्ञ मॅक्स फ्रे यांनी नऊ वर्षे प्रेतवस्त्राचा सूक्ष्म अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की प्रेतवस्त्रातील धुळीत सापडणारे परागकण हे पॅलेस्टाईन मृत समुद्राच्या आसपास सापडणाऱ्या परागकणांशी मिळतेजुळते आहेत. त्यांनी ते वस्त्र दोन हजार वर्षांइतके जुने असून ते ख्रिस्ताच्या काळातील आहे असा निर्वाळा दिला. रे रॉजर्ससारख्या अमेरिकन थर्मल केमिस्टच्या मते ही प्रतिमा अचानक उद्‌भवलेल्या प्रकाशामुळे निर्माण झाली असावी. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या पारंपरिक चित्रात प्रकाशाच्या झोतात थडग्यातून उठणारा तेजोमय ख्रिस्त आपणास दिसतो. स्वाभाविकच त्या वेळी अचानक निर्माण झालेल्या प्रकाशामुळे कफनवस्त्रावर ख्रिस्ताची प्रतिमा निर्माण होणे हे तर्कसुसंगत बनते.

अन्य काही अमेरिकन तज्ज्ञांनी प्रतिमेचे विश्लेषण केले आणि या वस्त्राखाली एखादे शरीर झाकले गेले असावे व त्यामुळे ही प्रतिमा असावी असा निष्कर्ष काढला.

ब्रिटनमधील फ्लॅक वस्त्रोद्योग तज्ज्ञ डब्ल्यू. बी. बेस्ट–जॉर्डन यांनी असा युक्तिवाद केला की प्रस्तुत प्रतिमा ही संपर्क छाया (कॉन्टॅक्ट-इमेज) असावी. तंतूपासून वस्त्र तयार होईपर्यंत त्यावर अनेक तांत्रिक व रासायनिक प्रक्रिया करण्यात येतात. त्यामुळे तंतूमधील रासायनिक घटकांत कमी-अधिक प्रमाणात बदल घडून येतात ही तंतूच्या रासायनिक घटकांची बदललेली सगळीच स्वरूपे शास्त्रज्ञांना ज्ञात असतात असे नाही. त्यातील काही रसायने वैशिष्ट्यपूर्ण असतात व ती अजूनही अज्ञात आहेत. कारण सदर घटकयुक्त वस्त्रांना कशाचा तरी संपर्क झाला की त्यावर लगेच काही बदल झालेला आढळत नाही. पण कालांतराने दमट हवेच्या सान्निध्यात स्पर्श झालेल्या वस्तूची प्रतिमा जशीच्या-तशी कपड्यावर उमटलेली आढळते. जॉर्डन महाशयांनी वापरलेल्या असंख्य वस्तूंवर याबाबत प्रयोग करूनच प्रस्तुत निष्कर्ष काढला आहे.

तुरीनचे प्रेतवस्त्र या आपल्या पुस्तकात ब्रिटनचे ख्यातनाम पत्रकार–इतिहासकार आयन विल्सन यांनी इ. स. ५० पासूनच्या या प्रेतवस्त्राच्या इतिहासाचा ऊहापोह केला आहे. प्रारंभी ही प्रतिमा म्हणजे एखाद्या मध्ययुगीन चित्रकाराची कृती होय असे मानले गेले परंतु शास्त्रीय विश्लेषणातील या प्रतिमेत रंगाचा सूक्ष्म कणदेखील

आढळला नाही. ती प्रतिमा ख्रिस्ताच्या जखमांतून वाहिलेल्या रक्ताच्या डागामुळे उमटली असे काहींचे मत होते. वस्त्राच्या शास्त्रीय तपासणीत रक्त खुणांची शाश्वती मिळते की नाही याबाबत मतभेद झाले. ज्यांना रक्ताच्या डागांचे चिन्ह आढळले असे वाटले त्यांनी तर हे ख्रिस्ताचेच कफन वस्त्र असावे यावर शिक्कामोर्तब केले. किंबहुना ख्रिस्ताचे पुनरुत्थान झाले (म्हणजे कबरीमधील प्रेतवस्त्रात गुंडाळलेल्या स्वत:च्या मृतदेहातून उठून तो बाहेर आला.) त्याचा हे वस्त्र म्हणजे असंख्य भाविकांना पुरावाच वाटत होता.

व्हॅटिकनच्या कोणत्याही पोपने या कफनाच्या अधिकृततेसंबंधी काहीही विधान केलेले नाही परंतु 'ते ख्रिस्ताचे नाहीच' असा निर्णायक पुरावा हाती न आल्याने ते अनधिकृत आहे असेही सांगितले नाही.

वैज्ञानिक हे कोडे उलगडण्यासाठी पुढे सरसावले होतेच. १९७८ साली तुरीनचे कार्डिनल बालेस्तेरो यांनी 'बॅटरी चाचणीला' संमती दिली. शास्त्रज्ञांना खरे तर कार्बन चाचणी करावयाची होती. परंतु त्यासाठी वस्त्राचा फार मोठा भाग कापून घ्यावा लागणार होता. हे वस्त्र ख्रिस्ताचे दफन वस्त्रच असावे ही समजूत बहुसंख्यांकांची अगदी पक्की होती म्हणून कार्डिनल तयार झाले नाहीत. खरे तर या शतकाच्या प्रारंभी (१९०३) फादर हर्बट यर्स्टन या धर्मगुरूने या 'श्राऊड'चा अभ्यास चालू केला. त्यांना मिळालेली माहिती धक्कादायक होती. ती अशी, इ. स. १३८९ साली ट्रायचे बिशप पिए डर्चिस यांनी पोप सातवे क्लेमेंट यांना एक खलिता पाठवला होता. त्यात म्हटले होते, 'खूप श्रम घेऊन आणि निकष लावून पॉर्थियरचे बिशप हेन्री यांनी प्रेतवस्त्रामागची बनवाबनवी शोधून काढली आहे. हे चित्र आपण रंगविले असून त्यात चमत्कारिक असे काही नाही अशी कबुली एका कलाकाराने दिली आहे.' कॅथरीन एमेरिश या धार्मिक प्रवृत्तीच्या बाईला एक दृष्टांत झाला होता. तिने वर्णन केल्याप्रमाणे चित्रकाराने अरब किंवा यहुदी दिसणाऱ्या व्यक्तीचे चित्र रंगविले. लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन पैसे उकळण्याचा तो एक प्रकार होता.

मात्र या सत्यकथन करणाऱ्या फादर थर्स्टन यांच्या लिखाणाचा काहीही परिणाम लोकांच्यावर झाला नाही. ते ख्रिस्ताचेच कफन असावे ही श्रद्धा लोकमानसात इतकी रुजली होती की या लिखाणाकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले. चर्चला फार मोठा आर्थिक लाभ होत होता म्हणून धर्माधिकाऱ्यांनीही त्याकडे कानाडोळा केला.

हा सगळा इतिहास लक्षात घेऊनही व्हॅटिकनचे पुरोगामी पोप दुसरे जॉन पॉल यांनी या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरवले. कार्बन १४ ही कालगणनेची नवी पद्धत अस्तित्वात आल्याने चाचणीसाठी वस्त्राचा नाममात्र तुकडा पुरेसा ठरणार होता. त्यामुळे तपासणी अधिक सोपी झाली. १४।। फूट लांबीच्या मूळ वस्त्राच्या खालच्या डाव्या बाजूचा सोडतीन×अर्धा इंच इतका छोटा तुकडा या चाचणीसाठी कापण्यात आला. नंतर त्याचे दोन तुकडे करण्यात आले. त्या प्रत्येकी अर्ध्या तुकड्याचे पोस्टाच्या तिकिटाच्या आकारचे तीन तुकडे करण्यात आले. ब्रिटिश

म्युझियमचे संशोधन प्रमुख डॉ. मायकेल टाईट आणि कार्डिनल बालेस्तेरो यांच्या उपस्थितीत तीन छोट्या कुप्यांत ते अवशेष सीलबंद करण्यात आले व त्यांना कोड नंबर्स देण्यात आले. तसेच पहिल्या शतकातील आणि मध्ययुगातील अवशेषांचे तुकडे असलेल्या दुसऱ्या कुप्या तयार करण्यात आल्या व त्यांनाही सांकेतिक क्रमांक दिले गेले. सर्व नमुने तपासणीसाठी आरिझोना (अमेरिका) झुरिक (स्वित्झरलंड) आणि ऑक्सफर्ड (इंग्लंड) येथील नामवंत प्रयोगशाळांकडे पाठवण्यात आले. शास्त्रज्ञांनी रासायनिक पद्धतीने नमुने धुवून स्वच्छ केले आणि कार्बन १४चे निकष तुकड्यांना लावण्यात आले. तिन्ही प्रयोगशाळांनी स्वतंत्रपणे अहवाल दिले की, इ. स. १००० ते १५०० या कालावधीतील ते प्रेतवस्त्र आहे. स्वाभाविकच ख्रिस्ताच्या नंतर किमान हजार वर्षांनी ज्या वस्त्राची निर्मिती झाली ते वस्त्र ख्रिस्ताचे दफन वस्त्र असणे सर्वस्वी अशक्यच होते.

पोप दुसरे जॉन पॉल यांनी तुरीनच्या कार्डिनलला आदेश दिला आणि ही बातमी जगजाहीर झाली.

एक गूढ कायमचे सुटले असे मानून वैज्ञानिक दृष्टीच्या धर्माधिकाऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला परंतु अनेक श्रद्धाळू भाविकांना हा निर्णय आवडला नाही. अनेक युक्तिवाद केले गेले.

प्रेतवस्त्रावर बेस्ट सेलर लिहिणारे श्री. आयन विल्सन म्हणाले, १५३२ साली प्रेतवस्त्र आगीत सापडले होते. आग विझवण्यासाठी पाण्याचा मारा वस्त्रावर करण्यात आला होता. त्यामुळे आणि पुनरुत्थित ख्रिस्ताच्या शरीरातून निघालेल्या किरणामुळे (रेडिएशन) कार्बन चाचणीवर विपरीत परिणाम झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. चाचणी करणारे शास्त्रज्ञ पूर्वग्रहदूषित होते; त्याचा परिणाम त्यांच्या अहवालावर झाला असणार असा आणखी एक आक्षेप होता. कार्बन कालगणनेची पद्धती विज्ञानात सर्वमान्य झालेली नाही असेही काही जणांचे आग्रही प्रतिपादन होते.

या सर्वांला ऑक्सफर्डचे कार्बनकालगणनातज्ज्ञ प्रो. हॉल यांनी चोख उत्तर दिले आहे.

त्यांच्या मते १५३२ साली प्रेतवस्त्र आगीत सापडल्यावर जळलेल्या भागावर नव्या कापडाचा तुकडा लावण्यात आला होता याची कल्पना तज्ज्ञांना होती म्हणून तो भाग वगळून जेथे वरपासून खालपर्यंत सलग धागे आहेत त्या भागातील नमुना घेण्यात आला होता. प्रो. हॉल यांनी असेही सांगितले की, ए. एम. एस. (एक्सल रेटेल मास स्पेक्ट्रामेट्री) ही अद्ययावत चाचणी वापरली गेली. या चाचणीसाठी अगदी छोटे नमुने पुरेसे असतात व या चाचण्या आता विश्वासार्ह मानल्या जातात. तेव्हा कार्बनगणनेची पद्धती विज्ञानात सर्वमान्य नाही हे खरे नाही. स्वतःच्या अनुभवावरून त्यांनी असेही सांगितले की त्यांनी आत्तापर्यंत दोन हजार तारखा निश्चित केल्या असून एकाही बाबतीत त्यांची चूक झालेली नाही. १००-२०० वर्षांचा कालावधी मागेपुढे होऊ शकतो. परंतु १००० वर्षांचा कालावधी पुढेमागे होणे अशक्य आहे.

याबरोबरच त्यांनी असेही सांगितले की, चाचणी करणाऱ्यातील अमेरिकेचे शास्त्रज्ञ डोग डोनाहू हे कट्टर कॅथालिक आहेत. हे कफन वस्त्र दोन हजार वर्षांपूर्वीचे व ख्रिस्ताचेच असावे असा त्यांना विश्वास होता. जेव्हा त्यांनी शास्त्रीय चाचणीचा निष्कर्ष पाहिला तेव्हा त्यांना वाईट वाटले.

थोडक्यात काय? धर्माचे पालन म्हणजे धर्म संस्थापकांच्या कालातीत संदेशाचे पालन. प्रत्यक्ष आचरण हाच धर्म. संतांचे आणि प्रेषितांचे खरेखोटे अवशेष म्हणजे धर्म नव्हे. म्हणूनच धर्मग्रंथांची कठोर चिकित्सा करावयास हवी. धार्मिक वास्तू, वस्तू व त्यांचे अवशेष यांचे कुळ आणि मूळ शोधायला हवे. सत्याच्या कसोटीवर जे टिकेल तेच मानावयास हवे. बाकीच्या सगळ्यांना अंधश्रद्धा म्हणून वगळावयास हवे.

आधुनिक विज्ञानाला सामोरे जाण्यास नकार देणारा तो धर्म कसला, ती तर स्वत:च्या स्वार्थासाठी बहुजनांची केलेली आत्मवंचना.

अशांना विवेकानंदांनी फार छान जमालगोटा देऊन ठेवला आहे.

स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे—

'प्रत्येक विज्ञानशाखा ही ज्याप्रमाणे तर्कबुद्धीच्या साहाय्याने स्वत:चे अस्तित्व प्रस्थापित करते त्याप्रमाणेच धर्मानेही तर्कबुद्धीचा आधार घ्यावा काय? विज्ञान आणि बाह्य सृष्टी यांचा शोध घेण्यासाठी जी साधने आणि ज्या पद्धती उपयोगात आणल्या जातात त्याच धर्मशास्त्राला लागू कराव्यात काय? यावर माझे उत्तर आहे की, होय. हे जेवढ्या लौकर घडेल तेवढे बरे. जर असे केल्याने तो धर्म कोसळून पडणार असेल तर तो धर्म नसून एक निरर्थक, निरुपयोगी अंधश्रद्धा होती असे मानावे लागेल. अशी अंधश्रद्धा कोसळून पडणे ही सर्वोत्तम गोष्ट आहे याबद्दल मला काडीइतकी शंका नाही. सगळे बांडगूळ काढून टाकले पाहिजे आणि धर्माचे खरे सत्त्व या शोध प्रक्रियेत तावून, सुलाखून, उजळून निघाले पाहिजे. पदार्थविज्ञान किंवा रसायन यांच्याइतकीच शास्त्रीयता धर्माबाबत आली पाहिजे. त्यामुळे तो अधिक सामर्थ्यशाली ठरेल.'

♦♦♦

एक तांदूळ पुढे एक गहू मागे

चवदार तळ्यावर समता संगर घडलं त्याला आता पासष्ट वर्षे होऊन गेली. पाणी पिण्याचा माणुसकीचा हक्क बाबासाहेब आंबेडकरांनी बजावला आणि संघर्षाला तोंड फुटले. सनातन्यांचे पित्त खवळले. त्यांनी काय करावे? तांब्याच्या एकशे आठ कलशांतून तळ्याचे पाणी भरून आणले. बाट लागलेले ते पाणी शुद्ध करण्यासाठी त्यात पंचगव्य मिसळले. पंचगव्य म्हणजे गायीपासून मिळणारे पाच पदार्थ. दूध, गोमूत्र, शेण वगैरे. शेण कालवल्याने आणि गोमूत्र मिसळल्याने शुद्ध झालेले ते कलशातील पाणी समारंभपूर्वक तळ्यात टाकण्यात आले. आणि ते 'चवदार' तळे पुन्हा पवित्र झाले.

जात ही फार जहरी अंधश्रद्धा होती यात शंकाच नाही. केवळ कोणी एक जण एका विशिष्ट जाती, गोत्रातील म्हणून इतका पवित्र की त्याचे पाय धुतलेले पाणी तीर्थ होते आणि दुसरा कितीही प्रज्ञावंत असला तरी त्याच्या जातीमुळे त्याच्या स्पर्शाचा विटाळ होतो, याला अमानुषतेपलीकडे दुसरा शब्द नाही. जात या व्यवस्थेला इतक्या मजबूत हितसंबंधाचे स्वरूप प्राप्त झाले आहे की, ती अंधश्रद्धा आहे हेच आपण विसरून गेलो.

हा अन्याय पुढे संविधानाच्या पुस्तकातल्या पानावर फर्मान काढून आपण मिटवला खरा. पण जनमानसाच्या मनामनाच्या पानावर उमटलेले त्याचे गडद ठसे पुसून काढण्याचे श्रम मात्र फारसे घेतले गेले नाहीत. पवित्र-अपवित्र, स्पर्श-अस्पर्श, शुभ-अशुभ या कल्पना कायमच राहिल्या. काही विपरीत घडले की मने ठोठावू लागली, 'अरे काही विटाळ चांडाळ तर नाही ना घडला ज्यामुळे असे विपरीत घडावे?' ही भावना एवढी बलवत्तर की विज्ञानाचे मजबूत गडकोट देखील तिने सहज उद्ध्वस्त केले. याचे दर्शन इतक्या प्रदीर्घ काळानंतर त्याच रायगड जिल्ह्यात परवा-परवा घडले.

जिल्ह्यात नागोठणे येथे आय. पी. सी. डब्ल्यू गॅस प्रकल्प अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उभा आहे. जगभर मोठ्या प्रकल्पात जसे अपघात घडतात, तसाच एक मोठा स्फोट अगदी अलीकडे नागोठण्याला घडला. कर्मचाऱ्यांची, ते हाताळतात त्या यंत्रांची, आजूबाजूच्या वातावरणाची, कसून चौकशी आणि घडलेल्या चुका टाळण्यासाठी नवी सक्षम वैज्ञानिक आखणी हा खरेतर यावरचा उपाय. त्याची सुरवात झाली पण त्याबरोबरच एक अफलातून शक्कल व्यवस्थापकाच्या मेंदूतून निघाली. ती म्हणजे पुढील काळात असे अपघात टाळण्यासाठी जागेची शांती करून सुदर्शन व मृत्युंजय यज्ञ सोहळा भव्यपणे पार पाडण्याची.

लाखो रुपये खर्चाच्या या यज्ञाचे यजमान होते आय. पी. सी. डब्ल्यू चे चेअरमन हसमुख शहा, श्री. व सौ. पद्मनाभन, कृष्णन. ही अति उच्चपदस्थ मंडळी सोहळ्यात

पूजा करीत होती. भव्य सुशोभित मांडव होता. दिवसभर भजन, कीर्तने चालू होती. यज्ञाचे पौरोहित्य पालीचे प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न श्री. सुहास गद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. अकरा ब्राह्मणांचा संघ मदतीस होता. प्रसादासाठी हजारो लाडू मागविण्यात आले होते.

एकूण पंचवीस धार्मिक विधी उरकण्यात आले. त्यापैकी काही असे : स्थळशुद्धी, आत्मशुद्धी, मधसंकल्प, अग्निस्थापना, नवग्रह स्थापना, स्थंडीलकर्म, नवग्रहहोम, प्रायश्चित्त आहुती, बलिदान, सत्यनारायणाची पूजा, पूर्णाहुती, मंत्राक्षता, महाप्रसाद.

यज्ञासाठी अनेक डबे गायींचे तूप, श्रीखंड मुंबईहून मागविले होते ते वेगळेच. या सगळ्याचा अर्थ काय?

चवदार तळ्याची सनातन्यांची पंचगव्य शुद्धी आणि इथली स्थळशुद्धी या मागची मानसिकता एकच की नाही? ती हीच की विटाळ-चांडाळ, शुद्ध-अशुद्ध काही व्यक्तीत असतो तसाच जागेतही. त्या अशुद्ध छायेपासून दूर राहण्यासाठी स्थळाची शुद्धी करावी. त्यासाठी अस्तित्वात नसलेल्या नवग्रहांची स्थापना करावी. विज्ञानाचे प्राथमिक ज्ञान ज्यांना मोडीत काढते त्या राहू केतू प्रधान नवग्रहांच्या शांतीसाठी होम करावा. काही गूढ शक्ती असतात. त्यांच्या कोपाने अरिष्ट येते, यज्ञाने ते टाळताही येते असे मानावे. ब्राह्मण देवाचे लाडके म्हणून त्यांनीच यज्ञ करावयास हवा. त्यासाठी ब्रह्मवृंदांना आमंत्रित करावयास हवे. पुन्हा हे सामर्थ्य अपौरुषेय वेदातच म्हणून ते सर्व वेदशास्त्रपरायण शास्त्री हवेत.

वरील सगळी गृहीते प्रमाण मानून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रकल्पाच्या सर्वोच्च अधिकाऱ्याने सोवळ्याने पूजापाठ उरकावेत? लोकांना बघायला मुश्कील झालेले शुद्ध तूप डब्यांनी जाळावे?

या आक्षेपावर अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण असे की यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनाला आधार मिळेल. त्यांचे धैर्य वाढेल. माणसाला अज्ञाताच्या हातातील बाहुले बनवून निर्भय बनविण्याचा हा मार्ग अजबच म्हणायचा.

आणखी एक खास कावा आला का तुमच्या लक्षात? पुन्हा जर अपघात झाला तर दोष झटकून टाकण्याची खास सोय. पूर्वीचा यज्ञ चुकला वा कमी पडला, तर तंत्रज्ञांना वा यंत्राला दोष देण्याचे नावच नको. काशीहून पंडित बोलावून यज्ञाची सुधारून वाढवलेली महामृत्युंजय आवृत्ती काढायची. तूप बॅरलने मागवायचे.

नदीकाळच्या शंकराच्या देवळासमोरच्या नंदीची गोष्ट माझी आई मला सांगायची. तो नंदी म्हणे पुढे-पुढे सरकायचा. असा तो नदीच्या पाण्यात गेला की सत्ययुग येणार ही लोकांची श्रद्धा. अडचण एवढीच की तो दरवर्षी एक तांदूळ पुढे जातो व एक गहू मागे येतो.

चवदार तळे ते नागोठणे हा पासष्ट वर्षांचा प्रवास आपल्या देशातील अंधश्रद्धा जाण्याची, विज्ञानयुग येण्याची हीच गती दाखवीत नाही का? तुम्हाला काय वाटतं?

♦♦♦

भुकेला कावळा पिंडाला शिवणारच!

मुंबई दूरदर्शन केंद्रात विजया जोगळेकर धुमाळेंच्याबरोबर गप्पा मारत होतो. एक प्रतिष्ठित व्यक्ती आली. विजयाबाईंनी ओळख करून दिली, नाव सांगताच ते म्हणाले,

'परवाच तुमचा विषय निघाला होता.'

मी प्रश्नार्थक नजरेने पाहिले. त्यांनी खुलासा केला.

'अलीकडेच श्मशानात जाण्याचा योग आला. कावळा पिंडाला शिवता शिवेना. लोक म्हणत, 'बोलवा दाभोलकरांना आणि दाखवा जरा.' तब्बल तीन तासांनी सगळ्या आणाभाका झाल्यावर मग कुठे कावळ्याने चोच लावली.'

हिंदू धर्मातील हा दशपिंड विधी. मृताच्या मुलांनी अगर जवळच्या नातलगाने श्मशानभूमीत जाऊन नदीवर अंघोळ करायची. न्हाव्याकडून संपूर्ण केस काढायचे. मग पुरोहित, भटजी सांगेल त्याप्रमाणे विधी करायचा. मेलेल्या माणसांच्या आत्म्याला समाधान मिळावे म्हणून चांगले जेवण करून ते पत्रावळीवर वाढायचे. पानापासून दूर बसायचे आणि कावळ्यांना 'कावकाव' करून हाका मारायच्या. कावळा चटकन पानाला शिवला तर मेलेला माणूस भाग्यवान होता असे मानायचे. बिचारा सगळ्या इच्छा तृप्त होऊन गेला. पण कावळा पत्रावळीकडे फिरकला नाही तर मग मेलेल्या माणसाचा मुलगा, मुलगी, पत्नी यांच्या नावाने गाऱ्हाणे घालायचे. 'आम्ही त्यांचे पालनपोषण चांगले करू. हवं नको ते बघू. काळजी करू नकोस.'

थोडं अधिक लांब जाऊन बसायचं. मग कावळा आला, चोच मारून गेला की, एकमुखी निष्कर्ष काढायचा. 'जीव घुटमळत होता' आणि कावळ्याने अगदी बहिष्कारच टाकला तर मग दर्भाचा कावळा करून विधी आटोपता घ्यायचा.

पूर्ण समाधानी जीवन जगून कोणत्याही अतृप्त इच्छा मागे न ठेवता व्यक्ती निधन पावली तर तिच्या पिंडाला कावळा पटकन शिवतो आणि अपुरी इच्छा वासना मागे रेंगाळत असेल तर तो शिवता शिवत नाही अशी ही अंधश्रद्धा.

पण भल्याभल्यांना ती अंधश्रद्धा आहे हे अजिबात पटत नाही.

एका जिल्ह्याच्या ठिकाणी महाविद्यालयात भाषण करून बाहेर पडलो. प्राचार्य दारापर्यंत पोचवावयास आले. स्वत:हून विषय काढून म्हणाले, 'डॉक्टर, विश्वास नसतो पण अनुभव येतो आणि मानावे लागते. आमच्या घरातली गोष्ट. आमच्या घरातील आजोबांचे निधन झाले. वय खूप झालेले. नैसर्गिकपणे आणि शांतपणे मृत्यू आला. आजोबांची पूजा, जपजाप्य चाले. शिष्य असत. त्यात स्त्रियाही. सोनूबाई नावाची त्यांची शिष्या होती. वृद्ध आणि विधवा. आमच्या गावाकडच्या घरी तिच्यामुळे आजोबा व्यवस्थित राहू शकले. जेवणखाण, घरातील काम सर्व ती करे.

तिला आमच्या नातेवाईकांच्यात मान होता. आजोबा गेले. दहाव्या दिवशी आम्ही सर्व नदीवर गेलो. कावळ्यासाठी पिंड तयार करून ठेवला. आजोबांचे जीवन कीर्तन, पूजन, प्रवचन असे गेल्याने आणि पूर्ण आयुष्य भोगून पिकलेल्या फळाप्रमाणे अलगद मरण आल्याने संसाराबद्दल आसक्ती नव्हतीच. कावळा लगेच शिवणार याबद्दल सर्वांनाच खात्री होती. पण खूप वेळ गेला. शेवटी सर्व जण कंटाळले. यांची इच्छा तरी काय राहणार असेच सर्वांचे मत. त्यामुळे दर्भाचा कावळा करून मार्ग काढायचा ठरले. एवढ्यात धाकटे काका बोलले, 'सोनूबाईंना अंतर देणार नाही गावाकडच्या घरात राहू देऊ.' एवढे बोलण्याचा अवकाश कावळा पटकन शिवला. आता तुम्ही सांगा याचा अर्थ कसा लावायचा? तुमचे विज्ञान हे मानते की, निसर्गात घडणाऱ्या बदलाची जाणीव काही पशुपक्ष्यांना आधीच होते. उदा. भूकंप, वादळ वगैरे. ढिगाऱ्यातील प्रेत माणसाला समजत नाही पण कुत्र्याला त्याचा वास येतोच ना? याचाच अर्थ पशुपक्ष्यांना काही अधिक शक्ती असतात. त्याचा अभ्यास व्हावयास हवा. आपल्या पूर्वजांनी पशुपक्षी यांचा गाढा अभ्यास केला होता. त्यात त्यांना कावळ्याच्या या अद्वितीय शक्तीबद्दल ज्ञान झाले असणार. पूर्वजांनी जेव्हा हा शोध लावला तेव्हा त्यांना कोणाला गंडवायचे नव्हते. तेव्हा त्याचे संशोधन करायला नको काय?'

वरवर पाहता बिनतोड वाटणारा हा युक्तिवाद प्रत्यक्षात किती भुसभुशीत व भ्रामक आहे हे जरा डोळसपणे विचार करायला लागले की लगेच समजते.

प्रथम घटनाक्रम पहा. किती गोष्टी गृहीत धरल्या आहेत? नंबर एक, प्रत्येक व्यक्तीला आत्मा हा असतोच. नंबर दोन, तो आत्मा व्यक्तीच्या निधनानंतर निदान दहा दिवसांपर्यंत तरी आसमंतात तरंगत राहतो. (किंवा स्वर्गातून किंवा नरकातून दहाव्या दिवशी ड्युटीला श्मशानात हजर राहतो) नंबर तीन, हा आत्मा शुद्ध शाकाहारी माणसाचा असला तरी मेलेल्या मासावर मजेत टोचा मारणाऱ्या कावळ्याच्या शरीरात जाण्यास त्याला काही वाटत नाही. (त्या आत्म्याची केवढीही इच्छा असली तरी शाकाहारी कावळा त्याला मिळणे अशक्यच.) नंबर चार, कावळ्याच्या शरीरात शिरलेल्या या आत्म्याला माणसाचा मेंदूही लाभतो. कारण त्याशिवाय माणसाची भाषा त्यातील सर्व आशयासह त्याला कशी समजणार? नंबर पाच, आत्म्याला काय हवे त्याचा इसार श्मशानात दशपिंडीला जमलेल्यांकडून मिळाला की कावळा लगेच कृती करतो आणि त्या निर्णयाला आत्म्याची पसंती जाहीर करतो. नंबर सहा, हे काम झाले रे झाले की बिचारा आत्मा घाईघाईने कावळ्याचा देह सोडतो. कारण कावळे थोडे आणि आत्मे फार असल्याने बाकीचे आत्मे आपला नंबर कधी येतो म्हणून बिचारे रांगेत ताटकळत उभेच असतात. आणि नंबर सात, प्रत्येक जीवमात्रात एकच आत्मा असतो म्हणे परंतु कावळा हा असा अद्‌भुत प्राणी असावा की ज्याच्यामध्ये अधूनमधून एकाच वेळी दोन आत्मे राहतात. एक त्याचा स्वत:चा. दुसरा आणखी कोण्यातरी मानवाचा. खरेतर 'विचार तर कराल' यासाठी याच्यापेक्षा

दुसरे चांगले उदाहरण शोधून सापडणार नाही. जरा डोळसपणे बघितले तर सत्य काय हे सहज समजेल.

मरणारी कोणीही व्यक्ती एक ना अनेक इच्छा मागे ठेवूनच मरते. आपल्या वृद्धापकाळात आपल्या मुलाचे तारुण्य स्वत:साठी मागणारा ययाती हा माणसाच्या अतृप्त वासनांचा प्रतिनिधी आहे. 'राजे गडावर पोहचले आता मी सुखाने प्राण सोडतो' म्हणणारा बाजीप्रभू एखादाच! याचाच अर्थ अपवाद वगळता मृत व्यक्तीच्या पिंडाला कावळा आपोआप शिवताच कामा नये. पण प्रत्यक्षात अनेकांच्या पिंडाला तो पटकन शिवतो.

आमच्या चळवळीतील एका कार्यकर्त्याने मुद्दामहून एक अभ्यास केला. ऐन तारुण्यात अपघातात गेलेल्या व्यक्ती, अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या अंगावर असताना अचानक निधन झालेले लोक अशा लोकांच्या पिंडदानाच्या वेळी कावळा पिंड ठेवल्यावर किती वेळाने शिवतो याची नोंद केली. खरे तर या सगळ्या मृतात्म्यांच्या मागे प्रचंड अतृप्त इच्छांचे मोहोळ होते... परंतु सत्तर टक्क्यांहून अधिक वेळा कावळा पटकन पिंडाला शिवला. सुज्ञांना निष्कर्ष काढण्यास हे सूचक आहे.

सर्वत्र आढळणारा कावळा हा इतर पक्ष्यांपेक्षा धीट आहे. श्मशानभूमीच्या आसपास सरावलेले कावळे असतील तर पिंडाजवळची माणसे आपल्याला हुसकावत नाहीत हे त्यांच्या अनुभवाने लक्षात आलेले असते. त्यामुळे ते लगेच पिंडाला शिवतात. शहरात हा अनुभव येतो. शहराजवळ इतर खाद्यपदार्थांची कमतरता असल्याने अशा परिसरातील कावळे भुकेले असण्याचा संभवही अधिक. त्यामुळेच पिंडाला लवकर शिवणे घडते. मरणाच्या घटना खेड्यात तुलनेने कमी असल्यामुळे कावळे मसणवट्यात तळ ठोकून नसतात. प्रत्येक प्राण्याला जिवाची भीती असतेच. एरवी उष्ट्या हाताने आपल्याला हुसकावणारी माणसे आज पान मांडून आपल्याला बोलावत आहेत यात आपल्या जिवाला काही धोका तर नाही ना? ही साधी प्राथमिक जीवनरक्षणाची प्रेरणा कावळ्याला असणे नैसर्गिक आहे. सराईत नसलेले कावळे पिंडाजवळ येतात. जवळ बसलेल्या माणसांना भिऊन लगेच दूर उडून जातात. कधी-कधी जवळच येत नाहीत. त्याचा अर्थ सोयीस्करीत्या वाटेल तसा लावला जातो. पानापासून माणसे बरीच लांब गेली तरी कावळा अन्नावर एक चोच मारून उडून जातो. निवांतपणे ते खात नाही. कावळ्याने पानाला शिवले की जमलेली माणसे निघून जातात. मगच कावळे पानावर यथेच्छ ताव मारतात. शिवाय खेड्यात कावळ्यांना ज्वारीची कणसे, मक्याची कणसे इ. पदार्थ खायला मिळण्याची शक्यता असते. कावळे भुकेलेले नसतील तर ते पिंडाला शिवण्याची घाई कशाला करतील?

पण या प्रकारावरून मृतात्म्याचे अस्तित्व, त्याची इच्छापूर्ती याचे निष्कर्ष काढण्याची घाई कावळ्याला अजिबातच नसली तरी माणसाला असते. न तपासलेल्या रूढीने कसे अंधळेपण येते याचेच हे उदाहरण :

या साऱ्याबाबत परत-परत तेच-तेच प्रश्न विचारणाऱ्यांना एका कार्यकर्त्याने छान

जबाब दिला होता. तो म्हणाला, 'प्रयोग करू या. जन्मभर शाकाहारी असलेल्या माणसांचे, खमंग मांसाहारी पिंड मांडू या. खरे तर कावळे त्यापासून दूर रहायला हवेत पण खात्री देतो ते भराभरा गोळा होतील.'

असा उलट तपासणीचा मुद्दा झाला की लोक म्हणतात, 'छे भलतेच! तुम्ही मंडळी कशावरच विश्वास न ठेवणारी. काहीतरी असेलच याच्या मागे!'

याच्यामागे काहीतरी आहेच, पण तो आहे वेळेचा अपव्यय! अंधळा समाज आणि अंधश्रद्धेची पायाभरणी.

♦♦♦

अंधळी कोशिंबीर की डोळसपणा?

व्यसनमुक्तीसाठी अथक परिश्रम करणाऱ्या पुण्याच्या 'मुक्तांगण मित्र' संस्थेत कार्यक्रमासाठी गेलो होतो. विषय नेहमीचाच. अंधश्रद्धा निर्मूलनाचा.

दाखल झालेले सर्व जण व्यसनाने पोखरलेले, पीडलेले. त्यांच्या घरादारावरही त्याचे सावट पडलेले. स्वाभाविकच त्यांच्या घराचा पहिला आधार काणी बाबा, बुवा, गुरू, महाराज, दैवी पुरुष.

अनेकांनी आपले अनुभव कथन केले. बाबांच्याकडे गेलो कसे? घरच्यांनी नेले कसे? बाबांनी काय सुचविले? काय सांगितले? अटी काय घातल्या? बाबांकडून पथ्यपाणी कोणते झाले याची वर्णने झाली. बाबाकडे गेल्यानंतर दारू सुटणार यासाठी जाताना शेवटची म्हणून आकंठ कशी प्यालो. बाबांची जिरवण्यासाठी नंतरही कसे पीतच राहिलो. घरच्यांना कळू नये म्हणून धूळफेक कशी केली? नंतर मुक्तांगणला आलो. आता कसे बरे आहोत असा त्यांचा आशय होता. पण एकाने एकदम वेगळाच मुद्दा मांडला. तो म्हणाला, 'तुम्ही म्हणता बाबाकडे जाऊन दारू सुटत नाही. माझ्या माहितीच्या अनेक लोकांची सुटलीय. आणि या व्यसनमुक्ती केंद्राच्या नियमाने फेऱ्या करणारे अनेक बघितलेत. इथे बंद. बाहेर गेले की पुन्हा येरे माझ्या मागल्या, कुणा महाराजांच्याकडे जाऊन तुमच्यापैकी अनेकांची जी गत होते तीच या केंद्रातून घरी गेल्यानंतर अनेकांची होते. मग ती एक बुवाबाजी तर ही पण बुवाबाजीच का नाही? नावे फक्त त्या बुवाबाजीला का ठेवता? ज्याला ज्याचा गुण येईल ते खरं.' त्याच्या अनुभवकथनामुळे प्रमुख पाहुणा म्हणून काय बोलावे हा माझा प्रश्न त्याने सोडवला. मी म्हणालो, 'मुक्तांगण व्यसनमक्ती केंद्र का महाराजांचा कृपाप्रसाद? ज्याच्या त्याच्या नशिबाचा मामला, असा हा प्रश्न नाहीच. मुद्दा आहे

डोळसपणाचा. बाबा, गुरू जे काही करतो, करायला लावतो ते सारे गूढ असते. तो जपजाप्य करतो, करायला लावतो. घरच्यांना उपासतापास करायला लावतो. अंगारे धुपारे असतातच. मंत्र, होमहवन, अनुष्ठाने त्याचे त्याला वावडे नसते. कोणता ग्रह वक्री झाला म्हणून हा व्यसनाचा साडेसातीचा फेरा आला हे सांगून ग्रहाच्या शांतीचा सल्ला दिला जातो; तोडगा सांगितला जातो. कोंबडं, बकरं बळी देण्याने व्यसनाच्या अरिष्टाचे निवारण होईल अशी खात्री मिळते.

माणसे अगतिक असतात. घरातला कर्तासवरता माणूस, होतकरू मुलगा व्यसनापायी बरबाद होताना बघून हादरलेली असतात. जे जे सांगितले जाते ते-ते बिचारे करतात. काही भले घडेल याची आशा धरतात. नाही तसे घडले तर नशिबाला बोल लावतात.

व्यसन म्हणजे काय? माणसाला आपल्या फासात ते कसे आवळते? त्यावर उपाय आहे का? कोणता? तोच का? यापैकी कशाचाही विचार न करता, आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ चालू होतो, चालू राहतो.

मुक्तांगण असो वा अन्य कुठले पण व्यसनमुक्ती केंद्रात जो कुणी जातो त्याला प्रथम याची कल्पना दिली जाते की, दारू, चरस, अफू, गर्द कोणतेही व्यसन हा (जागतिक आरोग्य संघटनेकडून मान्य झालेला) एक आजार आहे. कमकुवत व्यक्तिमत्त्व, स्वभावदोष, आजूबाजूची परिस्थिती या सर्वांतून तो जन्म घेतो. आजारी माणसाला धोपटून वा त्याचा तिटकारा करून उपयोग काय? जवळच्यांनी त्याच्या व्यसनाबद्दल वैताग, संताप, निराशा, उदासीनता बाळगूनही चालत नाही. सुटलेली बाटली पुन्हा सुरू झाली म्हणून चिकाटी सोडण्यात (आणि बाबाचे पाय धरण्यात) अर्थ नसतो. कारणे शोधावी लागतात. दोष हुडकावे लागतात. उपाययोजना बदलावी लागते. व्यसन कसे सुटेल? त्याचे मन कशात गुंतेल? पुन्हा पाय घसरणे कसे टळेल? व्यसनी व्यक्तीचे कौटुंबिक संबंध सुधारण्यासाठी कोणी काय काळजी घ्यावी? त्याचे नोकरी धंद्यात पुनर्वसन कसे करावे? त्याची मानहानी यापुढे कशी थांबवता येईल? त्याला पूर्वीची सामाजिक पत कशी प्राप्त होईल? हे सगळे प्रश्न व्यसनी माणसाच्या मनाशी, जनजीवनाशी, समाजाच्या वास्तवाशी संबंधित असतात. त्याची सोडवणूक कितीही पॉवरफूल बाबा करणे शक्यच नाही. ती त्या व्यक्तीला व तिच्या सुहृदांना नीट व धीटपणे करायला लागते. मुद्दा केवळ उपचारामागील प्रेम, तळमळ वा अगतिकता यांचा नाही. मुद्दा आहे तो उपचार कसे करायचे? डोळसपणाने की अंधळेपणाने? परिस्थितीला तोंड कसे द्यायचे? गूढपणाच्या आहारी जाऊन का कार्यकारणभाव शोधून उपचार करून?

शक्य आहे, प्रयत्न अपुरे पडतील. ते काही प्रसंगी चुकतील देखील. पण म्हणूनच पुढे कधीतरी ते पुरे पडतील. आजच्या चुका दुरुस्त केल्यावर उद्याची उत्तरे बरोबर येतील. तोडगे आणि ताईत यामधून खऱ्या प्रश्नाची सोडवणूक कधी होणारच नाही. नव्हे तिकडे वळण्याने प्रश्न सोडवण्याची दिशाच चुकेल.

गणिताची रीत पूर्णपणे चुकून उत्तरे कधी-कधी अचूक येतात. तसेच टिळा आणि माळा यामुळे कधीतरी होतेही, पण स्वत:ला प्रश्न विचारत प्रत्येकाने खरे उत्तर स्वत:च शोधावयास हवे. व्यसन असो वा अन्य अडचण त्यावर मात करण्याचा खरा मार्ग कोणता? पलायनवादी, शरणागतीचा की डोळस प्रामाणिक प्रयत्नवादाचा?

♦♦♦

राज्यपालांचा अंधविश्वास

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात काही प्रश्न गरागरा फेर धरून सतत नाचत असतात. श्रद्धा व अंधश्रद्धा नेमका फरक विज्ञानवाद्यांनी स्पष्ट करावा. तुमच्या विज्ञानवादाला मर्यादा असतातच की नाही? तुम्ही देव बुडवायले निघालेले आहात? वगैरे. पण या वैचारिक वादविवादांना व्यवहारात रणभूमीचे स्वरूप प्राप्त झाले ते राज्यपालांच्या कृपेमुळे.

पावसाने १९९२ साली महाराष्ट्राला ओढ दिलेली. माणसे सैरभैर. त्यामध्ये राज्यपालांचे आवाहन आले. 'अमुक दिवशी सकाळी ११ वाजता पावसासाठी सर्वांनी प्रार्थना करावी, करुणा भाकावी.'

राज्यपाल बोलल्यामुळे आपोआप फतवे निघाले. कलेक्टरपासून सर्व कर्मचारी आणि शिक्षण संचालकांपासून सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे हात जोडलेले आणि डोळे मिटलेले फोटो वर्तमानपत्रात झळकून गेले. आणि मग धुमश्चक्री चालू झाली आरोप, प्रत्यारोप, खंडन-मंडन यांची; ही भोळसट विचारसरणी की विश्वात्मक देवाची आळवणी याची. दोन उणिवा त्यामध्ये मला जाणवल्या. एक अतिशय महत्त्वाची म्हणजे मूळ प्रश्नातील गाभ्याचा एक भाग हा चर्चेत साफ दुर्लक्षित राहिला; दुसरी म्हणजे चर्चेला एक चटपटीत प्रासंगिकता प्राप्त झाली. खरे तर देशाच्या संविधानाच्या सरनाम्यात वैज्ञानिक प्रसार हे मार्गदर्शक तत्त्व आहे. नव्या शैक्षणिक धोरणात शास्त्रीय जाणीव विकसित करण्याचा आग्रह आहे आणि प्रत्यक्षात देशात मात्र अवैज्ञानिकता आणि अंधश्रद्धा अमाप आहेत. देशात अधिक गंभीरपणे व दीर्घकाळ याबाबतचा ऊहापोह व्हावयास हवा होता. देशासमोरचे अनेक प्रश्न आज बिकट आहेत. तेव्हा पंजाब, आसाम, काश्मीर, भाववाढ, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार या विरोधात प्रार्थनेचे साप्ताहिक वेळापत्रकच जाहीर करावयास काय हरकत आहे? रोज एकासाठी मनोभावे देवाची करुणा भाकायची, असा विचारला गेलेला प्रश्न भल्याभल्यांना रुचला नाही. त्यांच्या श्रद्धेचा त्यांना तो अधिक्षेप वाटला. श्रद्धा

बुडवायला निघाला आहात अशी प्रतिक्रिया आली. स्पष्टीकरण असे दिले गेले की वरील सारे प्रश्न हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हा दैवदुर्विलास आहे; निसर्गनिर्मित आहे. त्यासाठी परमेश्वराची प्रार्थना केली तर बिघडले कुठे?

आपल्या हातात परिस्थिती राहिली नाही म्हणून कुणाला तरी शरण जाणे हा मानवी प्रवृत्तीचा एक स्वाभाविक आविष्कार आहे. परंतु सामाजिक सारासार विवेक सांभाळणे हा देखील मानवी शहाणपणाचा भाग मानावयास हवा व मानला जातो. वर्षभर उनाडक्या करून अभ्यास अजिबात न करता परीक्षेच्या वेळी कितीही मनापासून आळवणी केली तरी ती निष्प्रभ आहेच आणि अयोग्यही, याबाबत एकमत आढळते.

पूज्य विनोबा भावेंचा प्रार्थना क्षेत्रातील अधिकार कोणीही अमान्य करणार नाही. ते सांगत असत, 'अरे, प्रार्थनेलाही मर्यादा असतात. तुम्हांला दिल्लीला जावयाचे आहे. तुम्ही मद्रासच्या गाडीत बसलात आणि संपूर्ण प्रवासात जिवाच्या आकांताने देवा, ही गाडी दिल्लीला जाऊ दे अशी प्रार्थना केलीत तरी त्याचा काय उपयोग?'

प्रार्थनेचे आवाहन करताना राज्यपाल आणि ते पाळणारे सर्व जण नेमका हाच मुद्दा विसरले आहेत (की सोयीस्कर विसरले आहेत?) दुष्काळाची छाया भेडसावू लागली हे खरे पण त्याचे प्रमुख कारण पावसाने दिलेला हिसका हे नाही. महाराष्ट्राने पाण्याचा वापर नियोजनशून्यतेने, अत्यंत अशास्त्रीय पद्धतीने केला आहे. ही आपत्ती, हा दुष्काळ 'अस्मानी' नाही, सुलतानी आहे. आणि स्वाभाविकच त्यावर प्रार्थना हा उपाय नाहीच नाही.

प्रथमत: हे नीट ध्यानात घ्यावयास हवे की दुष्काळ म्हणजे पिण्यासाठी व पिकासाठी पाण्याचा अभाव. कमी व जास्त पावसाशी त्यांचा संबंध आपण समजतो तसा सरळ-सरळ प्रस्थापित होत नाही. नाही तर या आधीची तिन्ही वर्षे पावसासाठी चांगली जाऊनही मराठवाडा, विदर्भात असा दुष्काळ का पडला?

अगदी ठळक आकडेवारी पाहता येईल.

महाराष्ट्राचे सरासरी पर्जन्यमान १२०० मि.मि. (४८") असून पाण्याचे नीट नियोजन केले तर दुष्काळ निर्मूलन शक्य आहे. स्थलकालदृष्ट्या पर्जन्यमानात मोठी तफावत असली तरी केवळ ४०२ ते ५०० मि.मि. पाऊस पडला तरी आपल्याला दोन नाहीत तर एका पिकाची, वैरणीची व पिण्याच्या पाण्याची हमी नक्की देता येईल. हे जगात, देशात व महाराष्ट्रात सिद्ध झाले आहे. 'अवर्षण' ही बाब नैसर्गिक असली तरी दुष्काळ मनुष्यनिर्मित बाब होय, किंबहुना नियोजनाचे अपयश आणि शासनाच्या नाकर्तेपणाचे हे द्योतक आहे. ४०० ते ५०० मि.मि. इतक्या कमी आणि अनिश्चित अशा पावसाच्या पाण्यापैकी २०% पाणी व्यवस्थित मुरवले व जिरवले तर दुष्काळी भागात देखील निम्म्या लागवड क्षेत्राला 'संरक्षित सिंचना'च्या सोयी उपलब्ध करून देता येतात. वास्तविक महाराष्ट्राच्या ३०३ तालुक्यांपैकी २०० हून अधिक तालुक्यांत ७५० मि.मि. पेक्षा अधिक तर त्यापैकी १०० तालुक्यांत १२५० मि.मि. पेक्षा अधिक पर्जन्यमान होते. तात्पर्य, महाराष्ट्रातील

उपलब्ध होणाऱ्या पाण्याची योग्य प्रकारे साठवण केली तर दुष्काळाचे कायमरूपी निर्मूलन केले जाऊ शकते. परंतु महाराष्ट्रातील सध्याची सिंचन अवस्था ही अत्यंत अकार्यक्षम व आजारी असून पाणी अडविण्याचा क्रम, आकार आणि प्रमाण उफराटे केल्यामुळे ती दिवसेंदिवस अधिक आजारी होत आहे.

जायकवाडी आणि उजनी या धरणांमध्ये जेवढी जमीन बुडाली तेवढी देखील भिजत नाही मग अशा धरण योजनांसाठी आणखी दहा हजार कोटी रुपये खर्च करणे कितपत योग्य आहे?

आजमितीला महाराष्ट्रात एकूण लागवड क्षेत्राच्या केवळ २.५ ते ३% क्षेत्रावर ऊस पीक घेतले जाते. मात्र त्यासाठी ६०% सिंचन पाणी वापरले जाते. केवळ ३% जमिनीवर ६०% पाणी वापर म्हणजे जमीन व पाणी दोन्ही साधनांची नासधूस व उधळपट्टी होय हे वेळीच लक्षात घेऊन उपाययोजना केल्या नाहीत तर महाराष्ट्रात पाण्याचे दुर्भिक्ष्य भीषण होईल. आता वापरले जाते त्याच्या निम्मे पाणी वापरून उसाचे उत्पादन दुप्पट केले जाऊ शकते. ही बाब स्पष्ट असताना देखील, या दिशेने पावले उचलली जात नाहीत. जोवर पाणी व वीज मोफत अगर नाममात्र दरात मिळते तोपर्यंत याची काळजी कोण करणार? हा प्रश्न शेतकरी काय करतात याचा नसून नियोजन कसे केले जाते व धोरणे कशी चुकीच्या पद्धतीने आखली व अंमलात आणली जातात याचा आहे.

लागोपाठ गेली तीन वर्षे चांगले पर्जन्यमान असताना यंदा महाराष्ट्रात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे एवढे दुर्भिक्ष्य का ओढवले? याचे स्पष्ट उत्तर आहे– पाण्याचा होणारा प्रचंड उपसा. सध्या राज्यात १७ लक्ष विद्युत पंपांद्वारे पाण्याचा उपसा केला जात असून हा उपसापुनर्भरणापेक्षा कितीतरी अधिक आहे. नवीन विहीर खोदून आणि खोल करून पाणी उपसण्याची जी स्पर्धा लागली आहे त्यामुळे उत्तरोत्तर पाण्याचे हे दुर्भिक्ष्य अधिक होत जाणार. एकीकडे पाण्याचा उपसा तीव्र गतीने होत आहे, तर जमिनीत पाणी मुरविण्या-जिरविण्याकडे लक्ष दिले जात नाही. उपसा आणि पुनर्भरण यात ताळमेळ नसल्यामुळे हे प्रश्न निर्माण झाले आहेत. भूगर्भातील पाणी वापरासंबंधी कायदा करून तो अंमलात आणल्याखेरीज हे उपसासत्र थांबणार नाही, विशेषत: भरणा आणि उपसा याचा मेळ घातला जावा. अर्थात पुनर्भरण जास्तीत-जास्त होईल याकडे लक्ष द्यावे लागेल.

पाण्याच्या उपलब्धतेसाठी अगर पाणीपुरवठा योजनांसाठी वर्षाकाठी आपण जवळपास ८००-९००कोटी रुपये खर्च करतो हे लक्षात घ्यावे लागेल.

ईश्वराच्या आळवणीचे सामर्थ्य, आम जनतेसाठी दाखवावयाची सहसंवेदना, प्रार्थनेनंतर पाऊस आला ही प्रचिती, विरोध नोंदविणाऱ्यांचे नगण्य बळ, श्रद्धा-अंधश्रद्धा यातील सीमारेषा, मानवी जीवनातील उत्कट भावनांचे स्थान आणि या साऱ्यामुळे सतत प्रश्नचिन्हात उभा केला जाणारा वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय? आणि श्रद्धा कोणती व अंधश्रद्धा कोणती? ही आहे या प्रश्नाची दुसरी बाजू.

परमेश्वराच्या प्रार्थनेत अंगभूत सामर्थ्य आहे. त्यामुळेच मानवी जीवन सुसह्य होते. परदेशातही प्रार्थना होतात. पोपच्या आजारपणातही प्रार्थना सर्वांनी केली. विज्ञानवादी इंग्रजही 'गॉड सेव्ह दि किंग' म्हणतात. आपणच उगाच गदारोळ उठवण्यात काय अर्थ? फार तर निरुपद्रवी बाब म्हणून दुर्लक्ष करा. आम जनतेच्या हितासाठी (अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांच्या म्हणण्याप्रमाणे) आम्ही केला थोडा भोळेपणा तर बिघडले कोठे? तुमचे अंधश्रद्धा निर्मूलन चांगले आहे. पण ते अंगारे धुपारे करणाऱ्यांच्या उच्चाटनापुरते मर्यादित ठेवा. निष्पाप प्राण्यांच्या हत्येविरुद्ध आवाज उठवा. भल्यासाठी चाललेल्या प्रार्थनेचा अपमान म्हणजे बहुसंख्यांच्या श्रद्धेचीच अवहेलना. विज्ञानवाद्यांना कोणतीच प्रार्थना मान्य नसेल तर त्यांनी सर्व भावनांपासून अलिप्त राहावे. आधुनिक डॉक्टरही रुग्णांसाठी प्रार्थना करा म्हणतात. तेव्हा श्रद्धा व अंधश्रद्धा यातील फरक आता या मंडळींनी स्पष्टपणे पुढे मांडण्याची हीच वेळ आहे. या आग्रही प्रतिपादनाची मांडणी शेवटी इथपर्यंतही आली की सामुदायिक प्रार्थना ही देवाची नाही, निसर्गाची अशा आपल्या ईश्वरवादी भूमिकेपासून राज्यपालांनी मागे हटून दुसऱ्या दिवशी घेतलेल्या भूमिकेची अजिबात गरज नव्हती. आम्ही देवाचीच प्रार्थना केली. त्याने प्रसन्न होऊन पृथ्वीवर संततधार धरली ही प्रत्यक्ष परमेश्वर कृपेची प्रचिती असेच मुळी आम्हांला ठामपणे वाटते असे प्रतिपादन होऊ लागले.

परमेश्वराच्या प्रार्थनेत असलेल्या अंगभूत सामर्थ्याचे ठोक विधान काळजीपूर्वक तपासून बघावयास हवे. मानसिक आधाराचा मुद्दा बाजूला काढला तर प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने काय अनुभव आहे? कोपलेल्या देवीचा शाप समजला जाणारा देवीचा रोग होता, त्या वेळी अनेकांच्या चेहऱ्यावर व्रण ठेवून जात होता. आणि ती देवी आता इतकी हद्दपार झाली की ती जगात कोठे बघावयासही मिळत नाही. कॉलरा होतो म्हणून 'मरीआईचा गाडा' आता अडाणी खेडूतही ओढत नाही. पाणी निर्जंतुक करून घेण्याची गरज त्याला समजते. इंद्राच्या रथाची चाबूक बनलेली विद्युल्लता आकाशातून कोसळू नये यासाठी इंद्रदेवाची करुणा भाकण्याचा सवालच पैदा होत नाही. प्रचंड इमारतीवरचे छोटेसे विद्युतरोधक यंत्र त्याला पुरे पडते. प्रार्थनेच्या अंगभूत सामर्थ्याच्या प्रभावाने वा अभावाने यातले काहीच होत नाही, मिळत नाही आणि हाच निष्कर्ष पर्जन्यवृष्टीलाही लावावा लागतो. तो साधा सोपा पण ठाम वैज्ञानिक दृष्टिकोनच आहे. सर्व विद्यापीठांचे कुलपती असलेल्या राज्यपालांनी तो पाळावा, सांभाळावा, वाढवावा ही अपेक्षा चूक आहे काय?

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य देवाच्या नावावरील पशुहत्या आणि अंगारे-धुपारे विरोधापुरतेच मर्यादित ठेवण्याचा सल्ला तर मतलबी स्वरूपाचा आहे. या बाबींना देखील अंधश्रद्धा का मानायचे? तथाकथित पुढारलेल्या जाती आर्थिक, सामाजिक, बौद्धिक दृष्टया मागासलेल्या जाती-जमाती ज्यांना समजतात त्या त्याचे आचरण करतात म्हणून? यात्रेतील पशुहत्याविरोधी सत्याग्रह करताना धनगर वा संबंधित समाज विचारतो, 'आमच्या धार्मिक परंपरांचा अनादर तुम्ही का करता? पशुहत्येनंतरचा

आमच्या सहभोजनाचा आनंद तुम्हांला अयोग्य वाटतो म्हणून का हिरावून घेता? अंगारे घेणारी बाई मूल नाही म्हणून छळ होतो म्हणून अनेकदा डॉक्टरांचा उपचार आणि अंगाऱ्याचा आधार दोन्ही घेते. धुपारे करणाऱ्यांना मनाच्या आजाराबद्दल अज्ञान असते. 'बाहेरची बाधा' या प्रकाराबाबत गूढ भीती असते. मानसोपचारतज्ज्ञांचा अभाव व त्यासाठीचा न झेपणारा खर्च ही कारणेही असतात. थोडक्यात बहुसंख्य प्रार्थना-समर्थकांना ज्या अंधश्रद्धाविरोधात लढणे इष्ट वाटते, त्याबाबतही संबंधितांच्या भावना तीव्र व आग्रहीच असतात. अर्थातच हे सारे प्रकार आणि पावसासाठी प्रार्थना या अंधश्रद्धाच असतात आणि आहेत. परंतु खरी मेख असते ती ही की एकाची अंधश्रद्धा ही दुसऱ्याला मनोभावे पूजावयाची श्रद्धा वाटते. श्रद्धा-अंधश्रद्धेच्या या व्यक्तिसापेक्षतेने व कालसापेक्षतेने त्यांच्या आकलनाबाबत सतत गोंधळ होतो; गैरसमज वाढतात. तरीही काही निकषांच्या आधारावर मांडणी होऊ शकते.

एकतर ज्या ठिकाणी कार्यकारणभाव सरळ नाकारलेला असतो ती अंधश्रद्धा असते. अशी उदाहरणे ठायी-ठायी आढळतात. प्रार्थना व पाऊस हे त्यातलेच एक. व्यक्तिस्वातंत्र्य मान्य करून आणि व्यक्तीच्या श्रद्धा बाळगण्याच्या हक्काचा आदर करूनही अशा कार्यकारण भावना नाकारणाऱ्या बाबींचे जाहीर प्रगटीकरण हे अंधश्रद्धेलाच झुकणारे असते. शासकीय कार्यालये वा शाळा, महाविद्यालये यांना सरसकट परिपत्रक काढून पावसासाठी प्रार्थनेला ठरावीक अकरा वाजता दोन मिनिटे हात जोडायला लावणे हा घाऊकपणा सद्भावनेचेही अंधश्रद्धेतच रूपांतर करतो. याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे मूळ परिस्थितीबाबत अर्थपूर्ण मौन पाळणे. प्रार्थनेच्या मानसिकतेशी सुसंगत होती ती 'परमेश्वरा, नियोजनकर्त्यांनी दिवाळखोरपणाने ही परिस्थिती ओढवली त्यांना सुबुद्धी दे' ही आळवणी किंवा 'हे देवा सुयोग्य प्रयत्न करणे राहूनच गेले ही मोठी चूक झालीच. परंतु आता प्रसंग मोठा बाका आला आहे तेव्हा लेकरांच्या चुका पोटात घालून माफ कर.' ही प्रार्थना की ज्यामध्ये, ज्यातून हा दुष्काळ उद्भवला त्याची प्रामाणिक कबुली असेल. शाळा-कॉलेजात वाचल्या गेलेल्या प्रार्थनेत याचा लवलेश नव्हता. अर्थात यासाठी श्रद्धा फारच गाढ हवी, संतांसारखी.

मुद्दा येतो श्रद्धेतून निर्माण होणाऱ्या सद्भावनेच्या सामर्थ्याचा. हे सामर्थ्य खरेतर असते मनाची एकाग्रता साधण्याचे, होकारात्मक स्वयंसूचना देण्याचे, चिंताजनक गोष्टींपासून मन अन्यत्र गुंतवण्याचे आणि दुबळ्या मनाला तात्पुरता आधार देण्याचे. कोणत्याही व्यक्तीला दिलेले शुभसंदेश, शोकसंदेश यातून व्यक्त होणाऱ्या भावनांचे हेच खरे कार्य असते. त्यातीलही सहृदयता लक्षात घेताना विवेकाला सोडचिठ्ठी देण्याची गरज काय? अडचणीत असलेल्या माणसाला त्याच्यासाठी केलेल्या प्रार्थनेतून इतरांच्या आपल्याबद्दलच्या सहवेदना समजतात. आपल्या दुःखावर फुंकर घातल्याचा दिलासा मिळतो हे खरे आहे. परंतु याबाबत ग्रामीण जनतेची प्रतिक्रिया मी अजमावली त्यामध्ये त्यांना ही प्रार्थना ही एक सोयीस्कर आणि परखड भाषेत सांगावयाचे झाले तर सभ्य ढोंगबाजी वाटली.

या पावसासाठी त्यांनी प्रार्थना केली. त्यातील कोरडा उपचार इतका स्पष्ट होता की, त्यातून सहसंवेदनेची तार छेडली जाईल आणि दु:खी दुष्काळी बांधवांना दिलासा मिळेल, त्यांचे मनोधैर्य टिकेल हे शक्यच नव्हते. इथे हेही अगदी स्पष्ट करावयास हवे की प्रार्थनेचा परिणाम फक्त मानसिक होऊ शकतो. परीक्षेला जाताना आईच्या आशीर्वादाने वा मित्रांच्या शुभेच्छा घेऊन निघालेल्या विद्यार्थ्यांची धास्तावलेली मन:स्थिती त्या होकारात्मक सूचनेतून काहीशी सावरू शकेल व त्या प्रमाणात त्याने केलेल्या अभ्यासाचे अधिक व्यवस्थित प्रकटीकरण तो करू शकेल. परंतु कितीही जणांच्या शुभेच्छा घेऊन तो परीक्षेला उशिराच निघाला तर पेपर सुरू होण्याआधी तो पोचू शकणार नाही ही मर्यादाही ध्यानातच ठेवावयास हवी.

प्रार्थना झाली आणि महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पाऊस पडला. हा प्रार्थनेच्या सामर्थ्याचाच पुरावा नाही काय? असे विचारणाऱ्यांचा प्रतिवाद काय करावयाचा? महाराष्ट्राचेच एक सुपुत्र वसंतराव गोवारीकर यांनी पावसाचा अंदाज करण्याचे शास्त्र बऱ्याच प्रमाणात विकसित केले आहे. गेली चार वर्षे याची प्रचितीही आलेली आहे. दडी मारलेला पाऊस १८ जुलैपासून जोर पकडेल हे निदान त्यांनी आधीच जाहीरपणे केले होते आणि तसे झालेही. त्याच वेळी केलेल्या सामुदायिक प्रार्थनेच्या परिणामाशी ज्यांनी त्याचे नाते जोडले (शाळकरी मुलांना तर तसे वाटलेच हे मला माहीत आहे.) त्यामुळे कोणता विचार समाजमानसात बळकट झाला?

परमेश्वरील श्रद्धा ही उदात्त भावना आहे. ज्यांना मनापासून त्याची प्रार्थना करून आळवणी करावीशी वाटते, त्यांना कुणाच्याही आदेशाचीच नव्हे तर आवाहनाचीही गरज नाही. त्यांनी ती मे महिन्यात उभा महाराष्ट्र पाण्यासाठी तडफडत असताना मनापासून केली असणार. प्रामाणिक आर्त भावनाही मानवी जीवनाची शक्ती बनू शकते, परंतु ती शक्ती का बनते? याचे विवेकी स्पष्टीकरणही देता येते; ही श्रद्धायुक्त अंत:करणाची भावना शक्ती नाही बनली तरी तिचा आविष्कार माणसाचे जीवन आश्वासित करू शकतो. माणूस हा केवळ तर्कावर जगणारा प्राणी नाही. त्याचे अंतरंग भावना व विचार यांच्या संयुक्त मिश्रणातून बनलेले आहे. म्हणूनच कार्यकारणभाव नाकारणे ही माणसाची प्रवृत्ती श्रेयस्कर नसली तरी समजून घेता येण्यासारखी आहे. भावनेच्या उत्कट आवेगातून माणूस काही तर्कविसंगत वर्तन करील हे मान्य करावयास हरकत नाही. त्यामागचा त्याचा अस्सलपणा लक्षात घेता चिकित्सा करताना त्याचा आदरही करावयास हवा. परंतु हा अस्सलपणा सार्वजनिक घाऊक प्रदर्शनात कोठून येणार? मी मन:पूर्वक प्रार्थना केली, ज्यांना उचित वाटेल त्या प्रत्येकाने आपापल्या परीने आपापल्या ठिकाणी प्रार्थना करावी असे राज्यपाल म्हणाले असते तर ते अगदी वेगळे ठरले असते आणि त्याचे सार्वजनिक घाऊक फतव्याने केलेले आचरण अगदी वेगळे ठरले आहे. ह्या प्रार्थनेमागील भावनेचेच त्यामुळे विडंबन झाले. श्रद्धायुक्त सच्च्या माणसानेही त्याचा अव्हेरच करावयास हवा.

♦♦♦

देवाचे दैव

माझ्या लहानपणी व त्यानंतरही एक भावगीत फार लोकप्रिय होते.

'पंढरीनाथा, झडकरी आता
पंढरी सोडून चला, विनविते रखुमाई विठ्ठला'

विठ्ठल भोळा. कटीवर हात ठेवून उभा असलेला.
डाव्या बाजूने रखुमाई. युगा-युगाची साथ देत.

खऱ्या भक्तीच्या आणि भक्ताच्या उमाळ्याने दाटलेले हे दैवत. पण घडते आहे काही वेगळेच, असे रखुमाईला जाणवते. खऱ्या भक्तांना दूर सारून बेरक्या मंडळींचे कोंडाळे पांडुरंगाभोवती जमलेले. त्यांनी पांडुरंगाला जणू आपल्या ताब्यातच घेतलेले. भक्तीचा लिलाव मांडलेला.

सावळ्या विठ्ठलाच्या नशिबातील ही नकली आरास बघून रखुमाई वैतागते, कळवळते, विठ्ठलाला विनवते.

'चला, ही पंढरी आता आपली नाही, येथे खऱ्या भाविकाची कदर नाही. भक्तीचा आदर नाही. तुमच्या महानतेवर हा केवढा कलंक! मला नाही तो बघवत.' आणि एवढ्यावरच न थांबता ती सुनावतेही, 'तुम्ही येत असाल तर ठीकच, नाहीतर मला निरोप द्या. मी ही निघाले! तुम्ही आणि तुमचे नशीब.'

देव असला म्हणून काय झाले? त्यालाही त्याचे नशीब असते, भविष्य असते, त्यात अडकणे असते, सुटणे असते. पण प्रत्येकालाच रखुमाईची साथ कोठून मिळायला? एवढा परखडपणा कुठला जमायला!

मग त्यासाठी उपाय काय?

देवाची पत्रिका मांडायला हवी. कुंडली नीट वाचायला हवी. शांती करून घ्यायला हवी. ही चेष्टा नाही. कल्पनाविलास नाही. मी गंभीर आहे. केरळसारख्या पुढारलेल्या राज्यात गुरुवायर हे अत्यंत प्रतिष्ठित देवस्थान. तेथे केरळातील नामवंत ज्योतिषांना अलीकडेच खास पाचारण करण्यात आले. देवाची पत्रिका मांडण्यात आली. त्या अभ्यासाचे नाव 'देवप्रसन्ना' झाले ते असे-

मंदिर व्यवस्थापकांच्या लक्षात आले. दस्तुरे खुद्द देवाधिदेवालाच त्रास होऊ लागला आहे. लक्षणे ठीक नाहीत. मग काय करायचे?

देवाजींची पत्रिका मांडावयास हवी. दोष शोधावयास हवा. उपाय सुचवायला हवा. यासाठी अभ्यास करून गुरुवायरातील देवाजींचे दुःख ज्योतिर्विशारदांनी शोधून काढले. (देवाची जन्मतारीख त्यांनी कोणती धरली हा यक्षप्रश्न मात्र विचारू नका.) त्यांना असे समजले.-

पुजाऱ्यांच्यात मांसाहाराचे प्रमाण वाढले होते. सोबत मदिराही होती. थोड्या

धनवंतांच्या सोयीसवडीसाठी धार्मिक विधी बदलले जात होते. मंदिराच्या सेवकवर्गात आपापसात चांगलीच खुन्नस होती. मंदिर परिसराचा दुरुपयोग चालू होता.

देवाजींची खिन्नता, निराशा, दु:ख पळवून लावण्यासाठी काय करावयास हवे? काय केले असता कृपाप्रसादाची गंगा गुरुवायरातून पुन्हा एकदा भक्तगणावर पूर्वीप्रमाणेच वाहू लागेल? भविष्यवेत्त्यांनी उपाय सांगितला.

सुकृत होम नावाचा विधी एका वर्षाच्या कालावधीत एक लाख चव्वेचाळीस हजार वेळा करावयास हवा.

भविष्य कळले. उपाय समजले. पण खरे तर नवे काय उमगले?

देवळाशी संबंधित अधिकारीवर्ग, पुजारी, भक्तीचा घाऊक ठेवा घेणारी इतर मंडळी ही देवाचे देवपण संपवून टाकतात, हे काही माहीत नसलेले सत्य नाही.

शक्यता आहे की, गुरुवायरच्या व्यवस्थापकांच्या डोक्यातील ही सुपीक कल्पना असेल. फलज्योतिषाच्या सहाय्याने देवाजीचे दु:ख प्रमाणभूत करून संबंधितांच्या गैरव्यवहाराशी ते जोडावे, त्यामुळे तरी मंडळी चरकतील, घाबरतील, सार्वभौम देवाधीदेवाच्या धाकाने तरी थोडी सुधारतील असे त्यांना वाटले असावे.

हे खरेच घडेल? तुम्हांला काय वाटते?

मला शंका आहे.

लबाड पुजारी, संधिसाधु सेवकवर्ग यांच्यावर 'देवप्रसन्न' अभ्यासाचा काहीही परिणाम होणार नाही, ही शक्यता अधिक. सुकृत होमहवनाचे कर्मकांड केले तरी त्यांची कृती सुधारण्याची शक्यता कमी.

दीर्घकाळ देवाच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्याच्या सामर्थ्याबद्दलची त्यांची माहिती अधिक पक्की असणार.

देवाच्या दैवाबद्दल व स्वत:च्या संधिसाधु सुदैवाबद्दल ते (देवकृपेने) नि:शंक असणार. म्हणूनच बिनधास्तही.

आणि रखुमाईसारखी तळमळीची अर्धांगी प्रत्येकाला थोडीच लाभणार आहे?

♦♦♦

देवाचे अवमूल्यन

हे पत्र तुम्हाला कधीतरी नक्की आले असणार, वा तुम्ही वाचले असणार.

गाव, नाव, देव वेगळा पण मूळ अर्थ एकच.

मी नगरहून पुणे गाडीत चढलो. घाईघाईने बसमध्ये चढून एका मुलाने 'शिर्डी साईबाबा का चमत्कार' हे पत्रक सर्वांना वाटले. मजकूर असा-

शिर्डीच्या साईबाबा मंदिरात एक पुजारी पूजा करत होता. अचानक तेथे साप निघाला. पुजारी घाबरला. नागदेवता ब्राह्मणरूपात प्रकट झाली व म्हणाली, 'घाबरू नकोस. मी सांगते ते नीट ऐक. मी थोड्याच दिवसांत पृथ्वीवर जन्म घेईन. जे लोक धर्माचा नाश करतात त्यांचा नाश करीन. जो माणूस माझ्या नावाच्या हजार पत्रिका वाटेल त्याची मनोकामना चोवीस दिवसांत पुरी होईल. जो आज उद्या चालढकल करत दिवस घालवेल त्याचे खूप नुकसान होईल.' असे म्हणून चोवीस पावले मागे सरकून नागदेवता गुप्त झाली. पत्रिका छापून वाटण्याचा आदेश ज्यांनी मानला त्यांचे कोटकल्याण झाले. हजार पत्रिका वाटल्या त्यांना साठ लाखाची लॉटरी लागली. सहाशेच वाटल्या त्यांनाही मोहरांनी भरलेली घागर मिळाली. एका बेकार तरुणाने जमेल तेवढ्या वाटल्या तर त्याला उत्तम नोकरी लाभली. एका माणसाने खोटे समजून हे पत्रक फाडून टाकले तर त्याचा मोठा मुलगा मेला. आग्रा शहरातील बाबूलाल गुप्तांना हे पत्रक मिळाले. आज-उद्या करत त्यांनी हे काम लांबणीवर टाकले तर धंद्यात त्यांना जबर नुकसान आले; पत्नी मरण पावली. पाच लोकांना हे पत्र मिळाले. त्यांनी मिळून हजार पत्रके छापून वाटली त्यांना तासाभरात हजारो रुपयांचा फायदा झाला.

तेव्हा सर्व वाचकांना विनंती - आपल्या धर्मश्रद्धेनुसार याचा प्रसार करा आणि होणाऱ्या चमत्काराचा फायदा घ्या.

बोला शिर्डीके साईबाबा की जय! श्री साईबाबा की जय !!

खरं सांगा, असे पत्रक वाचल्यावर तुम्ही काय कराल?

फाडून पायाखाली तुडवाल?

निदान फेकून द्याल व विसरून जाल?

का छापून घ्याल, वाटून टाकाल? सुटका झाल्यासारखे हुश्श म्हणाल? अशी पत्रे परत परत येतात, पत्रिका वाटल्या जातात त्या अर्थी लोक काय करतात हे उघडच आहे.

गोष्ट म्हटली तर छोटी आणि मोठीही. देशातील माणसांचा वेळ, श्रम, कागद वाया जातो हा एक तोटा. पण तुलनेने छोटा. मोठा तोटा हा की, देवाच्या धाकाने माणसाचे मन वेठीला धरले जाते.

तेलपाणी नाही, वेणीफणी नाही म्हणून मुलीच्या केसात जट येते. तिला यल्लमादेवीची समजून हळदकुंकू, वडाचा चीक वाहणे चालू होते, अंगात येऊ लागते, जोगवा मागितला जाऊ लागतो. मुलीचे देवाशी लग्न लागते. तिच्या सुखी संसाराच्या स्वप्नांची राखरांगोळी होते. या जटा सोडविणाऱ्या कार्यकर्त्यांना काय ऐकायला मिळते? "यल्लम्मादेवी लई कडक. तिच्या जटेला हात लावला तरी बाप्याला लुगडं नेसवल्याशिवाय सोडणार नाही."

"आपल्या मुलीला आपल्या हाताने नरकात ढकलणारी आई (!) असेलच कशी?" हा प्रश्न विचारलेला आवडत नाही. भीतीपोटी पटत नाही.

महाराष्ट्रातल्या जत्रेत, यात्रेत लक्षावधी बकरे बळी जातात. बकरे घेणं, ते टेम्पोने वा गाडीने नेणं, नवस फेडणं यासाठी भक्ताला दीड हजार रुपयांचा टोला बसतो. बहुसंख्य गरीब भक्तांना कर्ज काढल्याशिवाय हे अशक्यच असते. ग्रामीण महाराष्ट्राला अंधश्रद्धेपायी कर्जबाजारी करणारे एवढे मोठे कारण दुसरे नसेल. याविरुद्ध प्रचार करत हिंडत असताना अनुभव असा की, पहिले कर्ज फिटलेले नसते. सावकार पैसे नाकारतो. पुजाऱ्याचा दम चालूच असतो. 'देवाचं असं मधेच सोडता येत नाही. तीन वर्षांचा तरी नेम पाळायलाच हवा, नाहीतर लई वंगाळ होईल.' मग भांडीकुंडी घराबाहेर येतात. पण देवाच्या धाकाने नवस फेडला जातो. आम्ही लाख पटवितो, पण पटवणं अवघड जातं.

अमुक-अमुक गोष्ट का करावयाची याचे उत्तर ती न्याय्य आहे, निकोप आहे, नीतीची आहे असे नाही, तर दरडावणी अशी की खबरदार, हे न कराल तर देव तुमच्याकडे बघून घेईल.

मांगल्याची मूर्ती कल्पिलेल्या भगवंताला असे गावगुंडाच्या पंक्तीत बसवणे ही त्याच्या देवत्वाची टिंगलटवाळी नाही?

भीती हा माणसाचा स्वभावधर्म. त्यावर स्वत:ची पोळी भाजणे हा मात्र अधर्म. स्पष्ट बोलायचे तर बदमाशीच.

देवदेवता, संतमहंत, साधुपुरुष हे नीतीसाठी की भीतीसाठी? बहुसंख्यांना हे समजत नाही; समजले तरी कृतीने उमजत नाही. त्यापेक्षा पत्रिका छापून मोकळे होणे बरे असा पळपुटा मार्ग शोधला जातो.

'तसे त्यात काही तथ्य नाही हो, पण समजा असलंच, तर कशाला उगीच धोका? म्हटलं करून टाकू.' अशा पळवाटा शोधल्या जातात.

एकाच वेळी स्वत:चे आणि देवाचे दोघांचेही अवमूल्यन केले जाते.

हे नाकारायचे असेल, बदलायचे असेल तर डोळसपणा आणि निर्भयपणा या भरभक्कम आधारावर खडेखांब उभे राहावयास आपण शिकले पाहिजे.

♦♦♦

सत्यशोधकी विवाह

साऱ्या जगावर आर्थिक साम्राज्य गाजवू पाहणाऱ्या जपानच्या राजपुत्राचे लग्न अलीकडेच झाले. ते जगभर गाजले. लग्न समारंभाच्या दिवशी संपूर्ण देशाला सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली होती. समारंभाची वर्णने जगभरच्या वृत्तपत्रांनी छापली. जगभरच्या टी. व्ही. वरून हा सोहळा दाखवला गेला. या सगळ्या समारंभाबद्दल टाईम साप्ताहिकाच्या अंकात एका जपानी नागरिकाने लिहिलेले पत्र असे, 'हा सोहळा साजरा करण्यासारखी सध्या जपानची स्थिती नाही. सध्या मंदी असून त्यातून जपानी अर्थव्यवस्था बाहेर यायची आहे. कंबोडियामध्ये एका जपानी शांतिसेनाधिकाऱ्याची जी हत्या झाली त्याबद्दलच्या काळजीतून देश बाहेर यावयाचा आहे. आपल्या राजघराण्याच्या हजार वर्षांच्या इतिहासाला निरोप देऊन देशासमोरचे खरे प्रश्न सोडविण्याची सिद्धता करण्याची ही वेळ आहे.'

आमच्या चळवळीमार्फत गेले वर्षभरात झालेले काही विवाह पुढीलप्रमाणे.

अभिजीत वाघ व सुरेखा जानगुडे - नगर.

विलास जाधव व आशा बने - नेवासा.

मोहन हिंगसे व पुष्पमाला कारंडे - बारामती.

सुधीर साळेकर व शारदा पवार - सातारा.

तानाजी मस्के व राणी नलवडे - तासगाव जि. सांगली.

ही सारी नावे कशाकरता लिहावयाची? त्यांचे वेगळेपण ते काय?

विवाहाच्या निमंत्रणपत्रिका बघितल्या तरी ते स्पष्ट होईल.

मोहन हिंगसे व पुष्पमाला कारंडे यांच्या पत्रिकेचा हा नमुना.

'जगामाजी एक सत्यधर्म खास! सांगा सर्वत्रास! ज्योती म्हणे!' म. फुले.

प्रियजन, सस्नेह नमस्कार.

लग्नादी कार्यात अहमहमिकेने मानपान, वरदक्षिणा, निरर्थक कर्मकांडे यातून होणारा अमाप खर्च पाहता लग्न सोहळ्याचा आनंद आपण हरवून बसतो. लग्नाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी व बहुजन समाजाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी युगपुरुष महात्मा फुल्यांनी दीडशे वर्षांपूर्वी पुरस्कृत केलेल्या सत्यशोधकी पद्धतीने विवाह होणार आहे. अतिथिगण आपले विचार मांडणार आहेत. अगत्य उपस्थित राहावे ही प्रार्थना.'

सुधीर साळेकर व शारदा पवार यांनी स्वत:च्या नावाने काढलेले हे निमंत्रण.

विवाह...आयुष्यभराचा एक साथीदार निवडणं.

आणि सहजीवनाची सुरुवात करणं, ही खरं तर कितीतरी

नैसर्गिक आणि सहजसुंदर गोष्ट पण...

लग्न म्हटलं की हुंडा, मान-पान, देणी-घेणी, आहेर, जन्मपत्रिका, मुहूर्त, अर्थशून्य कर्मकांडे, कालबाह्य संस्कार, दागिन्यांचा चमचमाट, श्रीमंतीचं प्रदर्शन, रुसवे-फुगवे, जेवणावळी आणि ऐपत असो वा नसो हौसमौज या सदराखाली होणारी उधळपट्टी. या सर्वात त्यामागच्या आनंदाला व अर्थपूर्ण आशयालाच आपण मुकतो. यासाठी विवाहाचा आनंद द्विगुणित होण्याबरोबरच त्याला नवा आशय प्राप्त व्हावा असे आम्हांला वाटते म्हणून म. फुल्यांनी प्रारंभ केलेल्या सत्यशोधकी पद्धतीने आम्ही विवाहबद्ध होत आहोत.

याप्रसंगी आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहावे.

तानाजी मस्के व राणी नलवडे यांच्या घरच्यांनी (विशेष म्हणजे त्यांच्या आजोबांनी) काढलेली पत्रिका अशी :

समता, स्वातंत्र्य, सहजीवन.

तानाजी मस्के व राणी नलवडे या दोघांनी पति-पत्नी म्हणून समानतेने सहजीवन जगण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध होणेचे ठरवले आहे. या प्रतिज्ञेचा भावपूर्ण कार्यक्रम गुरुवार ता. १६-५-९१ रोजी दुपारी ४.३० वाजता संपन्न करण्याचे निश्चित केले आहे. या कार्यक्रमास आपण सहकुटुंब याल अशी मी आशा करतो. स्त्री-पुरुष संबंध कसे असावेत, धर्मवाद, दैववाद यावर काही वक्त्यांची भाषणेही होतील. येताना कोणत्याही प्रकारचे आहेर आणू नयेत.

सातारला झालेल्या विवाहात निमंत्रणपत्रिकेबरोबर या विवाहामागची भूमिका विशद करणारे पत्रकही हा उपक्रम सुरू करणाऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वाटले होते. ते असे,

'बहुजन समाजाला उपकारक असणाऱ्या परंपरांचा आग्रह अंधश्रद्धा निर्मूलन समिती बाळगते. म्हणूनच महात्मा फुले यांनी शंभर वर्षांपूर्वी प्रारंभ केलेल्या सत्यशोधकी विवाह पद्धतीत कालोचित बदल करून ते प्रत्यक्षात अंमलात आणण्याचा समितीचा प्रयत्न आहे. सामुदायिक विवाह व नोंदणी विवाह हे उपयुक्त व इष्टच आहेत. परंतु सत्यशोधकी विवाह हे त्याही पुढचे पाऊल आहे असे आम्हांला नम्रपणे वाटते. या विवाहामागची भूमिका अशी.

१. हुंडा, जेवणावळी, मंडप, रोषणाई, बॅन्ड, दागदागिने, आहेर या सर्व खर्चिक व अनावश्यक बाबींचा पूर्ण त्याग. विवाह अत्यंत साधेपणाने, निमंत्रणपत्रिका, हार-फुले, फोटो एवढाच खर्च. मंडप खर्च टाळण्यासाठी शक्यतो विवाह खुल्या जागेत.
२. विवाह हा सामाजिक व कौटुंबिक संस्कार असल्याने तो आप्तमित्रांसह विधिपूर्वक होणे बहुजन समाज आवश्यक मानतो. तसेच तो व्यक्तीच्या जीवनातील आनंदाचा क्षण असतो. म्हणून विवाहाचे हे सामुदायिक आनंद सोहळ्याचे स्वरूप कायम ठेवायचे यासाठी रजिस्टर विवाहापेक्षा सत्यशोधकी विवाह अधिक श्रेयस्कर. विवाहाच्या या स्वरूपात मानपान, रुसणे-फुगणे हे प्रकार निर्माण होत नाहीत.

३. वर्षातील कोणत्याही सोयीस्कर दिवशी व वेळी विवाह होऊ शकतो. ठरावीक मुहूर्ताच्या कल्पनेमुळे मंगल कार्यालये, लग्नाची सर्व व्यवस्था, प्रवास इत्यादीबाबत पडणारा ताण पूर्ण थांबतो. कुंडली, गृहयोग, मुहूर्त या सर्व अंधश्रद्धा आपोआप दूर होतात.
४. विवाहातील मंगलाष्टके अर्थपूर्ण पण सोपी व मातृभाषेत असल्याने सर्वांना समजतात. विधीसुद्धा सोपे, सरळ व कमी वेळांचे असतात.
५. अक्षता म्हणून होणारी तांदळाची उधळपट्टी थांबते. एका लग्नात ५ ते १० किलो तांदळाच्या अक्षता केल्या जातात. महाराष्ट्रात सरासरी दरवर्षी तीन लाख लग्ने होतात म्हणजे १५ ते ३० लाख किलो तांदूळ पायदळी पडतो. त्याऐवजी सुगंधी फुलांच्या पाकळ्याच अक्षता केल्याने सोहळा संस्मरणीय बनतो. फुले पिकवणाऱ्या शेतकऱ्याच्या घरी चार पैसे अधिक जातात.
६. सत्यशोधकी विवाहातील मंगलाष्टके म्हणणे व वधुवरांना शपथ देणे हे काम कोणतीही व्यक्ती करू शकते. त्यास जातिधर्माचे बंधन नाही. सत्यशोधकी विवाह हा भटशाही विरोधी व स्त्री समतावादी असल्याने ब्राह्मणेतर स्त्रीने हे करणे सर्वाधिक योग्य.
७. वधुवरांनी आपल्या ऐपतीप्रमाणे सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना आपल्या जीवनातील या आनंदाच्या प्रसंगी काही मदत जाहीर करावी अशी कल्पना आहे.
८. पारंपरिक पद्धतीने विवाह झाला असता तर जो खर्च झाला असता तो खर्च वा काही किमान रक्कम उभयबाजूंनी मिळून मुलीच्या नावावर बचत स्वरूपात ठेवणे हे आजच्या काळात प्रत्येकाचे कर्तव्य आहे. उत्पादकतेसाठी भांडवल व त्यासाठी बचत ही व्यक्ती, कुटुंब, राष्ट्र सर्वांची गरज आहे. एकट्या महाराष्ट्रात प्रतिवर्षी साधारण बाराशे कोटी रुपये विवाहात उधळले जातात हे लक्षात घेता याची गरज प्रकर्षाने जाणवते.

खरे तर यात नवे काय आहे? २५ डिसेंबर १८७३ रोजी महात्मा फुल्यांनी या पद्धतीचा पहिला विवाह लावला. दुसरा विवाह लागला ७ मे १८७४ रोजी. असे अनेक विवाह पुढे गावोगाव लागले. या विवाहांना ब्रह्मवृंदांनी फार मोठा विरोध केला. धर्ममार्तंडांनी अनेक अडथळे आणले. पारंपरिक जनमानसाला त्यातील क्रांतिकारकता समजली नाही. १९१७ मध्ये चांदे (ता. कर्जत जि. नगर) येथे सोनाजी बाबर पाटील यांच्या पुढाकाराने एका शेतकऱ्याचा सत्यशोधकी विवाह लावण्यात आला तेव्हा आपल्या जोशीपणाच्या हक्कावर गदा आली आणि साडेचार आणे दक्षिणा बुडाली म्हणून एका ब्राह्मण पुरोहिताने कर्जत कोर्टात दिवाणी दावा दाखल केला. खालच्या कोर्टात निर्णय ब्राह्मण पुरोहिताच्या बाजूने झाला, तेव्हा सत्यशोधक समाजाने अहमदनगरच्या वरिष्ठ कोर्टात अपील केले. आणि तेथे निर्णय सत्यशोधक समाजाच्या बाजूचा होऊन कोर्टाचा खर्चदेखील ब्राह्मण पुरोहिताने भरून

द्यावा असा निर्णय देण्यात आला. ही सारी उज्ज्वल परंपरा असूनही आजही सत्यशोधकी विवाहाची गरज तेवढीच वाटते. आणि पारंपरिक मानसिक जडतेमुळे तिचा स्वीकार होत नाही. अनेकदा तर विरोधच होतो. ही मानसिकता काय असते—

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतम्

बान्धवा: कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जना:!!

अर्थ असा की, लग्नप्रसंगी मुलीची मानसिकता असते आपणास साजेसा कर्तृत्ववान जोडीदार असावा. वरमाईची इच्छा असते लग्नात वधुपित्याने वधुला सोन्याने पिवळी करून द्यावी. वरबापाचा आग्रह असतो की, लग्न असे झोकात झाले पाहिजे की आमच्या घराण्याच्या कीर्तीत भर पडेल. आप्त स्वकियांचे लक्ष असते की, सोयरीक जमतेवेळी घराण्याच्या तोडीचे अस्सल घराणे आहे का? वऱ्हाडी मंडळी पाहतात की भोजनास मिष्टान्नांचे किती प्रकार केले आहेत.

श्लोक जुना असला तरी त्यातील आशय आजही ताजाच आहे. दोन्ही कुटुंबांच्या दृष्टीने महत्त्वाचा व आनंदाचा असा विवाहाचा क्षण, परंतु असलेल्या आणि बहुतेक वेळा नसलेल्या संपत्तीचे दर्शन घडविण्यासाठी एका दिवसात केलेल्या उधळपट्टीने हाच क्षण कित्येक वर्षांसाठी क्लेशदायक रूप धारण करतो. स्वत:च्या तथाकथित प्रतिष्ठेचे असे प्रदर्शन मांडण्यात लोकांना जेवायला घालून तृप्त करणे वा वधुवरांच्या कल्याणाचा विचार करणे ही भावना असते असे मानणे कठीण आहे. सारी उधळपट्टी होते ती इकडून तिकडून जमवलेल्या वा कर्जाऊ घेतलेल्या पैशावर. कार्य व्यवस्थित करणं म्हणजे किमान लाखभर रुपयांचा चुराडा होतोच. हे 'पहिलंच कार्य' किंवा 'शेवटचंच' असा युक्तिवाद भ्रामकच असतो. दोन मुलं असण्याच्या जमान्यात कुठलं तरी कार्य हे पहिलं आणि कुठलेतरी शेवटचे असणारच आणि असं पहिले वा शेवटचे कार्य धडाक्यात केले पाहिजे हा नियम कोणी लिहिला? 'हौस असते' हे आणखी एक समर्थन. हौसमौज शे-पाचशे रुपयांची. लाखभराच्या उधळपट्टीने आपण गाळात जातो हे उघडे नागडे सत्य असूनही पिढ्यान्‌पिढ्या झपाटल्यासारखे पुन:पुन्हा त्याच गर्तेत स्वत:ला ढकलणे हा एकतर मूर्खपणा आहे किंवा अंधळा माज.

धुमधडाक्याच्या लग्नासाठी मग एक-एक युक्तिवाद पुढे येतात. 'घरातल्या घरात उरकून घेतलं तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही' असे अनेकांना वाटते. खरंतर इतरांच्या सुखदु:खाशी असं प्रमाणाबाहेर कर्तव्य कोणालाच नसतं. तुमच्या घरातले कार्य उरकले काय व अडले काय यामुळे कोणाचा घास अडत नाही. 'लग्न-समारंभाच्या निमित्तानं माणसं एकत्र जमतात' अशी भलावण केली जाते. खरेतर लग्नघरच्या गोंधळात धड कुणाकडे लक्ष पुरवता येत नाही. निवांत भेटीगाठी होत नाहीत. तात्पुरत्या ओळखी होतात, त्यांना अर्थच नसतो. होते ती फक्त कुणाच्याही पदरात सुख न घालणारी प्रचंड दमछाक. आहेराच्या प्रकाराबाबतही हीच चरफड ऐकू येते. लग्नसराईत घरी पडलेल्या लग्नपत्रिकांचा गठ्ठा आहेराच्या कल्पनेने आनंदाऐवजी

बहुदा पोटात भीतीचा गोळा उठवतो.

हेही सारे पुढचेच झाले. लग्नाच्या बाजारात पहिल्यांदा मुलीला हुंड्याच्या तराजूत तोलले जाते. मुलीचे गुण, स्वभाव, शिक्षण, रूप याला दुय्यम स्थान असते. महत्त्वाचा मुद्दा असतो, हुंड्याच्या तराजूत दुसऱ्या बाजूला किती वजन टाकण्याची मुलीच्या घरच्यांची स्थिती आहे याचा. बरं, हा तराजू लग्नानंतरसुद्धा वरखाली हालत राहतो. तो कधीच स्थिर राहत नाही. मुलीचा बाप कधी सोनंनाणं, कधी स्कूटर, फ्रीज, टी.व्ही. असे काही ना काही पदरमोड करून कर्ज काढून. तराजूत टाकत जातो. या सर्व किंमती वस्तूंपुढे माणूस म्हणून विवाहित होणाऱ्या व झालेल्या मुलीची किंमत मात्र घसरतच जाते. अनावश्यक खरेदी, कालबाह्य मानपान, पिळून काढणारे दागदागिन्यांचे सोस, मोठेपणाच्या खोट्या भपक्यापायी होणारा मंडप, रोषणाई, बॅन्ड आणि जेवणावळी यांचा प्रचंड खर्च या सर्वांची खूणगाठ, हुंडा ठरताना आणि बस्त्याची गाठ बांधतानाच मारलेली असते.

मुलीच्या बापाचा मजबूत खिसा म्हणजेही लग्नाच्या बाजारात सर्व काही असतेच असे मात्र नाहीच. संगणकाच्या युगात त्याचीच मदत घेत जात-पात, गोत्र, कुळी हे सारे भेदभाव आणि पत्रिकेतील किती गुण जमतात याचे शास्त्र (?) हे काही टळत नाही. मुलीला मंगळ असणे हे केवढे अमंगळ. मुलीच्या पित्याला हे समजताक्षणीच अख्खे घरदार जबरदस्त तणावाखाली येते. मंगळ या ग्रहाची विज्ञानाच्या पुस्तकातील सारी माहिती कुंडलीच्या घरातील मंगळाचा प्रभाव दूर करण्यासाठी उपयोगी येत नाही किंवा उत्तम पत्रिका जमलेले अनेक विवाह अपयशी का होतात, त्यातल्या अनेक मुली अक्षरश: कापरासारख्या का जाळल्या जातात हा युक्तिवादही पत्रिकेबद्दलचा भ्रम दूर करू शकत नाहीत. पत्रिका पाहून ठरलेली लग्ने ग्रहगोल ताऱ्यांच्या शुभ मुहूर्तावर करणे हे ओघानेच येते. उभय बाजूंच्या सर्वांच्या सोयीची वेळ हा उत्तम मुहूर्त मानावा हे पटू शकत नाही. स्वाभाविकच उत्तम मुहूर्ताची गर्दी एकाच दिवशी एकाच वेळी होते. त्या मुहूर्तावर हॉल मिळवणे हे खरे तर हाल करून घेणेच असते. शिवाय सगळीकडे तोच क्षण असल्याने व्यवस्थांवर बेसुमार ताण पडतो. पण लक्षात कोण घेतो? या सर्वातून शेवटी घडते ते हेच 'लग्न थोडक्यात करू' असे बोलत बोलत सीमांतपूजन, व्याही भोजन, होमहवन, जेवणावळी, व्हीडिओ शूटिंग हे सगळं कसं यथासांग पार पडतं! या सगळ्यातून नवविवाहित दांपत्याला काडीचाही फायदा नसतो. मग उभय बाजूंच्या घरच्यांना तर काही वर्षे कर्ज फेडीत घालवणे हाच एक कार्यक्रम उरतो.

या साऱ्याला पर्याय शोधण्याची धडपड अनेक ठिकाणी चालू आहे. काही सामाजिक संस्था, ज्ञाती मंडळी, साखर कारखाने पुढाकार घेऊन एकाच मांडवात सामुदायिक विवाह करण्याचा उपक्रम चालवतात. तो समाजाला पोषक आणि उपयुक्त असाच आहे. सध्याच्या भरमसाठ खर्चावर ते एक मर्यादित उत्तर आहे. मात्र या लग्नाला जुने टाकाऊ ठरलेले सर्व विधी आणि सोपस्कार करण्यात येतात.

त्यासाठी बराच खर्चही येतो. ते टाळले पाहिजे. काही वेळा स्वत:चे सामाजिक काम मिरवण्यासाठी केलेला समारंभ आणि त्यात भर म्हणून पुढाऱ्यांचे सत्कार करण्यात वेळ आणि पैसा वाया घालवणे असे स्वरूप येते. आणि मग मूळ हेतूबद्दलच संशय निर्माण होतो.

रजिस्टर विवाह (नोंदणी पद्धत) ही एक साधी, सोपी, प्रभावी आणि सर्व धार्मिक कर्मकांडांना फाटा देणारी पद्धत आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणे तो खरा कायदेशीर विवाह ठरतो. परंतु ही पद्धत अनेक कारणांनी पांढरपेशा समाज किंवा घरच्यांचा विरोध असताना केलेली लग्ने यांच्यापुरती मर्यादित राहिलेली आहे. आणि काही वेळा तर लग्न नोंदणी पद्धतीने होते पण नंतरचा स्वागत समारंभ इतक्या दणक्यात होतो की ज्याचं नाव ते. आपल्याकडील लग्नपद्धती हा त्यामुळे ढोंगीपणाचा प्रकार आहे असे वाटू लागते.

सत्यशोधकी विवाह हा याच्यावर उपाय शोधण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. काही गोष्टी अगदी स्पष्ट असायला हव्यात. बहुसंख्यांना विवाह हा संस्कार म्हणून सार्वजनिकपणे केला जावा अशी इच्छा असते. बहुजन समाजात तर ती समाजाची मानसिकताच आहे. तेव्हा लग्न सोहळा करायचाच परंतु अत्यंत साधेपणाने हे सत्यशोधकी लग्नाचे पहिले सूत्र. पारंपरिक लग्न पद्धतीतील ९० हून अधिक खर्च सहजपणे वाचतो असा आमच्या चळवळीचा अनुभव आहे. विवाह सोहळा म्हटला की किमान वातावरण निर्मिती आलीच. छानपैकी सनईची रेकॉर्ड वाजवायला पैसे थोडेच पडतात? विवाहाला आलेल्या सर्वांच्या हातात फुलाच्या पाकळ्या दिल्या तर वातावरणात त्या उधळल्या जात असताना थोडा रोमँटिकपणा येतोच. (तांदूळ वाचतात ते वेगळेच) सगळ्यात जास्त खर्च हॉलचा वा मांडवाचा. सायंकाळच्या वेळी मोकळ्या जागेत विवाहसोहळा घेतला तर तोही खर्च वाचतो. शिवाय ग्रहयोग आणि मुहूर्त यांना तर मुळातच फाटा दिलेला असतो. मंगलाष्टके म्हणणे व संस्कारपूर्वक लग्न लावणे हे नोंदणी लग्नात पूर्ण गाळलेच जाते. परंतु सार्वजनिक सोहळा म्हटल्यावर हा भाग महत्त्वाचा ठरतो. सत्यशोधकी विवाहातील मंगलाष्टके मोठी अर्थपूर्ण आहेत. (आणि नवीनही रचता येतील.) त्यातील एक वराने वधूला उद्देशून, दुसरे वधूने वराला उद्देशून आणि तिसरे उपस्थितांनी दोघांना उद्देशून म्हणावयाचे असते. प्रत्यक्षात सुरेल आवाजात ते कोणी तरी म्हणतो. मंगलाष्टके म्हणणारी व्यक्तीच वधूवरांना शपथ देते किंवा या दोन्हीसाठी वेगवेगळे जणही असू शकतात. परंतु महत्त्वाचे म्हणजे विवाह संपन्न करण्याचे हे काम शक्यतो बहुजन समाजातील स्त्रीने करावे अशी कल्पना आहे. पुरोहित कशाला, असा आक्षेप यावर घेतला जाऊ शकतो परंतु तो लक्षात घेऊनही सध्याच्या विवाह पद्धतीत सत्यशोधकी विवाहाचे एकूण आचरण क्रांतिकारक वाटेल यात शंकाच नाही. स्वत:च्या सामाजिक बांधीलकीची खूण म्हणून आपल्या ऐपतीप्रमाणे वधूवरांनी सामाजिक संस्थांना काही देणगी जाहीर करणे हेही वेगळेपण मोलाचे आहे.

आजच्या काळात अटळ असलेला एक आशय सत्यशोधकी विवाहाला अधिक अर्थपूर्ण जोडण्याचा आमचा प्रयत्न आहे. तो म्हणजे हे विवाह अधिकृतपणे बचत विवाह व्हावयास हवेत. साध्या लग्न -समारंभातून ही उधळपट्टी थांबते. दोन्ही बाजूंचे पैसे वाचतात. पण ते पैसे बहुधा पुन्हा दुसऱ्या ठिकाणी उधळपट्टीत जाण्याची वा फार तर अनुत्पादक सोने घेण्यात गुंतवण्याची शक्यता अधिक असते. एका बाजूला महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले कृष्णेचे पाणी अडविण्यासाठी राज्याकडे पैसे नाहीत म्हणून ५०० कोटी रुपयांचे बॉन्ड काढावे लागतात. तर दुसरीकडे दरवर्षी महाराष्ट्रात १५०० कोटी रुपये विवाहावर उधळले जातात. पूर्णत: अनुत्पादक हौसमौजेसाठी हा केवढा अंतर्विरोध ! विवाह साधेपधाने करावयाचा आणि काही किमान रक्कम तरी वधूवरांच्या नावावर दीर्घ मुदतीच्या ठेवीमध्ये ठेवायची असा प्रयत्न आवर्जून व्हावयास हवा. किसान पत्रात आज गुंतवलेले २५ हजार रुपये या विवाहित जोडप्याचे मूल २१ वर्षाचे होईल तेव्हा चार लाख झालेले असतील. हा हिशेब मांडून दाखवला तर संबंधितांचे चेहरे अविश्वास वाटून काही काळ अवाक् होतात.

विवाह हा संस्कार आहे तर त्याला कालसुसंगत आचारही हवा हे आपण कधी लक्षात घेणार?

♦♦♦

व्रतवैकल्याचा वेगळा विचार

एका उच्चविद्या विभूषित विदुषीच्या घरी जाण्याचा योग आला. अनेक वर्षे वाढूनही झाड अगदी छोटेच ठेवण्याच्या जपानी तंत्रातील बोनसॉयमधील त्या तज्ज्ञ होत्या. मोठ्या उत्साहाने त्यांनी महिती दिली. आपल्याकडच्या कुंड्यामध्ये असलेल्या दहा दहा, बारा बारा वर्षांच्या झाडांचे नमुने दाखवले. एका कुंडीत एक वडाचे झाड होते. मोठ्या वडाची अगदी छान प्रतिकृती होती. त्या अभिमानाने म्हणाल्या. 'हे बघा, याचा आणखी एक फायदा होतो. वटसावित्रीच्या दिवशी वडाचे झाड हुडकत हिंडायला नको. घरच्या घरीच पूजा होते.' आपल्या उच्चभ्रू वस्तीतील अनेक महिला हा पर्याय निवडतात असेही त्यांनी उत्साहाने सांगितले.

वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी मी बाजारात एकदा वडाच्या फांद्यांचा भला मोठा ढीग घेऊन विकत बसलेला माणूस बघितला. ज्या बायकांच्या घराजवळ वडाचे झाड नसेल त्यांनी एक फांदी घरी घेऊन जायची आणि पूजा करावयाची अशी खास सोय होती असे चौकशी केल्यावर समजले.

एकीकडे झाडे लावा, झाडे जगवा याचा जयघोष करायचा, 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे' अशी संस्कृतीची महती गावयाची आणि दुसरीकडे तीच झाडे तोडून त्यांची पूजा बांधायची हा केवळ विरोधाभास नाही तर त्या उच्चविद्या विभूषित महिलेच्या बोनसॉय वडाप्रमाणे स्वत:च्या बुद्धीचेही बोनसॉय झाल्याचे लक्षण आहे.

व्रतवैकल्याबाबत माणसाची आणि विशेषत: महिलांची मने हळवी असतात. व्रतामध्ये धर्माचरण असते. कुलपरंपरा सांभाळण्याचे समाधान असते, जीवनाला एक शिस्त येते, असा समज असतो. यामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्वतंत्र होऊ लागलेली आजची मध्यमवर्गीय सुशिक्षित महिलादेखील व्रतवैकल्यांच्या आचरणाबाबत आग्रही असते. खरे तर झालेले असते ते असे की एका बाजूला परंपरेने संस्कारित झालेले मन आणि दुसऱ्या बाजूला आधुनिकतेची ओढ यामुळे तिची अवस्था एक पाय घरात व एक बाहेर अशी झालेली असते. ती चाकोरीतून बाहेर पडू शकत नाही आणि रूढीपरंपरेच्या आधीन होणे मनाने स्वीकारू शकत नाही.

श्रावणझडीने केवळ सृष्टीच भिजून निघते असे नाही तर सणवार, व्रतवैकल्यांनी श्रावणातील सारे दिवसही भरून गेलेले असतात. नागपंचमी, नारळीपौर्णिमा, श्रावणी सोमवार, शुक्रवार, पोळा, मंगळागौरी, कालाष्टमी, निरनिराळ्या एकादश्या, चतुर्थ्या यांची सुरू झालेली अखंड मालिका चांगली हरितालिका, ऋषीपंचमी, गौरीगणपती, नवरात्र इथपर्यंच चालूच असते आणि खरे तर वर्षभर अधूनमधून गाजत असते. 'आमच्याकडे अजून सगळं पाळलं जातं' असं वरवर अभिमानाने सांगणारी गृहिणी पूजा, सोवळे, दान, दक्षिणा, सवाष्ण, जेवण असे सगळे मेटाकुटीला येऊन उरकत असते. कुटुंब विभक्त असले, बाई नोकरी करणारी असली तर या कार्यक्रमात खूप तडजोडी केलेल्या असतात. पण तरीही सगळी धावपळ उरकून एक घासही न खाता ऑफीस गाठणाऱ्या आणि कामाने थकून भागून संध्याकाळी चिडचिडणाऱ्या बायका हे चित्रही अपवादात्मक नाही.

तरीही हे सण, ही व्रतवैकल्ये पाळण्याचा अट्टाहास का केला जातो? हा प्रश्न "विशिष्ट सोवळेच कशाला नेसायला हवे, सर्वांना निर्माण करणाऱ्या देवाच्या पूजा नैवेद्यासाठी ब्राह्मणच का हवा?" अशा बाबतीतही विचारला जात नाही. मग व्रतवैकल्याचे प्रयोजन खरोखरीच कोणते? असे छेडणे तर दूरच राहिले. आचरणाची नेमकी स्पष्टीकरणे त्यांनाच माहीत नसतात. त्यामुळे इतरांना ते समजावण्याचा प्रश्नच येत नाही. लहानपणापासून रुजलेल्या श्रद्धा, परंपरा कशाला मोडायच्या? एक प्रकारचं मानसिक समाधान मिळते, अडीअडचणीवर मात करायला बळ मिळते, सासरचा मान ठेवायला करावे लागते अशी अनेक उत्तरे दिली जातात.

व्रतवैकल्ये ही शेवटी आपल्या समाजजीवनाशी निगडित आहेत. त्याला काही सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संदर्भ आहेत. दसरा-संक्रांत सारखे सण स्नेहसंबंध वाढवायला उपयोगी पडतात. हरतालिका, मंगळागौरीच्या निमित्ताने थोडा मैत्रिणींचा सहवास, थोडं माहेरपण, थोडी निसर्गाशी जवळीक साधते. शेतीवर आधारलेल्या

जीवनाशी नाते जोडणारे पोळा, नागपंचमी, दिवाळी हे सण आहेत. व्रतवैकल्यांना त्या-त्या काळाचे काही उपयुक्त संदर्भ आहेत. आत्मसंयमाची शिकवण आहे. हे सगळे मानले तर मग त्यात कालोचित बदल करावा हे मानणे का जड जावे? या धार्मिक कर्मकांडांवरचा अनावश्यक सर्व खर्च टाळावा, विषमतेचा संदर्भ सोडावा, त्यांना कालसुसंगत अधिक आशयपूर्ण पर्याय द्यावा असे का करू नये?

महारांना ब्राह्मणांबरोबर पंक्तीत बसवणाऱ्या आणि त्याबद्दल ब्राह्मणांनी वाळीत टाकल्यावर त्याला धैर्याने सामोरे जाणाऱ्या एकनाथाला जर आपण संत मानतो तर घरी भोजनाला व पूजेला ब्राह्मणच का लागावा? स्त्रीला जर स्वतंत्र व्यक्ती म्हणून आपण मान्यता देतो तर सधवा-विधवा, परित्यक्ता या सीमारेषा कशाला? स्त्रीचे सगळे सौभाग्य पती आणि त्याची प्रतीके याच्याशीच निगडित का असावे? या सगळ्या वेळा, दिवस पाळताना मासिक पाळी नसावी यासाठी गोळ्या घेऊन ती पुढे वा मागे ढकलण्याची धडपड कशासाठी?

अनेक सणावारांबरोबर, व्रताबरोबर आपल्या जवळचे काही दुसऱ्याला देण्याचा एक महत्त्वाचा संस्कार अपेक्षित असतो. महात्मा फुल्यांच्यापासून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यापर्यंत सर्वांनी याबाबत पोटतिडिकेने लिखाण केले आहे. आजच्या व्रतआचरणात या गोष्टी निव्वळ उरकल्या जातात. साधे संक्रांतीचे हळदीकुंकू घ्या. बायका वस्तू लुटतात त्या बहुदा उपचार म्हणून, अतिसामान्य निरुपयोगी वस्तू. काही चांगली वस्तू दिलीच, तर ज्यांची ती घ्यावयाची ऐपत आहे, ज्यांच्याकडे ती आधीच आहे वा ज्यांना त्याची अजिबात गरज नाही अशांना दिली जाते. यात कसले औचित्य? तेच पैसे एखाद्या अनाथाश्रमास मदत म्हणून दिले वा गरीब विद्यार्थ्यांच्या फीवर खर्च केले तर? चातुर्मासात किंवा अधिकमास स्त्रिया अनेक नेम करतात. त्यातले बरेचसे दानधर्मातले असतात. एखाद्या गरीब मुलाला रोज वा आठवड्यातून एक दिवस नियमितपणे वर्षभर जेवायला घालीन वा एखाद्या निरक्षर स्त्रीला लिहायला शिकवीन अशा व्रताची आज खरी गरज आहे. अधिक मासात भटजीला वा जावयाला ३३ वस्तूंचे दान करण्याऐवजी तेच पैसे अंधशाळेला देणगी म्हणून का देऊ नयेत? वास्तुशांतीऐवजी आपल्याला मिळालेल्या निवाऱ्याच्या आनंदाप्रीत्यर्थ ज्यांनी आपल्या व इतर अनेकांच्या निवारा उभारणीसाठी हातभार लावले पण ज्यांच्या डोक्यावर कधीच छप्पर आले नाही त्या कष्टकऱ्यांना काही मदत देता येईल. एक सश्रद्ध बाईच्या वाचनात देशातील दारिद्र्याचं वर्णन करणारा लेख आला. त्या वर्षीपासूनच्या नवरात्रात नऊ दिवस तेलाचा अखंड दिवा लावणे तिने थांबवले. गरजू मुलीला सन्मानाने वह्यापुस्तके, शालेय वस्तू देणे सुरू केले. आता तिचे नवरात्र शालेय वर्षाप्रमाणे जूनमध्ये सुरू होते.

व्रत आणि सणाविषयी अत्यंत जागरूक असणारा आपला समाज विशेषत: स्त्रीवर्ग राष्ट्रीय सणाविषयी अत्यंत उदासीन असतो. राष्ट्रीय संपत्तीप्रमाणेच राष्ट्रीय सणांबद्दल आपल्याकडे एकूण अनास्था असते पण एक कुटुंब मला माहीत आहे की

जे २६ जानेवारीला सर्व ओळखीच्या मंडळींना बोलावते. संक्रांतीचाच महिना म्हणून तिळगूळ व साधा साजेसा मेनू करतात. जात, धर्म, सधवा-विधवा, स्त्री-पुरुष असा भेदभाव करण्याचा प्रश्नच येत नाही. छोटेसे स्नेहसंमेलनच होते. राष्ट्रीय सण साजरा करणे, हळदीकुंकू, सत्यनारायण याला पर्याय होतो. आणि एकत्र जमणे कोणत्याही अडसराशिवाय साध्य होते.

हे सारे लिहिण्याबोलण्यापेक्षा आचरणे बरेच अवघड आहे. कारण हा संघर्ष स्वत:पासून सुरू होतो. स्वत:च्याच संस्कारांशी तो झगडा असतो. आजच्या विभक्त कुटुंबपद्धतीतही याला पोषक वातावरण नाही. वाचन करावे, विचार करावा, तर्काच्या कसोटीवर तो घासून, पुसून घ्यावा, त्याचा आचार करण्याचे मानसिक बळ स्वत:मध्ये निर्माण करावे वा कुटुंब, मित्रमैत्रिणी यांच्याकडून मिळवावे. कालबाह्य पुण्यांना छेद देणारी व्रतवैकल्ये वा त्यातील तो तो भाव नाकारावा, असे मुलींच्या जडणघडणीत आपल्याकडे घडतच नाही. मुलांच्यावर हे संस्कार करण्याआधी स्वत:त ते बदल जाणीवपूर्वक घडवावे लागतात; ही बाब अवघड असते हेही एक कारण आहे. याबरोबरच बुद्धीला पटत नाही म्हणून एखाद्याच्या श्रद्धा विचारांची, त्याबरोबर जोडलेल्या कर्मकांडांची टिंगलटवाळी करणे कटाक्षाने टाळावयास हवे. भावनिक गुंतवणूक झालेले सश्रद्ध धार्मिक विचार आणि त्यांचे आचरण आणि प्रामाणिक खुली चिकित्सा व त्या आधारे कृतीचा आग्रह यांच्यातील मानसपरिवर्तन हा शुष्क कोरडा बौद्धिक विचार नसतो, तर संवेदनाशील जीवन व्यापाराशी संबंधित व्यवहार असतो याचे भान बाळगावे लागते. सुधारणेचे घरातून सुरू होऊ शकणारे पहिले पाऊल म्हणून त्याकडे बघावे, बघता येते.

♦♦♦

होकार देणारा नकार

काही जण हिणवतात तर काही टोमणे मारतात.

'ही कसली तुमची चळवळ? दोन अक्षरांची, एका शब्दाची, एकाच पालुपदाची.'

'भूत' नाही.

'अंगात येतं?' नाही.

'चमत्कार?' नाही.

'मंत्रशक्ती' नाही.

'फलज्योतिष?' नाही.

'वशीकरण विद्या?' नाही.

'जारण मारण?' नाही.

तेव्हा थोडक्यात काय?

'आम्हाला कळलं काहीच नाही, आता आम्हांला तुमचीपण गरज नाही.' अशा मल्लीनाथीने हा उपहास पूर्ण होतो.

याचाच दुसरा भाग म्हणजे लोक रागारागाने विचारतात. 'फार शहाणे समजता तुम्ही लोक स्वत:ला. तुम्हाला तरी आहे सगळी अक्कल?'

आम्हाला म्हणजे कोणा अ, ब, क व्यक्तीला नव्हे तर ज्याच्या आधारावर आमची चळवळ चालते त्या विज्ञानाला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला.

लक्षात घ्या. सगळे मला कळलेच हा मुळी विज्ञानाचा दावाच नाही. खऱ्या वैज्ञानिक जाणिवा बाळगणाऱ्याला तो कधीही करता येत नाही.

विज्ञान काय करते? एका सुसंगत पद्धतीने तपासणी करते. प्रथम निरीक्षण-जसे जेम्स वॅटने वाफेच्यामुळे उडणाऱ्या चहाच्या किटलीच्या झाकणाचे केले.

मग तर्क आणि अनुमान– जसे धूर दिसला की तर्काने जाणता येते त्या ठिकाणी अग्नी असेल. प्रत्यक्ष बघायलाच हवे असे नाही. तिसरी पायरी प्रयोगाची, आणि चौथी त्याच्या सार्वत्रिक सत्यतेची. म्हणजे असं की पाणी शंभर डिग्रीला उकळते याचा प्रयोग करायचा आणि दिल्ली, लंडन, न्यूयॉर्क, मॉस्को इथेही तसेच घडते हे अनुभवायचे परत परत प्रयोग करून!

या सगळ्या पायऱ्यांमधून टिकलेल्या वस्तुस्थितीचा सिद्धांत बनवायचा. तोही तोपर्यंतच टिकवून ठेवायचा जोपर्यंत नवी माहिती तो खोटा ठरवत नाही. याचा अर्थच असा की, सर्वज्ञतेचा दावा विज्ञान कधी करतच नाही. फार तर फार, या घडीला सगळ्यात अचूक काय एवढेच ते सांगते. ते नम्र असते. स्वत: चुकण्याची, त्यातून शिकून बदलण्याची शक्यता ते गृहीत धरते. न्यूटनच्या मर्यादा आईनस्टाईनने शोधून काढल्या म्हणून दोघांच्या अनुयायात युद्ध होत नाही आणि आईनस्टाईनला आव्हान देणारे कोणी निघाले तरी त्याचे स्वागत होते.

'मला तपासावयाचे नाही. माझा शब्द हा शेवटचा, त्यावर शंका नकोत, तो पाखंडीपणा आहे. अंतिम सत्य मला समजले आहे; अंतिम ज्ञान गवसले आहे. तुम्ही निमूटपणे मम म्हणून आचरण करायचे' हा सारा दावा धर्माचा असतो. धर्म कधीही नम्र नव्हता आणि नाही. विज्ञानाचे वैशिष्ट्य नेमके याच्यापेक्षा वेगळे असते.

विज्ञान डोळसपणे तपासते.

जे समजले नाही त्याचा शोध नम्रपणे चालू ठेवते. मात्र जे तपासून सिद्ध झाले आहे त्या आधारेच ठामपणे व्यवहार करते.

पाप झाले म्हणून बिहारातील प्रचंड भूकंप झाला असे महात्मा गांधी का म्हणोनात, ते नाकारावेच लागते; नाकारले जाते.

या विचाराच्या भरभक्कम पायावर काय दिसते?

'भूत?' नाही, तो गंभीर मानसिक आजार आहे वा भ्रम आहे.

अंगात येणे?' नाही, ते मानसिक असंतुलन आहे.

'चमत्कार?' नसतोच. ती असते बदमाशी.

'मंत्रशक्ती?' अस्तित्वात नाही आणि कुणाचा दावाच असेल तर त्या शक्तीने जेवणाच्या ताटातील साधा पापड मोडून दाखवणाऱ्याला आमचे पाच लाखांचे आव्हान आहेच!

'फलज्योतिष?' एक रिझवणारी कला. नाहीतर मात्र दिशाभूल.

'वशीकरण विद्या?' वेगळ्या संमोहित मनोवस्थेमधील कोणताही गूढपणा नसलेले आविष्कार.

'जारण मारण?' एक थोतांड. मूठ मारून कुणी रक्त ओकायला लावत असेल तर त्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील शेकडो कार्यकर्ते तयार आहेत.

या साऱ्याचा अर्थ काय?

अर्थ एकच.

जे नाही हे नाहीच असे आमची चळवळ ठणकावून सांगते. त्याबाबत तपासण्यासाठी निर्भयपणे उभे राहते. ते तसे नाही म्हणून त्याला फाटा द्या, असा प्रचार उच्चरवाने करते.

आम्ही नाही म्हणतोच.

पण आमचा ठाम नकार हा विज्ञानाचा डोळस होकार असतो.

♦♦♦

धर्मश्रद्धा की अंधश्रद्धा

सकाळपासून चिवरीच्या यात्रेचा नूर वेगळाच होता. अनेक जण गेले काही दिवस अथकपणे झटत होते. त्याला यश येणार असे दिसत होते. दरवर्षी यात्रेच्या दिवशी लक्ष्मी आईच्या समोरच्या पटांगणात धारदार सुरे चालायचे, शे दोनशे रेडे, पाच-सात हजार बकऱ्या, दहा हजार कोंबड्या यांच्या रक्तमांसाचा चिखल व्हायचा. यंदा यातलं काहीच नव्हतं. चपाती, भात, गूळ, नारळ यांची ताटं घेतलेली रांग संथपणे देवीच्या दर्शनाला पुढे सरकत होती. कार्यकर्त्यांनी खेडोपाडी केलेला प्रचार, लोकप्रतिनिधींचे साह्य, मंदिराचे विश्वस्त, गावची पंचमंडळी यांचा समंजसपणा, शासनाची कणखर भूमिका या साऱ्याचा मेळ बसला होता.

वातावरणात अस्वस्थता होतीच. पशुहत्या वगळता बाकीच्या अंधश्रद्धांचा उदंड

जल्लोषही होता. देवासमोरच्या मैदानात अंगात आलेले स्त्री-पुरुष घोळक्या घोळक्याने घुमत होते. वय विसरून सोळापासून साठ वयापर्यंतच्या बायका बेभानपणे केस मोकळे सोडून आळोखे पिळोखे देत होत्या. अंगात आलेले तरणेताठे त्यांच्यामध्येच उड्या मारत, हुंकारत होते. अंगचट हा शब्दही अर्थहीन होता. तोंडाला शेंदूर फासलेली आणि हातात देवीचा आसूड घेतलेली पोतराजाची फौजही बेहोशी वाढायला शक्य तेवढा हातभार लावत होती. धुळीने भरलेल्या माळावर लोळण घेत नवस फेडण्यासाठी त्या फुफाट्यातून, तळपत्या उन्हातून बायका-पुरुष देवळाकडे सरकत होते. यात्रेकरू बाजूला सरकून त्यांना वाट देत होतेच पण वाकून हातही जोडत होते. देवीला सोडायला आणलेले रेडे गळ्यात माळा आणि अंगावर रंगीत कपडे घालून मिरवीत चालले होते. भाविक त्यांनाही हात लावून नमस्कार करून पुण्य गाठी बांधत होते.

तरीही देवळासमोरचे बळी तरी थांबले यावर काही समाधानी होते. अनेक जण आणलेले प्राणी घेऊन जत्रेतून घराकडे माघारी वळताना दिसत होते. पसरलेल्या माळावर काही ठिकाणी डोळा चुकवून सत्तूरी परजल्या जाणार हे यंदाच्या वर्षी आम्ही गृहीतच धरले होते. त्यासाठी तर 'ग्यानबा तुकाराम, बोकडाचं काय काम?' अशा घोषणा देत तरुणांचे पथक साऱ्या माळावर फिरत होते.

दुपारचा १ वाजला आणि जयशिवाजी - जयभवानीच्या घोषणा देत शंभर एक जणांचा जथा मंदिरासमोर आला. त्यांच्या म्होरक्याने हातात कोंबडं धरलं होतं. कायद्याने पशुहत्या मनाई केल्याचा फलक पोलिसांनी लावला होता. कायद्याची ऐशीतैशी म्हणत बळी देण्याचा हक्क बजावणारच असा आग्रह त्याने धरला. पोलिसांचा विरोध. ताण वाढला. अंगात येऊन घुमणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आणि अघटित घडले, ज्याने सरकन अंगावर काटाच उभा राहिला. बेभानपणे नाचणाऱ्या एका पोतराजाने बळी द्यायला आणलेली कोंबडी खस्सकन ओढून आपल्याकडे घेतली आणि तिची मान काकडीसारखी दाताखाली घातली, नाचत नाचत ती मान दाताने चावून कचाकचा तोडली. कोंबडीचे धड भिरकावून दिले. रक्त निथळणारा मानेचा डोक्याकडील भाग तोंडात तसाच धरून ठेवला. या बहादुरीने हिंदू धर्माचा विजय झाल्याचा जल्लोष सुरू झाला. डोक्यावर उचलून म्होरक्याची व त्या पोतराजाची मिरवणूक निघाली. त्यांच्या अंगावरच्या कपड्यांवर रक्तात भिजलेल्या हाताचे पंजे उठवले गेले.

दुसऱ्या दिवशी गावात जत्रेचे नाटक झाले. त्याआधी जळजळीत भाषणे झाली. बळी प्रथेचा अभिमानास्पद हिंदुधर्मीय वारसा पुढील वर्षी पुन्हा जोमाने सुरू करून धर्माची मान उंचावण्याची भाषा झाली. आदल्या दिवशी सत्याग्रहात असणाऱ्यांना दुसऱ्या दिवशी रात्री ठरवून ठोकण्यात आले. जखमा झाल्या. हाडे मोडली. वाहने पेटवून देऊन जाळण्यात आली.

स्वाभाविकच आहे. देव, धर्म, श्रद्धा व त्यांचे पालन याबाबत सध्या लोक फार

जागरूक बनले आहेत. संवेदनशील झाले आहेत.

पण खरा धर्म कोणता? आणि खोटा कोणता?

रसदार गाभा कोणता? आणि शुष्क टरफल कोणते?

अभिमान कशाचा बाळगायचा? दुराभिमान कशाचा सोडायचा? धर्मातील चांगल्या भागाचा आग्रह बाळगताना सरसकट अभिनिवेशाची भूमिका हितकारक का अहितकारक? खरेतर या साऱ्याची फार चांगली उत्तरे संतांनी, समाजसुधारकांनी देऊन ठेवली आहेत. 'तीर्थे धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी' असे तुकोबा उगाच नाही म्हणाले. कर्मकांड, उपासतापास, मंत्रतंत्र या साऱ्या पलीकडे जाणाऱ्या मानवता धर्माचा पुकारा सर्व धर्मातील संतांनी केला आहे.

पण हा झाला खूप दूरचा आदर्श. जेथे धर्माची सारासार विवेकाशी फारकत होत असेल तेथे काय करायचे असा रोकडा प्रश्न आज अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसमोर आहे.

ग्रामदेवतांच्या यात्रा हा ग्रामीण भागातील सांस्कृतिक, धार्मिक आविष्कार. समुदायाच्या आनंदाचा, भाविकतेचा सोहळा, पण त्यातील अनेक यात्रा-जत्रांत जे प्रकार घडतात त्याने धर्मकल्पना उन्नत होते की अवनत? महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची मान ताठ होते की शरमेने खाली झुकते? आणि तरीही लोक अट्टाहासाने त्यालाच धर्म समजून कवटाळत असतील तर आमची चळवळ कुठवर पुरी पडणार? सुजाण नागरिक, समाज, शासन यांनी याबाबत भूमिका घ्यावयास हवी की नको?

मौजे न्हावी, ता. भोर, जि. पुणे येथे यमाई देवीची यात्रा भरते. प्रामुख्याने चर्मकार समाजाची ही यात्रा. मोटारसायकली, जिप्स, प्रिमियर, मारुती अशा वाहनांतून गर्दी करून लोक येतात. बहुतेक जण नोकरदार, मुंबई, पुण्याला वा सातारा जिल्ह्यातून शिरवळ, लोणंदला राहणारे, सुस्थितीत असलेले. ही सारी डोईफोडे अडनावाची मंडळी असतात.

भांबुर्डे, ता. भोर येथील गुरव जातीचे रामचंद्र आनंद गुरव हे प्राथमिक शिक्षक तेथील धार्मिक कृत्याचे पुजारी आहेत. त्यांच्या जोडीला हडपसरला कंपनीत कारागीर असलेले त्यांचे बंधू पण असतात.

धार्मिक विधीसाठी डोईफोडे मंडळी जुने दोन व नवे दोन वस्तरे श्री. गुरव यांना देतात. अनेकदा जुने ते सोने या न्यायाने जुनाच वस्तरा चांगला आहे व मानाचा आहे असे ठरवण्यात येते. त्या जुन्या काळपट गंजलेल्या वस्तऱ्यास राख, हळद, कुंकू लावले जाते. नंतर कोणत्या गावाचा प्रथम मान ते ठरते. या गावातील व्यक्तीपासून वस्तऱ्याने डोक्यावर चीर मारून रक्त काढण्याचा विधी चालू होतो. याला डोके फोडणे असे म्हणतात. एकेका वस्तऱ्याने ५०-६० लोकांच्या डोक्यावर चीर मारण्यात येते. रक्तामध्ये बुडलेला तोच वस्तरा बिनधास्तपणे पुन्हा-पुन्हा वापरण्यात येतो. कपाळावर मारलेल्या चिरेतून येणारे रक्त चेहऱ्यावरून वाहण्याच्या अवस्थेत प्रत्येक जण देवालयात पाच फेऱ्या मारतो. काही जणांच्या कमरी खोल

जखमेतील रक्त लवकर गोठते. काही जणांच्या जास्त खोल जखमांचे रक्त चेहरा माखून छातीवरून धोतरावर पडते. वस्तरा मारून चीर पाडून घेणाऱ्या व्यक्तीच्या घरातील स्त्री पंचारतीचे ताट घेऊन फिरत असते. (केवढा पराक्रम केला! पंचारती नको ओवाळायला?) कधी-कधी रक्त पाहून तिलाच चक्कर येते. न गोठलेल्या रक्तावरती श्री. गुरव राख व हळद यांचे मिश्रण फासतात.

भोगवली, ता. भोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एम.पी. शिवशरण हे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाबाबत तळमळ व आस्था बाळगणारे. त्यांनी लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. राख लावून वस्तरा वापरण्यातले धोके सांगितले. एडस्‌बद्दलही ते बोलले. काहींना काहीसे पटले. काहींनी वाद घातला. विशेष म्हणजे एडस् संशोधन मुंबई शाखेत काम करणारा एक सुशिक्षित भक्त निर्जंतुकरणाच्या विरोधात बोलत होता. गुरव गुरुजी तर ऐकून घेण्याच्या मन:स्थितीतच नव्हते. त्यांचा एकच ठेका, 'तुम्ही हे सारे डोईफोडे मंडळींना सांगा, मला नको.' डॉक्टर शिवशरण त्यांना म्हणाले, "आपण त्या मंडळींचे गुरू आहात. शिवाय पुणे जिल्हा परिषदेत शिक्षक. आपण समजून घ्यावयास हवे. निदान जे काही करता त्यात आरोग्याची कमीत-कमी हानी होईल हे पाहणे तर तुमचे कर्तव्य नाही का?" त्यावरचे त्यांचे उत्तर असे, "अहो साहेब, तुम्ही हे काही सांगू नका. आमचे पूर्वज संपूर्ण गळा कापून देवापुढे ठेवत. डोकं नसलेल्या धडाला इतरांनी पाच फेऱ्या मारून आणल्या ही आम्ही ते पुन्हा धडावरती चिकटवत असू. पण इंग्रजांची नजर पडल्यामुळे आमच्या पूर्वजांचे सामर्थ्य कमी झाले."

वर्षानुवर्षे ही प्रथा चालू आहे भाविक 'डोईफोडे' समुदायात असलेले समाजकल्याण अधिकारी, हायस्कूल शिक्षक, अधिकारी वर्ग १ (सर्जन) अशी मंडळी भक्तिभावाने उघड्या (!) डोळ्यांनी हे सारे पाहत आहेत.

सातारा-पुणे या जिल्ह्यांत अनेक गावांच्या जत्रा–यात्रांत 'बगाड' मानाने मिरवले जाते. बगाड म्हणजे काय? एका सरळसोट खांबावरच्या टोकाला बांधलेला छोटा आडवा दांडा. हे सगळे सांगाडे बैलगाडीवर बसवलेले. बैलगाडीला शर्यतीसाठी तयारी करून घेतलेल्या बैलांच्या जोड्या बांधलेल्या, नवस केलेल्यांपैकी ज्या भाग्यवानाचा नंबर निघतो तो बगाडाचा मानकरी; यात्रेच्या आदल्या दिवशी उपास करतो. यात्रेच्या दिवशी सूर्योदयापूर्वी नदीत अंघोळ करतो. मग त्याला उंच बगाडाच्याा आडव्या दांड्याला बांधतात. चांगभलाच्या गजरात बैलगाडी पळविली जाते. रानाशेतातून धोंड्यादगडातून जाते. गावातले प्रतिष्ठित मानाचे म्हणून बैलगाड्यावर पुढे बसलेले असतात. उंच खांबाच्या वरच्या टोकावर बांधलेला भक्त हेलकावे खात असतो. सूर्यास्तापर्यंत गाडा इष्ट स्थळी पोचतो. तोपर्यंत त्याचे काय होत असेल? या साऱ्यातून देवाची उपासना कशी होते? असा प्रश्न चर्चेला जरी उपस्थित केला तरी खवळून अंगावर येतात. वाचकांच्या पत्रव्यवहारात बगाडाविरोधी पत्र आले तर त्या माणसाचे घर शोधत संतप्तपणे हिंडतात. दोन वर्षांपूर्वी शेतातल्या चिखलात गाडा

रुतला, कलंडला. एक माणूस मृत्यूमुखी पडला. लोक म्हणाले, "पथ्यपाणी मोडलं असणार. मटण-दारू खाल्ली असणार. त्याची शिक्षा मिळाली." ब्रिटिश सरकारने बगाडाविरोधी कायदा केला, त्याच्या शोधात आम्ही होतो. एका गावाने आम्हाला सुनावले, "लई शहाणपणा करू नका. पोलिस काय करतील, गोळ्या चालवतील? आमचा समाजपण दहा पंधरा हजार असतोय. आम्ही बघून घेऊ."

नगर जिल्ह्यात गोदातीरावर संवत्सर व कोकमठाण खेड्यात दरवर्षी अक्षयतृतीयेपासून पाच दिवसांचे गोफण गुंड्याचे युद्ध आजही खेळले जाते. त्यासाठी काही पौराणिक कथेचा आधार घेतला जातो. वैशाख शुद्ध अक्षयतृतीयेच्या दिवशी भल्या सकाळपासून सहस्रावधी भाविक व योद्धे आपापल्या देवतांची करुणा भाकून तयार होतात. दुपारपासून संवत्सर आणि कोकमठाण या पंचक्रोशीतून योद्धे पारंपरिक शस्त्रांच्या साहाय्याने शेकडो वा हजारोंच्या संख्येने सशस्त्र दाखल होतात. त्या-त्या गावाचा सर्वात वृद्ध सेनापती मानला जातो. त्याच्या हातात ध्वजा दिली जाते. हातात काठ्या, कुऱ्हाडी, ढाली, गोफणगुंडे याबरोबरच माणसाला तत्काळ जखमी करणाऱ्या ५ ते ७ फूट लांबीच्या अणकुचीदार लवंगी काठ्या असतात. गोदावरीच्या विस्तृत पात्रात उभय बाजूंचे योद्धे खडे होतात. मधला पाण्याचा प्रवाह ही युद्धरेषा मानली जाते. थोड्याच वेळात डफ, ढोल, तडतमाशा, पिपाण्या, धोधाणे या रणवाद्यांचा गजर होतो. लक्ष्मीआई, म्हसोबा यांच्या जयजयकारांनी वातावरण भरून जाते. दगडधोंड्यातून भरलेल्या गोफणीतून हल्ले, प्रतिहल्ले सुरू होतात. 'हाणामारा' असा आवाज कानावर येतो. १७ वर्षांच्या मुलापासून ते ८० वर्षांच्या वृद्धापर्यंत गावातले सर्व जण या पाच दिवसांत लढाईत भाग घेतात. प्रत्येकजण किमान पाच दगड तरी फेकतोच. जखमी योद्ध्याला खांद्यावर उचलून आपापल्या ग्रामदैवतासमोर नेऊन ठेवले जाते. पाच दिवसांत ८ ते १० हजार जण यामध्ये भाग घेतात. अनेक योध्यांचे हातपाय, डोके, डोळे जबर जखमी होतात. परंतु युद्धकाळात डॉक्टरी उपाय वर्ज्य असतो. ग्रामदैवताचा धावा करून जखमेवर उदी, अंगारा मंत्रून लावला जातो. फार तर हळदमीठ लावून परमेश्वराची करुणा भाकली जाते. या उपायांनी जखमी बरा होतो अशी भावना आढळते. हे युद्ध जर खेळले नाही तर गावावर अरिष्ट येते. पीक, पाणी नष्ट होते, रोगराई वाढते अशी श्रद्धा या धार्मिक भावनेने खेळल्या जाणाऱ्या युद्धामागे आहे. ही लढाई पाहण्यासाठी महाराष्ट्रातून खूप माणसे येतात.

हे युद्ध थांबवण्याचे प्रयत्न खूपदा करण्यात आले असे सांगतात. इंग्रजांच्या राजवटीत घोडेस्वार पोलिसांनी केलेला प्रयत्नही अयशस्वी झाला.

महाराष्ट्रातील या स्वरूपाच्या प्रकारांची यादी आणखीही वाढवता येईल. माझ्यापुढे भलेमोठे प्रश्नचिन्ह आहे, ही धर्मश्रद्धा कशी? या साऱ्या आचरणातून देवाची पूजा, धर्माची उपासना, परंपरेचे पावित्र्य यांची जोपासना होते काय? यात 'गर्व से कहो' असे काय आहे?

— धुळीने भरवून घेत जमिनीवर लोळण घेत जाणे व अशा व्यक्तीच्या पाया पडणे हा धर्म?
— बेभान बेहोषपणे अंगावरच्या वस्त्राचे भान न बाळगता तासन्तास घुमत राहणे हा धर्म?
— दाताने कोंबड्याची मान चावून त्याला मोक्ष देणे हा पुरुषार्थ?
— बळीच्या प्रथेपायी कर्जबाजारी होणाऱ्या भक्तांना त्याबाबत प्रबोधित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना होणारी मारहाण हा जाज्वल्य धर्माधिमान?
— देवाला खूष करण्यासाठी मुक्या प्राण्यांची समारंभपूर्वक केली जाणारी हत्या हे धर्माचे जपण्याचे रूप की टाकण्याचे रूप?
— देव मानण्याचे, धर्मपालनाचे स्वातंत्र्य संविधानानेच सर्वांना दिले आहे परंतु एखाद्या जीवाची हत्या करून वा एखादे अघोरी कृत्य करून देव प्रसन्न होतो ही कल्पना आदिमानवाच्या कल्पनाविश्वाशी जवळीक सांगते की आधुनिक मानवाच्या?
— पुराणकाळात यज्ञात सरसकट होणारी पशुहत्या पुढे थांबली. यज्ञ होत राहिले ही धर्म कल्पनेची प्रगती की परागती?
— वस्तऱ्याने कपाळ चिरून घेणे हे धर्माचरण? बगाडाला लटकून घेणे हा मुक्तिमार्ग? गोफणगुंड्यांचे युद्ध ही धार्मिक संस्कृती?

स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना, चळवळी यांना या प्रकाराबाबत वाटते तरी काय? श्रद्धा तपासल्याच नसत्या तर माणूस बदलला असता काय? नरबळी हा एकेकाळी पवित्र धार्मिक विधीच होता ना? मानवाच्या प्रगतीचा इतिहास हाच मुळी श्रद्धा तपासण्याचा इतिहास आहे. धर्मश्रद्धा तर सर्व श्रद्धांचे मूळ. ती तपासावयास नको का? कालसुसंगत आचार-विचाराने बदलावयास नको का?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिल्ली येथील आपल्या २३ जून १९५६ च्या भाषणात म्हणाले होते, "धर्माची परीक्षा करून त्याची तपासणी करता आली पाहिजे. बाजारात सराफाच्या दुकानी आपण सोन्याचा दागिना खरेदीसाठी जातो, तेव्हा तुम्ही काय करता? तुम्ही हे पाहता, की हे सोने खरे आहे की खोटे? हे समजण्यासाठी कसोटीवर त्या दागिन्याला कस लावून पाहण्यात येतो. तसेच धर्माला कस लावून त्याची परीक्षा पाहिली पाहिजे. धर्मतत्त्वाची छाननी करून सिद्धांत आणि व्यवहार पडताळून आपण पाहू या की कोणता धर्म माणसाला सुख, समाधान देऊ शकेल? सोने कसोटीवर खरे उतरल्याशिवाय विकत घेत नाहीत. तसेच धर्मदेखील मानवाला उपयोगी आहे की नाही या कसोटीवर घासून, पारखून पाहिला पाहिजे. जोपर्यंत धर्माची अशी परीक्षा होत नाही तोपर्यंत स्वीकारणीय ठरत नाही. उलट अशा वेडगळ कल्पनांनी देश भिकेस लागला आहे."

कर्जबाजारी होऊन खरोखरच भिकेस लागलेल्या आपल्या देशाने, समाजाने

आज तरी आपला उत्साह, श्रम, वेळ, पैसा कशासाठी वापरायचा याचा सारासार विचार व आचार करणे हेच खरे धर्माचरण नव्हे काय?

पण त्यासाठी तयारी हवी, वर उल्लेखलेल्या अग्निपरीक्षेची.

ती तयारी तर दूरच राहिली, पण साध्या तपासणीलाही जी श्रद्धा नकार देते ती अंधश्रद्धा म्हणावयाची की धर्मश्रद्धा?

'गर्व से कहो' वाल्यांनी याचे प्रामाणिक उत्तर द्यायलाच हवे.

♦♦♦

अंधश्रद्धेची आणीबाणी?

सर्वात खतरनाक अंधश्रद्धा कोणती?

झपाटलेले भूत उतरवण्यासाठी महिलेला होणारी मारहाण? नियतीच्या कल्पनेने माणसाला पछाडून टाकणारे फलज्योतिष? घरदार, शेजारीपाजारी यांना संत्रस्त करून सोडणारी भानामती? कुमारिकांचा उपभोग घेणारी बुवाबाजी?

अंधश्रद्धा वाईटच. भूत, भानामती, बुवाबाजी करणे, ज्योतिष या साऱ्या बाबी घातकच. परंतु त्याहीपेक्षा विषारी असे अंधश्रद्धेचे रसायन कोणते?

ते आहे धर्मश्रद्धेला निखालस अंधश्रद्धा बनवण्याचे.

माणसाचे सर्वाधिक वेगळेपण म्हणजे त्याची विवेकबुद्धी. आपल्या भोवतालच्या वातावरणाशी, मानवासह अन्य प्राणिमात्रांशी, निसर्गाशी कोणते वर्तन इष्ट, रास्त, योग्य, उपकारक आणि कोणते अनिष्ट, अयोग्य, अहितकारक याचे भान माणूस बाळगतो. त्याप्रमाणे वर्तन करण्याचा प्रयत्न करतो. धर्मश्रद्धा ज्या वेळी अंधश्रद्धा बनवली जाते त्या वेळी हे भान सुटते. माणसाचा मूल्य विवेक गमावला जातो, ही लागण समाजाला होते. समाज भ्रमिष्ट झाल्यासारखा व अंधळेपणाने वागू लागतो. परंतु अशा अवस्थेत व्यक्ती वा समाज करत असलेल्या वर्तनाच्या विरोधात ब्र उच्चारलेलाही त्याला चालत नाही. मग विरोध करणे तर दूरच राहिले. धर्मश्रद्धेचा पगडा असतोच तसा जबरदस्त.

दाऊदी बोहरा या मुस्लिम पंथाचे उदाहरण घ्या ना.

भारतातील दहा लाखांहून अधिक बोहरा व्यक्तींवर त्यांच्या सय्यदनांची (सर्वोच्च धर्मगुरू) एकाधिकारशाही चालते.

अस्मा ताहेर बारावीच्या परीक्षेत राज्यात सर्वप्रथम आलेली औरंगाबादची विद्यार्थिनी. तिचा कल वैद्यकीय शाखेकडे. परंतु 'सय्यदनां'नी परवानगी दिल्याशिवाय ती

वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकली नाही. जुलेखाची कहाणी हृदयद्रावकच. जन्मत:च हृदयात काही दोष होता. मात्र त्याबाबत ऑपरेशन करावे की नाही यासाठी 'सय्यदनां'कडून परवानगी मिळविण्यासाठी तिच्या आईवडिलांनी तब्बल ३५ वर्षे प्रयत्न केला. शेवटी तिचा मृत्यू झाला. तोपर्यंत ऑपरेशनची परवानगी काही आली नाही. मुंबईचे शेरीफ फकरूद्दीन खोरकीवाला यांना शेरीफ पद स्वीकारतानाही धर्मगुरूंची परवानगी लागलीच. मुंबईच्या मर्कंटाइल बँकेत आबिदा, वखारीया या बोहरा भगिनी नोकरी करतात. व्याज घेणे मुस्लिम धर्माप्रमाणे पाप असल्याने अशा 'पापी' ठिकाणी असलेली नोकरी सोडून देण्याचे त्यांना फर्मान निघाले. नोकरी सोडली की जगायचे कसे? सय्यदनासाहेबांनी एक तोड काढली. पापविनाशासाठी धर्मगुरूंना देणगी देण्याची. बाईंनी लगोलग रक्कम भरून पापमुक्तीचा परवाना हासिल केला. दोधांचाही फायदा– बाईंची बँकेतील नोकरी कायम आणि पापाची भीती नाही. धर्मगुरूंनाही चैन करायला पैसा उपलब्ध. परंतु एवढ्यावरच सगळ्यांचे भागते असे नाही. भाईसरीया यांना बँकेत नोकरी होती. पण हा पापी धंदा करणाऱ्या बापाच्या मुलींचा विवाह सय्यदन यांनी अडवला. तो मिळविण्यासाठी श्री. सरीया यांना नोकरी सोडावी लागली. पण तेवढ्यावरही सय्यदनासाहेबांचे समाधान झाले नाही. इतकी वर्षे पगार खाल्ल्याबद्दल सय्यदनांनी दहा हजार रुपये दंड मागितला आणि तो भरल्यावरच विवाहाला परवानगी दिली.

धर्मगुरू बोहरा समाजावर अक्षरश: सरकारप्रमाणे राज्य करतो. सय्यदनासाहेब सात प्रकारचे कर दाऊदी बोहराकडून वसूल करतात. धर्माच्या नावाने त्यांच्या खजिन्यात करवसुली करून दरवर्षी वीस कोटी रुपये जमा होतात. गरिबातल्या गरीब बोहरालाही वार्षिक चारशे रुपयांची जकात धर्मगुरूंना द्यावीच लागते. श्रीमंत बोहरा लक्षावधी रुपये देतात. प्रत्येक बोहरा व्यक्तीला आपल्या उत्पन्नाचा अडीच टक्के हिस्सा जकात रूपाने धर्मगुरूंच्या खजिन्यात जमा करावाच लागतो, त्याखेरीज ईदच्या मुहूर्तावर मशिदीच्या देखभालीसाठी 'साबील' कर भरावा लागतो. मरणानंतर दफनभूमीत सात बाय तीन फूट आकाराच्या जागेसाठी धर्मगुरू मागतील तेवढे पैसे भरावे लागतात. आणि नंतर थेट स्वर्गातच जागा मिळावी यासाठी 'हुकूमनाफ' म्हणून पैसे घेतले जातात ते वेगळेच. विवाह करण्यासाठीही धर्मगुरूंची परवानगी लागते आणि धर्मगुरूंच्या हाताचे प्रेमाने चुंबन घ्यावयाचे तरी दाम मोजावे लागतात. हे कर प्रत्यक्षात इस्लामने सांगितलेले नाहीत तर धर्मगुरूंनी आपल्या अनुयायांचे शोषण करून त्यांना ताबेदार बनविण्यासाठी तयार केले आहेत. विशेष म्हणजे धर्मगुरूंनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध बोहरांना कुठल्याही न्यायालयात दाद मागता येत नाही. समाजातील करोडपती व्यापारी धर्मगुरूपुढे गुलामासारखे वागतात. बोहरा समाज हा भारतात राहत असला तरी हा समाज म्हणजे भारताच्या पोटातले सय्यदनांचे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रच आहे. तेथे भारतीय कायदे चालत नाहीत. या सगळ्याला आधार असतो तो अर्थातच अंधश्रद्धेचा. अशा ठिकाणी स्वाभाविकच धर्म ही

अंधश्रद्धेची बेडी बनली नाही तरच नवल.

हजारो पंथ आणि जातींमध्ये आपला भारतीय समाज विभागला आहे. आपापल्या पंथ जातींमधील रूढी परंपरांच्या साखळदंडात तो जखडलेला आहे. आदिवासी समाजात व भटक्या विमुक्त जाती-जमातींत आजही सामाजिक व धार्मिक रूढी-परंपरा याच बलिष्ठ असतात, सर्वश्रेष्ठ असतात. त्यांच्यासमोर निमूटपणाने वाकावे लागते आणि त्यांच्या आदेशाप्रमाणे वागावे लागते. त्यांच्या विरोधात बोलायला हवे तर असते पण शक्य तर नसते. कारण अंधश्रद्धेचे उघड समर्थन करणाऱ्या त्या रूढी, परंपरा धर्मश्रद्धेचा भाग बनतात; व्यक्तीला पवित्र व संरक्षक वाटू लागतात.

परंतु हे तर तुलनेने सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेले जनसमूह; शीख समाज हा धडाडीचा, उद्यमशील, सुशिक्षित, जगभर पसरलेला. त्याची काय स्थिती?

सर्वोच्च पवित्र असलेल्या सुवर्णमंदिरात बसलेले शीख धर्मगुरू फर्मान काढतात.

(माजी) मुख्यमंत्री बर्नाला, (माजी) केंद्रीय गृहमंत्री बुटासिंग अमुक तमुक कारणाने दोषी आहेत. त्यांना धर्मबहिष्कृत करून शिक्षा ठोठावण्यात येत आहे. शिक्षा कोणती?

— स्वत:च्या गळ्यात फलक अडकवावा की मी महापापी आहे.

— लंगरमधली भांडी घासावीत.

— गुरुद्वाराची फरशी पुसावी.

— लोकांचे जोडे साफ करावेत.

असे पाच गुरुद्वारांत पाच आठवडे करावे. त्यानंतर धर्मपीठासमोर हजर राहावे. पुन्हा धर्मप्रवेश करू देण्याचा अर्ज करावा. विचार केला जाईल.

हे सारे कशाकरता? धार्मिक प्रमादाकरता नव्हे तर मुख्यमंत्री वा केंद्रीय गृहमंत्री म्हणून जे काही प्रशासकीय निर्णय राबवले ते धर्ममार्तंडांना चुकीचे वाटतात म्हणून.

निमूटपणे ही शिक्षा का भोगली जाते?

कारण एवढेच की धर्मगुरूंच्या चुकीच्या आदेशाचेही उल्लंघन करण्याची हिम्मत होत नाही. त्यांचे बरोबरच वाटते, कधी विचाराने तर कधी धाकाने.

धाक कशाचा?

तो याचा की बहुसंख्य शीख बांधवांना धर्मगुरूंचे आदेश शिरसावंद्य असतात त्यामुळे त्यांच्या आदेशाचे उल्लंघन केले तर धर्मातून बाहेर फेकले जावे लागेल. आणि विचार असाही केला जातो की सर्वश्रेष्ठ धर्मगुरू ते कसे चुकीचे करतील? गफलत आहे ती येथेच.

— आदेश देणारे चूक करतातच.

— त्या आदेशांना आपल्या मूकतेने अर्थ प्राप्त करून देणारे अधिक मोठी चूक करतात.

— मानवी आत्मगौरव धुळीला मिळवणारे ते आदेश इमानेइतबारे पार पाडणारे घोडचूक करतात.

पण सर्वात भयंकर ते हे की यातील कुणालाच हे असे काही जाणवत नाही.

काही वर्षांपूर्वी एक आणीबाणी या देशाने अनुभवली. निर्बंध कडक होते. हात असून लिहावयाची मनाई होती. पाय असून मोर्चे काढता येत नसत. शब्द उच्चारण्यासाठी तोंड उघडायला आधी परवानगी लागे. वर्षा दीड वर्षाची ती आणीबाणी इथल्या जनतेने निर्धाराने उलथून पाडली.

पण अंधश्रद्धेची आणीबाणी अधिक अवघड असते. हातापायात बेड्या असल्याची खंत, संताप, चीड असली की सांगता येते, 'उठ वेड्या, तोड बेड्या.' पण त्या बेड्यांना फुलांचे गजरे समजून ते माळण्यात आणि मानवी प्रतिष्ठा पायदळी तुडविणाऱ्या उपायांना मुक्तीचे महाद्वार समजून मिरवण्यात धन्यता वाटू लागली की बेड्या तोडण्याची आशाच निकालात निघते. म्हणूनच शतकामागून शतके उलटली तरी त्या बेड्या मजबूत आणि शाबूत राहतात. धर्मश्रद्धेचे कवच चढवल्यामुळे सुवर्णाचे पाणी चढवलेल्या अलंकाराप्रमाणे त्यांची झळाळी दिमाखदार राहते; त्या अक्षय व अभेद्य बनतात. माणसाचे माणूस म्हणून असलेले मूल्य गाडून टाकून त्या थडग्यावर सन्मानाने आणि पावित्र्याने मिरवतात.

व्यक्तिस्वातंत्र्याचे आत्मतत्त्वच गहाण टाकायला लावणाऱ्या धर्मांध अंधश्रद्धेपेक्षा आणखी खतरनाक ते काय असणार?

♦♦♦

विवेकाचा आवाज

क्वचितच कधीतरी होणारी धार्मिक महापूजा, तीही सार्वजनिक असली की तिचे पावित्र्य आणि तिची इष्टता गृहीतच धरायची असते. विरोध करणे म्हणजे हात दाखवून अवलक्षण करण्यासारखे.

तरीही नेमिनाथनगर, सांगली येथे होणाऱ्या जैन समाजाच्या कल्पद्रुमविधान पूजेच्या समोर मौन बाळगून आम्ही उपोषणाला बसलो. जैन बांधवांची प्रचंड नाराजी होती.

खरे तर त्यांच्या लेखी आम्ही भले कार्यकर्ते होतो. यात्रांतील पशुहत्येच्या विरोधात संयुक्त सहकार्याने आमचा संघर्ष चालू होता. यात्रेतील भाविकांचा रोष पत्करून पशुहत्येविरोधात आम्ही प्रबोधन करत होतो. सांगली जिल्ह्यात यात्रेत धार्मिक भावनेने नवस फेडण्यासाठी पशुहत्या करणारे बहुसंख्य बांधव धनगर होते. त्यांच्या धर्मकृत्याला आम्ही करत असलेला विरोध त्यांना अनाकलनीय होता. आमच्या जैन बांधवांच्या दृष्टीने मात्र तो पूर्णपणे समर्थनीय होता. त्याच जैन

बांधवांना कल्पद्रुमविधान पूजेला आम्ही करत असलेला विरोध अनाकलनीय, अयोग्य, अस्थानी वाटत होता; प्रक्षुब्ध करत होता.

घटना वेगवेगळ्या होत्या. आशय एकच होता, तो म्हणजे ''धर्माचा आचार प्रश्नचिन्हांकित करण्याचा तुमचा अधिकार नाही.''

धर्म हा पुस्तकांच्या पानावर नेहमीच उदात्त, मंगल, महन्मधुर असतो.

जैन धर्माची स्थापना फार पुरातनकाळी ऋषभाने केली असे म्हटले जाते. हे पहिले धर्मप्रवर्तक होते. याचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. त्यांनी गृहस्थांसाठी अणुव्रत (महाव्रताचे मर्यादित पालन) व साधूंसाठी महाव्रताचा उपदेश केला. या धर्मात एकंदर चोवीस धर्मोपदेशक होऊन गेले. त्यांना तीर्थंकर म्हणतात. त्यामध्ये एकविसावे श्रीनेमिनाथ, तेविसावे श्रीपार्श्वनाथ आणि चोविसावे श्रीवर्धमान अथवा महावीर हे होते. महावीर हे इ. स. पूर्व ५९९ या वर्षी जन्मले. तरुणपणीच त्यांनी अत्यंत कठोर तप व ध्यानधारणा केली. जगातील दु:ख कसे नाहीसे करावे हा त्यांच्या चिंतनाचा विषय होता. चौदा वर्षांनी त्यांना 'केवल' ज्ञान प्राप्त झाले. नंतर पुढे लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम हाती घेतले. महावीरांनी अध्यात्म, सामाजिक सुधारणा, भाषा या क्षेत्रात मोठे कार्य केले. स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्त्रीभिक्षुणींचा स्वतंत्र संघ स्थापला; शिवाय या धर्मातील महत्त्वाची पाच व्रते सांगितली.१. सत्य, २. अहिंसा, ३. ब्रह्मचर्य, ४. अस्तेय, ५. अपरिग्रह. या योगे अनुक्रमे विश्वास, मैत्री, ओजस्विता, निष्कपटता व पुरुषार्थ अंगी बाणतो असे ते म्हणत. त्यांनी जैनांचे धर्मग्रंथ लिहिले, त्यापूर्वी एकही ग्रंथ नव्हता.

लौकिकात जैन धर्म तुलनेने अधिक संघटित आहे. त्यातील एक वर्ग धनिक आहे. व्यापार, उद्योगांवर पकड बसवून आहे. सामाजिक, राजकीय क्षेत्रावर प्रभाव पाडण्याची उमेद बाळगून आहे. व्यवहाराची उत्तम जाण आहे.

तरीही कल्पद्रुमविधान पूजा त्यांना इष्ट वाटते, रास्त वाटते.

उपोषणाला बसलेले आम्ही पत्रके वाटीत होतो.

'नेमिनाथनगर, सांगली येथे होणाऱ्या या महाखर्चिक महापूजेचा उद्देश पूजाविधी आयोजिणाऱ्यांनी सांगितला आहे – विश्वशांती, स्वशांती, धर्मप्रभावना. पूजेतून विश्वशांती, स्वशांती कशी होणार याचे विवेचन आयोजक करू शकले नाहीत. धर्मप्रभावना म्हणजे नेमके काय याचेही उत्तर लोक जमा करणे व धर्म सांगणे एवढेच मिळते. पूजाविधी, कर्मकांडे, यज्ञ यावर महावीरांनी कडाडून हल्ला चढविला होता. निरीश्वरवादी जैनसमाज उभा केला होता. त्यांना अशी धर्मप्रभावना अभिप्रेत होती काय? आज परिस्थिती पूर्ण पालटून जैन समाज तो हाच काय असा प्रश्न पडत आहे. ज्या कर्मकांडावर भगवान महावीरांनी हल्ला चढविला त्याच धर्मपंथामध्ये कर्मकांड आणि पूजा धडाक्यात सुरू झाल्या आहेत. सांगलीत होत असणारी १५ लाख रुपये खर्च करून अखंड ११ दिवस चालणारी 'कल्पद्रुमविधान' पूजा हा त्यातीलच एक प्रकार. ज्ञानमती अम्माने रचलेल्या आणि कुठल्याही धर्मशास्त्राधार

नसलेल्या या पूजेने भगवान महावीरांच्या विचारांनाच सुरुंग लावला आहे. पं. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ग्रंथात म्हटले आहे, 'सामान्य धर्मकल्पना, लोकभ्रमावर पोसलेल्या वेडगळ धर्मसमजुती, कर्मकांडे यांचे अवडंबर, उपाध्येगिरी आणि या सर्वांना कवटाळून बसलेले मिराशी हितसंबंध यावर हल्ला चढवण्याइतके धैर्य महावीरांजवळ होते.' एकीकडे अंधश्रद्ध विचारावर आयोजिली जाणारी पूजा, तर दुसरीकडे समाजातील मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करून पूजाविधीसारख्या अर्थशून्य कर्मकांडावर उधळला जाणारा, वाया जाणारा अफाट पैसा असे हे चित्र आहे. हुंडाबळी, व्यसनाधीनता, बेरोजगारी, विधवा-परित्यक्ता स्त्रियांची वाढती संख्या, निराधारांची अगतिकता अशा अनेक समस्या जैन समाजात असताना पूजेसारख्या विधीने धर्मप्रभावना कशी होणार ते कळत नाही. पूजा एक पैशाची, समाजासाठी ९९ पैसे ही भूमिका आम्हांला योग्य वाटते.''

नुकताच गणेशोत्सव पार पडला होता. त्यामुळे दुसऱ्याच्या दोषाकडे बोट दाखवित नामानिराळे होण्याची नेहमीची युक्ती वापरण्याची सोय होतीच. गणेशोत्सवात कोट्यवधी रुपयांची उधळण होते. तेव्हा कोठे जातो तुमचा शहाणपणा? तुमच्या समाजाला शिकवा काय ते! आमचे आम्ही बघून घेऊ.' असा सूर लावला गेला. हे तुमचे आणि आमचे फार सोयीस्कर असते, मूळ मुद्द्याला बगल द्यायला.

पण प्रश्न केवळ आम्हीच विचारत नव्हतो. वासंती शहा या ज्येष्ठ भगिनी. मन:पूर्वक धर्माचे आचरण करण्याचा पण त्याच वेळी समाजाभिमुख राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या, एकाकीपणे झगडणाऱ्या. त्यांनी 'केवली प्रणीत धर्मच कल्पद्रुम आहे. कल्पद्रुमविधान मात्र पैसे गोळा करण्याचा धंदा आहे.' या शीर्षकाखाली सडेतोडपणे खडसावले, पोटतिडीक मांडताना त्यांनी लिहिले, 'आजच्या कठीण काळात कल्पद्रुमाची खरी फळे तर आमचे भट्टारक चाखत आहेत. समाजासाठी काहीही न करता समाजाच्या पैशाने ते राजैश्वर्य भोगत आहेत. चांदीच्या घंगाळात स्वत:चे पाय धुवून घेत आहेत. वैभवाचे प्रतीक म्हणून हत्ती बाळगून आहेत. जोडीला मोटारीही आहेतच. हा सारा थाटमाट सांभाळण्यासाठी ही तत्त्वशून्य पूजाविधाने आणि मूठभर श्रीमंतांना स्वर्गीय ऐश्वर्यभोगाच्या थापा असे आश्वासन देणाऱ्याच्या शोधात असतातच. कुठलेही सत्कर्म न करता पुण्यफळाची आशा असते त्यांना; वर धार्मिकतेचा शिक्का मिळतो तो वेगळाच.'

'एकूण समाजाची चतुर्विध दानावरील आणि शील संयमावरील श्रद्धा या पंडित व भट्टारकरांनी उडवून लावली आहे. ती इतकी की समाजातील उच्चशिक्षित लोकांनासुद्धा असे वाटते की एखादे मंदिर बांधले किंवा सौधर्म इंद्रपदाचा भारी चढावा घेतला की स्वर्ग, मोक्ष हमखास मिळणार. अशा मिथ्या कल्पनांमुळे आपण कोणत्या मार्गाने पैसे मिळवतो याची चाड माणसाला राहत नाही. शील संयमाची त्याला किंमत वाटत नाही. समाजाच्या धर्मविचारांना असे अनिष्ट वळण लागल्यामुळे सहधर्मी बंधुभाव कमी झाला आहे. आता सांगलीत ते कल्पद्रुमविधान होत आहे

त्यात साडेचारशे इंद्रपदे विकली आहेत. त्याची किंमत कित्येक लाख होईल. याशिवाय हत्ती सवारी, घोडेसवारी व इतर पूजाविधीचे चढाव होणार हे वेगळेच. हे लक्षावधी रुपये मठ, मंदिराची धन होणार. एवढ्या पैशातून चार-दहा समाज उपयोगी संस्था सहज उभ्या राहतील. तळातील समाजाचा विकास होईल. पण समाजहिताची ही दृष्टी ना त्यागींना आहे ना धनींना. आता तळातील समाजच जागा व संघटित होण्याची गरज आहे.' अर्थात हे अरण्यरुदन ठरले हे सांगावयास नकोच. परखडपणे हे कटूसत्य समाजमानसाच्या कानापर्यंत पोचवण्याचे काम वासंती शहा आपल्या 'ज्ञान शलाका' मासिकातून सतत करत आहेत. या-ना-त्या स्वरूपात वेळोवेळी मोतीलाल छाजेड, महावीर सांगलीकर, सुरेश भटवरा, स्वरूपचंद राका, ॲड. रमेश बाफना विवेकाचा हा आवाज बुलंद व्हावा असा प्रयत्न जोपासत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील बाहुबलीच्या मूर्तीचा रौप्य महोत्सव करण्याची नामी कल्पना त्या क्षेत्राच्या संचालकांनी चार वर्षांपूर्वी काढली. खरेतर रौप्य महोत्सव एखाद्या शिक्षण संस्थेचा वा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेचा केला जातो. गेल्या पंचवीस वर्षांतील कार्याचा आढावा, पुढील कामाची दिशा यावर महोत्सवी वर्षात चर्चा विनिमय होतो. मूर्तीने पंचवीस वर्षांत असे कोणते कार्य केले आणि ती पुढे करणार आहे की तिचा महोत्सव करावा?

महोत्सव यासाठी की पैसा गोळा करायला निमित्त हवे. महोत्सवातील मुख्य आकर्षण १००८ कलशांनी करायचा अभिषेक. बाहुबलीच्या संचालकांनी काही महिन्यापूर्वी कलश विकून अठरा लाख रुपये गोळा केले. समाजातील तळाच्या स्तराला वर आणण्याची योजना सांगून त्यांनी पैसे मागितले असते तर लाख रुपये तरी जमले असते का कोणास ठाऊक? समाजाचाही दोष नाही. कित्येक शतकांपासून त्यागीकडून त्यांना अशी शिकवण मिळाली आहे की मंदिर, पूजाअर्चा यासाठीचे दान हेच खरे दान. या दानातच धर्म, स्वर्ग, मोक्ष आहे. निम्नस्तरियांच्या उन्नतीसाठी मदत करणे म्हणजे हलक्या प्रतीचे पुण्य. वासंती शहा यांनी मागणी केली होती – 'बाहुबली विद्यापीठाच्या अखत्यारीत कित्येक गुरुकुले आहेत. त्या गुरुकुलांचे व्यवस्थापन सुधारावयास हवे. जमवलेल्या लाखो रुपयांतून त्यांची सुधारणा व्हावयास हवी. कमी पगारामुळे असंतुष्ट असलेल्या कर्मचाऱ्यांना आजची महागाई लक्षात घेऊन पगार द्यावयास हवा. त्यांच्या असहायतेमुळे त्यांचे शोषण होऊ नये. मुलांच्या जेवणाचा दर्जा सुधारावा. त्यांचे शरीर तंदुरुस्त राहील आणि त्यांच्या बुद्धीचा विकास होईल असे जेवण त्यांना मिळावे. डाळीशिवायची आमटी खाऊन त्यांचे पोषण कसे होणार?'

'गुरुकुलातील मुलांना किती निकृष्ट जेवण मिळत असेल याची कल्पना आमच्याच समाजाच्या साप्ताहिक प्रगती व जीन विजयाच्या बेडबाळ गुरुकुलातील मुलांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल वाचून येईल. त्या अहवालाप्रमाणे सर्व मुले कुपोषणाचे बळी आहेत; ॲनिमिक आहेत. काही मुलांची दृष्टी मंद झाली आहे. काहींच्या कानात

दोष निर्माण झाले आहेत तर काहींना दमा झाला आहे. काहींच्या पायांना जखमा आहेत. काहींची त्वचा कोरडी पडली आहे. कित्येकांच्या टॉन्सिल्स वाढल्या आहेत. गुरुकुलातील मुलांची तपासणी झाली. त्या तपासणीचा रिपोर्ट याहून वेगळा आहे. या सर्व गुरुकुलांमधून जैनांची भावी पिढी घडत आहे. या प्राचीन धर्माचा वारसा हीच मुले चालवणार आहेत. एकीकडे लाखो रुपयांचा फंड कुजत ठेवायचा आणि दुसरीकडे पिढी खुरटवावयाची. यात कोणती धर्मभावना आहे? सर्व समाजानीच आता या मुलांबद्दल गंभीरपणे विचार करावा.'

अर्थात असे विचार होत नसतातच. धर्माच्या जल्लोषात विवेकाचे स्वर फार दुबळे ठरतात. कोल्हापूरच्या बाहुबलीवर या उत्सवात शेकडो लिटर दूध, उसाचा रस, आमरस, साखर, गूळ यांचा अभिषेक करण्यात आला. मूर्तीचे पाय सारखे तुपाने धुतले गेले. श्रवणबेळगोळच्या गोमटेश्वराच्या आद्य मूर्तीवर तर बारा वर्षांनी होणाऱ्या महाभिषेकात १९९३ च्या डिसेंबरात टँकरने दूध, रस, नारळाचे पाणी, साखर, गूळ, किलो, किलो केशर घोळलेले सुगंधी पाणी टाकले गेले. जलाच्या कलशापेक्षा दुधाचा कलश टाकणे पुण्यकारक आणि दुधापेक्षा तुपाचे त्याहून महापुण्यकारक अशी कल्पना व व्यवहार होता.

खाद्य वस्तूंच्या अभिषेकामुळे मूर्तीचे सुद्धा फार नुकसान होते. गोमटेश्वराची मूर्ती एक हजार वर्षांपूर्वीची जुनी आहे. कालाची झीज म्हणून मूर्तीत अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहेत. त्या भेगात हे खाद्य कण जातात व कुजतात. महाभिषेकानंतर पुढेही काही महिने लहान-मोठे अभिषेक होत राहतात. ठिकठिकाणचे यात्रेकरू समूहाने येऊन दूध आदी पदार्थांचा अभिषेक करतात. ते पदार्थही फटीत जात राहतात. या सगळ्याचा परिणाम मूर्तीचा दगड हळूहळू ठिसूळ व विघटित होण्यात होतो. म्हणून उत्सव संपल्यावर पुराणवस्तू संरक्षण खाते ती मूर्ती स्वच्छ करते. पण मग मुळातच अभिषेकाचा व खाद्य पदार्थ नासाडीचा अट्टाहास कशासाठी? प्रचंड महागाईच्या काळात खाद्यवस्तू अभिषेकाची ही कालबाह्य प्रथा बंद का करण्यात येऊ नये? जीवनावश्यकवस्तूंची नासधूस हा सामाजिक गुन्हा नाही काय? खाद्यवस्तूंची ही प्रचंड नासाडी म्हणजे जैन धार्मिक भाषेत अनर्थ दंड आहे. अनर्थ दंड म्हणजे कसलेही प्रयोजन नसताना केलेले पाप. आता धर्माचे ठेकेदार शास्त्रीपंडित असा युक्तिवाद करतात की हे तर धर्मकार्य. या क्रियेत काही वाया गेले तर त्याला अनर्थ दंड म्हणता येणार नाही.

हा युक्तिवाद तर वैदिकांचा आहे. यज्ञात तेल, तूप, तीळ, तांदूळ जाळतात. ते म्हणत हे धर्मकार्य आहे. या वस्तू आम्ही जाळून वाया घालवत नाही तर त्या अग्निमुखाने देवतांना पोचतात. मग त्या प्रसन्न होऊन कितीतरी पटीने अधिक धनधान्य आम्हाला देतात. पण खाद्य पदार्थांची नासधूस हे धर्मकार्य होऊ शकत नाही. मग ती नासधूस यज्ञाच्या रूपाने होवो की अभिषेकाच्या रूपाने. याच तत्त्वावर महावीरांनी यज्ञयागाला विरोध केला. शिवाय यज्ञ करून समृद्धी प्राप्त होते ही

कल्पना अवैज्ञानिक आहे. स्वाभाविकच महावीरांचा त्याला विरोध असणार. पण त्यांच्या अनुयायांनी हळूहळू अंधश्रद्धात्मक, अवैज्ञानिक अनर्थ, दंडात्मक क्रियाकांड, अज्ञतेने व स्वार्थाने जैनधर्मात आणले. हिंदुधर्मीय खाद्य पदार्थ यज्ञकुंडात जाळून वाया घालवतात. जैनधर्मीय ते अभिषेकरूपाने सांडून वाया घालवतात इतकाच काय तो फरक.

गुरुकुलातील शेकडो विद्यार्थांना महिनोन्‌महिने तुपाचे दर्शन नाही. त्यांची त्वचा कोरडी पडलेली. आंब्याचा हंगाम संपला तरी मुलांना चार आंबे खाऊ घालणे अवघड अशी हजारो जैन कुटुंबे कुठेही भेटतील. अशा वेळी पुण्यलाभाच्या मिथ्या भावनेने कित्येक लिटर आमरसाचे पाट वाहावेत, मूर्तीच्या पायावर तुपाचे शेकडो कलश टाकून ते वाया घालवावे हे कितपत योग्य?

जैन समाजात आलेला पूजा उत्सवाचा ऊत आणि खरी धर्मभावना यांचा काहीतरी संबंध आहे काय? नाव धर्मप्रभावनेचे प्रत्यक्षात व्यवहार धर्माच्या नावाने मांडलेल्या बाजाराचे, असे लिहिताना वासंती शहा यांनी जैन धर्मातील कित्येक धर्मक्रियांच्या विक्रीची माहिती दिली आहे. तीर्थकारांचे माता-पिता होण्याचा मान हवा? घ्या चढाव! इंद्रसौधर्मेंद्र पद पाहिजे? बोला-बोली, कित्येक पदांचा लिलाव होतो. जसे काही स्वर्गात नेमणुका करण्याचा अधिकार यांनाच दिला आहे! बरे या प्रतिष्ठा उत्सवाचे ठेकेदार सर्व दृष्टीने सुरक्षित असतात. गोळा केलेल्या पैशांचा हिशेब त्यांना कुणीही विचारत नाही. दोन-दोन लाखाच्या इंद्रपदाचा चढाव घेणारे व्यवहारचतुर, हुशार व्यापारी, उद्योगपतीही विचारत नाहीत. अखेर त्यांच्या लेखी तो एक सौदा असतो. इथे नकली इंद्र म्हणून भाड्याच्या हत्तीवरून मिरवलो तरी स्वर्गात असली इंद्र सौधर्मेंद्र म्हणून जन्मणार; ऐरावतावरून मिरवणार. इथल्यापेक्षा हजार पटीने जास्त सत्ता वैभव भोगणार ही त्यांची (अंध) श्रद्धा मग दिलेल्या पैशाची ते कशाला चौकशी करतील? (खरे तर त्यांनी ही चौकशी करावयास हवी की इंद्र देवांचा राजा असताना आणि देव असल्यामुळे अमर असताना तो आणखी कोण्या इंद्राला बरे येऊ देईल!)

विधी हे पैसे गोळा करण्याचे प्रभावी साधन बनले आहे. जेथे प्रत्येक पूजा विधीची विक्री होते तिथे धर्म कोठे राहिला? पुण्यसंपादनाच्या या मिथ्या धारणा समाजमनात इतक्या खोलवर रुजल्या आहेत की सुशिक्षित पिढीदेखील या विषयावर स्वतंत्रपणे विचार करायला तयार नाही. अशा वातावरणात धर्माचे ठेकेदार बिनधास्त न झाले आणि पूजा उत्सवाला बहर न आला तर नवल.

महाराष्ट्रात व कर्नाटकात शहरात व खेड्यापाड्यात जैन समाज पसरला आहे. त्यातील सत्तर टक्के कुटुंबे आज गरिबीत दिवस काढत आहेत. अज्ञानात पिचत आहेत. अनेक गुरुकुलातील मुले हलक्या तांदळाचा भात व रसम् नावाचे पाणी अल्युमिनियमच्या कळकट थाळीतून जेवत आहेत. दानधर्माचा ओघ मात्र भलतीकडेच वाहत आहे. धर्माचा जे धंदा करत आहेत ते मठपती, मंदिरपती, कोट्यधीश झाले

आहेत. आणि त्यांनी बाळगलेल्या हत्तीच्या पायाखाली सामान्य जनता मात्र चिरडली जात आहे. धर्मप्रभावकांचे लक्ष तिकडे का जात नाही?

मांगीतुंगी हे जैनांचे एक धर्मक्षेत्र. दोन कोटी रुपये खर्चून एक टोलेजंग मंदिर आणि जोडीला मानस्तंभ याचे काम तेथे चालू आहे. वास्तविक तेथे आधीच तीन-चार मंदिरे व भव्य संगमरवरी मानस्तंभ आहे. मग या नवीन बांधकामाची काय गरज? पण एका मुनीचा हट्टाग्रह एवढेच कारण. दहा वर्षे पावत्या फाडत मुनी स्वत: पैसे गोळा करत आहेत. या मुनींना झोपडपट्ट्यांत राहणारे आपलेच गरीब भक्त कसे दिसत नाहीत?

त्यांच्या निवाऱ्यासाठी ते का पावत्या फाडत नाहीत? आदेश का देत नाहीत? आपल्या गरीब अनुयायांना निवारा मिळवून देणे यात समाज व संस्कृतीचे रक्षण आहे की अनावश्यक मंदिरे उभारण्यात? पण लक्षात कोण घेतो? महाभिषेकाच्या निमित्ताने कोट्यवधी रुपये चार-सहा दिवसांत लोकांचे डोळे दिपवण्यासाठी उधळायचे, ही धर्मप्रभावना नव्हे, धन-मद आहे. लाखो बांधव हीनदीन अवस्थेत असताना भडक उत्सवात मिरवण्यात कोणती आली धर्मभावना?

ही धर्मभावना एकदा अशी विक्रीसाठी बाजारात आली तर काय होऊ शकते? अत्युच्च त्यागाच्या धर्मभावनेचेही विडंबन होऊ शकते. वासंती शहा यांनी त्याबाबत दिलेली माहिती कोणालाही अंतर्मुख करावयास लावणारी आहे. निमित्त आहे संल्लेखन व्रताचे.

माताजी अजितमती यांनी बारामतीला ७ जानेवारी ९१ पासून नियम संल्लेखना घेतली. त्यांचे वय ८० वर्षांचे. शरीराची साथ मिळेना. त्यांनी ठरविले आता हा मोह सोडायचा. नियम संल्लेखना म्हणजे धान्यपदार्थ वर्ज्य करून फक्त पेयपदार्थ घ्यावयाचे. अन्नपाण्याचा आमरण त्याग करून धर्मध्यानपूर्वक देह ठेवणे या यम संल्लेखनाची ही पूर्वतयारी. मनोविजयाची साधना करणारा साधक, संल्लेखना व्रत घेऊन आयुष्यभराच्या तपश्चर्येचा जणू कळस गाठतो. साधकाने आयुष्यभर केलेल्या मनोनिग्रहाच्या कसोटीचा हा काळ असतो. मृत्यूला निर्भयपणे सामोरे जाण्याची ती कठोर तपश्चर्या असते. सामान्य माणसाला भयप्रद वाटणाऱ्या मृत्यूला आजच्या भोगवादी युगात निरिच्छपणे व घट्ट मनाने सामोरे जाणे ही घटना जवळून पाहणाऱ्या कित्येकांना नवा आत्मप्रत्यय देणारी ठरू शकते. म्हणून ह्या साधनेचे पावित्र्य व गांभीर्य कायम राखणे ही जबाबदारी अन्य सर्व संबंधितांवर येऊन पडते.

या व्रताचाही बाजार मांडला जाणार असण्याची बातमी १-२-९१ च्या धर्ममंगलमध्ये प्रसिद्ध झाली. स्वत:ला साधूभक्त म्हणवणाऱ्यांनी साधकांकडेच पैसे गोळा करण्याचे साधन म्हणून पाहावे, सवंगपणे पुण्य खरेदी करण्याची, बेहिशेबी पैशांचे चढाव घेऊन हजारोंच्या उपस्थितीत पुण्य व प्रतिष्ठा एकाच वेळी मिळवण्याची सोय धनिकांना धर्माच्या नावाने उपलब्ध करून द्यावी हे किती विदारक?

मात्र हे नवीन नाही. ५२ साली आ. श्री. शांतीसागर महाराजांनी व त्यांच्यानंतर

श्री. वृषभसागर महाराजांनी कुंथलगिरीला संल्लेखना घेतली. दोन्ही संल्लेखना महिन्याहून अधिक काळ टिकल्या. त्या वेळी कशा-कशाचे चढाव व्हावेत, महाराजांना पाणी देण्याचा चढाव, आरती ओवाळण्याचा चढाव, पण हे एवढ्यावरच थांबले तर ट्रस्टी बनिये कसले? मुनींचा स्वर्गवास झाल्यावर पैस काढण्याच्या वृत्तीला उधाण आले. खांदेकरांचा चढाव, शिंकाळी धरण्याचा चढाव, अग्नी देण्याचा चढाव असे नाना चढाव झाले. हा सर्व प्रकार पाहून श्री समंतभद्र महाराजांनी मुळी लिहूनच ठेवले की, आपल्या मृत्यूनंतर कसलेही चढाव करू नयेत. खोबरे, तूप आदी बहुमूल्य खाद्यपदार्थांचा दहनासाठी उपयोग करू नये. व्यक्तीविषयी आदर व भक्ती दाखवण्यासाठी सरणात पोते-पोते खोबरे व डबेच्या डबे तूप ओतणे ही तर अंध मिथ्य भक्ती झाली.

भक्ती ही देखील मिरवण्याची गोष्ट झाली की सगळा सारासार विचार कसा सुटतो याचे डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे उदाहरण म्हणजे अहमदाबादच्या अतुलकुमार शहा यांचा ऐश्वर्यसंपन्न संन्यास सोहळा. ही गोष्ट १ जून १९९१ ची. अहमदाबादचे एक कोट्यधीश, हिरे व्यापारी दलपतीशेठ शहा यांचे चिरंजीव अतुलकुमार शहा यांनी त्या दिवशी संन्यास घेतला. त्यागी संन्याशाकडे जाण्यासाठी त्यांनी भोगी सोहळ्याचे एक अद्‌भुत मायाजाल उभे केले.

समारंभासाठी कॅलेंडरच्या आकाराच्या पाच हजार पत्रिका निघाल्या. त्यासाठी वीस लाख रुपये खर्च झाले. प्रत्येक निमंत्रण पत्रिकेवर तीनशे रुपये किंमतीचे चांदीचे नाणे चमकत होते. जी मिरवणूक पहिल्या दिवशी निघाली, त्या वेळी अतुलकुमार शहांच्या अंगावर भरजरी नक्षीकाम केलेली, सोन्याचा वर्ख लावलेली लाल अचकन होती. गळ्यात हिरेजडित माळा होत्या. हातात सोन्याच्या जाडजूड आंगठ्या होत्या. त्यांच्या अंगावरच्या जडजवाहिरांची किंमत साठ लाखांहून अधिक होती. असे नटून थटून तयार झालेले अतुलकुमार चांदीच्या पत्र्याने मढवलेल्या रथात आरूढ झाले. रथाला सात हत्ती लावलेले होते. तेही नटलेले. रथामागून ५० शोभिवंत घोडे, ४० उंटांच्या गाड्या आणि नाचणे गाणे करणाऱ्या अनेक ताफ्यांचा समावेश होता. ही शोभायात्रा जवळ जवळ आठ किलोमीटर अंतर चालून गेली. मिरवणुकीच्या मार्गावर अधूनमधून चांदी, सोन्याची नाणी, हिरे, माणके उधळण्यात आली. धर्मभावनेने उधळलेली आणि पुन्हा सोन्याची असलेली ती नाणी वा हिरे मिळवण्यासाठी व जपून ठेवण्यासाठी माणसांची एकच धावपळ उडाली. दुसऱ्या दिवशी सरदार पटेल स्टेडियमवर दीड लाख लोकांच्या उपस्थितीत अतुलकुमार यांचा संन्यास झाला. मुनी हित्रुच्छजी विजयजी महाराज हे नवीन नाव त्यांनी धारण केले. मात्र या नामकरणाचेही लिलाव झाले. सुरुवात अडीच लाखांपासून झाली. स्थानिक व्यापाऱ्यांवर ताण करून बेल्जियमच्या हिरे व्यापाऱ्याने सवाल १५ लाखांपर्यंत नेला. शेवटी त्यांनी आपला हक्क अतुलच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करण्याची तयारी दाखवली. सवालांची व देणग्यांची रक्कम नव्वद लाखांपेक्षा अधिक झाली. त्यानंतर दीड लाख लोकांना भोजन देण्यात आले. हे सारे पाहणारा लहान जैन व्यापारी म्हणाला, 'संपत्तीचा त्याग

करताना त्याच संपत्तीचे इतके अवास्तव जाहीर प्रदर्शन का करायचे? जैन धर्मात सांगितलेल्या सोज्वळ, साध्या, गंभीर मार्गाने ते करता आले नसते का? अतुलला खरोखरच मोक्षाची तहान होती तर ती त्याने गरिबांच्या सेवेत भागवायची. आपली संपत्ती एखाद्या धर्मादाय विश्वस्त निधीला दान करून त्यातून एखादी शिक्षणसंस्था, रुग्णालय बांधायचे.' पण खुद्ददस्तुर हिंत्रुच्छजी (पूर्वीचे अतुलकुमार शहा) यांना मात्र हे पटले नाही. त्यांच्या मते 'मला लोकांना सर्वसंगपरित्यागाचे महत्त्व पटवून द्यायचे होते. इतर लखपतींना प्रेरणा द्यायची होती.'

धर्माचे आचरण करावे, परमेश्वराच्या निकट जाण्यासाठी धडपडावे, आयुष्य अध्यात्माच्या मार्गाने, मोक्षाच्या रस्त्यावर उजळून टाकावे यासाठी सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेण्याची प्रेरणा व्हावी ही धार्मिक उन्नयनाची वाटचाल. ही खरे तर पूर्णतः व्यक्तिगत स्वरूपाची बाब आहे. मार्ग खूपच कसोटी पाहणारा आहे. पाऊल टाकण्यापूर्वी शंभर वेळा विचार करावा अशी गरज आहे. पण बहुदा असे होत नाही. आणि ते तसे होत नाही याबद्दल ब्र उच्चारणे अवघड जावे इतका दबाव असतो. उदात्त धार्मिक आचरणाच्या नावाखाली भलेभले या प्रसंगाला साक्षी होतात. जैन समाजातील प्रमुख आचार्यांनी तीन मुलींना उदयपूर मुक्कामी दीक्षा दिली. त्याला राष्ट्रपतींना निमंत्रित केले होते. ज्ञानशलाका १९ सप्टेंबर १९९३ च्या अंकात मोतीलाल छाजेड यांनी याबाबत तळमळून लिहिले होते. त्यांच्या मते जैन समाजातील बहुसंख्य लोक आपल्या संसाराची तोंडमिळवणी करताना मेटाकुटीला आलेले असतात. भारतातील इतर जातीजमातींप्रमाणे जैन समाजात मुलींना परक्याचे धन व मुलगा हा वंशाचा दिवा मानण्यात येतो. फारच थोड्या मुली शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहतात. बहुसंख्य मुलींना चूल आणि मूल यांच्याशिवाय पर्यायच नसतो.

कोवळे वय, अल्प शिक्षण, जात्याच मुलींचा भावनाप्रधान स्वभाव याचा फायदा घेऊन जैन साधू मुलींना आस्ते कदम दीक्षा घेण्यास प्रवृत्त करतात. समाजातील धनदांडगे नंतर खर्च करून दीक्षा विधी पार पाडतात. अफाट जनसमुदाय जमलेला असतो. धार्मिक, भावनिक वातावरण असते. दीक्षार्थी मुलींना खरे काय, खोटे काय हेच या प्रसंगी गोंधळलेल्या मनःस्थितीमुळे कळेनासे होते.

काही दिवसांनी दीक्षा देणाऱ्या साध्वींबरोबर मुलगी विहार करते. भर उन्हात अनवाणीपणे भिक्षा मागण्यास जेव्हा ही मुलगी प्रारंभ करते तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी येतेच पण बघणाऱ्यांचे डोळेही अश्रूंनी डबडबतात. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत या बकाल दुनियेत पायी ऊन, वारा, पाऊस यापासून कुठल्याही संरक्षणाशिवाय धर्मबंधनामुळे फिरावे लागते. मुलींनी कितीही अभ्यास केला, विद्यापीठाच्या पदव्या घेतल्या तरी त्यांना प्रमुख आचार्यपद पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे मिळू शकत नाही. संन्यास मार्गावरून परत फिरणे जवळपास अशक्य असते. पाठीमागचे दरवाजे बंद असतात. आहे त्या परिस्थितीत आयुष्य घालवणे एवढेच हाती असते. जैन समाजातील गर्भश्रीमंत, महर्षी कर्व्यांचा वारसा चालवण्याचा दावा करणारे समाजसुधारक, जैन

विद्वान या सर्वांना या प्रथेकडे पाहण्यास वेळ नसतो. त्यांना ह्यात गैर वाटत नाही. आचार्यांच्या विरुद्ध बंड करणे दूरच राहिले. धर्माचरणाचे नियम एवढे काटेकोर असतात की त्यात अत्यावश्यक कालसुसंगत बदल केले तरी ते धर्मबाह्य वर्तन मानले जाते; कठोर शिक्षा ठोठावली जाते.

जैन साध्वी मधुस्मिताजी व जयस्मिताजी यांनी जैनधर्म प्रसारासाठी अमेरिकेचा दौरा केला; तेथील जैन बांधवांच्या निमंत्रणावरून. अमेरिकेत आजमितीला सुमारे साठ हजार जैन आहेत. त्यांची अमेरिकेतच जन्माला आलेली अपत्ये तारुण्याच्या उंबरठ्यावर आहेत. समृद्धीबरोबर येणारे अनेक शाप भोगावे लागण्याची त्यांना रास्त भीती वाटते. हा जैन समाज चांगल्या प्रकारे संघटित आहे. ५१ केंद्रांतून एकमेकांशी उत्तम संपर्क ठेवून आहे. मधुस्मिताजी व जयस्मिताजी सहा महिने अमेरिकेत राहिल्या. त्यांनी २० केंद्रांना भेटी दिल्या; धार्मिक आचारविचारांचे मार्गदर्शन केले. या धाडसाबद्दल, अपार मेहनत घेऊन मिळवलेल्या यशाबद्दल खरे तर भारतीय जैन समाजाने त्यांचा गौरव करावयास हवा. तो तर दूरच राहिला; उलट मायभूमीत आल्यावर त्यांना एका अवास्तव संघर्षाला तोंड द्यावे लागले.

भारतातून अमेरिकेत पायी पोहोचणे परमेश्वरालाही शक्य नाही. अमेरिकेत पायी प्रवास करणे तिथल्या परिस्थितीप्रमाणे अनेक ठिकाणी अशक्य आहे. स्वाभाविकच त्यांना विमान व मोटारीने प्रवास करावा लागला. साध्वींनी पायी संचार करायचा या धर्मादेशाचा भंग झाला त्यामुळे या अधर्माचरणाची शिक्षा म्हणून त्यांच्या विरोधात फतवे निघाले. त्यांना भारतातील कोणत्याही स्थानकात वास्तव्य करण्यास देऊ नये; जैन बांधवांनी त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये; त्यांच्यावर साध्वी या नात्याने सामाजिक बहिष्कार घालावा अशा स्वरूपाचे एकतर्फी, टोकाचे विचार अनेक शहरांतील समाजधुरीणांनी (!) व्यक्त केले. मुंबईला विमानतळावर उतरल्या क्षणापासून या साध्वींनी पायी प्रवास सुरू केला, याचीही दखल घेतली गेली नाही.

विज्ञानाने केलेल्या प्रगतीचा उपयोग करू नये ही स्वत:च्या बुद्धीशी वैर करायला लावणारी कल्पना आहे. जैन तत्त्वज्ञानात अशी भूमिका कोठे आहे? उलट कालकालम् समायरे (उत्तराध्यायन सूत्र) याचा अर्थ कालानुरूप आचरण करावे ही जैन धर्माचीच शिकवण नाही काय?

जैन तत्त्वज्ञानाच्या नावाखाली जुनाट, कालबाह्य परंपरांचे स्तोम माजवणाऱ्या या प्रकाराविरुद्ध नाशिकच्या ॲड. सुरेश भटवरा, स्वरूपचंद राका, ॲड. रमेश बाफना या त्या समाजातील डोळस व्यक्तींनी आवाज उठवला. समाजमानसाच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन केले.

हे आवाहन पोचले नाही तर धार्मिक सोहळे ह्या धनवानांनी मिरवण्याच्या वैभव यात्रा ठरतात. बाहुबलीच्या महाभिषेकाआधी झालेल्या पंचकल्याणिक उत्सवात इंद्र, अहमिंद्र झालेले धनिक आपापल्या आलिशान गाड्यांतून येत. लाखो धर्मबांधवांच्या नजरा त्यांच्यावर लागलेल्या. आपण जणू स्वर्ग लोकीचे इंद्रच भूतलावर अवतीर्ण

झालो आहोत असा त्यांचा रुबाब असे. धार्मिक विधी संपला की क्षणभर ते तेथे थांबत नसत. आपले कौतुक करणाऱ्या निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या सामान्यांच्या समुदायात मिसळण्याचा ते प्रयत्नच करत नसत. करोडो रुपयांचे हे सोहाळे मग सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने कितपत सफल ठरणार?

ते सफल ठरत नाहीत याचे कारण कितीही उदात्त तत्त्वे उद्‌घोषित केली जात असली तरी व्यवहारातला धर्माचा पाया पक्का हितसंबंधांचा बनत जातो. श्रवणबेळगोळसारख्या एका सर्वोच्च धर्मस्थानाबद्दल वाटणारी भीती ए. ब्रह्मरामप्पा पाटील, पुणे यांनी ज्ञानशलाकाच्याच अंकात मांडली ती अशी : कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे बाहुबलीची विश्वविख्यात मूर्ती आहे. सुदैवाने हे क्षेत्र आजपर्यंत मूळ निवासी जैनांकडे आहे. पण राजस्थानी दिगंबर जैनांनी या क्षेत्रावरही डोळा ठेवला आहे. पैशाच्या जोरावर त्यांनी या क्षेत्रात प्रवेश केल्यास ते सहजच हे क्षेत्र बळकावतील. हे क्षेत्र त्यांच्या ताब्यात गेल्यास मूळ निवासी जैनांचा एक अमोल ठेवा नाहीसा होईलच पण त्यांच्या जैनत्वातदेखील बाधा येईल. हे व्यापारी पेशाचे लोक मूळ निवासी जैनांना धर्मबहिष्कृत करण्यात पटाईत आहेत.'

'मूळ निवासी जैनांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते वणिक नाहीत. त्यांचा पारंपरिक व्यवसाय प्रामुख्याने शेती हा आहे. भारताच्या सर्व भागात हे लोक आहेत. ते राजस्थान वा गुजरातमधून स्थलांतर करून गेलेले नाहीत. पण संख्येने अल्प असलेल्या व राजस्थान, गुजरातमधून आलेल्या या वणिक जैनांनी तीर्क्षक्षेत्रे बळकावली आहेत. भारतभर १४० हून अधिक ठिकाणी हा वाद चालू आहे. गेली १०० वर्षे हे वाद सुटलेले नाहीत, सुटणार नाहीत कारण वाद सोडवायचा एकमात्र मार्ग म्हणजे ही क्षेत्रे मूळ निवासी जैन मालकाला परत करणे हा आहे. सध्याच्या मालकांना तो रुचणारा नाही. हेच श्रवणबेळगोळला होऊ घातले आहे. नुकत्याच झालेल्या महामस्तकाभिषेकाच्या वेळी या समाजाचे 'परमपूज्य' नेते निर्मलकुमार यांनी अभिषेक करण्याचा अधिकार फक्त शुद्ध जैनांना आहे असे पत्रक काढले होते. त्यांच्या लेखी शुद्ध जैन म्हणजे ज्या जैन जातीत विधवाविवाह, आंतरजातीय विवाह होत नाहीत ते. या समाजाने १९८१ च्या महामस्तकाभिषेकात पंतप्रधान इंदिरा गांधींनादेखील अभिषेक करण्यास विरोध केला होता. कारण उघडच आहे.'

श्रवणबेळगोळ जर मालकी हक्क वृत्तीच्या जातीच्या ताब्यात गेले तर दक्षिणेतील कोणत्याच जैन जातीस अभिषेक करता येणार नाही. अगदी पाटलांना देखील. कारण या व्यापाऱ्यांच्या जैनत्वाच्या व्याख्येत दक्षिणेतील कुठलीच जात बसत नाही.

दक्षिणेतील श्रावकांनी वेळीच सावध होऊन या तराजू बहादुरांना धडा शिकवणे आवश्यक आहे.

आपापसामधील रस्सीखेच एवढेच या सर्व घटनांचे स्वरूप आहे काय? तसे असते तर इतरांनी तिकडे दुर्लक्ष करणे उत्तम. कारण अशी ओढाताण जेथे हितसंबंध असतात तेथे असतेच. या हितसंबंधांसाठी पावित्र्याच्या कल्पना वेठीला धरून कशा

राबवल्या जातात हे बघण्यासारखे आहे. शासन जातीजातींनी विघटित झालेल्या समाजात आंतरजातीय विवाह इष्ट व कालोचित म्हणून त्यांचा पुरस्कार करते आणि येथे तो केला तर धार्मिक कारणासाठी अभिषेक विधी करण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याची शिक्षा सुनावली जाते. विधवा ही व्यक्ती म्हणून तिची कदर करा असे मानवतावाद सांगतो. संविधान तिला पूर्ण नागरिक अधिकार देते आणि अभिषेकाचा अधिकार मात्र तिचा काहीच दोष नसलेल्या या वैधव्यासाठी तिला नाकारला जातो.

धर्मभावनेचे नैतिक तेज निष्प्रभ झाले की मग शुष्क कर्मकांडी व्यवहार उरतो, मूल्य जाणिवेचे तत्त्व गमावलेला. वर्धमान महावीराचे तत्त्वज्ञान हे माणसाने मानव समाजात कसे वागावे याचे नियम सांगते. ही शिकवण महत्त्वाची आहे, यात शंकाच नाही. ही शिकवण अंमलात न आणणाऱ्या आपल्या धर्मबांधवांबद्दलचा समाजाचा रागही रास्त मानला पाहिजे. पण मूळ तत्त्वाचे अवधान सुटले आणि कर्मकांडाचे झापडबंद आकलन उरले की या अधर्माचरण करणाऱ्या धर्मबांधवांनाही कसा तरतम भाव लावला जातो हे बघण्यासारखे आहे.

हर्षद मेहता व दिलीप कोठारी हे दोघेही जैन धर्माचे अनुयायी आहेत. या देशातील जनतेच्या पैशावर हजारो कोटी रुपयांचा बँक गैरव्यवहार केलेला सर्वात भ्रष्टाचारी माणूस म्हणून हर्षद मेहता आता सर्वांनाच माहीत आहे. दिलीप कोठारी कोण? ते जैन समाजातले एक बडे उद्योगपती आहेत. ४० कोटी रुपये खर्चून हैद्राबादजवळ अलकवीर नावाचा प्रचंड मोठा कत्तलखाना ते काढत आहेत. या अद्ययावत कत्तलखान्यात दरवर्षी चाळीस लाख प्राण्यांची कत्तल होणार आहे.

समस्त जैन समाजात एकच खळबळ उडाली. काय हा अघोरीपणा? कत्तलखाना आणि तो एका जैनधर्मीयाचा? भारतातून जैनधर्मीयांची ३५० हून अधिक सामाजिक, धार्मिक नियतकालिके प्रकाशित होतात. बहुतेकांनी कोठारीच्या या प्रकल्पाची दखल घेतली. कडाडून जाहीर निषेध केला. जैन समाजाच्या अनेक नेत्यांनी त्यांना दूषणे दिली. कोठारी यांनी या प्रकल्पापासून परावृत्त व्हावे म्हणून त्यांची मनधरणी करण्यापासून ते त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी देण्याचे सर्व उपाय अवलंबिले जात आहेत.

दिलीप कोठारी हे जैन असूनही हिंसक धंदा करणार? केवढे हे महापाप? पण जैन धर्मात हिंसा हे एकमेव महापाप नाही. असत्य, चोरी, लांड्यालबाड्या व फसवणूक करणे, आणि परिग्रह (आवश्यकतेपेक्षा प्रचंड अधिक जमवणे) ही देखील महापापेच आहेत.

हर्षद मेहता या दुसऱ्या जैन गृहस्थाने असत्य, चोरी आणि महान परिग्रह ही तीन महापापे केली आहेत पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे दिलीप कोठारीचा निषेध करणाऱ्या एकाही महाभागाने हर्षद मेहताचा निषेध केला नाही. असे का व्हावे बरे?

याचे कारण असे संभवते की, दुर्दैवाने आजचा जैन धर्म मूठभर वणिकांच्या ताब्यात आहे. वणिकांनी जैन समाजातील बुद्धिजीवी व श्रमजीवी वर्गाला संपवून

टाकले आहे. हा वणिक समाज बहुतांशी अनुत्पादक दलालांचा समाज झाला आहे.

हे वणिक लोक श्रावकांनी पाळावयाच्या पाच अणुव्रतांपैकी सत्य, अचौर्य आणि परिग्रहप्रमाण ही तीन व्रते पाळू शकत नाही. ते फक्त प्राणी संदर्भातील अहिंसेचे पालन करू शकतात. (महात्मा गांधींची property is violence मालमत्ता हीच हिंसा आहे ही हिंसेची व्याख्या त्यांना परवडणारी, पचणारी नाही.) म्हणून त्यांनी जैन समाज हा अहिंसा व शाकाहार असा जगाचा समज करून दिला आहे. फक्त एकच तीही बाह्यांगाची कसोटी उरली की, कांदा लसूणदेखील न खाणारा शाकाहारी हर्षद मेहता जैन धर्मविरोधी अधर्माचरण करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मग त्याचा निषेध करण्याचे प्रयोजन काय?

स्वत: जैन असलेल्या चिंचवडच्या महावीर सांगलीकरांनीच ही सारी कैफियत मांडली आहे. या सर्व विवेचनावरचे संतप्त प्रतिवाद मला माहीत आहेत. सगळेच असे कोठे वागतात? काहींची उदाहरणे देऊन धर्माला बदनाम का करता? स्वत:च्या पायाखाली काय जळते बघा की? असे अनेक प्रश्न विचारले जाऊ शकतात. प्रश्न साधा आहे. आरोप, प्रत्यारोपाचा नाही, धर्माची वकिली करण्याचा नाही; अंतर्मुख होऊन विचार करण्याचा आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने कधीच अमक्या एखाद्या धर्मजातीच्या बाजूने वा विरोधात काम केलेले नाही. सगळ्याच धर्मांतील अयोग्य वर्तनावर, अंधश्रद्धांवर आम्ही आघात करतो. नैतिक, धार्मिक आचरणाचा मन:पूर्वक आदर करतो. जैन धर्माचे अनुयायी अधिक संघटित, प्रगल्भ आहेत म्हणून त्यांच्यावर जबाबदारी अधिक, त्यामुळे त्याची चिकित्साही सर्वांच्या आधी होणार हा मुद्दा मात्र आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जैन धर्मातीलच काही जण खराखुरा उन्नत नैतिक जैन धर्म प्रगट व्हावा या उदात्त धार्मिक भावनेने हा प्रयत्न आज सातत्याने करत आहेत. त्याला पाठिंबा मात्र अत्यल्प मिळत आहे. किंवा खरेतर उपहासच पदरी येत आहे. अशा वेळी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसारख्या कठोर पण विधायक धर्मचिकित्सेची निकड मानणाऱ्यांनी त्यांना मदत करावी हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

देवपदाचे लिलाव, साध्वीच्या समाधी मरणाचे चढाव, प्रचंड मंदिरे, दुधा-तुपाचे अभिषेक हे महावीरांना अभिप्रेत असलेल्या धर्माचे रूप आहे काय? संन्यास लादला तर जात नाही? स्वखुषीने संन्यास घेऊनही निर्धार नाही टिकला तर सन्मानाने गृहस्थाश्रमात माघारी येणे व्यवहारात अशक्यप्राय तर होत नाही? साध्वीच्या परदेशप्रवासाला केलेल्या बंदीमुळे धर्मात कालसुसंगत बदल करण्यास नकार तर दिला जात नाही? धर्मावर वाढणारे धनिकांचे प्राबल्य, सनातनत्वाचा आग्रह, विधवाविवाह विरोध, हर्षद मेहताबद्दल गुपचूप आणि दिलीप कोठारीबद्दल आगपाखड यातील खऱ्या जैनतत्त्वाला उपकारक काय? अतिरेकी परिग्रहाच्या मागे लागलेल्या हावरट धनिकांचे नियंत्रण अपरिग्रहधारक मुनींच्याकडून होण्याऐवजी गंगा उलटीच वाहू लागली काय, अशी शंका सामान्य भाविकाला येऊ लागली तर त्यात ना धर्माचार्यांचे

हित ना धर्माचे.

विवेकाचा आवाज चारी बाजूंनी वाढण्यात अंतिमत: सर्वांचेच हित आहे असे नाही वाटत?

♦♦♦

समाजक्रांतीचे पाऊल पुढेच पडावे

डॉ. शंकर देवकर हे सातारा जिल्ह्यातील उच्चकुलीन मराठा समाजातील युवक. या समाजात आजही विधवा-विवाहास तीव्र स्वरूपाची मनाई आहे. वरपक्षाची गोष्ट सोडाच, परंतु वधूपक्षाला, एवढेच कशाला, संबंधित विधवेलाही असा विचार अत्यंत चुकीचा, अपवित्र, अप्रतिष्ठेचा व घराण्याला बट्टा लावणारा वाटतो. कल्पनेलाच प्रचंड विरोध, तर कृती दूरच राहिली.

डॉ. शंकर देवकर हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते, परिवर्तनवादी विचार मानणारे व ते कृतीत आणण्यासाठी धडपडणारे. त्यांनी ही अनिष्ट रूढी स्वत:पासून सुरुवात करून मोडायची ठरवले. त्यासाठी भरपूर विरोध सहन करत मराठा समाजातील सविता निंबाळकर या सापत्य विधवेशी ते १९९३ मध्ये विवाहबद्ध झाले. समाजक्रांतीचे पाऊल त्यांनी कृतीत उचलले.

काळ झपाट्याने बदलत चालला. जुन्या समाजधारणेची मूल्ये आणि त्यांना आधार देणारे धर्मसंकेत कालबाह्य झाले पण गतिमान जगाबरोबर माणसाची मने त्या गतीने बदलली नाहीत. परंपरेने कवटाळलेल्या रूढी त्या मनांनी सोडल्या नाहीत. परिणामी आजच्या सामाजिक गरजा व जुन्या अर्थहीन पण शोषणकारी प्रभावी रूढी यात विसंवाद निर्माण झाला. त्यांना धीटपणे सामोरे जाण्याऐवजी माणसे सफाईदार बगल देण्यात धन्यता मानू लागली.

एखादी स्त्री कोणत्याही कारणाने विधवा झालेली असो, आजही तिला पांढऱ्या पायाची व कमनशिबी म्हणूनच हिणवले जाते. मंगल प्रसंगी तिला हटकून दूर ठेवले जाते. ती आलीच तर ते अशुभ मानले जाते. विधवा आणि परित्यक्ता स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क मिळावा म्हणून महात्मा फुल्यांनी खूप परिश्रम घेतले. राजर्षी शाहू महाराजांनी १९१७ सालीच आपल्या राज्यात पुनर्विवाह कायदा केला. स्वत:च्या मुलाचे अकाली अपघाती निधन झाल्यानंतर स्वत:च्या सुनेचा पुनर्विवाह, तिची इच्छा असल्यास करून देण्याची मनाची उदारताही त्यांनी दाखवली होती. काही जातीसमूहांत विधवा-विवाह आता निषिद्ध मानला जात नाही. परंतु महात्मा फुले व

शाहू महाराजांचा वारसा मानाने मिरवणाऱ्या मराठा समाजात याबाबतची स्थिती काय आहे?

मराठा समाजातील तरुण स्त्री विधवा होते. तिचा काहीही दोष त्यामध्ये नसतो. कधी अपघातात पतीचे निधन होते, कधी तो सैन्यात लढाईमध्ये मारला जातो. कधी व्यसनाधीन होऊन तरुणपणीच मृत्यू ओढवून घेतो. तर कधी आजारपणामुळे मृत्युमुखी पडतो. मुलीचे सारे आयुष्य उलटेपालटे होते. सुखी संसाराच्या स्वप्नांची राखरांगोळी होते. तिच्या तारुण्यसुलभ भावना, सुखी जीवनाचा हक्क व कल्पना यांना कवडीमोलाची किंमत देऊन, नैसर्गिक प्रेरणांना दडपून अखेरपर्यंत संन्यस्त वृत्तीने जगण्याची एक अटळ सक्ती तिच्यावर लादली जाते. अत्यंत गरजेशिवाय तिला घराबाहेर पडायला मनाई होते. घरातले हसणे, खिदळणे निषिद्ध मानले जाते. पुरुषांशी कामासाठी बोलणेदेखील चांगले मानले जात नाही. स्वतःच्या पायावर उभी करण्यासाठी तिला शिक्षण देण्याचा विचार पाप मानला जातो. इतर कुटुंबियांच्या करड्या नजरेखाली, चार भिंतीच्या आतच तिला मर्यादित आयुष्य कंठावे लागते. विधवेच्या इतर कुटुंबियांची देखील मानसिक अवस्था फारशी समाधानकारक असते असे नाही. अल्पावधीतच आपल्या मुलीचा उजाड संसार, तिच्या भावी आयुष्याची काळजी याने आईवडिलांची मने विदीर्ण होतात. सुनेचे पाऊल वाकडे पडले तर कुळाची अब्रू वेशीला टांगली जाईल, या चिंतेने आणि जन्मभर पांढऱ्या पायाचा बोजा सांभाळावा लागणार या वैतागाने सासरची माणसे ग्रासलेली असतात. दोन्ही बाजूंची कुटुंबे तणावग्रस्त वातावरणात जगत राहतात. मानसिक स्वास्थ्याबरोबरच भौतिक प्रगतीवरही त्याचा नकळत परिणाम होतो.

एवढी अन्यायकारक अशी ही प्रथा टिकून राहिली तरी कशी? स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचे एक मुख्य कारण तिच्या अज्ञानात आहे. स्त्री शिकून सज्ञान झाल्याशिवाय आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव तिला होणार नाही. मुलीचे शिक्षण हा आपण प्राधान्याचा विषय ठरवतो का? याचे उत्तर मराठा समाजाने अंतर्मुख होऊन शोधावयास हवे. मुलीचा विवाह तुलनेने लहान वयातच उरकला जातो. त्यामुळे शिक्षणाची दारे तिला आपोआपच बंद होतात. आत्मविकास व आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याची संधी तिला कधीच मिळत नाही. स्वतंत्र निर्णय घेण्याचा साधा विचारसुद्धा ती करू शकत नाही. मग हे दुष्ट चक्र भेदण्यासाठी लागणारे उच्च मनोधैर्य तिच्या अंगी कोठून येणार? (ही स्थिती अर्थातच इतर अनेक समाजांतही आहे.) परंतु केवळ शिक्षणानेही हा प्रश्न सुटत नाही. पती हाच परमेश्वर, पती हेच स्त्रीचे सर्वस्व ही विचारसरणी आजही मनावर पगडा टिकवून आहे. दुसऱ्या बाजूला समाजातील सुशिक्षित स्त्री-पुरुषदेखील विधवा विवाह अपवित्र, अनीतीमूलक मानतात. हे संस्कार घरीदारी लहानपणापासून घट्टपणे रुजवले जातात. विधवेचा विवाह ही खानदानी घराण्याची अवनती मानली जाते आणि त्याबाबत कोणताही पुनर्विचार करण्याच्या मनःस्थितीत समाजातील सुशिक्षित वर्गही नसतो. प्रारब्धवादाचा पगडा स्त्रीच्या

मनावर बळकट असतोच. त्यामुळे आपले वैधव्य हे ती पूर्वजन्मीच्या पापाचे फळ वा नियतीचा, दैवगतीचा विचित्र खेळ समजते. ही मानसिक गुलामगिरी तिच्यामध्ये मोठ्या खुशीने परंपरेच्या उदात्तीकरणाने रुजवलेली असते. त्यामुळे अशा तरुण विधवेकडे तिच्या पुनर्विवाहाचा विषय काढताच 'थोबाड फोडेन' अशी टोकाची प्रतिक्रिया अनेकदा ऐकायला मिळते. या संस्कारातून रूढी बळकट न होईल तरच नवल. याबरोबर मराठा समाजात विधवा सर्वस्वाचा त्याग करून धर्मशीलतेचे रक्षण करतात, सर्व आयुष्य एकाकी जगून मृत पतीवरची निष्ठा व्यक्त करतात अशी गौरवपूर्ण मखलाशी केली जाते. घराण्याची अब्रू व वर्णसंकर या दोन गोष्टींचे दाखलेही हमखास जोडले जातात. या सर्वांमधून शेकडो वर्षे उलटली तरी सामान्य मराठा माणूस याविरुद्ध आवाज उठवण्याच्या भानगडीत पडत नाही. आमच्या चळवळीतील एका मराठा कुलातील तरुणाने विधवा बहिणीच्या विवाहाची खटपट परस्पर चालविली आहे हे समजताच त्याला घरातून सरळ हाकलून दिले. दुसरीकडे मराठा समाजातील अनेक मान्यवर नेत्यांनी या रूढीमुळे मुलीचे खूप हाल होतात पण काय करणार? समाज मानतच नाही अशी खंत (बोटचेपेपणा) माझ्याकडे व्यक्त केली आहे.

खरंतर खानदानाचे संरक्षण असे जर काही असेल तर ते फक्त स्त्रियांच्याच आत्मत्यागावर अवलंबून असणे कितपत योग्य? पुनर्विवाह नाकारणे हा जर खानदानीपणाचा निकष असेल तर पुरुषांच्याही पुनर्विवाहास प्रतिबंध का नाही? विधवा बंदी हा शुचितेचा आग्रह आहे की पुरुषप्रधान संस्कृतीमधील सोयीस्कर दुटप्पीपणा? जीवनस्वातंत्र्यावर प्रभावी बंदी आणून जपले जाणारे तथाकथित पावित्र्य हे खरोखरच काही साध्य करते का?

वर्णसंकराचा मुद्दा तर आधुनिक विज्ञानाने कधीच खोटा ठरविला आहे. नैसर्गिक मासिक चक्रात प्रत्येक वेळी स्त्रीच्या अंडकोषातून नवे स्त्रीबीज बाहेर पडत असते. त्या काळातच शुक्रजंतूचा स्त्री योनीत प्रवेश झाल्यास केवळ एकाच शुक्रजंतूचे त्या एकाच स्त्री बीजाशी फलन होऊन त्याचे गर्भात रूपांतर होते. बाकीचे सर्व शुक्रजंतू काही तासांत मरण पावतात. जर विशिष्ट कालावधीत असे फलन होऊ शकले नाही तर गर्भधारणा होत नाही. प्रत्येक मासिक पाळीनंतर मागील मासिक चक्रात निर्माण झालेली स्त्रीबीजे व योनीत शिरलेले शुक्रजंतू यांचा लवलेशही शिल्लक राहत नाही, हे जगविख्यात साधे ज्ञान तर शाळेतील मुलांनाही आता दिले जाते. मग अनेक वर्षांनी विधवेचा दुसऱ्या पतीशी संबंध आल्याने वर्णसंकर होईलच कसा?

गेल्या शतकात ही दुष्ट रूढी ब्राह्मण समाजालाही व्यापून राहिली होती. आगरकर, महात्मा फुले, महर्षी कर्वे यासारख्या समाजसुधारकांच्या कार्याने ब्राह्मण समाजाने आपल्या चुका सुधारल्या. शिक्षणाचा आग्रह धरला. रूढीपासून फारकत घेतली. त्याचा अनुकूल परिणाम त्या समाजावर झाला. जैन, माळी, गुरव, इतर अनेक मागासवर्गीय जाती यामध्ये एकेकाळी विधवेचा पुनर्विवाह होत नसे. परंतु बदलत्या

काळाचे भान राखून, त्यांनी याबाबतच्या आपल्या विचार-आचारांत योग्य बदल केला. काळ बदलला, परिस्थिती बदलली, की सामाजिक गरजा व समस्याही बदलतात. बदलत्या काळाचे भान जे राखतात ते पुढे जातात, यशस्वी होतात. आजही मराठा युवापिढी या मुद्यावर विचार करताना आढळते, ही एक समाधानाची बाब आहे. प्रत्यक्ष कृतीसाठी केलेल्या धडपडीला पाठिंबा देण्यासाठी समाज मात्र अजूनही पुढे येताना दिसत नाही.

काही वर्षांपूर्वी मराठा समाजातील एका विधवा शिक्षिकेचा विवाह मी लावला होता. त्याबद्दल भरपूर नाराजी व कटुता व्यक्त झाली होती. परंतु त्या समाजातील मान्यवरांच्या सहकार्याने तो विरोध शमवता आला. डॉ. देवकर अशा स्वरूपाचा विवाह करण्यासाठी आपल्या लोकांची मने वळवण्याचा तब्बल चार वर्षे प्रयत्न करत होते. तरीही विरोध कायम होता. विवाह चार दिवसांवर आला तरी 'हा विवाह मोड. तुला पाहिजे तसे स्थळ आणून ताबडतोब विवाह करून देतो.' असा आग्रह होत होताच. त्याबरोबरच 'गावात येऊ देणार नाही, देवळात पाऊल टाकू देणार नाही.' अशी धमकी होतीच. घरचे कोणीही विवाहास आले नाही. एकच बरे झाले की विरोध लवकर मावळत आहे. पण खरेतर या विरोधाऐवजी खुले कौतुक व्हावयास हवे.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम हे अंधळ्या रूढी, कर्मकांडे, परंपरा यांच्या विरोधात उभे राहण्याचे काम आहे. ते जातीधर्माच्या पलीकडे जाणारे आहे. परंतु आपला समाज जातीजातींनी बनलेला आहे हे वास्तव आहे. समाजागणिक काही वेगवेगळ्या रूढी, कर्मकांडे, परंपरा आहेत; अंधश्रद्धा आहेत. त्याबद्दल दुसऱ्या समाजाने बोललेलेदेखील संबंधित समाजाला चालत नाही. मराठा हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा बहुजनसमाज आहे. अशा वेळी त्यांच्यातील चुकींच्या प्रथांचे इतर समाज अंधानुकरण करण्याची शक्यता असते. समाजसुधारकांचा वारसा सांभाळण्याची मराठा समाजाची जबाबादारी अशा वेळी अधिकच वाढते. विधवा पुनर्विवाहाचा प्रयत्न करत असताना एक वेगळा अनुभव आला. वृद्ध माणसे स्वाभाविकपणेच बदलाच्या विरोधी असतात. परंतु वृद्ध विधवा अतिशय तळमळीने अशा विवाहाचा पुरस्कार करत होत्या. आयुष्यभर वाट्याला आलेल्या परवडीमधून ही पोटतिडीक व्यक्त होत होती. अनेक ठिकाणी विचाराच्या पातळीवर पाठिंबा व्यक्त होत आहे.

हे सारे लक्षात घेतले तर असे विवाह हे समाजक्रांतीचे पहिले पाऊल म्हणायला काहीच हरकत नाही. ते शंभर वर्षे उशिरा उचलले जात आहे याची मात्र खंत आहे. ही वाट पुढे चांगली रुळेल असा प्रयत्न अंधश्रद्धा निर्मूलन समिती करेल. आपल्या सगळ्यांच्या हार्दिक पाठिंब्याची व सहभागाची त्यासाठी गरज आहे.

♦♦♦

असेल हिंमत तर

प्रसंग पुण्यातील. अलीकडच्या काळातील. पुण्यातील नामवंत शाळा. प्रसंग हीरक महोत्सवाचा. त्या निमित्ताने त्यांनी जाहीर केली १०८ सत्यनारायणांची पूजा. पालकांच्याकडून सत्यनारायणासाठी देणग्यांच्या पावत्या फाडल्या, खुशीच्या सक्तीने.

आम्ही विरोध नोंदवला.

एक भाग असा की त्या शाळेच्या संचालकांनी, शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी खुशाल सत्यनारायण घालावा. तो त्यांच्या व्यक्तिगत धर्मस्वातंत्र्याचा भाग, पण त्याचे जाहीर संघटित प्रदर्शन शाळेच्या आवारात कशासाठी?

दुसरा भाग अधिक महत्त्वाचा. सत्यनारायणासारखी पोथी चमत्काराच्या कहाण्यांनी भरलेली शिक्षण क्षेत्रात कशाला? त्यातही त्या पोथीमध्ये ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखापासून, क्षत्रिय बाहूपासून, वैश्य स्कंधापासून आणि शूद्र पायापासून निघाले असा उल्लेख खुलेआम आहे. तो कालसुसंगत की कालविसंगत? गाडगे महाराजांनी किती कठोर भाषेत या पोथीचे वाभाडे काढले आहेत.

पूजेच्या समोर धरणे धरले. मंडपात एक बंद पेटी ठेवली. त्यावर लिहिलं. 'Speak out' 'बोलके व्हा' 'मोकळे व्हा!' मंडपाजवळ येणाऱ्या सर्वांना कागद आणि पेन द्यायचे आणि आमच्या धरण्याबद्दल त्यांचे स्पष्ट मत लिहून पेटीत टाकायला सांगायचे.

शिव्या आणि ओव्यांनी पेटी भरली.

आश्चर्य असे की बहुसंख्य शिव्यांच्यामध्ये एकच राग या-ना-त्या भाषेत आला होता. फक्त हिंदूंच्या अंधश्रद्धांवर का बोलता? जरा बोला ना मियाँभाईंबद्दल!

तुम्हांला जत्रांच्यामधले बकरे बळी दिसतात पण कुर्बानी प्रथेबद्दल तोंडावर बोट का? गाणगापूरमधल्या अंगात येण्याबद्दल लिहिता आणि नांद्राच्या दर्ग्यावर लिहिताना काय लेखणी मोडते का?

पोथीपुराणावर बोलताना जीभ चुरुचुरु चालते मग कुराणावर बोलताना काय दातखीळ बसते?

"हिंदुधर्मबांधव सहिष्णू म्हणून बिचारे गप्प ऐकतात. असेल हिम्मत तर जरा इस्लामबद्दल बोला की?"

एकूण मथितार्थ की जो महाराष्ट्रभर अनेकांच्या बोलण्यात या-ना-त्या प्रकारे डोकावत असतो. तो हाच की ही मंडळी फक्त हिंदू अंधश्रद्धा निर्मूलनवादी आहेत. खरे काय?

खरे हेच की हा एक गैरसमज आहे. चळवळीचे यश झाकोळण्यासाठी सहेतुकपणे पसरवलेला.

शास्त्रीय नाही पण सोप्या भाषेत सांगायचे तर आमची भूमिका अगदी स्पष्ट आहे. अंधश्रद्धा हा आम्ही श्रद्धेच्या क्षेत्रातला काळाबाजार मानतो. आमचा विरोध आहे, काळ्या बाजाराला मग तो हिंदू असो वा मुसलमान, ख्रिश्चन असो वा बुद्ध!

आणि याची उदाहरणे तरी किती द्यायची?

पुणे जिल्ह्यातल्या इंदापूरजवळ मीरावलीबाबाच्या दर्ग्यावर जन्नतबी दिलावर शेखच्या अंगात यायचे. भुते उतरवण्यासाठी झपाटलेल्या (?) माणसांना दिवसरात्र खांबाला बांधून मारहाण व्हायची, दिलावर शेखची लेखी माफी घेऊन चळवळीने ते बंद पाडले.

सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात कटगुण गावी मोहरमला जहरी नागदंशावर मंत्र दिला जावयाचा. जहर उतरवण्यासाठी तो प्रतिबंधात्मक दुआँ देण्याचा प्रकार. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने थांबवला.

सांगली जवळच्या नांदणी गावी पिसाळलेल्या श्वानदंशावर (ज्यामुळे रोग झालाच तर जगात त्या रोगावर (रेबीजवर) औषध नाही.) रमजान गुंडू शेख नामक कोणी औषध देतो; माणसांच्या मृत्यूला कारणीभूत होतो. समितीने त्यावर कोर्टात खटला घातला. जुन्नरच्या तुर्रेवालाबाबा इनामदार याने गादीसमोर या, मूठ मारून रक्त ओकायला लावतो असे आव्हान दिल्यावर त्याच्यासमोर जाऊन मी उभा राहिलो. सोबत स्वत:वर मूठ मारून घेण्यास तयार असे पंचवीस कार्यकर्ते होते. होकारार्थी उत्तराला न उचलता येण्याएवढा, जड लागणाऱ्या आणि नकारार्थी उत्तराला फुलासारखा हलका होणाऱ्या जैतुनबी मुल्लाच्या लंगरच्या चमत्काराची बनवाबनवी कायमची थांबवली.

अघोरी विद्येच्या (ब्लॅक मॅजिक) साह्याने 'मकान भरनेका पाच हजार, मकान खाली करनेका पाच हजार' असा धंदा करणाऱ्या मुंब्र्याच्या काद्रीबाबाला अटक करण्यासाठी मुंबईत पहिल्यांदा मॅजिक ड्रग ॲन्ड रेमेडिज हा कायदा वापरायला लावला.

करमअली दरवेश असा पुकारा केल्यानंतर हाताच्या बोटाच्या नुसत्या स्पर्शाने भलामोठा दगड वर नेण्याची दूरदर्शनने गाजावाजा करून दाखवलेली खेडशिवापूरच्या दर्ग्यावरील चमत्काराच्या मागची वस्तुस्थिती प्रत्यक्षात तेथे जाऊन उघडकीस आणली.

महात्मा फुलेंच्या घराजवळ सर्व असाध्य रोगांवर पवित्र तीर्थ देणाऱ्या मुसाबाबा शेखचा भलताच बरकतीला आलेला धंदा, ते तीर्थ म्हणजे पेशवेपार्कमधील व्याघ्रमूत आहे हे सिद्ध करून त्याला चंबूगबाळे आवरावयास लावले.

प्रार्थनेने मुके बोलू लागतात; पांगळे चालू लागतात. अंधळ्यांना दृष्टी येते असा प्रचार करून जाहीर प्रार्थना करणाऱ्या स्वित्झर्लंडहून आलेल्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या विरोधात मोर्चा नेला. गावच्या जत्रेत नवस फेडण्यासाठी पळत येऊन देवळाच्या दगडी भिंतीवर डोके आपटून टक्कर घेण्याची रूढी सातारा जिल्ह्यात जावळी व गुजवरे येथे फक्त नवबौद्धांतच धर्मांतरानंतर अगदी मागील वर्षापर्यंत चालू होती. ती सातत्याने प्रयत्न करून, प्रक्षुब्ध जमावाची जोखीम पत्करून थांबवली. आणि विनाकारण

लक्षावधी रुपयांची उधळपट्टी करणाऱ्या 'कल्पद्रुमविधान' या जैन समाजातल्या पूजेलाही उपोषण करून विरोध नोंदवला.

पण खरेतर आमची भूमिका एवढीच मर्यादित नाही. त्याला महत्त्वाच्या इतर बाजू आहेत.

या देशात साधारणत: ८०% लोक हिंदू आहेत. स्वाभाविकच समितीकडे येणाऱ्या अंधश्रद्धांच्या प्रकरणांपैकी ८०% हिंदूंची असणार. म्हणजेच अंधश्रद्धा विरोधात १० प्रकरणांत लढा दिला तर त्यातील आठ असणार हिंदू समाजातील आणि दुसऱ्या बाजूला कार्यकर्तेही ८०% हिंदूच असणार. आपल्या समाजाची वास्तवता काय? जातीजातीच्या अस्मिता आणि अहंकारांच्यामध्ये बंदिस्त झालेला आपला समाज; एका जातीतील अनिष्ट रूढी-परंपरा विरोधात दुसऱ्या जातीतील कोणी बोलले तर भुवया वर जातात. मग दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीने आपल्या धर्मावर टीका करण्याची बातच सोडा. यामुळे ज्या वास्तवात चळवळ करावी लागते त्यामध्ये स्वाभाविकच हिंदू धर्मामधील अंधश्रद्धा विरोधात जास्त प्रहार होणारच.

पण याहीपेक्षा एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

इस्लाम व ख्रिश्चन हे तसे अलीकडचे धर्म. इ. स. नंतरचे, शिवाय त्यांचा देव एक, प्रेषित एक, धर्मग्रंथही एकच. हिंदू धर्म असे ज्याला समजले जाते तो धर्म याहून खूपच प्राचीन. शिवाय अनेक धर्मग्रंथ, असंख्य अवतारी पुरुष आणि देव तर मोजदाद न करता येण्याएवढे. अंधश्रद्धांचे पीक अमाप येण्यास ही सारी सुपीक भूमीच. पण एवढेच नाही. अंधश्रद्धा आहेतच पण त्या विरोधात तर्ककठोरपणे खडेखांब उभे राहण्याचा वारसाही तेवढाच तेजस्वी आहे. 'खालच्या खोलीतील जेवण मला आपोआप वर पोचत नाही मग यज्ञामधील आहुती एकदम स्वर्गात कशी पोचते' हा प्रश्न चार्वाकाने हजारो वर्षांपूर्वी विचारला. 'जन्मांध मूल ठोकरा खाते आणि चुलीत हात घालून भाजून घेते हे तुमच्या परमदयाळू परमेश्वराला कसे बघवते आणि हे त्या मुलाचे पूर्व प्राक्तन म्हणत असाल तर तो महाशक्तिमान परमेश्वर ते बदलू कसे शकत नाही' असा रोकडा सवाल गौतमबुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी उभा केला. महाराष्ट्रात तर लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गाडगे महाराज यांच्या बलदंड परंपरेने अंधश्रद्धेच्या विरोधात हिंदू धर्मावर टीकेचे आसूड ओढले. 'पोटात ३३ कोटी देव असलेली गोमाता भरलेल्या पिकात तोंड घालते, त्या वेळी गोभक्त शेतकरी तिच्या पाठीवर दांडक्याचे चार रट्टे लगावतो म्हणजे तिच्या पोटातील शे-दीडशे देवांना लंबे करतो हे खरे की खोटे' असा परखड सवाल स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती करते ते एवढेच की समाजसुधारकांचा हा वारसा सांभाळू इच्छिते, कुवतीनुसार वाढवू इच्छिते.

खरेतर अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यावर हा आक्षेप घेणाऱ्यांच्या मनात एक भलताच तेढा युक्तिवाद असतो. तो असा, तुम्ही फक्त हिंदूंच्यामधील अंधश्रद्धा

घालवणार. त्यांच्या (मुसलमानांच्या) अंधश्रद्धा मात्र तशाच राहणार. अंधश्रद्धांच्यामुळे ते कडवे व आक्रमक राहणार. अंधश्रद्धा गेल्यामुळे आम्ही लेचेपेचे होणार. त्यांची आमची गाठ पडली तर आमचे कसे होणार? अंधश्रद्धा जोपासल्यामुळे माणसे जास्त सामर्थ्यवान होतात ही समजूत हा भ्रम की न्यूनगंड?

खरेतर मूलभूत प्रश्न विचारावयाला हवा तो हा की अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम मूलत: हितकारक आहे की अहितकारक. ते भल्याचे असेल तर कोणासाठीही केले तरी ते उपकारकच. आणि कामच वाईट असेल तर कोणासाठीच करावयास नको. ना हिंदूंसाठी ना मुसलमानांसाठी.

अंधश्रद्धांना विरोध म्हणजे शोषण, अनिष्ट प्रथा, रूढी, कालविसंगत कर्मकांड, त्यातून होणारी दिशाभूल, फसवणूक याला विरोध. लोकांच्या श्रद्धेचा, सात्त्विक भावनेचा वा भयगंडाचा फायदा घेऊन ही सफाईनंतर धूळफेक वा चलाख लूटमार केली जाते त्याला ना जात, ना पंथ, ना धर्म. त्याला विरोध हेच फुले, आंबेडकरांनी सांगितलेले सत्यशोधकी कर्म.

♦♦♦

क्रोधापेक्षा करुणा, उपहासापेक्षा आपुलकी

ठिकठिकाणी वेगवेगळ्या भाषेत पण एक मुद्दा मला लोक नेहमी सुनावत असतात.

'दाभोलकर, ठीक आहे सध्या जोरात बुद्धिवादाच्या गप्पा मारता. पण एक दिवस झटका बसला ना म्हणजे कळेल बरोबर!'

त्यांचे म्हणणे खरे आहे. अनपेक्षित जोरदार आघात झाला तरी मी वाकणार नाही, मोडणार नाही, अंधश्रद्धेचा बळी होणारच नाही असे घडेल का? प्रसंग आला तरच याचा निकाल लागायचा, पण तोपर्यंत तरी असेच घडेल हे मानणेच जास्त वैज्ञानिक ठरेल.

गप्पा मारताना एकदा विजय तेंडुलकर मला म्हणाले होते, 'नरेंद्र, तुमचे काम चांगलेच आहे. पण लोक अंधश्रद्ध बनतात ती त्यांची गरज असते, असे नाही तुम्हाला वाटत?'

मी चळवळीतला एक कार्यकर्ता आहे. या विश्वातील कोणतीही घडामोड कोणत्यातरी दैवी सामर्थ्याच्या प्रभावाने वा आशीर्वादाने घडते यावर माझा विश्वास नाही. स्वत:ला पडणाऱ्या सर्व प्रश्नांचा विचार लोकांनी बुद्धीने, विवेकाने करावा. तसाच आचार

करून तो प्रश्न सोडवावा असे मला वाटते.

पण हे अजिबात सोपे नाही.

एकतर माणूस हा केवळ तर्काने चालणारा, विवेकानेच वागणारा प्राणी नाही. बुद्धी व भावना, विचार व कल्पनाविलास यांच्या मिश्रणातूनच त्याचे व्यक्तित्व घडते.

दुसरे, परिस्थितीची अगतिकता अनेकदा त्याला मजबूर करते. त्यामुळे तो अनेक समज, गैरसमज, अपसमजुती मनाशी बाळगतो; स्वत:च्या बचावाला ढालीसारख्या वापरतो.

समजा वेळ रात्रीची, अमावास्येची. तातडीचा निरोप देण्यासाठी जाणे आवश्यक. अडचण अशी की रस्ता श्मशानातूनच जातो. श्मशानाजवळ घाबरून दातखीळ बसणे वा तिथेच बेशुद्ध पडणे वा भीतीने निरोप देण्याचे कामच सकाळपर्यंत लांबणीवर टाकणे दोन्ही अशक्य. मग व्यक्ती मार्ग शोधते. रामनाम म्हणत श्मशान पार करते. भूत असते, रामाचे नाव घेतल्याने ते पळून जाते. या निखालस अंधश्रद्धेचा वापर व्यक्ती करते, कशासाठी? कार्यभाग पार पाडण्यासाठी. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचे संतुलन टिकवण्यासाठी. वाहने कितीही मजबूत असली तरी रस्ते खराब असतात, त्यावरील खाचखळग्यांच्यामुळे आणि विशेषत: त्यांच्यावरील व्यक्तींना धक्के कमी बसावेत म्हणून त्यांना शॉक ॲबसॉर्बर बसवलेले असतात. धक्के बसतातच पण तीव्रता कमी होते, बहुसंख्य व्यक्ती स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या बचावासाठी स्वत:ला जे शॉक ॲबसॉर्बर बसवतात त्या म्हणजे अंधश्रद्धा! जीवनमार्गावरती भीती, निराशा, अडचणी, अपेक्षाभंग या धक्क्यातून स्वत:चे संरक्षण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

मुलाला अनपेक्षित कॅन्सर होतो.

धंद्यात खोट येते.

हातातोंडाशी येऊन यश हुकते.

असे झाले की, माणसाची भावना विचारावर मात करते. असे घडण्याची अदृश्य कारणे शोधली जातात आणि ते उपायही आग्रहाने पार पडतात.

लग्नानंतर गावाकडच्या कुलदेवताला जाणे राहिले म्हणून कॅन्सर. जागेची वास्तुशांती नाही म्हणून धंद्यात खोट, सत्यनारायणाची पूजा केली नाही म्हणून यशाची हुलकावणी.

मग स्वाभाविकच कुलदैवताला चांदीचा देव्हारा दिला जातो. वाजत गाजत वास्तुशांती होते. महापूजा यथासांग पार पडते.

आजच्या जीवनातले अनेक धक्के हे अनियंत्रित सामाजिक परिस्थितीतून आलेले असतात. नोकरी, जोडीदार, घर, शिक्षण, संधी, औषधोपचार या सर्वच बाबतीत बहुसंख्यांच्या पदरी या-ना-त्या स्वरूपाची तीव्र निराशा असते. त्यातून स्वत:ला सावरून जीवन जगणे तर अटळ असते. मग प्रत्येक जण आपापल्या आवडीनुसार सिद्धीविनायक, गुरुचरित्राची पोथी, भविष्य, मंत्रतंत्र, बाबा, गुरू, पुनर्जन्म अशा अनेक बाबींचा शॉकॲबसॉर्बरसारखा उपयोग करतो.

खरेतर जे घडले ते दैवी अवकृपेने नाही हे समजणे सोपे असते. ते का घडले?

याचे कार्यकारण हुडकणे अवघड नसते. असे होऊ नये म्हणून स्वत:ची मानसिकता व समाजाची वास्तवता बदलणे अवघड असले तरी तेच इष्ट व आवश्यक असते.

पण व्यक्तीवरचे, कुटुंबातले, समाजातले संस्कारच असे असतात की ही चिकित्सा शिकवण्याऐवजी टाळण्याकडे कल असतो. आणि कृतीच्या खडतर व लांबच्या मार्गाऐवजी अंधश्रद्धेचा शॉर्टकट जवळचा वाटतो. लांबचा मार्ग यशस्वी होण्याऐवजी स्वत: मोडून पडण्याची भीती व्यक्तीला वाटते. मग ती अंधश्रद्धेचा शॉकॲबसॉर्बर लावून जगते.

अशा अंधश्रद्धा उपद्रवी असतील तर त्यावर व्यक्तीच्या भल्यासाठीच पण कठोर प्रहार करावे लागतात.

त्या भले निरुपद्रवी असतील तरी व्यक्तीची बुद्धी त्यात गहाण पडू नये याची काळजी घ्यावी लागते. श्मशानात रामनाम घेणाऱ्याने प्रत्येक वेळा रस्ता ओलांडताना, बसमध्ये चढताना, साहेबाच्या केबिनमध्ये जाताना रामाचा जप सुरू ठेवला तर? तर अर्थ एवढाच की ती व्यक्ती राम-नाम संकटातून तारून नेते या अंधश्रद्धेची शिकार बनली आहे. बुद्धी आणि भावनेने बनलेल्या तिच्या व्यक्तिमत्त्वाचे संतुलन ढळलेले आहे. या विरुद्धही बोलावे लागतेच.

परंतु या पलीकडे एक मोठा वर्ग असा आहे की, जो अगतिकतेने, हताशपणे, नाईलाजाने जीवनात या-ना-त्या प्रसंगी अंधश्रद्धेचा शॉकॲबसॉर्बर लावून स्वत:चा बचाव करीत असतो.

घरीदारी आजूबाजूच्या वातावरणातून संस्कार घेतच सर्व व्यक्ती वाढतात. हे संस्कार बुद्धीशी सुसंगत असतात असे नाही. बहुधा नसतातच. माणसाला आधार हरघडी लागतो. हा आधार शोधताना विचारापेक्षा त्याचे संस्कार त्याच्यावर मात करतात. अडचणीच्या वेळी स्वत:च्या जीवनाचा आधारच त्या संस्कारात त्या आधारे केलेल्या कर्मकांडात तो शोधतो; मिळवतो, हे सारे सोडून देणे त्या प्रसंगी त्याच्या बुद्धीला पटले तरी प्रत्यक्ष व्यवहारात वळतेच असे नाही.

चळवळीतील शहाणपणाचा आणि माणुसकीचा भाग येतो तो याच ठिकाणी. आधार घेण्याची वास्तवता आणि आहारी जाण्याची भयग्रस्तता याचा नीरक्षीर विवेक व्यक्तीने सतत करावयास हवा. माणूस आधार घेता-घेता कधी आहारी जातो व मानसिक गुलामगिरी स्वीकारतो हे कळत नाही. म्हणूनच सजगता हवी, चुकीच्या संस्कारावर विचाराने मात करून त्याचे विवेकी आचारात रूपांतर करावयास लावणे हे खरे चळवळीचे काम असते. त्यासाठी लोकांवर संतापून भागणार नाही आणि 'काय हा मूर्खपणा!' म्हणून त्याची टिंगलटवाळी करून चालणार नाही. त्याच्याशी सतत व सहृदयतेने संवाद साधत राहावयास हवे. मार्ग खूप लांबचा आहे पण तोच इष्ट आहे. शेवटी लढा आहे माणूस बदलण्याचा आणि त्यासाठी क्रोधापेक्षा करुणेची व उपहासापेक्षा आपुलकीची खरी गरज आहे.

♦♦♦

प्रिय वाचक,

विवेक जागृतीची परंतु परंपरेच्या प्रवाहाविरुद्ध जाणाऱ्या कृतिशील विचारांची ही चळवळ आम्ही चालवत आहोत. आपणाकडून अंत:करणपूर्वक मिळणाऱ्या सहकार्यावरच ही वाटचाल होणार आहे.

कृपया लिहावे : डॉ. नरेंद्र दाभोलकर – कार्याध्यक्ष, महाराष्ट्र
अंधश्रद्धा निर्मूलन समिती.
१९, गुरुकृपा हौ. सोसा. गोडोली, सातारा – ४१५ ००१.

(चळवळीला आर्थिक मदत अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाने पाठवावी.)

प्लॅंचेट, बुवाबाजी, भानामती, भविष्य
रूढी, प्रथा, कर्मकांडे, परंपरा.
अंधश्रद्धेचा हा हजार पायांचा ऑक्टोपस-
शोषण करणारा.
या लेखनात पानोपानी आहेत त्यावर
आरपार प्रकाशझोत.
पण त्याचबरोबर आहे
अस्वस्थ आणि अंतर्मुख करावयास लावणारे
एक निखळ प्रामाणिक आवाहन.

राजकीय आणीबाणीपेक्षा
अंधश्रद्धेची आणीबाणी अधिक अवघड.
बंधनं जाणवत असली की माणूस
त्याविरुद्ध लढावयास उभा राहतो.
परंतु बंधनातच प्रतिष्ठा, धन्यता वाटू लागली तर ?
विचार स्वातंत्र्याचे आत्मतत्त्वच हिरावून घेणाऱ्या
धार्मिक अंधश्रद्धा नेमके हेच करीत असतात.

एक सर्वांगीण अरिष्ट समाजाला ग्रासत आहे.
हिंसा, द्वेष, धर्मांधता, चंगळवाद यांची वादळे
घोंघावत आहेत.
आज मानवी मूल्यांना सर्वप्रथम एकच परिमाण आहे.
आणि ते म्हणजे मानव, मूलभूत मानवता.

आपला आपण स्वत:शीच शोध घ्या.
बुद्धीला कौल लावा.
मूल्यभावनेला प्रतिसाद द्या.
आव्हानाला सामोरे जाणाऱ्या
लोकयात्रेत सामील व्हा.
कारण-
माणसाला मदत केवळ माणसेच करू शकतात.
आणि
माणसेच समाज घडवत असतात व बदलत असतात.

राजहंस प्रकाशन / पुणे.

विचार तर कराल?

नरेंद्र दाभोलकर

राजहंस प्रकाशन